टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) संस्कृतच्या उपाधीसाठी

प्रस्तुत शोधनिबंध

# राष्ट्रीय मूल्यशिक्षणामध्ये महाभारताचे योगदान


संशोधक

श्रीमती अपर्णा वामदेव जोशी

मार्गदर्शक

डॉ. मंगला मिरासदार

श्री. बालमुकुंद लोहिया

संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ



मार्च –२०१६

# प्रतिज्ञापत्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अधिनियमानुसार मी, अपर्णा जोशी, नमूद करते की, मी सादर करीत असलेल्या संशोधन प्रबंधातील लेखन स्वतंत्र स्वरूपाचे असून ते यापूर्वी किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) अभ्यासक्रमासाठी सादर केलेले नाही. यात नमूद केलेल्या अभ्यास संशोधनाचा हा माझा पहिलाच प्रयत्न असून, आजपर्यंत या विषयाबाबत कोणीही अशा वेगळ्या प्रकारचे संशोधन सादर केलेले नाही असे मी माझ्या समजूतीने नम्रपणे नमूद करत आहे.

विद्यार्थ्याची सही

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे साहित्य आणि ललित कला विद्याशाखेच्या अंतर्गत संस्कृत विषयात सादर केलेल्या – 'राष्ट्रीय मूल्यशिक्षणात महाभारताचे योगदान' या विषयावरील विद्या वाचस्पती (पीएच्.डी.) साठीचा संशोधन प्रबंध, श्रीमती अपर्णा जोशी यांनी स्वत: लिहिलेला असून पूर्णपणे स्वतंत्र असा आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात सादर केलेला नसून माझ्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली २०१३ ते १०१६ या शैक्षणिक काळात समाधानकारकरित्या पूर्ण केलेला आहे.

मार्गदर्शक सही

# ऋणनिर्देश

‘शालेय मूल्यशिक्षणात महाभारताचे योगदान या विषयाचा अभ्यास करताना अनेक लोकांची बहुमूल्य मदत झाली.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ येथील बालमुकुंद लोहिया संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ श्रीपाद भट यांनी सर्वप्रथम या विषयात संशोधन करण्यास मला अनुमती दिली. तसेच वेळोवेळी उत्तेजन देऊन सहकार्य दिले याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

माझ्या मार्गदर्शिका डॉ.मंगलाताई मिरासदार यांनी माझे लेखन वाचून मौलिक सूचना केल्या. तसेच लिखाणाबद्दल वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्यामुळेच लिखाणाची योग्य दिशा समजण्यास साहाय्य झाले. याबद्दल त्यांचीही मी ऋणी आहे.

भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळाच्या ग्रंथालयातील प्रमुख ग्रंथपाल श्री. सतीश सांगळे, साहाय्यक ग्रंथपालिका श्रीमती मेघना देशपांडे, तसेच इतर सेवकवर्ग यांच्या मदतीबद्दल त्यांचे मी अत्यंत आभारी आहे.

राज्य शिक्षणशास्त्र संस्थेतील ग्रंथपालिका श्रीमती सुशीला जाधव यांनी शिक्षणासंबंधीचे आयोग उपलब्ध करून दिले, मूल्यशिक्षणासंबंधीची पुस्तके दिली याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार !

वैदिक संशोधन मंडळाच्या श्रीमती भाग्यलता पाटसकर यांनी ऋग्वेदातील राष्ट्रकल्पनेचे संदर्भ शोधण्यासाठी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. तसेच पंडित वसंतराव गाडगीळ यांचेही संदर्भसंशोधन कार्यात जे मार्गदर्शन झाले त्याबद्दल त्यांचेही आभार.

माझ्या कुटुंबातील मंडळी, भाऊ–डॉ.मोहन आगाशे, मुले –उन्मेष, अतुल व सुना सौ. अश्विनी व सौ. उमा, ऋजुता, अद्वैत ही छोटी मंडळी यांचा पाठिंबा व बहुमोल सहकार्य याशिवाय हे काम सिद्धीस गेले नसते. त्यांच्या ऋणात राहणे हेच उचित !

या शोधनिबंधाची नेटकी मुद्रित प्रत देणाऱ्या सौ.स्मिता बाहेगव्हाणकर यांचेही मनापासून आभार.

श्रीमती अपर्णा जोशी

# अनुक्रमणिका



| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | भाग १ | |
| १) | प्रतिज्ञापत्र | II |
| २) | प्रमाणपत्र | III |
| ३) | ऋणनिर्देश | IV |
| ४) | संक्षेपसूची | VI |
| | भाग २ | |
| ५) | प्रकरण १ ले – वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय मूल्यामधील परस्परसंबंध | १ |
| ६) | प्रकरण २ रे – राष्ट्रासंबंधी विविध कल्पना | ४५ |
| ७) | प्रकरण ३रे – महाभारताचे स्वरूप, महत्त्व व त्यातील राष्ट्रीय मूल्यविचार | ६८ |
| ८) | प्रकरण ४थे –प्राचीन काळातील शिक्षणातील मूल्यविचाराची पार्श्वभूमी व आधुनिक काळातील मूल्यशिक्षणाची पार्श्वभूमी | ११२ |
| ९) | प्रकरण ५ वे – राष्ट्रीय मूल्यशिक्षणामध्ये महाभारताचे योगदान | १५२ |
| १०) | प्रकरण ६ वे – उपयोजन | २२३ |

# संक्षेपसूची

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अथर्व | – | अथर्ववेद |
| २) | ऋक् | – | ऋग्वेद |
| ३) | कठ | – | कठोपनिषद् |
| ४) | केन | – | केनोपनिषद् |
| ५) | कौ. अ. | – | कौटिलीय अर्थशास्त्र |
| ६) | गीता | – | श्रीमद्भगवद्गीता |
| ७) | छांदोग्य | – | छांदोग्योपनिषद् |
| ८) | जै. सूत्र | – | जैमिनी सूत्र |
| ९) | तै. उप. | – | तैतिरीय उपनिषद् |
| १०) | बृहद् | – | बृहदारण्यकोषनिषद् |
| ११) | BORI म.भा. | – | BORI महाभारत |
| १२) | म.स्मृती | – | मनुस्मृती |
| १३) | मुण्डक | – | मुण्डकोपनिषद् |
| १४) | रघु. | – | रघुवंश |
| १५) | वै. सूत्र | – | वैशेषिक सूत्र |
| १६) | शत. ब्रा. | – | शतपथ ब्राह्मण |
| १७) | शांडिल्य | – | शांडिल्य उपनिषद् |
| १८) | शि. ह.पु. | – | शिक्षक हस्तपुस्तिका |
| १९) | स्कंद | – | स्कंदपुराण |

# प्रकरण १ ले
# वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचा परस्पर संबंध व आवश्यकता

प्रस्तावना

## १) संशोधनाचे महत्त्व :–

व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या जीवनात मूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. तसेच शालेय शिक्षणातही 'मूल्यशिक्षणाला' अतिशय महत्त्व दिले आहे. शाळेच्या दिवसाची सुरवात मूल्यशिक्षणाने होते. यासाठी सुरवातीची पंधरा मिनिटे दिलेली आहेत. मुख्यत: इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी म्हणजे वय वर्षे५ ते १५ हा काळ हा वयाचा संस्कारक्षम असा काळ ! ज्या काळात घडलेले संस्कार चिरंतन राहतात. राष्ट्र आणि राष्ट्रीय मूल्ये यांचा विचार महाभारताच्या संदर्भात साकल्याने झालेला नाही. त्या दृष्टिकोनातून हा अभ्यास हे या संशोधनाचे महत्त्व आणि वेगळेपण आहे. महाभारताच्या विस्तृत कथेत अगणित मूल्ये आहेत. त्यातील राष्ट्रीय मूल्यांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

## २) संशोधनाचे उद्दिष्ट :–

व्यक्तिगत मूल्ये, सामाजिक मूल्ये तसेच राष्ट्रीय मूल्ये यांचा परस्परसंबंध घनिष्ट आहे. तसेच ही मूल्ये परस्परावलंबी आहेत. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी राष्ट्र ही संकल्पना स्पष्ट करून राष्ट्रीय जीवनाच्या संदर्भात या मूल्यांचा विचार करणे हे उद्दिष्ट आहे. महाभारतातील कथा, व्यक्तिरेखा, प्रसंग यात दिसणारी राष्ट्रीय मूल्ये प्रकाशात आणणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## ३) संशोधनाचे सर्वेक्षण :–

महाभारतावर झालेल्या संशोधनाची माहिती घेण्यासाठी डॉ. दांडेकर रा. ना. यांची वैदिक संदर्भसूची, प्रभातसिंह ठाकूर तसेच कुटुंबशास्त्री यांनी प्रकाशित केलेल्या प्रबंधांच्या संदर्भसूची पाहिल्या, यामध्ये असे आढळले की, भारतातील विविध विश्वविद्यालये मिळून असे एकंदर १४१ प्रबंध सादर झाले आहेत. विविध विषयांवर – जसे की, महाभारतातील स्त्रिया, द्रोपदी – एक समीक्षात्मक अध्ययन, महाभारतातील लोककल्याणाच्या राजकीय योजना, यासारखे १२१ प्रबंध आहेत. तर विविध पर्वांवर २० निबंध आहेत. परंतु, 'राष्ट्रीय मूल्यशिक्षणात महाभारताचे योगदान' या विषयाचा अभ्यास यापूर्वी कोणीच केलेला नाही.

४) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–

महाभारत ही लक्ष श्लोकात्मक अशी संहिता आहे. या ग्रंथात एकंदर १८ पर्वेआहेत. हा अतिशय विस्तृत ग्रंथ असल्याने विषयाच्या दृष्टीने आवश्यक अशा आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, भीष्मपर्व, शांतिपर्व या पर्वांचा विचार साकल्याने केला आहे.

५) गृहीतके :–

आदिपर्व, वनपर्व, शांतिपर्व तसेच उद्योगपर्व यातील कथांमधून काही मूल्ये प्रकाशात येतात. विदुरनीती, यक्षप्रश्न, श्रीमद्‌भगवद्‌गीता, शांतिपर्व–आपद्‌धर्म यातील श्लोकामध्ये, संवादातून सत्य, न्याय, त्याग, दान इत्यादि चिरंतन मूल्ये स्पष्ट करता येतील. तसेच युधिष्ठिर, विदुर, भीष्म पितामह, भगवान श्रीकृष्ण अशा सकारात्मक व्यक्तिरेखांच्या गुणांचे प्रकटीकरण करता येईल.

१) वैयक्तिक व सामाजिक मूल्यांची आवश्यकता :–

'मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे.' (Man is a social animal) हे सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल याचे वाक्य प्रसिद्ध आहे. मनुष्याला एकटे रहायला आवडत नाही. आई, वडील, पती, पत्नी, मुले व इतर नातेवाईक यांनी बनलेल्या कुटुंबात तो रहात असतो. कुटुंब सुसूत्र व सुखी राहण्यासाठी कुटुंबातील व्यक्तींचे परस्परांशी आचरण सहकार्याचे व सामंजस्याचे असणे आवश्यक असते. पूर्वीच्या काळी कुटुंबात कुटुंबप्रमुखाचे स्थान अतिशय महत्त्वाचे मानले जाई. तो सर्व कुटुंबाचे पालनपोषण करीत असे. त्याच्या आज्ञेत कुटुंबातील सर्व व्यक्तींनी राहणे अपेक्षित असे. कुटुंबातील विविध नातेसंबंध व त्याबाबतची जी विविध कर्तव्ये त्यांना धर्म अशी संज्ञा होती. 'पितृधर्म, पुत्रधर्म, पातिव्रत्यधर्म, सेवकधर्म' हे शब्द कुटुंबाच्या संदर्भात महत्त्वाचे मानले गेले आहेत. वडिलांच्या शब्दाचा मान ठेवून रामाने चौदा वर्षाचा वनवास स्वीकारला. राज्याचा त्याग करून पुत्रधर्माचे पालन केले, ही रामायणातील कथा सुप्रसिद्ध आहे.

अशा अनेक कुटुंबाचा मिळून समाज बनतो. हा समाज ज्या विशिष्ट भूभागावर राहतो, त्या भूभागाला गाव अशी संज्ञा प्राप्त होते. अशी अनेक गावे–खेडी, वस्त्या, शहरे यांचा मिळून प्रांत बनतो अनेक प्रांत वा विभाग यांचे राष्ट्र तयार होते. तर पृथ्वीतलावरील सर्व राष्ट्रांचे मिळून विश्व तयार होते. व्यक्तीचा संबंध जसा कुटुंबातील सदस्यांशी असतो, तसाच तो गाव, प्रांत, राष्ट्र व विश्व यांच्याशीही असतो. अशा तऱ्हेने त्याच्या वैयक्तिक संबंधांचे वर्तुळ अधिकाधिक विशाल होत जाते. यावरून हे सहज लक्षात येईल की, व्यक्ती व समाज यांचा संबंध अतिशय घनिष्ठ असा आहे.

हे संबंध सुरळीत व शांततापूर्ण राहण्यासाठी व्यक्तीचे जीवन नैतिकदृष्ट्या सुसंपन्न असणे अतिशय अगत्याचे आहे. समाजातील कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तीचे जीवन कर्तव्यनिष्ठ व जबाबदारीचे असावयास हवे. कर्तव्याचे यथायोग्य पालन करणारी व्यक्ती समाजाची उन्नती घडवून आणू शकते. अशा व्यक्तीचे स्वत:चे जीवन शुद्ध, पवित्र व समाधानी असते. त्यामुळे समाजात सत्प्रवृत्ती वाढीस लागतात. समाजातील स्थैर्य, शांतता व सामंजस्य टिकते. अशा सत्प्रवृत्त व्यक्ती ज्या समाजात असतात. तो समाज सुसंघटित व ऐक्यपूर्ण राहतो. अशा सुसंघटित समाजाची उन्नती वेगाने होते. याउलट ज्यांचे वर्तन असते अशा गुन्हेगारी वृत्तीच्या किंवा उपद्रवी व्यक्तींमुळे समाजात अस्थैर्य निर्माण होते. व्यक्तीच्या व सामाजिक जीवनातील शांतता लोप पावते. व्यक्ती–व्यक्तींमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. यासाठी समाजातील व्यक्तींचे आचरण नीतीने युक्त असणे, व्यक्ती नीतीमान् असणे गरजेचे व आवश्यक आहे.

२) नीतीचा अर्थ :–

गीर्वाण लघुकोशाप्रमाणे नीती हा शब्द  नी (नय् १ उ. प) नेणे किंवा पुढे चालविणे यापासून आला आहे. [१]

नीती हा शब्द स्त्रीलिंगी असून गीर्वाण लघुकोशात त्याचे अर्थ खालीलप्रमाणे दिले आहेत.

(१) व्यवस्था, (२) वर्तन, (३) शिष्टाचार, (४) न्याय्य वर्तन, (५) युक्ती किंवा योजना, (६) राजकारण, (७) सदाचार पद्धत. [२]

माणसाने कसे जगावे, त्याचे हित कशात आहे, माणसाची कर्तव्ये व त्याचे कल्याण यांचा परस्परसंबंध काय हे निश्चित करणारे असे हे शास्त्र आहे. सर्वसाधारणपणे नीती या शब्दाने सदाचरण किंवा सत्प्रवृत्ती यांचा बोध होतो.

व्यवस्था या अर्थाने रोजच्या जीवनात राजनीती, अर्थनीती, सामाजिक नीती, आध्यात्मिक नीती, शैक्षणिक नीती अशा जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये नीती हा शब्द उपयोगात आणला जातो.

जीवनाच्या विविध क्षेत्रांशी संबधित असणारी नीतीची तत्त्वे त्या त्या क्षेत्रांनुसार बदलत असतात. मात्र जीवनाच्या सर्व क्षेत्रांशी सामान्यत: समान अशी जी तत्त्वे त्यांना नीतीमूल्ये असे म्हटले जाते.

अशी मूल्ये म्हणजे सत्य, अहिंसा, अस्तेय, दान, दया, क्षमा, धैर्य, त्याग, शांतवृत्ती, संयम, निर्लोभी वृत्ती, प्रामाणिकपणा ही होत. यांनाच शाश्वत मूल्ये किंवा स्थलकालातील, चिरंतन अशी मूल्ये असे

---

१) कै. ओक जा. वि. – गीर्वाण लघुकोश (पृ. क्र.५६५)

२) कै. ओक जा. वि. – गीर्वाण लघुकोश (पृ. क्र.२७६)

म्हटले जाते. या मूल्यांच्या आचरणाने मनुष्याला जीवनातील अंतिम श्रेयाची प्राप्ती व्हावी हे नीतिशास्त्रांचे मुख्य प्रयोजन आहे.

३) पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या नीतिविषयक कल्पना [३]:–

नीती किंवा मूल्यशास्त्रासंबंधी पाश्चात्य तत्त्वज्ञानी लोकांमध्ये विविध मते आढळून येतात.

१) इ.स.पूर्व तिसऱ्या व चवथ्या शतकात प्लेटो व ॲरिस्टॉटल हे प्रसिद्ध विचारवंत होऊन गेले. नीतिशास्त्र हे बंधनवादी अथवा हेतुवादी शास्त्र आहे, असे त्यांचे मत आहे. यामध्ये विहित कृत्य ही संकल्पना मूलभूत मानलेली आहे. 'विहित' याचा अर्थ आपल्याला यदृच्छया करावे लागणारे कर्म होय. त्यासाठी विवेकशक्ती, धृती म्हणजे निर्भयता व हितकारक अशी विशिष्ट इच्छा यांचा समावेश असतो. निरामय समाजजीवनात सर्व व्यक्तींचा समतोल व सुसंवाद साधलेला असतो असे प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचे मत आहे. [४]

२) तर हेगेल डब्लू. एफ्.यांच्या मते ''व्यक्तीच्या जीवनात कर्तव्य व हित यांच्यात विरोध आढळत नाही. हेगेल यांचा काल इ.सनाचे सतरावे शतक हा आहे. मात्र विहित कृत्य हे योग्य आहे की, नाही हे त्याच्या उपयुक्ततेवरून ठरते. ज्या कृत्याचे जास्तीत जास्त चांगले परिणाम दिसून येतात त्यासच उपयुक्त किंवा योग्य कृत्य म्हणता येते. यास उपयुक्ततावाद असेही म्हणतात.'' [५]

३) इ.सनाच्या अठराव्या व एकोणिसाव्या शतकात जॉन स्टुअर्ट मिल व जी.ई.मूर हे तत्त्ववेत्ते होऊन गेले. त्यांनी नीतिशास्त्राबद्दल खालील मते मांडली.

अ) व्यवहारात आपण नैतिक निर्णय घेतो. इतरांच्या वर्तनांचे मूल्यमापन करतो. अशावेळी आपण ज्या संकल्पना वापरतो त्यांचे विश्लेषण करणे, व्याख्या तयार करणे, या दोहोंमधील परस्परसंबंध स्पष्ट करणे.

ब) ज्या कृत्यामुळे जास्तीत जास्त सुख निर्माण होते असे कृत्य करणे.

क) व्यक्तीचे हित व सामाजिक हित यातील परस्परसंबंध स्पष्ट करणे.

---

३) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोष खंड ६ वा १९७९ (पृ.क्र. ८०५ ते ८१३)

४) a) Aristotal Tran - The Nechomachean Ethics New Yark 1941.

b) Plato Tran - The Republic - New Yark 1943.

५) Hegel W. F. Tran - The Philosophy of Right, Oxford 1942.

या सर्व गोष्टींचा विचार म्हणजे अधिनीतिशास्त्र असे जॉन स्टुअर्ट मिल व जी.ई.मूर यांनी म्हटले आहे. (६)

४) इमॅन्युअल कांट – हा अठराव्या शतकातील बंधनवादी नीतिशास्त्राचा पुरस्कर्ता होऊन गेला. त्याच्या मते मानवी प्रकृतीचा श्रेष्ठ घटक विवेकशक्ती हा होय. ही शक्ती सार्वत्रिक सत्यांना जन्म देते. ही सत्ये वा तत्त्वे आदेश या स्वरूपात येतात म्हणून अशा सत्यांना नैतिक मूल्य प्राप्त होते. (७)

५) जेरेमी बेंथम, एपिक्यूरस व त्याचे अनुयायी यांच्या मते जास्तीत जास्त लोकांचे सुख ज्यामधून प्रत्यक्षात येते असे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय. हे तत्त्ववेत्ते सुखवादी तत्त्ववेत्ते म्हणून प्रसिद्ध होते. यांचा काल एकोणिसावे शतक होय. (८)

४) प्राचीन भारतातील नीतिशास्त्र :–

प्राचीन भारतात नीतिशास्त्र असा स्पष्ट उल्लेख असलेले शास्त्र अस्तित्वात होते असे आढळत नाही. मात्र समाजाची जीवनपद्धती चार वर्णांवर आधारित होती. तर व्यक्तीची जीवनपद्धती चार आश्रमांवर आधारित होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे समाजात चार वर्ण होते. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची विभागणी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम अशा चार आश्रमात केलेली होती. चार वर्णांचे गुण जे स्वभावज असे म्हटले आहे, ते व प्रत्येकाचे त्यानुसार असणारे कर्म याला अनुसरून ही विभागणी आहे असे श्रीमद्‌भगवद्‌गीतेत म्हटले आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या चौथ्या अध्यायात भगवान् श्रीकृष्ण सांगतात, ''सत्त्वरजादि गुण व सात्त्विकराजसादि कर्मेयांच्या भेदाप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णांची व्यवस्था (निर्मिती) मी केली आहे. मी तिचा कर्ता आहे, तथापि अव्यय अकर्ताहि आहे असे तू समज.''(९)

---

६) अ) जॉन स्टुअर्ट मिल – Utilitarianism, London 1861

ब) जी. ई. मूर – Principl a Ethica, Cambridge 1903.

७) इमॅन्युअल कांट – Metuphysics of morals -Tran by Abbot in Kants Theory of Ethics.

८) Benthem Jeremy - The Principles of moral & Aion legista, New Yark, 1948.

(संदर्भ – टिळक लोकमान्य 'गीतारहस्य' पृ.क्र. १०४.)

९) गीता (अ.४–१३) – चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्॥

अ) चार वर्णांचे गुण :–

त्यानुसार ब्राह्मण वर्णाचे गुण खालीलप्रमाणे आहेत.

शमो दमस्तपं शौचं क्षान्तिरार्जवमेव च।

ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्।। (१०)

(अर्थ– त्यानुसार ब्राह्मणाचे गुण खालीलप्रमाणे आहेत. मनोनिग्रह, इंद्रियांवर संयम, तप, शुद्धता, शांतवृत्ती, सरळपणा, शास्त्रीय व आध्यात्मिक ज्ञान, आस्तिक्यवृत्ती हे ब्राह्मणांचे सहजगुण आहेत.)

त्यानुसार ब्राह्मणांची प्रमुख कर्तव्ये म्हणजे अध्ययन, अध्यापन, यजन–याजन व दान व प्रतिग्रह ही आहेत. म्हणजेच स्वत: अध्ययन करणे, स्वाध्याय, विद्यादान करणे, हवन करणे, दुसऱ्यासाठी यज्ञ करणे, देणे व दान स्वीकारणे ही त्यांची प्रधान कर्तव्ये होत.

क्षत्रियांचे गुण म्हणजे शौर्य, तेजस्वी वृत्ती, मनोधैर्य, दक्षता, युद्धात पलायन न करणे, दानी वृत्ती व स्वामित्व गाजविणे हे अंगभूत गुण आहेत.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी हे खालीलप्रमाणे सांगितले आहे.

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।

दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्।। (११)

त्यामुळेच अध्ययन, यज्ञ करवून घेणे, दान, शस्त्र बाळगणे, प्राणिमात्रांचे पालन–पोषण व रक्षण करणे ही क्षत्रियांची प्रमुख कर्तव्ये मानली गेली आहेत. (१२)

वैश्यांची व शूद्रांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

कृषिगोरक्षवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्।

परिचर्यात्मक कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्।। (१३)

(अर्थ – वैश्यांची प्रमुख कर्तव्ये शेती (कृषी), गोरक्षण म्हणजे पशुपालन व व्यापार ही आहेत. तर त्रैवर्णिकांची म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची सेवा करणे हे शूद्राचे स्वभावज कर्तव्य असे सांगितले आहे.)

---

१०) गीता (अ. १८–४२) (मनु अ. १०–७५, ७६)

११) गीता – (अध्याय १८–४३.)

१२) कौ. अ. – (अधिकरण १– अध्याय ३रा).

१३) गीता – (अध्याय १८–४४) व कौ. अ. (अधिकरण १– अध्याय ३).

मात्र कौटिल्य हा बुद्धिवादी होता. केवळ प्रजाहित हेच धोरण, हे राजाचे आद्य कर्तव्य असे तो मानत असे. त्यामुळे आपल्या कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथात कौटिल्याने चारी वर्णांची कर्तव्ये दिली आहेत. मात्र केवळ त्रैवर्णिकांची सेवा एवढेच शूद्राचे कर्तव्य (धर्म) असे त्याने दिले नाही. तर शूद्राच्या स्वधर्मात वार्ता (शेतीभाती) व कारुकुशीलव कर्म (कारागिरीची कामे) ह्यांचाही अंतर्भाव कौटिल्याने केला आहे. त्यांना अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ मानले आहे. एवढेच नव्हे तर सैन्यातही केवळ क्षत्रिय नव्हे तर वैश्य, शूद्र यांनाही स्थान असावे असे कौटिल्य मानतो. यावरून मनुस्मृती व महाभारत यांच्यापेक्षाही कौटिल्याची वृत्ती अधिक उदार होती असे दिसून येते.

ब) चार आश्रम व त्यांची कर्तव्ये :–

त्याचप्रमाणे चार आश्रमांमध्येही व्यक्तीच्या आचरणासंबंधी प्रमुख कर्तव्ये सांगितली आहेत.

१) ब्रह्मचर्याश्रम :–

ब्रह्मचर्याश्रमात उपनयन संस्कार झाल्यानंतर बारा वर्षेगुरुगृही राहून अध्ययन करावयाचे असते. यामध्ये भावी आयुष्याची तयारी, पाया हा घातला जातो. श्रीकृष्ण, बलराम, सुदामा हे सांदीपनीमुनींच्या आश्रमात राहून अध्ययन करीत असत असे उल्लेख आहेत. धौम्य ऋषींच्या आश्रमात आरुणि व उपमन्यु हे शिष्य होते. कर्ण ब्रह्मास्त्राच्या प्राप्तीसाठी भगवान् परशुरामांच्या आश्रमात गेला होता. सर्वसाधारणपणे आश्रमामध्ये सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळे. गुरुगृही राहून पडेल ते काम करावे लागत असल्याने समभावाची वृत्ती व श्रमप्रतिष्ठा या मूल्यांचे संस्कार आपोआपच होत असत. यानंतर विवाह करून गृहस्थाश्रमात पदार्पण केले जाई.

२) गृहस्थाश्रम :–

गृहस्थाश्रम म्हणजे विवाह करून कुटुंबाची उभारणी करणे. तसेच कुटुंबाधिष्ठित आयुष्य होय. कुटुंबसंस्था हा समाजाचा आधार किंवा कणा असे म्हटले आहे. नैतिक मूल्यसंवर्धनासाठी कुटुंब अतिशय पोषक मानले आहे.

'मेरे सपनोंका भारत' यात महात्मा गांधी म्हणतात, ''सुसंस्कृत कुटुंब हीच एक मोठी आदर्श अशी शाळा आहे. सदाचारी माता पिता यांच्या तोडीचे चांगले शिक्षक संभवत नाहीत.''

ब्रह्मचारी, संन्यासी व नातेसंबंधातील अनाथ लोक या सर्वांचाच गृहस्थाश्रम हा मोठाच आधार होय. 'सानन्दं सदनं– धन्यो गृहस्थाश्रम:' अशी गृहस्थाश्रमाची थोरवी सुभाषितकारांनीही गायली आहे.

३)  वानप्रस्थाश्रम :–

कुटुंबाची म्हणजे गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये पार पाडल्यानंतर वानप्रस्थाश्रमात प्रवेश करावा, याविषयी मनुस्मृतीत म्हटले आहे की, 'शरीरास सुरकुत्या पडल्या, केस पांढरे झाले, तसेच पुत्रास पुत्र झाला की, वानप्रस्थाश्रमात प्रवेश करावा. मनुस्मृतीच्या सहाव्या अध्यायात वानप्रस्थाश्रमासंबंधी अनेक नियम सांगितले आहेत. (१४)

४)  संन्यासाश्रम :–

संन्यासाश्रमामध्ये म्हणजेच आयुष्याच्या चौथ्या भागात सर्वसंगपरित्याग करावा. तसेच संन्यासी होऊन संन्यस्त वृत्तीने रहावे असे सांगितले आहे. (१५)

समाजाचा आकृतीबंध म्हणजे चार वर्ण होत. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात दोन ऋचा आहेत. समाजपुरुष जो सांगितला आहे तो कशाप्रकारे आस्तित्वात आला ? त्याचे मुख कोणते ? त्याचे दोन्ही हात (बाहू) कोणते ? मांड्यांपासून कोण उत्पन्न झाले ? पायापासून कोण उत्पन्न झाले ? यांची उत्तरे त्या ऋचांमध्ये आहेत.

'ब्राह्मण हे त्याचे मुख (ज्ञानस्वरूप) क्षत्रिय–राजे हे त्याचे बाहू (रक्षणकर्ते), मांड्यापासून वैश्य व समाजपुरुषाच्या पायापासून शूद्र निर्माण झाले. (१६)

मनुष्य पायाशिवाय उभा राहू शकत नाही. पायावर तो खंबीरपणे उभा राहतो. त्याचप्रमाणे शूद्र हा समाजाचा आधारस्तंभ आहे. क्षत्रिय आपल्या बाहूंनी समाजाचे रक्षण करतात. तर ब्राह्मण मुखद्वारा ज्ञान देतात.

क)  चार पुरुषार्थांची कल्पना :–

चार वर्ण, चार आश्रम यासारखेच प्राचीन परंपरेत चार पुरुषार्थांची आवश्यकता प्रतिपादन केली गेली आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत. धर्म, अर्थ, काम व मोक्ष !

---

१४)  म. स्मृती (अ. ६.२)

१५)  म. स्मृती ( अ. ६. ३३)

१६)  ऋक् (१०.६० ११,१२)

यातील पहिल्या तीन पुरुषार्थांचा संबंध व्यक्ती व समाज यांच्याशी आहे. मोक्ष हा पुरुषार्थ मात्र सर्वस्वी वैयक्तिक स्वरूपाचा आहे. मोक्ष म्हणजे नि:श्रेयसप्राप्ती. हे मनुष्याचे अंतिम ध्येय किंवा साध्य असावे असे मानले गेले आहे. त्यानुसार 'सर्वभूतहित' हे सर्वश्रेष्ठ असे नीतिमूल्य मानले गेले आहे. मानवाच्या आयुष्याचे प्रयोजन अथवा प्रेरणा असे या संकल्पनेचे स्वरूप आहे. (१७)

अर्थ म्हणजे धनसंपत्ती ! तसेच काम याचा अर्थ पञ्चेंद्रियाच्या उपभोगाचे जे विषय त्यांच्या लाभाची इच्छा हे होय. डोळे, कान, नाक, जिव्हा व त्वचा ही पञ्च ज्ञानेंद्रिये होत. रूप हा डोळ्यांचा विषय, शब्द हा कानांचा विषय, गंध हा नाकाचा विषय, रस हा जिव्हेचा विषय, तर स्पर्श हा त्वचेचा विषय होय. अर्थ आणि काम या पुरुषार्थांची प्राप्ती धर्म या पुरुषार्थाच्या मर्यादेत राहून करावी अशी प्राचीन भारतीय नीतीशास्त्राने पारंपारिक अपेक्षा सांगितली आहे. 'धर्म' हा पुरुषार्थ सर्वात श्रेष्ठ मानला आहे.

ड) विविध कालातील धर्म शब्दाचे अर्थ :–

'धर्म' हा शब्द वेदकालापासून वेगवेगळ्या अर्थांनी वापरला गेला आहे.

१) व्युत्पत्तीच्या दृष्टीने पाहिले तर 'धर्म' हा शब्द धृ – (१ प.प. १० उ.प.) या धातूपासून तयार झाला आहे. धृ धातूचा अर्थ 'धारण करणे' असा आहे. जो धारण करतो तो धर्म होय अशी त्याची व्याख्या आहे.

२) वेदामध्ये वेगवेगळ्या अर्थांनी धर्म शब्द योजलेला आहे, ते खालीलप्रमाणे (१८)

'मी सोमाच्या पोषक तत्त्वाचे स्तवन करीन.' (१९)

'अग्नी हा समाजाचा पोषणकर्ता व यज्ञाचा साधक आहे.' (२०)

याठिकाणी 'धर्म' शब्दाचा अर्थ 'पालन करणे' 'पोषण करणे' असा आहे.

३) वेदामध्येच काही ठिकाणी 'प्राचीन नीतिनियम' किंवा 'आचाराची निश्चित तत्त्वे' असा धर्म शब्दाचा अर्थ केलेला आढळतो.

'आप्रा रजांसि दिव्यानि पार्थिवा ।
श्लोकं देव: वृणुते स्वाय धर्मणे ।।'

---

१७) जोशी गजानन नारायण – भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास (पृ.क्र. २१३) खंड १२ – नीतीशास्त्र (पृ.क्र. २).

१८) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खंड ४ था १९६०.

१९) 'पितु: नु स्तोषं महो धर्माणं तविषीम्१

२०) 'धर्माणमग्निं विदतथ साधनम्। (ऋग्वेद १– १८७.१)

(अर्थ – याने सर्व दिव्य लोक व भूलोक व्यापून टाकले. देवाने स्वत:च्या आचारविचारांच्या उत्कर्षासाठी प्रार्थनास्तोत्र रचून दिले आहे. [२१]

तर ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलात

'वरूणाच्या नीतीनियमांनी द्यावापृथिवी जे आपापल्या ठिकाणी सावरून धरले आहेत.' या अर्थाची ऋचा आली आहे. [२२]

४) वेद व उपनिषदे यांच्या काळात समाजाची विभागणी चार वर्णात विशेषत्वाने झाली. ते म्हणजे अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. तर व्यक्तीच्या आयुष्याची विभागणी ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास अशा चार आश्रमात झाली. समाजात अनेक स्थित्यंतरे झाली. या काळात 'धर्म' शब्दाचा अर्थ मानवाचे विशिष्ट अधिकार, कर्तव्ये, वर्णाश्रमानुसार आचरणाचे नियम असा झाला. याला अनुसरून क्षात्रधर्म, राजधर्म, पुत्रधर्म, शिष्यधर्म, पितृधर्म, पतिव्रतेचा धर्म, सेवकधर्म हे शब्द प्रचारात आले.

तैत्तिरीय उपनिषदाच्या अकराव्या अनुवाकामध्ये शिष्याचे अध्ययन पूर्ण झाल्यानंतर समावर्तन विधीच्या वेळी आचार्य त्याला उपदेश करतात, 'सत्यं वद। धर्मं चर ।' [२३]

याठिकाणी धर्म शब्दाचा अर्थ कर्तव्य, आचरणाचे नियम असा आहे.

५) श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या तिसऱ्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण सांगतात,

'श्रेयान्‌ स्वधर्मोविगुण: परधर्मात्‌ स्वनुष्ठितात्‌।

स्वधर्मेनिधनं श्रेय: परधर्मोभयावह: ।। [२४]

(अर्थ – परक्याचा धर्म आचरणात आणावयास सोपा असला व आपला जरी अवघड असला तरी स्वधर्माप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर होय. आपल्या धर्माचे पालन करीत असताना मरण आले तरी चांगले. पण परक्यांच्या धर्माचे आचरण करणे भयंकरच होय.)

याठिकाणी धर्म शब्दाचा अर्थ 'विहित कर्तव्य' म्हणजे यदृच्छया आपल्याला प्राप्त झालेले कर्तव्य असा आहे.

६) मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात सर्व ऋषींनी मनूला सर्व वर्णांचे व संकीर्ण जातीचे आचाराविषयीचे नियम सांगण्याची विनंती केली असा उल्लेख आहे.

तेव्हा मनूने सांगितले की, 'ऋक्‌यजु:साम व अथर्वरूप म्हणजे विधी – अर्थवाद व मंत्ररूप असे सर्व

---

२१) ऋक्‌ (४.५३.३)

२२) ऋक्‌ (क. १०.९२.२) (६.७०.१)

२३) तै. उप.(अनुवाक ११.१).

२४) गीता (अध्याय ३.३५).

वेद धर्माविषयी प्रमाण आहेत. तसेच ते वेद जाणणाऱ्या मन्वादिकांच्या स्मृती व शील धर्माविषयी प्रमाण होय. त्यांचा आचारही धर्ममूल आहे. धार्मिक पुरुषांस दोन्ही विधानांपैकी जे एक करावेसे वाटते ती त्यांची आत्मतुष्टी (मनाचे समाधान) होय. (२५)

याठिकाणी वेद म्हणजे श्रुती व स्मृति (उपनिषदे) यांनी निर्दिष्ट केलेली आचरणाची विशिष्ट पद्धत असा 'धर्म' शब्दाचा अर्थ सांगितला आहे.

७) गीर्वाणलघुकोशामध्ये धर्म शब्दाचे अर्थ खालीलप्रमाणे दिले आहेत.

१) चाल, २) पुण्यकर्म, ३) संप्रदाय, ४) आचार, ५) शास्त्रोक्त कर्तव्य, ६) कायदा, न्याय, ७) नीती, न्याय, ८) विशिष्ट गुण (२६)

८) धर्म शब्दाचा आधुनिक कालातील अर्थ :–

भारतात हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, ज्यू बौद्ध, जैन असे विविध धर्माचे लोक राहतात. या सर्व विश्वावर व मानवावर नियंत्रण ठेवणारी किंवा त्यांच्यावर सत्ता गाजविणारी एक अलौकिक, अदृश्य अशी शक्ती आहे अशी या सर्वांची श्रद्धा असते. या शक्तीला कोणी परब्रह्म, कोणी परमेश्वर,कोणी अल्ला या नावांनी संबोधतात. तर या शक्तीचा प्रेषित म्हणून कोणी जीझस्, कोणी बुद्ध, कोणी महावीर तर कोणी पैगंबर अशा विविध नावांनी त्याला संबोधतात. यांनी सांगितलेल्या तत्त्वांनुसार ही अलौकिक शक्ती व जीवन यांना जोडणारी जी आचारपद्धती त्याला धर्म अशी संज्ञा हल्लीच्या काळात दिली गेली आहे. इंग्रजी भाषेतील रिलिजन (Religion) या अर्थी येथे धर्म शब्द वापरला जातो.

९) धर्माची लक्षणे :–

कणाद, जैमिनी व वेदव्यास यांनी धर्माची लक्षणे वेगवेगळ्या प्रकारे सांगितली आहेत.

अ) कणादाने आपल्या वैशेषिक दर्शनात धर्माचे लक्षण खालीलप्रमाणे सांगितले आहे.

''ज्याच्यामुळे ऐहिक उत्कर्ष होऊन पारलौकिक सुखही मिळते तो धर्म होय.'' (२७)

ब) तर पूर्वमीमांसाकार जैमिनी व्याख्या करतात ती अशी

''प्रवृत्त करणारा, प्रेरणादायी असा जो तो धर्म होय.'' (२८)

२५) म.स्मृती (अ.२.६) वेदोऽखिलो धर्ममूलम्। स्मृतिशीले च तद्विदाम्। आचारश्चैव साधूनाम् आत्मन: तुष्टिरेव च ।

२६) आपटे ज.वि. – गीर्वाण लघुकोश – पृ.क्र. २५१.

२७) वै.सूत्र (१.१.२) यतोऽभ्युदय नि:श्रेयससिद्धि: स धर्म:।

२८) जै.सूत्र (१.१.२) चोदनालक्षणोऽर्थोधर्म:।

३)     भगवान श्री व्यासमुनींनी महाभारतातील शांतिपर्वात 'धर्म म्हणजे काय ' हे खालीलप्रमाणे सांगितले आहे.

''धारणात् धर्ममित्याहु: धर्मोधारयते प्रजा: ।

य: स्यात् धारणसंयुक्त: स धर्म: इति निश्चय: ।। (२९)

स्पष्टीकरण – सृष्टी, स्थिती व लय या जगाच्या तीन अवस्था आहेत. यापैकी स्थितीचे काम उत्तम प्रकारे चालविणे हे धारण होय. धर्म हे धारण करतो म्हणून तो धर्म : कर्तव्याचे प्रामाणिकपणे केलेले आचरण म्हणजे धर्म होय. या धारणानेच प्रजा एकत्र बांधलेल्या आहेत. नाहीतर समाज विस्कळीत होईल. तेव्हा जगाचा संसार उत्तम प्रकारे चालविण्याची धारणाशक्ती ज्यात आहे तो धर्म होय.

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की व्यक्तिगत नीती व सामाजिक नीती हे स्वतंत्र भाग नसून परस्परावलंबी आहेत. व्यक्ती व समाज यांच्या परपस्पसंबंधातून नीतीचा जन्म होतो. म्हणूनच नीतीचा अर्थ सदाचरण असा केला जातो. व्यक्तीचे कुटुंबातील वर्तन तसेच त्यातील नातेसंबंधाबद्दलची अपेक्षा दर्शविणारी खालील कविता प्रसिद्ध आहे.

'घर असावे घरासारखे नकोत नुसती नाती ।

तिथे असावा प्रेमजिव्हाळा नकोत नुसत्या भिंती ।।'

असे असेल तरच कुटुंब अभंग व जिव्हाळ्याने बांधलेले राहते.

हीच गोष्ट समाजाच्या बाबतीतही तितकीच महत्त्वाची आहे. समाजातील शांतता व सुव्यवस्था टिकून समाजजीवन सुरळीत चालावयाचे असेल तर समाजातील व्यक्ती चारित्र्यसंपन्न व धर्मनिष्ठ असणे अगत्याचे आहे. स्वार्थापेक्षा परार्थ श्रेष्ठ मानणाऱ्या व्यक्तींचा समाजच सुसंघटित राहू शकतो.

समाजात अनेक व्यक्ती या परस्परांशी विविध संबंधांनी बांधलेल्या असतात. तसेच अनेक बाबतीत त्या एकमेकांवर अवलंबून असतात. तेव्हा माणसांना जोडणारे व सामूहिक जीवन शांततेने, सामंजस्याने व सुसूत्रपणे चालविणारे जे नियम त्यांनाच नीती किंवा आचारधर्म असे म्हटले जाते.

म्हणूनच मनुष्यधर्म, राजधर्म, सेवकधर्म, राष्ट्रधर्म, पुत्रधर्म, पतिव्रताधर्म हे शब्द व्यवहारात वापरले जातात. धर्म याचा अर्थ नैतिक कर्तव्य ! यामध्ये हक्कापेक्षादेखील स्वत:ची कर्तव्ये करण्यावर अधिक भर हा हिंदू आचारपद्धतीत दिला गेला आहे. त्यामुळे 'वर्णाश्रमधर्म' हा शब्द प्रचलित आहे.

चारी वर्णांनी व चार ही आश्रमांमध्ये आपापली कर्तव्ये, जबाबदारीने, शिस्तीने व संयमाने पार पाडली जावीत अशी अपेक्षा 'धर्म' शब्दाने व्यक्त केली जाते. प्रा. दांडेकर रा. ना. यांच्या मते, ''धर्म ही

---

२९)     BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१०९.१)

कल्पना सर्वस्पर्शी व सर्वसंग्राहक आहे. धर्माचे कार्य हे विधायक स्वरूपाचे आहे. त्याचे उल्लंघन केल्यास अधर्म होतो. तो समाजविघातक असतो.'' (३०)

शान्तिपर्वात भीष्माचार्य म्हणतात,

''सर्वेषां य सुहृद् नित्यं, सर्वेषां च हिते रत: ।

कर्मणा, मनसा, वाचा स धर्मं वेद जाजले ।।''

(अर्थ – हे जाजले, काया, वाचा, मने करून जो सर्वांचा मित्र असतो, नेहमी सर्वांचे हित करण्यातच जो मग्न असतो तोच खरा धर्म होय, असे तू जाण)(३१)

तसेच शान्तिपर्वाच्या २५९ व्या अध्यायात भीष्माचार्य म्हणतात, 'समाजाचे कार्य सुरळीत चालावे यासाठीच धर्माचे नियमन सांगितले आहे.' (३२)

'सर्वभूतहित म्हणजे काय हे सांगताना भीष्माचार्य म्हणतात, ''ज्या ज्या गोष्टींची आपण स्वत:च्या बाबतीत इच्छा करतो, त्यांचा इतरांच्या बाबतीतही विचार करावा. (३३)

खालील सुभाषित प्रसिद्ध आहे,

अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनद्वयम् ।

परोपकार: पुण्याय पापाय परपीडनम् ।।

(अर्थ – अठरा पुराणांचे सार काढले तर भगवान व्यासमहर्षींची दोनच वाक्ये महत्त्वाची निघतात. दुसऱ्यांवर उपकार करणे पुण्याला कारणीभूत होते, तर दुसऱ्याला क्लेश होतील, त्रास होईल असे वागणे हे पापाला कारणीभूत होते.) (३४)

पाप व पुण्य या कल्पना याही आपल्या नीती परंपरेतील वैशिष्ट्यपूर्ण अशा कल्पना आहेत. 'काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपु' (सहा शत्रू) म्हणून सांगितले आहेत.

श्रीमद्‌भगद्‌गीतेत 'दैवासुरसम्पद्‌विभागयोग' या सोळाव्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात, 'काम, क्रोध व लोभ ही तीन प्रकारे आपला नाश करणारी नरकाची द्वारे आहेत. म्हणून या तीन गोष्टींचा त्याग करावा.' (३५)

---

३०) डॉ. जोशी गजानन नारायण – भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास – पृ. क्र. २२६.

३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२६१.९)

३२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२५९.४) 'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियम: कृत:।'

३३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२५९.२२) यद् यद् आत्मनि चेच्छेत् तत्परस्यापि चिन्तयेत्।

३४) विंझे ल. गो.– संस्कृत सुभाषितकोश प्रकरण ३४, श्लोक ८१

३५) गीता (अ. १६–२१) त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मन:। काम: क्रोधस्तथा लोभ: तस्मादेतत्त्रयं त्यजेत्।।

माणसाच्या मनात निर्माण होणाऱ्या या सहा शत्रूंच्या–विकारांच्या आहारी मनुष्य गेला की, समाजातील इतरांना त्रास होईल असे वर्तन तो करतो. हेच परपीडन होय. त्यामुळे पापाचरण घडते. हे मनुष्याने टाळावे. या षड्रिपुंवर त्याने मात केली तरच हे शक्य होईल.

तसेच इतरांना सुखकारक होईल अशातऱ्हेचे मनुष्याचे वर्तन समाजाच्या हिताचे असते. चांगले–वाईट याचे विश्लेषण करून चांगल्याचे आचरण करण्याची विवेचक व विवेकबुद्धी हे केवळ मनुष्याचेच मनुष्यप्राण्याचेच एकमेव असे वैशिष्ट्य आहे. यामुळेच कर्तव्याची भावना त्याच्या मनात जागृत होते. हाच परोपकार होय.

एका सुभाषितकाराने म्हटले आहे,

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।

धर्मस्तु तेषामाधिको विशेषो धर्मेण हीना: पशुभि: समाना: ।।

(अर्थ – भोजन (खाणे), झोप, भीती व मैथुन या भावना पशु व मानव (मनुष्य) या दोघांमध्येही समान असतात. परंतु मनुष्यांमध्ये धर्म (कर्तव्यभावना) ही एक अधिक वैशिष्ट्यपूर्ण भावना आहे. धर्मभावनेखेरीज असणारी माणसे ही पशूंप्रमाणेच होत.) (३६)

समाजाच्या हितासाठी स्वत:च्या इच्छा व प्रवृत्ती यावर बंधन घालण्याची प्रेरणा ज्यामुळे मिळते ते नैतिक गुण ! त्यांचे पालन करणे ही श्रेष्ठतर नीतिमत्ता होय. तर आपला वैयक्तिक स्वार्थ नसताना आपला वेळ व पैसा खर्च करून इतरांना मदत करणे, सर्वस्वाचा त्याग करून समाजहिताचा प्रयत्न करणे ही श्रेष्ठतम नीतिमत्ता होय.

'महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, राजगुरू यांसारखे क्रांतिकारक, चंद्रशेखर आझाद, हे क्रांतिकारक, स्वामी विवेकानंद, महर्षी कर्वे, ज्योतिबा व सावित्रीबाई फुले यांसारखे समाजसेवक ही अशा सर्व लोकांची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

आपल्या सर्व संतांनी हाच उपदेश केला आहे.

१) ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात म्हणतात, 'दया म्हणजे करुणावृत्ती ! जेथे करूणा जागृत होते तेथे कर्तव्यनिष्ठेचा, कर्तव्यबुद्धीचा उगम होतो. कर्तव्याचे पालन केल्याने जे मानसिक सुख मिळते तीच परमेश्वराची प्राप्ती होय.' (३७)

---

३६) विंझे ल.गो.– सुभाषितकोश (प्रकरण ३४, श्लोक ९)

३७) ज्ञानेश्वरी – अध्याय १८–३४

दया तेथे धर्मु। धर्मु तेथे सुखागमु।

सुखी पुरुषोत्तमु। असे जैसा।।

पसायदानात ज्ञानेश्वर परमेश्वराकडे प्रार्थना करतात. जगातील दुष्ट लोकांचा दुष्टपणा नष्ट होवो. चांगल्या कृत्यांबद्दलची आवड त्यांच्या मनात निर्माण होवो. सर्व प्राणीमात्रांच्या मनामध्ये परस्परांबद्दल स्नेहभाव निर्माण होवो. (३८)

२) संत तुकाराममहाराज आपल्या अभंगवाणीमध्ये सांगतात, 'जे दु:खीकष्टी व संकटग्रस्त लोक असतील त्यांना जो आपले मानतो. स्वत:ची पोटची मुले व घरातील नोकरचाकर यांच्याशी जो समान अशा दयाबुद्धीने वर्तणूक ठेवतो, तोच खरा साधुवृत्तीचा मनुष्य म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच मूर्ती होय.' (३९)

३) महात्मा गांधीना अतिशय आवडणारे नरसी मेहता यांनी रचलेले प्रसिद्ध भजन आहे.

'जो दुसऱ्याचे दु:ख जाणतो, तोच खरा विष्णुचा भक्त.'' (४०)

४) साने गुरुजी आपल्या कवितेत हेच सांगतात.

'सर्व जगाला प्रेम देणे हा एकच खरा धर्म आहे. सर्वजण परमेश्वराचीच मुले आहेत. ती सर्वच त्याची लाडकी आहेत. कोणालाही हीन (तुच्छ) मानू नये. सर्व जगाबद्दल प्रेम बाळगावे.' (४१)

५) वेदातील खाली उद्धृत केलेली प्रार्थना 'सर्वभूतहित' याचीच इच्छा दर्शविते.

'सर्वेऽपि सुखिन: सन्तु । सर्वेसन्तु निरामया: ।।
सर्वेभद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ।।'

(अर्थ– या जगात सर्वांना सुख मिळो. सर्व रोगमुक्त असोत. सर्वांचे कल्याण होवो. कोणालाही दु:ख न होवो.)

---

३८) ज्ञानेश्वरी पसायदान १८–९४

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।।
भूता परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।।

३९) संत तुकाराम –

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।
दया करणे जे पुत्रासि । तेचि दासा आणि दासी ।
तुका म्हणे सांगु किती । तेचि भगवंताची मूर्ती ।।

४०) नरसी मेहता – वैष्णवजन तो तेणे कहिये । जे पीर पराई जाने रे ।।

४१) साने गुरुजी – खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।

प्रभूची लेकरे सारी । तयाला सर्वही प्यारी ।।
कुणा न तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ।।

कुष्ठरोग्यांच्या वेदना जाणून त्यांच्या आयुष्यात आनंद आणण्यासाठी धडपडणारे बाबा आमटे व साधनाताई आमटे, आदिवासींच्या जगण्याला अर्थ देणारे डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे, डॉ. कोल्हे दाम्पत्य, अनाथांना आधार व मायेची सावली देणाऱ्या श्रीमती सिंधुताई सपकाळ, दलितांच्या जीवनातील दु:ख दूर करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही सर्व अशा 'सर्वभूतहित' वृत्ती ठेवून परोपकार करणाऱ्या व्यक्तींची उदाहरणे होत.

आचार्य विनोबा भावे सांगतात, 'स्वत:ला भूक लागली असता खाणे ही प्रकृती, दुसऱ्याला न देता, स्वत:ला भूक नसतानाही खाणे ही विकृती, परंतु आपण भुकेले असताना स्वत:चे जेवणाचे ताट समोर आलेल्या भुकेल्या माणसाला देणे ही संस्कृती होय.'

हाच परोपकार ! वरील सर्व उदाहरणे ही अशा परोपकारी व्यक्तींची उदाहरणे होत. या सर्व व्यक्ती नीतिमान्, चारित्र्यसंपन्न व धर्माचे यथातथ्य पालन करणाऱ्या व्यक्ती होत.

मात्र 'धर्म' हा शब्द आधुनिक काळात भिन्न अर्थाने वापरला जातो. वेगवेगळ्या आचारपद्धती सांगणाऱ्या थोर व्यक्तींमुळे विश्वातील अलौकिक शक्ती व जीवन यांना जोडले गेले. या अर्थी 'धर्म' शब्द हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध, जैन या विशिष्ट आचारपद्धतींचा निर्देश करतो. तसेच घटनेतही 'धर्मनिरपेक्षता' हे तत्त्व स्वीकारले आहे. त्यामुळे 'धार्मिक' शब्दाने घटनात्मक पेच निर्माण होतो. त्यामुळे धर्मातील चांगली तत्त्वे याऐवजी 'मूल्य' हा शब्द वापरावा असे सुचविले आहे. (४२)

तसेच जीवनातील विविध क्षेत्रात आचरणात आणावयाची जी आचारपद्धती त्यास नीती असे संबोधिले जाते. उदाहरणार्थ – अर्थनीती, राजनीती, व्यापारनीती, व्यवहारनीती, इत्यादि असे आपण पाहिले. त्यामुळे उच्चतम अशी जी जीवनातील तत्त्वे त्यांना 'धार्मिक तत्त्वे' अथवा 'नैतिक तत्त्वे' असे म्हणण्याऐवजी 'मूल्ये असा शब्द वापरला आहे. 'मूल्ये' ही स्थलकालातीत असून चिरंतन असतात. शाश्वत नीतीतत्त्वे म्हणजेच मूल्ये होत.

मनुस्मृतीत ही चिरंतनमूल्ये दहा सांगितली आहेत. त्यांना धर्मलक्षण असे म्हटले आहे. ती खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

'धृति: क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रह: ।

धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ।। (४३)

---

४२) श्रीप्रकाश समिती – Religious & Moral Education Ch. 8, P. 125

४३) बापट विष्णुशास्त्री – म. स्मृती (अध्याय ६.४२)

(स्पष्टीकरण – संतोष, दुसऱ्याने अपकार केला तरी त्याच्यावर उलट उपकार करणे ही क्षमा, विकार उत्पन्न करणारे विषय जवळ आले असतानाही संयम राखणे हा दम, अन्यायाने वा जुलूमजबरदस्तीने धन इत्यादिकाचा अपहार न करणे हे अस्तेय, यथाशास्त्र मृत्तिका व जल यांच्या साहाय्याने देह शुद्ध करणे हे शौच, पत्र्च ज्ञानेंद्रियांना (नेत्र, श्रोत्र इ.) विषयांपासून आवरून धरणे हा इन्द्रियनिग्रह. शास्त्रांच्या तत्त्वांचे ज्ञान ही बुद्धी, आत्मज्ञानरूपी विद्या, यथार्थ व योग्य बोलणे हे सत्य, व क्रोधास कारण असतानाही त्याच्या आहारी न जाणे हा अक्रोध ही दहा प्रकारची धर्मलक्षणे आहेत.)

श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी व आसुरी गुणांचे वर्णन केले आहे. दैवी संपद् म्हणजे चिरंतन अशी मूल्येच आहेत.

‘निर्भयता, अन्तःकरणात निष्कपट वृत्ती, आत्मज्ञानात मग्न असे मन (ज्ञानयोग व कर्मयोग यांची योग्य सांगड) उदार, दानी वृत्ती, इंद्रियांचा निग्रह, यज्ञ, वेदांचे अध्ययन, तपश्चर्या, वृत्तीचा सरळपणा, कायेने, वाचामनाने दुसऱ्याचा घात न करणे, सत्य बोलणे, शांत वृत्ती, कठोर वृत्तीचा अभाव, प्राणीमात्रांबद्दल करूणा, लालसेचा अभाव, विनय, स्थिरबुद्धी, तेजस्विता, क्षमाबुद्धी, संतोष, पावित्र्य, द्रोह न करणे, अयोग्य अभिमान न बाळगणे हे सर्व सात्विक गुण म्हणजेच चिरंतन अशी मूल्येच होत. (४४)

याउलट सांगितलेले जे स्वभावदोष, दुर्गुण म्हणजेच वाईट असे गुण किंवा आसुरी संपद् ! हे दुर्गुण समाजातील स्थैर्य नष्ट करतात. मनुष्याला जन्ममृत्यूच्या बंधनात अडकवितात.

‘ढोंगी वृत्ती, दुरभिमान, गर्व किंवा अहंकार, तापट, रागीट वृत्ती, जीवनाच्या यथार्थ स्वरूपाबद्दलचे अज्ञान हे ते सर्व वाईट गुण होत. (४५)

कोणते वर्तन योग्य, कोणते अयोग्य याचे काहीच भान त्यांना नसते. पावित्र्य, सदाचरण, सत्यवृत्ती या आचारपद्धतींचा ते विचारही करीत नाहीत. गीतेच्या सोळाव्या अध्यायात या व्यक्तींचे वर्तन कसे असते

---

४४) गीता (अध्याय १६ श्लोक १ ते ३)

१) अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्।।१।।

२) अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम्।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्।।२।।

३) तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता।
भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत।।३।।

४५) गीता (अध्याय १६, श्लोक ४)
दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ।।

याचे सविस्तर वर्णन आले आहे. हे लोक कायमच काम या पुरुषार्थाच्या म्हणजे विषयवासनेच्या आहारी गेलेले असतात. कितीही धन किंवा उपभोग मिळाले तरी त्यांची तृप्ती होत नाही. आज एखादी गोष्ट मिळाली तर उद्या दुसरी एखादी गोष्ट कशी मिळेल याच विवंचनेत ते असतात. आपल्या इच्छांच्या आड येणाऱ्या प्रत्येकाला ते शत्रू मानतात. आपल्या वाटेतून त्याला दूर करण्यासाठी त्याला ठार मारायलाही ते मागेपुढे पहात नाहीत. यज्ञ, दान या गोष्टी ते देखाव्यासाठी करतात. 'माझ्यासारखा मीच' या वृत्तीने ते अत्यंत गर्विष्ठ व अभिमानी होतात. प्रत्यक्ष परमेश्वराचाही ते द्वेष करतात. (४६)

कंस, रावण, दुर्योधन, जरासंध, शिशुपाल, आताच्या काळातील अतिरेकी, क्षुल्लक गोष्टींसाठी खुनास व मारहाणीस प्रवृत्त होणारे लोक ही सर्व अशा व्यक्तींची उदाहरणे होत.

अशा वृत्तीच्या लोकांमुळे समाजात अन्याय व जुलूम वाढतात. समाजजीवन अस्थिर व असुरक्षित होते. परस्परांमधील अविश्वास वाढतो.

यासाठी चिरंतन अशी जी सत्य, अहिंसा, क्षमा, दया, दान, तप, आर्जव, अस्तेय, निर्भयता इत्यादि मूल्ये व्यक्तिगत व समाजजीवनात रूजणे आवश्यक आहे.

या मूल्यांमुळे व्यक्तीचे वैयक्तिक जीवन निरामय व सुखमय होतेच. पण कुटुंबजीवनातही संबंध आदरयुक्त असे जिव्हाळ्याचे राहतात. परिसरातील निसर्ग (झाडे, नद्या, सरोवरे) व पशुपक्षी इत्यादि प्राणीमात्र यांची जोपासना व संरक्षण करण्याची वृत्ती वाढीस लागते. तसेच समाजाचे एक जबाबदार घटक म्हणून सामाजिक बांधीलकी जपून सामाजिक ऐक्य जोपासण्याची वृत्ती वाढीस लागते.

ही चिरंतन मूल्ये व त्यांचे महत्त्व रामायण, महाभारत या महाकाव्यांमध्ये सातत्याने वर्णिलेले आढळते. धार्मिक अधिष्ठान या मूल्यांच्या आचारासाठी आवश्यक असे मानलेले आहे. प्राचीन काळच्या शिक्षणपद्धतीतून या मूल्यांचे संस्कार होत असत. त्यामुळे व्यक्तीचा चारित्र्यविकास होऊन सामाजिक जीवनात आपोआपच त्याचे प्रतिबिंब दिसत असे.

प्राचीन काळी प्रामुख्याने राजेशाही शासनपद्धती आस्तित्वात होती. 'यथा राजा तथा प्रजा' ही उक्ती महत्त्वाची मानली जात असे. त्यामुळे राजा या व्यक्तीवर मूल्यसंपन्नतेने वागण्याची फार मोठी जबाबदारी असे.

चारही आश्रमातील आचारांचे काटेकोर पालन करणारे असे रघुवंशातील राजांचे वर्णन कालिदासाने रघुवंशाच्या पहिल्या सर्गात केले आहे.

---

४६) गीता (अध्याय १६ वा, श्लोक १० ते १७)

कालिदास सांगतो – बालपणी (ब्रह्मचर्याश्रमात) विविध विद्यांचे अध्ययन करणारे, तरूणपणी (गृहस्थाश्रमात) विविध विषयसुखांचा उपभोग घेणारे, वार्धक्यात (प्रौढपणी वानप्रस्थाश्रमात) ऋषीमुनींप्रमाणे वागणारे (निष्काम व अलिप्त वृत्ती ठेवून वागणारे), व शेवटी (संन्यासाश्रमात) योगाचे आचरण करून शरीराचा त्याग करणारे असे रघुवंशातील राजे होते. (४७)

'समाजाच्या प्रमुखपदी–नेतेपदी असणारी व्यक्ती जे व जसे आचरण करेल तसेच इतर लोक वागतात. ती ज्या गोष्टींना प्रमाण मानेल तसेच इतर लोक वागतात.' हे भगवद्‌गीतेतील वचन प्रसिद्ध आहे.(४८)

परंतु काळ जसा पुढे गेला तशी भौतिक प्रगती वेगाने झाली. विज्ञानयुग सुरू झाले. राज्यपद्धती वेगवेगळ्या आस्तित्वात आल्या. केवळ राजा प्रमुख अशी राज्ये राहिली नाहीत. वेगवेगळी राष्ट्रे आस्तित्वात आली. अध्यक्षीय लोकशाही, संसदीय लोकशाही, हुकुमशाही प्रधान राष्ट्रे अशा राज्यपद्धती उदयास आल्या. समाजवादी विचारपद्धती, साम्यवादी विचारपद्धती यांनाही महत्त्व आले. यामुळे व्यक्तिगत नीतिमूल्ये, व्यक्तीचा विकास, तर सामाजिक जीवन, त्यातील नीतिमूल्ये यांचा परस्परांशी निकटचा संबंध प्रस्थापित करणे महत्त्वाचे ठरले. समाजाला हितकारक ते ते मूल्यांच्या संस्काराने आस्तित्वात येते हे निश्चितच त्रिकालाबाधित असे सत्य आहे.

श्रीयुत सहस्त्रबुद्धे दि. ह. यांच्या मते 'मूल्य हा शब्द आपल्या मनोधारणेची विशिष्ट स्थिती अथवा घडण ही दर्शवितो.' (४९)

तेव्हा बदलत्या काळाला अनुसरून काही नवीन मूल्ये अस्तित्वात आली.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी भारताने संसदीय लोकशाही या राज्यपद्धतीचा स्वीकार केला. १९५० साली भारतीय राज्यघटना तयार झाली. या संविधानात पुढील मूल्ये प्रमुख म्हणून सांगितली आहेत. (५०)

---

४७) कालिदास – (सर्ग १, श्लोक ८)
शैशवेऽभ्यस्तविद्यानां, यौवने विषयैषिणाम्।
वार्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम्।।

४८) गीता (अध्याय ३.२१)
यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:।
स यत्प्रमाणं कुरूते लोकस्तदनुवर्तते।।

४९) सहस्त्रबुद्धे दि. ह. – शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन.

५०) भारतीय संविधान – संचालक – मुद्रण व लेखनसामग्री महाराष्ट्र शासन, २६ सप्टेंबर २००६.

१) स्वातंत्र्य – भारताच्या प्रत्येक नागरिकाला घटनेने विचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य बहाल केले आहे.

२) समता – भारतीय लोकशाहीत लिंगभेद, धर्मभेद, अथवा जातिभेद हा कोणत्याही मूलभूत हक्काच्या आड येणार नाही. सामाजिक समतेचे आचरण हे आवश्यक राहील.

३) लोकशाही – प्रत्येक १८ वर्षावरील व्यक्ती ही मतदार असेल. निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावेल. 'लोकांचे, लोकांसाठी व लोकांनी चालविलेले राज्य' असेच भारतीय लोकशाहीचे स्वरूप राहील.

४) समाजवाद – सहकाराच्या तत्त्वाने उत्पादन निर्माण करणे. जसे सहकारी कारखाने, सहकारी शेती, सहकारी बँका, सहकारी दुग्धव्यवसाय संस्था इत्यादि. जिथे कोणाी एका व्यक्तीची मालकी राहणार नाही. तसेच उत्पादन, विक्री व नफा यांचे समान विभाजन होईल.

५) धर्मनिरपेक्षता – प्रत्येकाला आपापल्या श्रद्धेनुसार आपापल्या धर्माचे, त्यातील तत्त्वे व आचारपद्धती यांचे पालन करण्याचे स्वातंत्र्य राहील. शासन त्यात हस्तक्षेप (ढवळाढवळ) करणार नाही. तसेच कोणत्याही विशिष्ट धर्माची सक्ती कोणालाही करता येणार नाही.

६) न्याय – राष्ट्राची न्यायव्यवस्था ही सर्वांच्या बाबतीत समान राहील. (असेल.)

७) बंधुता – राष्ट्रातील सर्वजण परस्परांशी प्रेमाने व सौजन्याने वागतील. अशाप्रकारे बंधुत्व हे तत्त्व आचरणात आणतील.

८) सहिष्णुता – सहनशील वृत्ती अंगी बाणविणे याचाच अर्थ सहिष्णुता होय. परस्परांच्या भावना समजून घेऊन एकमेकांशी सलोख्याने वागतील.

९) राष्ट्रीय पंचशील – राष्ट्रीय पंचशील म्हणून पुढील पाच तत्त्वे (मूल्ये) मान्य करण्यात आली. स्वच्छता, सत्यनिष्ठा, परिश्रम, समानता व सहकार.

१०) राष्ट्रीय मूल्ये – १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणाच्या प्रकियेत संस्कारांच्या दृष्टीने मूल्यांचा विचार सुरू झाला. सुसंस्कारित समाज निर्माण होण्यासाठी एकंदर दहा राष्ट्रीय मूल्ये निश्चित करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे आहेत. [५१]

| | | |
|---|---|---|
| १) राष्ट्रभक्ती | २) राष्ट्रीय एकात्मता | ३) सर्वधर्मसहिष्णुता |
| ४) स्त्रीपुरुष समानता | ५) वैज्ञानिक दृष्टिकोन | ६) श्रमप्रतिष्ठा |
| ७) सौजन्यशीलता | ८) संवेदनशीलता | ९) वक्तशीरपणा |
| १०) नीटनेटकेपणा | | |

---

५१) शि.ह.पु. (इ. १ली ते १० वी) पृ.क्र. ६.

'सत्य, अहिंसा, दया, दान, क्षमा, तप इत्यादि चिरंतन मूल्ये आपण पाहिली त्यांच्या आचरणानेच वरील राष्ट्रीय मूल्ये प्रत्यक्षात येतील. चिरंतन मूल्यांच्या संस्कारामुळेच वरील राष्ट्रीय मूल्यांचा संस्कार होईल. यादृष्टीने वरील चिरंतन मूल्यांच्या पोटातच राष्ट्रीय मूल्ये समाविष्ट आहेत असे म्हणता येईल.

या मूल्यांच्या व्याख्या काय आहेत ते पाहू.

१) सत्य – हे एक अंतिम तत्त्व आहे.

'वर्तमान, भूत भविष्य या तीही कालात जे बाधित होत नाही ते सत्य होय.' (५२)

खरेपणा, एखाद्या गोष्टीची न्याय्य बाजू म्हणजे सत्य होय. 'सत्य बोलणे हा श्रेष्ठ असा सद्‌गुण आहे. खरेपणा अथवा सत्यवृत्ती या गुणासाठी निर्भयता हा आवश्यक गुण आहे. जर मन अथवा वृत्ती भीतीने ग्रस्त असतील तर सद्गुणांची वाढ होणार नाही.

सत्याचे महत्त्व सांगताना सुभाषितकार म्हणतात, (५३)

'अश्वमेधयज्ञ हा अतिशय पुण्यकारक समजतात, पण असे हजार अश्वमेध यज्ञ एका पारड्यात व सत्य दुसऱ्या पारड्यात घातले व त्यांचे वजन केले तर दोहोंमध्ये सत्याचेच पारडे जड होईल.'

ऋग्वेदात म्हटले आहे, 'सत्य व असत्य यांचे सारखे वाग्युद्ध जुंपलेले असते.' (५४)

तर आणखी एक ऋषी सत्याचे महत्त्व प्रतिपादन करताना म्हणतात, 'सत्य व सरळ त्याचे सोमदेव रक्षण करतो. असत्याचा व त्याची बाजू घेणाऱ्याचा नाश करतो. अंतिम विजय हा सत्याचाच असतो.' (५५)

उपनिषदे व पुराणे यांनीही सत्य या मूल्याचे महत्त्व स्पष्ट शब्दात सांगितले आहे. विशेषत: उपनिषत्कारांची सत्यावर विशेष प्रीती आढळते.

मुण्डकोपनिषदात म्हटले आहे

सत्यमेव जयते नानृतम् । सत्येन पन्था: विततो देवयान: ।

येनाक्रमान्त्यृषयो ह्याप्तकामा: । तत् सत्यस्य परमं निधानम् ।। (५६)

---

५२) पंडित जोशी महादेवशास्त्री – 'भारतीय संस्कृतिकोश' सर्वलक्षणसंग्रह (खण्ड ९ पृ.क्र. ६२४ ते ६२६)
कालत्रयाबाध्यं यत् तत् सत्यम् ।

५३) विंझे ल. गो. – संस्कृत सुभाषितकोश प्र. ३४ श्लोक १६, पृ.क्र.२७६
अश्वमेधसहस्त्रं च सत्यं च तुलया धृतम् ।
अश्वमेधसहस्त्रेभ्य: सत्यमेवातिरिच्यते ।।

५४) ऋक् (७.१०४.१२) 'सच्चासच्च वचसी पस्पृधाते ।

५५) ऋक् (७.१०४) भारतीय संस्कृतिकोश खण्ड ९.

५६) मुण्डक (३.५.६).

(अर्थ – सत्याचाच जय होतो. असत्याचा नाही. सत्याने देवयान मार्ग मोकळा होतो. त्या मार्गाने पूर्णकाम ऋषी जिथे सत्याचे महान भांडार आहे तेथे पोचतात.)

यादृष्टीने छांदोग्योपनिषदातील सत्यकाम जाबालाची कथा लक्षणीय आहे.

जबाला या दासीचा सत्यकाम हा पुत्र होता. त्याला पित्याचे नाव व गोत्र ठाऊक नव्हते. परंतु ही गोष्ट त्याने स्पष्टपणे गुरुंना सांगितली. निर्भेळ व शुद्ध सत्य बोलल्याने गुरुंनी त्याला 'सत्यकाम जाबाल' असे म्हणून ब्राह्मणाची पदवी दिली. तो वेदाध्ययनास पात्र झाला. (५७)

शतपथ ब्राह्मणात सत्याला प्रज्वलित अग्नीची उपमा दिली आहे. (५८)

तर भागवतात भगवान श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात, 'सत्य बोलण्याने पवित्र झालेली वाणी बोलावी. तसेच मनाला शुद्ध वाटणारे (पवित्र) सारासार विचारयुक्त आचरण करावे.' (५९)

भारतीयांच्या परंपरेत राम हा एकवचनी व सत्यप्रतिज्ञ होता. तर हरिश्चन्द्राने स्वप्नात दिलेल्या वचनाच्या पूर्तीसाठी सर्वस्वाचा त्याग केल्याचे प्रसिद्ध आहे. अग्निशुद्धीच्या वेळी सीतेने, तर महाभारतात अभिमन्युपत्नी उत्तरेच्या मृत गर्भाला जिवंत करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी आपली सत्याची शक्ती पणाला लावल्याच्या कथा प्रसिद्ध आहेत.

समावर्तन विधीच्या वेळी गुरु शिष्याला उपदेश करताना 'सत्यं वद । धर्मं चर।' असाच उपदेश करतो. (६०)

कोणतीही निष्ठा, मातृपितृभक्ती, राष्ट्रभक्ती हे गुण, ही मूल्ये सत्यनिष्ठ वृत्तीशिवाय आचरणात येऊ शकत नाहीत. प्रतिज्ञापालन हेही सत्यनिष्ठेशिवाय आचरणात आणणे शक्य नाही. म्हणून सत्य हे अत्यंत महत्त्वाचे असे मूल्य आहे.

२) अहिंसा – न हिंसा। नञ् तत्पुरुष।

हिंसेच्या उलट ती अहिंसा असे म्हटले आहे. परंतु प्रथम हिंसा म्हणजे काय ते स्पष्ट करावे लागेल. 'साक्षात् मरणानुकूल: व्यापार: नाम हिंसा।'

---

५७) छांदोग्य (अध्याय ४, खण्ड ४, ५)

५८) शत. ब्रा. (१.१.१४)

५९) भागवत (११.१८.१६–२) सत्यपूतां वदेत् वाणीम्।

६०) तै. उप. – मन:पूतं समाचरेत्। शिक्षाध्याय: प्रथमा वल्ली । एकादश अनुवाक:।

प्रत्यक्ष मरणाला अनुकूल अशी कृती (व्यापार) म्हणजे हिंसा होय.

गौतम धर्मसूत्रात 'द्रोह: इति परे मन्येत।' असे म्हटले आहे. तर अमरकोशात 'हिंसा चौर्यादि कर्म।' असे म्हटले आहे. [६१]

या सर्वांच्या विरुद्ध ती अहिंसा होय. अहिंसेची व्याख्या देताना असे म्हटले आहे की, कायावाचामने कोणाही माणसास पीडा न देणे, भूतमात्रावर प्रेम करणे, देहाने कोणास न मारणे, त्रास न देणे, उलट कोणी त्रास दिला तर तो सहन करणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे गीताई–शब्दार्थकोश यात म्हटले आहे. दैवी संपत्तीमध्ये जे विविध सद्गुण सांगितले आहेत ते बहुतेक अहिंसेचेच पर्यायवाचक शब्द आहेत असे म्हणता येईल.

'भूतदया, मार्दव, आर्जव, क्षमा, शांती, दम, अद्रोह हे निरनिराळे अहिंसेचेच पर्यायवाचक असे शब्द आहेत. [६२]

महाभारतात भीष्माचार्य युधिष्ठिराला उपदेश करताना म्हणतात, 'अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ धर्म (कर्तव्य) आहे. अहिंसाचरण हेच दमन होय, दानात अहिंसाच श्रेष्ठ आहे. अहिंसा हेच मोठे तप आहे.'

'अहिंसा परमो धर्म: तथाऽहिंसा परमो दम: ।

अहिंसा परमं दानं अहिंसा परमं तप: ।। [६३]

आचार्य विनोबा भावे म्हणतात 'अहिंसा व सत्य या दोन गुणात इतर सर्व गुण येऊन जातात. सर्व सद्गुणांना संक्षेप दिला तर अहिंसा व सत्य या दोनच गोष्टी शिल्लक राहतील. [६४]

३) अभयम् – न विद्यते भयं यस्मिन् तत्। नञ बहुव्रीहि।

न भयम्। नञ् तत्पुरुषं।

ज्यामधून भीती निघून गेली आहे असे वर्तन म्हणजे निर्भय वर्तन किंवा निर्भयता–अभय होय.

खऱ्या गोष्टीची म्हणजे सत्याची बाजू घेताना किंवा अहिंसाव्रताचे पालन करताना कोणत्याही गोष्टीची भीती न बाळगणे. म्हणजेच अभय–निर्भयता हा गुण फार महत्त्वाचा ठरतो. दैवी संपत्तीचे वर्णन गीतेच्या १६ व्या अध्यायात करताना 'अभय' या गुणाला पहिले स्थान भगवान श्रीकृष्णांनी दिले आहे.

---

६१) जोशी महादेव शास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

६२) आचार्य भावे विनोबा –गीता प्रवचने – अध्याय १६, पृ.क्र. २०६.

६३) BORI प्रमाणित प्रत म.भा. अनुशासन पर्व (१३.११६.३८).

६४) आचार्य भावे विनोबा – गीता प्रवचने – अध्याय १६, पृ.क्र. २०६.

४) अस्तेय – स्तेय म्हणजे चौर्य. त्याच्या विरुद्ध ते अस्तेय होय.

'अनादानमदत्तस्य अस्तेयव्रतमुदिरितम्।[६५]

अर्थ – एखाद्याची वस्तू त्याने न दिल्यास त्याचा अपहार न करणे यास अस्तेय असे म्हटले आहे. देहादिकांच्या गरजेसाठी जे आवश्यक असेल ते आणि तेवढेच विषय सेवन करणे यास अस्तेय असे म्हटले आहे. जेवढे आवश्यक तेवढाच उपभोग घेणे, तसेच विहित मार्गाने देवादिकांना अर्पण करून मगच एखाद्या गोष्टीचा उपभोग घेणे उचित होय.

पातंजल योगसूत्रात चित्ताचा अवरोध करण्याच्या म्हणजेच संयमन करण्याच्या (१) अहिंसा, (२) सत्य, (३) अस्तेय, (४) ब्रह्मचर्य, (५) अपरिग्रह या पाच गोष्टी सांगितल्या आहेत.[६६] त्यापैकी एक अस्तेय होय.

५) दान – दान या शब्दाची व्युत्पत्ती दा–देणे या धातूपासून झाली आहे. दानाच्या वेगवेगळ्या व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे सांगितल्या आहेत.

अ) भीमाचार्य झळकीकर यांनी न्यायकोशात म्हटले आहे. 'वस्तूचे मूल्य न घेता तिच्यावरची आपली मालकी नष्ट करून तिथे दुसऱ्याची मालकी निर्माण करणे. अशा प्रकारचा जो त्याग त्याला दान असे म्हटले जाते.[६७]

ब) सत्पात्र व्यक्तीला श्रद्धेने द्रव्यादि वस्तू देणे म्हणजे दान होय.[६८]

क) न्याय्य मार्गाने मिळविलेल्या धन धान्यादि गोष्टी श्रद्धापूर्वक याचकाला देणे म्हणजे दान होय.[६९]

दानाची अंगे – दानाची सहा अंगे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत. (१) देणारा (दाता), (२) घेणारा (प्रतिगृहीता), (३) श्रद्धा (विश्वास), (४) देय (देण्याची वस्तू), (५) उचित स्थळ (योग्य ठिकाण), (६) उचित काळ (योग्य वेळ) ही दानासाठी आवश्यक अशी अंगे आहेत.

---

६५) सर्वदर्शन संग्रह – जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

६६) पातञ्जल योगदर्शन (२.३०)

६७) झळकीकर भीमाचार्य –न्यायकोश १९२८

'मूल्यग्रहणं विना स्वस्वत्त्वध्वंसपरस्वत्वजनकः त्यागः।'

६८) देव राधाकांत – शब्दकल्पद्रुम

'अर्थनामुदिते पात्रे श्रद्धया प्रतिपादितं दानम् इति अभिनिर्दिष्टम्।

भारतीय संस्कृतिकोश खण्ड ४

६९) शांडिल्य उप (१.२.१)

'दानं नाम न्यायार्जितस्य धनधान्यादेः अर्थिभ्यः प्रदानम्।'

दानाची आवश्यकता – व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनातील उणीवा दूर करणे हा दानाचा मुख्य उद्देश होय. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे ऋण फेडणे हे मनुष्याचे प्रधान कर्तव्य होय. दानाने समाजाचे ऋण अंशत: का होईना फेडले जाते.

दानाचे विविध प्रकार –

अ) (१) नित्य, (२) नैमित्तिक, (३) काम्य, (४) विमल हा भिन्न भिन्न दाने सांगण्याचा एक प्रकार होय. (७०)

ब) गरूडपुराणात दानाचे (१) कायिक, (२) वाचिक, (३) मानसिक असे तीन प्रकार सांगितले आहेत. (७१)

क) तर भगवद्गीतेत दानाचे (१) सात्त्विक, (२) राजस, (३) तामस असे तीन प्रकार सांगितले आहेत. (७२)

१) सात्त्विक दान – केवळ द्यावयाचे आहे अशा निष्काम भावनेने ज्याने आपल्यावर कोणतेही उपकार केले नाहीत अशा पात्र व्यक्तीला परतफेडीची अपेक्षा न ठेवता योग्य स्थळी, योग्य काळी जे दान केले जाते ते सात्त्विक दान होय.

२) राजस दान – तर परतफेडीची अपेक्षा ठेवून, फळाची इच्छा धरून, अनिच्छेने जे दान दिले जाते ते राजस दान होय.

३) तामस दान – अपात्र व्यक्तीला, अयोग्य वेळी, अयोग्य ठिकाणी, असे जे दान अनिच्छेने व अपमानपूर्वक दिले जाते ते तामस दान होय. (७३)

---

७०) जोशी पंडित महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड ४ था

७१) जोशी पंडित महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड ४ था

७२) गीता (अध्याय १७.२०)

१) दातव्यमिति यद् दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे, कालेच पात्रेच तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥२०॥

७३) गीता (अध्याय १७ . २१, २२)

२) यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुन:।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥२१॥

३) अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम्॥२२॥

६) तप – तपति, तापयति वा। (७४)

१) देह आणि मन यांना क्लेश देऊन इच्छित ते साध्य करून घेण्याचा एक उपाय म्हणजे तप होय.

२) भूक, तहान, कडाक्याची थंडी, उन्हाळा इत्यादि द्वन्द्वे सहन करणे म्हणजे तप. (७५)

३) श्रीमद्भगवद्गीतेत तपाचेही तीन प्रकार सांगितले आहेत.

अ) शारीरिक तप –

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।

ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तपमुच्यते ।।

ब) वाचिक तप –

अनुद्वेगकरं वाक्यं, सत्यं प्रियहितं च यत्।

स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।।

क) मानसिक तप –

मन:प्रसाद: सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रह: ।

भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ।। (७६)

(अर्थ् – अ) शारीरिक तप – देव, ब्राह्मण, विद्वान व गुरुजन यांचे पूजन, सरळपणा, पावित्र्य, ब्रह्मचर्य, अहिंसा यांना कायिक (शारीरिक) तप म्हटले आहे.

ब) दुसऱ्याला उद्वेग वाटेल असे भाषण न करणे, खरे व हितकारक बोलणे, वेदांचे अध्ययन (ज्ञानप्राप्ती करून घेणे) यास वाचिक तप म्हटले आहे.

क) मनाची प्रसन्नता, शांतवृत्ती, मोजके भाषण, मौन वृत्ती, आत्मसंयमन, मनाची शुद्धवृत्ती हे मानसिक तप होय.)

अशाप्रकारे सृष्टी, समाज व व्यक्ती (शरीर) या तीनही संस्थांचे कार्य सुंदर व शुद्ध रहावयास हवे. यासाठी दान व तप ही मूल्ये आवश्यक आहेत. म्हणून चिरंतन मूल्यांमध्ये त्यांचा समावेश केला गेला आहे.

वेद व ब्राह्मणे या ग्रंथात तपाचे उल्लेख आढळतात. उपनिषदात तपाविषयी बरेच उल्लेख आहेत. तसेच वानप्रस्थाश्रमात तप महत्त्वाचे मानले आहे.

---

७४) देव राधाकान्त – शब्दकल्पद्रुम/ भारतीय संस्कृतिकोश खण्ड ४ था.

७५) सर्वलक्षण संग्रह – भारतीय संस्कृतिकोश खण्ड ४

'क्षुत्पिपासाशीतोष्णादिद्वन्द्वसहनम् नाम तपम्।

७६) गीता – (अध्याय १७.१४, १५, १६)

व्यासमहर्षींप्रमाणेच विविध सुभाषितांमध्ये सुभाषितकारांनी क्षमा, दान व परोपकार या मूल्यांचे श्रेष्ठत्व वर्णन केले आहे.

क्षमेचे महत्त्व :–

सभापर्वामध्ये व्यासमहर्षी सांगतात की, क्षत्रियांचे सामर्थ्य तेजस्वीपणा हे आहे. मात्र ब्राह्मणांचे सामर्थ्य क्षमाशील वृत्तीत आहे. दुर्बल लोकांचा क्षमा हा गुण आहे. तर सामर्थ्यवान लोकांचा क्षमा हा अलंकार आहे. (७७)

तर उद्योगपर्वात म्हटले आहे की, क्षमावृत्तीने सर्व जग आपलेसे करता येते. क्षमावृत्तीने कोणती गोष्ट साध्य होणार नाही. (७८)

चाणक्यशतकात क्षमेचे महत्त्व सांगताना कवी म्हणतो, 'क्षमा हे शस्त्र ज्याच्या हातात आहे, त्याला दुर्जन काय करू शकेल ? उदाहरणार्थ गवत नसणाऱ्या जागी पडलेला अग्नी आपोआपच विझून जातो. (७९)

हाच सुभाषितकार पुढे सांगतो की, सौंदर्य हा माणसाचा अलंकार आहे. तर सद्गुण हा सौंदर्याचा अलंकार आहे. ज्ञान हे सद्गुणांचे भूषण तर क्षमा हे ज्ञानाचे आभूषण आहे. इतके क्षमा या मूल्याचे महत्त्व आहे.(८०)

---

७७) प्रमाणित प्रत म.भा, सभापर्व (२.२७५.७९)
क्षत्रियाणां बलं तेजो ब्राह्मणांना बलं क्षमा।
क्षमा गुण अशक्तानां शक्तांना भूषणं क्षमा।।

७८) प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३३.५४)

७९) विंझे ल. गो. सुभाषितकोश (प्रकरण ४९, ३०),
चाणक्यशतक (३.३०)
क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जन: किं करिष्यति।
अतृणे पतितो वह्नि: स्वयमेव उपशाम्यति।।

८०) विंझे ल. गो. सुभाषितकोश (प्रकरण ४९, २६ )
चाणक्य नीती ४३
नरस्याभरणं रूपं रूपस्याभरणं गुण:।
गुणस्याभरणं ज्ञानं ज्ञानस्याभरणं क्षमा।।

दानाची थोरवी :–

दानाचे महत्त्व सांगताना सुभाषितकार म्हणतात

'गौरवं प्राप्यते दानान्न तु वित्तस्य सञ्चयात्।

स्थितिरुश्चै: पयोदानां पयोधीनामध: स्थिति: ।।[८१]

(अर्थ – संपत्तीचे दान केल्याने कीर्ती प्राप्त होते, पण संपत्तीचा साठा करण्याने मोठेपणा मिळत नाही. पाण्याचा संचय करणारा सागर खाली राहतो. तर पाणी देणारे मेघ उंच आकाशात असतात.)

तर दुसरा एक सुभाषितकार म्हणतो, 'शंभर माणसात एखादाच शूर जन्माला येतो.हजारांमध्ये एखादा विद्वान् माणूस असतो. उत्कृष्ट वक्ता दहा हजार माणसांमध्ये जन्माला येतो. पण दानी मनुष्य मात्र क्वचितच जन्माला येतो.[८२]

दानी लोक किती पराकोटीचा त्याग करतात. याचीही उदाहरणे सुभाषितकाराने दिली आहेत. कर्ण हा पराकोटीचा दानी म्हणून प्रसिद्ध होता. त्याने स्वत:ची त्वचा कापून कवचकुण्डले इंद्ररूपी ब्राह्मणाला दान केली. शिबी राजाने कपोतासाठी ससाण्याला स्वत:चे मांस कापून दिले. जीमूतवाहनाने स्वत:चे प्राण दान केले. तर दधीची ऋषींनी स्वत:ची हाडे इंद्राला त्याचे वज्र बनवण्यासाठी, परकल्याणार्थ दान केली.[८३]

परोपकार हा गुणही सुभाषितकारांनी प्रशंसिलेला आहे. वृक्ष, नद्या, गायी ही सृष्टीतील परोपकारी वृत्तीची उदाहरणे आहेत. सुभाषितकार म्हणतात.

परोपकाराय फलन्ति वृक्षा: ।

परोपकाराय वहन्ति नद्य: ।।

परोपकाराय दुहन्ति गाव: ।

परोपकारार्थमिदं शरीरम् ।।

(अर्थ – वृक्ष आपली फळे स्वत: खात नाहीत. नद्या स्वत:चे पाणी स्वत: पीत नाहीत. गाई आपले दूध दुसऱ्यांना देतात. मनुष्याचे शरीरही दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी, परोपकारासाठीच आहे.)[८४]

---

८१) विंझे ल. गो. सुभाषितकोश प्र. १५.६ (सूक्तिमुक्तावलि ११६.३)

८२) विंझे ल.गो. सुभाषितकोश – प्रकरण १५.१

शतेषु जायते शूर: । सहस्त्रेषु च पण्डित: ।

वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ।।

८३) विंझे ल. गो. – सुभाषितकोश प्रकरण १५.१३ शार्ङ्गधरपद्धती २७९.

८४) विंझे ल. गो. – सुभाषितकोश प्रकरण १६.२ विक्रमोर्वशीय ६६.

मनुष्याचे शरीर हे अलंकारांनी सजण्यासाठी नाही. अलंकारांनी ते शोभून दिसत नाही. तर परोपकारी वृत्तीनेच शरीर शोभून दिसते. (८५)

परोपकारी व्यक्तींना स्वत:च्या कार्यासंबंधी आदर नसतो. त्यांची वृत्ती स्वार्थी नसते. परोपकार करताना पडणाऱ्या कष्टांची त्यांना पर्वा नसते असे विचार सुभाषितकार मांडतात.

महाभारतातील मूल्यविचार :–

महाभारतातील आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, शांतिपर्व तसेच अनुशासनपर्व या सर्व पर्वांमध्ये सत्य, अहिंसा, दया, दान, आर्जव म्हणजेच एकंदरच आचार यात चिरंतन मूल्यांना अतिशय महत्त्व दिले आहे.

परंतु हे महत्त्व देताना व्यवहार हा लक्षात घ्यावा असेही प्रतिपादन महाभारतात आढळते.

‘सत्यस्य वचनं श्रेय:, सत्यादपि हितं वदेत् ।

यद् भूतहितमत्यन्तं एतत्सत्यं मतं मम ।’

सत्य बोलणे हे कल्याणकारक खरेच, परंतु काही वेळा सत्यापेक्षाही सर्वांचे हित ज्यात आहे असे बोलावे. सर्व प्राणीमात्रांचे हित ज्यात आहे तेच सत्य होय.’ असे भीष्माचार्यांनी शांतिपर्वात युधिष्ठिरास सांगितले आहे. ‘ज्याने सर्वांचे नुकसान होते, ते सत्यही नव्हे व ती खरी अहिंसाही नाही.’

याचाच अर्थ व्यवहारामध्ये ‘सर्वभूतहित’ म्हणजेच अंतिम परिणाम लक्षात घेऊन तारतम्याने मूल्यमापन असाच महाभारतकारांचा अभिप्राय दिसते. यादृष्टीने सामान्यनीतीपेक्षा महाभारतातील मूल्ये ही काहीवेळा व्यावहारिक हित व फायदा लक्षात घेऊन उपयोगात आणलेली दिसतात.

आदिपर्वातील दुष्यंत व शकुंतला यांच्या कथेत शकुंतला राजाला सत्याचे महत्त्व पटवून देते. ती म्हणते,

१) नास्ति सत्यात्परो धर्म: न सत्यात् विद्यते परम् ।

न हि तीव्रतरं किञ्चिदनृतादिह विद्यते ।। (८६)

(अर्थ – सत्याशिवाय श्रेष्ठ असा धर्म नाही. सत्यासारखे श्रेष्ठ असे दुसरे काहीच नाही, आणि असत्यासारखे क्लेशदायक असेही दुसरे काहीही नाही.)

---

८५) विंझे ल. गो. –सुभाषितकोश प्रकरण १६.३ भर्तृहरी नीतीशतक ७१

श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन, दानेन पाणिर्न तु कङ्कणेन।

विभाति काय: खलु सज्जनानां परोपकारैर्न तु चन्दनेन।।

८६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (६९.२४, २५)

२) राजन्, सत्यं परं ब्रह्म, सत्यं च समय: पर: ।

मा त्याक्षी: समयं राजन्, सत्यं संगतमस्तु ते ।।

(अर्थ – हे राजा, सत्य हेच सर्वश्रेष्ठ ब्रह्म आहे. सत्य हीच श्रेष्ठ प्रतिज्ञा, आचरण आहे. हे राजा, प्रतिज्ञेचा भंग (त्याग) करू नकोस. सत्य सदैव तुझ्यासमवेत असो.)

यावेळी व्यावहारिक दृष्टीने ती विचार करते. दुष्यंताला पूर्वी घडलेल्या सत्य घटनांचे स्मरण असूनही तो असत्य बोलतो आहे असे तिला वाटते. आपले नाते मान्य व्हावे हा तिचा हेतु आहे.

मात्र भीष्माचार्य, आमरण ब्रह्मचर्याची जी प्रतिज्ञा करतात त्यावेळी त्यांची सत्यनिष्ठा ही नि:स्वार्थ आहे. सत्यनिष्ठेने ते धर्माचे पालन करतात.

भीष्म – सत्यवती संवादात भीष्माचार्य आपल्या वचनाची खात्री पटवून देतात म्हणतात,

'एकवेळ इंद्र पराक्रमाचा त्याग करेल, धर्मराज (यम) धर्माचा त्याग करेल, पण मी सत्यापासून विचलित होणार नाही. [८७]

त्रैलोक्याचा अथवा देवातील राज्याचा मी एकवेळ त्याग करेन, पण याहिपेक्षा अधिक महत्त्वाचे सत्य त्याचा मी कधीही त्याग करणार नाही. [८८]

तसेच ते पुढे म्हणतात,

'सत्याश्रुति: क्षत्रियस्य न धर्मेषु प्रशस्यते ।' [८९]

(अर्थ – क्षत्रियांच्या बाबतीत सत्यापासून ढळणे याची धर्माच्या दृष्टीने कधीही प्रशंसा केली जात नाही.)

मात्र काहीवेळा घटनेच्या परिणामाकडे लक्ष देऊन व्यवहारी वृत्तीने, आपद्धर्म म्हणून सत्याला मुरड घालावी लागते.

द्रोणवध हा लढाईतील – युद्धातील विजयाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा होता. त्यामुळे युधिष्ठिर यावेळी अर्धसत्य बोलतो. अश्वत्थामा या हत्तीला मारल्यानंतर द्रोण युधिष्ठिराच्या सत्यनिष्ठेवर विश्वास ठेवून त्याला 'खरे काय ?' ते विचारतात परंतु युधिष्ठिर 'नरो वा कुञ्जरो वा' असे संदिग्ध उत्तर देतो.

---

८७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९७.१७.१४)

१) विक्रमं वृत्रहा जह्याद्धर्मं जह्याश्च धर्मराह्।

न त्वहं सत्यमुत्स्त्रष्टुं व्यवसेयं कथञ्चन ।।

८८) परित्यजेयं त्रैलोक्यं राज्यं देवेषु वा पुन: ।

यद्वाप्यधिकमेताभ्यां न तु सत्यं कथञ्चन ।।

८९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९७.२४).

शकुंतलेचे अथवा युधिष्ठिराच्या या वचनांचे अपवाद सोडले तर एकंदरीने 'सत्य' या चिरंतन मूल्यांवर महाभारतात ठिकठिकाणी भर दिला आहे.

आदिपर्वात अष्टक व ययाती यांच्या संवादात ययातीने सत्याचे महत्त्व खालील शब्दात वर्णन केले आहे.

'सत्यवृत्तीमुळेच आकाश, पृथ्वी व मनुष्य याठिकाणी अग्नी प्रज्वलित होतो. मी कधीच निष्कारण, व्यर्थ खोटे असे शब्द उच्चारत नाही. कारण सज्जन लोक सत्याचीच सर्वत्र पूजा करतात. (सत्याचाच मान राखतात.) सर्व देव, ऋषी, मुनी आणि सर्व जग सत्यामुळेच पूजनीय होते असे मला वाटते. (९०)

वनपर्वातील पतिव्रतेच्या कथेत पतिव्रता कौशिक ब्राह्मणाला सत्याचे महत्त्व खालील शब्दात विशद करते.

१) इंद्रियाणां निग्रहं च शाश्वतं द्विजसत्तम्।

सत्यार्जवे धर्ममाहु: परं धर्मविदो जना: ।।

२) दुर्जयो शाश्वतो धर्म: स तु सत्ये प्रतिष्ठित: ।

(अर्थ – इंद्रियनिग्रह हाच शाश्वत आहे.धर्म जाणणारे लोक सत्य आणि आर्जव हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे म्हणतात. शाश्वत, चिरंतन धर्म हा अजिंक्य आहे. मात्र तो सत्यावरच अधिष्ठित आहे. (९१)

उद्योगपर्वात साध्यदेव व आत्रेय यांच्या संवादात सत्याचे महत्त्व खालीलप्रमाणे अधोरेखित केले आहे.

काहीतरी बोलण्यापेक्षा न बोलणे (मौन) चांगले. मौनापेक्षा सत्य बोलणे अधिक चांगले. त्याहीपेक्षा सत्य व प्रिय बोलणे उत्तम. परंतु सत्य, प्रिय व धर्मानुकूल बोलणे सर्वोत्तम होय. (९२)

---

९०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (८८.२४.२५-२६)

सत्येन मे द्यौश्च वसुन्धराश्च।

तथअवाग्नि: ज्वलते मानुषेषु।।

न मे वृथा व्याहृतमेव अहु:।

सत्यं हि सन्त: प्रतिपूजयन्ति।।

सर्वेच देवा मनुयश्च लोका:।

सत्येन पूज्या इति मे मनोगतम्।।

९१) BORI प्रमाणित प्रत म.भा.वनपर्व (३.१९७.३८,३९)

९२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (६.३६.१२)

अव्याहृतं व्याहृताच्छ्रेयं आहु:।

सत्यं वदेत् व्याहृतं तत्तृतीयम्।।

प्रियं वदेत् व्याहृतं तत्तृवीयम्।

धर्म्यं वदेत् व्याहृतं तश्चतुर्थम्।।

तर वनपर्वात खालीलप्रमाणे सत्याची प्रशंसा केली आहे.

यद् भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा । (९३)

(अर्थ – प्राणीमात्राचे पराकाष्ठेचे हित म्हणजे सत्य होय.)

सत्यं व्रतपरं व्रतम् । (९४)

अर्थ– व्रतामधील श्रेष्ठ व्रत म्हणजे सत्य होय.

अहिंसा – अनुशासनपर्वात अहिंसेचे सामर्थ्य सांगताना म्हटले आहे की, 'अहिंसेमुळे दीर्घायुष्य प्राप्त होते असे ज्ञानी लोक म्हणतात. (९५)

अहिंसया च दीर्घायु: इति प्राहु: मनीषिण: ।

आर्जव – 'कुटिलता हेच मृत्यूचे स्थान आहे, आणि सरळपणा आणि नम्र वृत्ती हेच ब्रह्मपद आहे, हा एवढाच ज्ञानाचा विषय असताना वृथा बडबड कशासाठी ? (९६)

सरळ वृत्ती हाच खरा धर्म आहे. कुटिलता हा अधर्म होय. (९७)

वर सांगितल्याप्रमाणे अहिंसा व आर्जव या गुणांचे महत्त्व महाभारतात वर्णन केले आहे.

दान – दान या मूल्याबद्दल महाभारतात सर्वांगीण विचार हा आढळतो.

कोणाला कोणते दान द्यावे यासंबंधी वनपर्वात खालील उपदेश केला आहे.

दु:खीकष्टी माणसाला आश्रय द्यावा. थकलेल्याला दमल्या–भागलेल्याला आसन द्यावे. तहानलेल्याला पाणी द्यावे, तसेच भुकेलेल्या माणसाला अन्न द्यावे. (९८)

९३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२०९.४)

९४) BORI प्रमाणित प्रत म.भा.वनपर्व (३.२१३.३०)

९५) BORI प्रमाणित प्रत म.भा. अनुशासनपर्व (१६३.१२)

९६) BORI प्रमाणित प्रत म.भा.शांतिपर्व (१२.७९.२१)

सर्वं जिह्म मृत्युपदम् आर्जवं ब्रह्मण: पदम् ।

एतावान् ज्ञानविषय: किं प्रलाप: करिष्यति ।।

९७) BORI प्रमाणित प्रत म.भा. अनुशासन पर्व (१४२.३०)

९८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२.५५)

देयमार्तस्य अयनं, श्रितश्रान्तस्य चासनम् ।

तृषितस्य च पानीयं क्षुधितस्य च भोजनम् ।।

तसेच यापुढील श्लोकात दान द्यावयाचे धन कसे मिळविलेले, ते कोणाला, कोठे व केव्हा द्यावे याचेही मार्गदर्शन श्रीव्यासमुनींनी युधिष्ठिराला केले आहे. (९९)

१) न्यायबुद्धीने मिळविलेल्या धनाचेच दान करणे हे वैशिष्ट्य लक्षात ठेवले पाहिजे. योग्य व्यक्तीला, योग्य ठिकाणी व योग्य वेळी सज्जनांना ते द्यावे.

२) अन्यायाने मिळविलेल्या धनाने जो दानधर्म केला जातो, तो दात्याला फार मोठ्या भीतीपासून (संकटापासून) वाचवू शकत नाही.

३) योग्य व्यक्तीला, योग्य काळी शुद्ध मनाने दिलेले थोडेसे दानदेखील परलोकी (अनंत – फार मोठे), चिरकाल टिकणारे फळ देते असे म्हटले आहे.

२) केवळ जन्माने ब्राह्मण तो ब्राह्मण असे नाही. ब्राह्मणत्व हे जन्माधिष्ठित नाही. तर खरे गुण (चिरंतन मूल्ये) ज्याच्या अंगी आहेत तोच खरा ब्राह्मण असे वनपर्वातच अजगर–युधिष्ठिर संवादात अजगराने खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

१) ‘सत्य, क्षमा, दया, उत्तम चारित्र्य, कठोरपणा नसणे, दम (विकारांवर संयमाने मात), दयाबुद्धी ही ज्याच्या ठिकाणी आढळतात तोच खरा ब्राह्मण असे म्हटले आहे.

२) जे चातुर्वर्ण्याला प्रमाण मानतात, सत्य, ब्रह्म, शूद्रांच्या बाबतीतही जे सत्य, दान, शांतवृत्ती, कठोरपणा नसणे, अहिंसा, तसेच दया आणि प्रामुख्याने उत्तम चारित्र्याने युक्त असे गुण आढळतात. तोच खरा ब्राह्मण असे तत्त्वज्ञानी लोक जाणतात. (१००)

---

९९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२४५.३१ ते ३३)

१) विशेषस्तत्र विज्ञेयो न्यायनोपार्जितं धनम्।
पात्रे देशे च काले च साधुभ्यः प्रतिपादयेत्।।३१।।

२) अन्यायसमुपात्तेन दानधर्मोधनेन यः।
क्रियते न स कर्तारं त्रायते महतो भयात्।।३२।।

३) पात्रे दानं स्वल्पमपि काले दत्तं युधिष्ठिर।
मनसा सुविशुद्धेन प्रेत्यानन्तफलं स्मृतम्।।३३।।

१००) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१७७.१६, १७)

१) सत्यं, क्षमा, दया, शीलमानृशंस्य, दमो, घृणा।
दृश्यन्ते यत्र नागेंद्र स ब्राह्मणः इति स्मृतः।। १६।।
चातुर्वर्ण्य प्रमाणं च सत्यं च ब्रह्म चैव ह।
शूद्रेष्वपि सत्यं च दानमक्रोध एव च।।
आनृशंस्यमहिंसा च।
घृणा चैव युधिष्ठिर।।१७।।

३) १) पात्रे दत्त्वा प्रियाण्युक्त्वा सत्यमुक्त्वा च भारत ।

अहिंसानिरत: स्वर्गं गच्छेदिति भरतर्षभ ।।२ ।।

२) दाने रतत्त्वं सत्यं च अहिंसा प्रियमेव च ।

एषां कार्यगरीयस्तादृश्यते गुरुलाघवम् ।।४ ।।

वनपर्वातच वरील दोन श्लोकात खरे थोर कोण, हे सांगितले आहे.

(अर्थ – १) योग्य व्यक्तीला दान देऊन, नेहमी सत्य बोलून, नेहमी अहिंसेत गढून गेलेल्यालाच स्वर्गप्राप्ती होते.

२) दानाची आवड, सत्य आणि अहिंसा प्रिय असणारे, तसेच तारतम्य ज्यांच्याजवळ आहे. त्यांच्याबाबतीत कार्याचा मोठेपणा दृष्टीस पडतो.) (१०१)

तर वनपर्वातील १७८व्या अध्यायातील ४३व्या श्लोकात म्हटले आहे की, पुरुषांच्या बाबतीत जात अथवा कुळ महत्त्वाचे नाही. तर सत्य, संयमीवृत्ती, तप, कर्तव्याकर्तव्याचा विवेक, अहिंसा व सदैव दान करण्याची वृत्ती या गोष्टी आवश्यक आहेत. जात किंवा कुळ नव्हे. (१०२)

वरील विवेचनावरून हे सहज लक्षात येईल की, महाभारतात जन्माधिष्ठित वर्ण वा जात यापेक्षाही चिरंतन मूल्यांचे संस्कार असणारा आचार हा सर्वश्रेष्ठ मानला आहे.

वनपर्वात पतिव्रता स्त्री व कौशिक ब्राह्मण तसेच धर्मव्याध यांच्या कथा आल्या आहेत. ज्यामध्ये चिरंतन मूल्यांचे महत्त्व प्रतिपादन केले आहे.

त्या कथा पुढे थोडक्यात दिल्या आहेत.

१) पतिव्रता स्त्रीची कथा – (वनपर्व १९७.१ ते २२)

कौशिक ब्राह्मण आपल्या वृद्ध आईवडिलांना सोडून तपश्चर्येसाठी वनात गेला. एकदा तो झाडाखाली ध्यानस्थ बसला असता झाडावरील बगळीने त्याच्या अंगावर घाण केली. कौशिक ब्राह्मणाने रागावून वर बघताच बगळी जळून खाक झाली. कौशिक ब्राह्मणाला वाईट वाटले. तेव्हा तसाच उठून तो गावात भिक्षा मागण्यासाठी गेला. एका घरात त्याने भिक्षा मागितली. परंतु त्याचवेळी घरातील स्त्रीचा पती कामावरून घरी आला. कौशिक ब्राह्मणाला तसाच उभा ठेवून तिने प्रथम पतीचा आदर करून त्याला भोजन दिले.

---

१०१) BORI प्रमाणित प्रत म.भा.वनपर्व (३.१७८. २,४)

BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( ३.१७८.४३)

१०२) सत्यं दमस्तपो योगमहिंसा दाननित्यता ।

साधकानि सदा पुसां न जाति र्न कुलं नृप ।।

कौशिक ब्राह्मण क्रोधित झाला, तेव्हा पतिव्रता स्त्रीने त्याला खालील उपदेश केला,

१) 'मनुष्यांच्या शरीरात राहणारा क्रोध हा त्याचा शत्रूच होय. जो क्रोध आणि मोह यांच्यावर मात करतो त्यालाच देव 'ब्राह्मण' असे जाणतात.'

२) इंद्रियांवरील संयम हा शाश्वत असला पाहिजे. सत्य आणि ऋजुता हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे धर्म जाणणारे लोक म्हणतात.' (१०३)

२) धर्मव्याधाची कथा – (वनपर्व १९८.१९९, २०१ ते २०६)

कौशिक ब्राह्मणाचा क्रोध पाहून पतिव्रता स्त्रीने त्याला खऱ्या धर्मज्ञानासाठी धर्मव्याधाकडे जाण्यास सांगितले. मिथिला नगरीत धर्मव्याध राहात होता.

व्यवसायाने मांसविक्री करणारा असा तो व्याध होता. आपले कुटुंब, माता–पिता, नोकरचाकर यांच्या बाबतीतील कर्तव्य तो चोख पार पाडत असे. व्यवसाय नेकीने करत असे. माता–पित्यांना देवता मानून त्यांची सेवा करत असे. त्याने कौशिक ब्राह्मणाला खऱ्या धर्माचा उपदेश केला.

'यथाशक्ती माणसाने अन्नाचे दान करावे. सहनशीलता ठेवून नित्यनेमाने कर्तव्याचरण करावे. योग्यतेप्रमाणे प्रत्येकाचे पूजन करावे. सर्व प्राणीमात्रांवर दया करावी. इतर गुण हे त्यागाशिवाय मानवांमध्ये राहू शकत नाहीत. असत्य टाळावे. मागणी केल्याशिवाय दुसऱ्याचे प्रिय करावे. तसेच लोभामुळे, गर्वामुळे किंवा द्वेषाने धर्माचा (कर्तव्याचरणाचा) कधीही त्याग करू नये. (१०४)

तर सुसंस्कृत लोकांची वर्तणूक कशी असते, शिष्टाचारात कोणते गुण येतात याचे तपशीलवार वर्णन धर्मव्याधाने कौशिक ब्राह्मणाला सांगितले आहे.

---

१०३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७.१ ते ४४)

१) क्रोधः शत्रुः शरीरस्थो मनुष्याणां द्विजोतम।
यः क्रोधमोहौ तरति तं देवाः ब्राह्मणं विदुः।।३१।।
इंद्रियाणां निग्रहं च शाश्वतं द्विजसत्तम।
सत्यार्जवे धर्ममाहुः परं धर्मविदो जनाः।।३८।।

१०४) BORI प्रमाणित प्रत म.भा.वनपर्व (३.१९८.३९.४०)

शक्त्या अन्नदानं सततं तितिक्षा धर्मनित्यता।
यथार्हं प्रतिपूजा च सर्वभूतेषु वै दया।।
त्यागात् न अन्यत्र मर्त्यानां गुणास्तिष्ठन्ति पुरुषे।
न च कामात् न संरम्भात् द्वेषात् धर्मं उत्सृजेत्।।

यज्ञं दानं तपो वेदा सत्यं च द्विजसत्तम।

पञ्चैतानि पवित्राणि शिष्टाचारेषु नित्यदा।।१।।

गुरुशुश्रूषणं सत्यमक्रोधो दानमेव च।

एतत् चतुष्टयं ब्रह्मन् शिष्टाचारेषु नित्यदा।।(१०५)

(अर्थ – १) यज्ञ, दान, तप, वेदाध्ययन, सत्य या पवित्र अशा गोष्टी शिष्टाचारात नेहमीच असतात.

२) वडील माणसांची सेवा, सत्य, शांत वृत्ती, दान या चार गोष्टी शिष्टाचारात नेहमीच असतात.

३) वेदांचे सार सत्य हे आहे. सत्याचे सार संयम हे आहे. तर संयमाचे सार त्याग हे नेहमीच शिष्टाचारात असते.)(१०६)

वनपर्वातील १९८ व्या अध्यायात सत्य, अहिंसा, क्षमा, दया, आर्जव या चिरंतन मूल्यांच्या आचरणावर धर्मव्याधाने विशेष भर दिला आहे.

वनपर्वातील २४६ व्या अध्यायात ब्रीहिद्रोणत्याग केलेल्या मौद्गल्याचे वर्णन करताना दुर्वासमुनी त्याची प्रशंसा करतात.

'हे मौद्गल्या, दया, सत्य आणि कर्तव्यनिष्ठा (धर्म) हे सर्व तुझ्या ठायी प्रतिष्ठित आहे. आपल्या कर्माचरणाने तू जगाला जिंकले आहेस. त्यामुळे तुला सर्वश्रेष्ठ गती प्राप्त झाली आहे. (१०७)

वनपर्वातील अध्याय २५८ ते अध्याय २७६ यामध्ये रामकथेचे वर्णन आले आहे. राम हा 'पितृवचनकारिन्' म्हणून गौरविला आहे. 'राजा सत्यो भवतु इति।' आपला पिता राजा दशरथ याचे वचन असत्य ठरू नये म्हणून राम चौदा वर्षेवनवास स्वीकारतो. (१०८)

वनपर्वातच सावित्रीचेआख्यान आले आहे. सत्यवानाला पती म्हणून वरण्याचा निश्चय सावित्री करते. तो गुणी परंतु अल्पायुषी असल्याचे कळते. तेव्हा हा विचार सोडून द्यावा असे सावित्रीचे वडील तिला सांगतात. यावर सावित्रीने दिलेले उत्तर तिची सत्यनिष्ठा दर्शविते. सावित्री म्हणते,

---

१०५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८.५७,६०)

१०६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३. १९८.६२)

वेदस्य उपनिषत् सत्यं सत्यस्योपनिषत् दम:।

दमस्योपनिषत् शिष्टाचारेषु नित्यदा।।

१०७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२४६.२८)

दया सत्यं च धर्मश्च त्वयि सर्वं प्रतिष्ठितम्

जितास्ते कर्मभिर्लोका: प्राप्तोऽसि परमां गतीम्।।

१०८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व अध्याय (२६०.२७)

'मनाने निश्चय केल्यानंतर तो वाणीने सांगितला जातो. नंतर त्याप्रमाणे कृती केली जाते. म्हणून माझे मन हेच मला प्रमाण आहे.' (१०९)

वनपर्वातील यक्षप्रश्नांमध्ये युधिष्ठिराने सांगितले आहे की, 'दक्षता (हुशारी) हा परिपूर्ण असा धर्म आहे. दान म्हणजेच परिपूर्ण अशी कीर्ती होय. सत्य हे परिपूर्ण असे स्वर्गप्राप्तीचे साधन आहे. तर शील (चारित्र्य) म्हणजेच परिपूर्ण असे सुख होय. (११०)

प्रजागरपर्वात चिरंतन मूल्यांचे महत्त्व सांगताना विदुराने म्हटले आहे की यज्ञ, दान, अध्ययन व तप हे चार गुण सज्जनांमध्ये नेहमीच वसत असतात. तर इंद्रियनिग्रह, सत्य, सरळपणा व मृदुता या चार गुणांचे ते नेहमीच आचरण करतात. (१११)

तसेच विदुराने पुढे म्हटले आहे की,

एको धर्म: परं श्रेय: क्षमैका शान्तिरुत्तमा ।

विद्यैका परमा तृप्ति: अहिंसैका सुखावहा ।। (११२)

(अर्थ – धर्म (कर्तव्याचरण) हाच एकमेव कल्याणकारक आहे. क्षमा हीच सर्वश्रेष्ठ शांती आहे. ज्ञान हाच सर्वश्रेष्ठ संतोष, तर अहिंसा ही एकमेव सुखकारक अशी आहे.)

यज्ञ, अध्ययन, दान, तप, सत्य, क्षमा, दया आणि निर्लोभी वृत्ती हा आठ प्रकारचा धर्माचरणाचा मार्ग आहे. (११३)

महाभारतकालामध्ये शासनसंस्थेचा प्रमुख राजा असे. त्यामुळे राजधर्म हा अत्यंत महत्त्वाचा मानला जाई. यामुळे भीष्माचार्यांनी शांतीपर्वात युधिष्ठिराला सत्याचे महत्त्व विशद केले आहे.

---

१०९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२७८.२७)

मनसा निश्चयं कृत्वा ततो वाचा अभिधीयते।

क्रियते कर्मणा पश्चात् प्रमाणं मे मनस्तत: ।।

११०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७.४९)

दाक्ष्यं एकपदं धर्म्यं, दानं एकपदं यश: ।

सत्य एकपदं स्वर्ग्यं, शीलमेकपदं सुखम् ।।

१११) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३५.४८)

११२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.६२.३२)

११३) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.६२.१३०)

इज्याध्ययनदानानि तप: सत्यं क्षमा घृणा।

अलोभ इति मार्गोऽयं धर्मस्य अष्टविध: स्मृत: ।।

'धर्माचरणासाठी सत्याखेरीज इतर कोणतेच कारण राजांकरिता नाही. सत्यवृत्तीत मग्न असणारा राजाच या लोकी व परलोकातही आनंद प्राप्त करतो. ऋषीमुनींच्या बाबतीतही सत्य हेच सर्वश्रेष्ठ आहे. राजाच्या सत्यवृत्तीखेरीज सर्वश्रेष्ठ असे विश्वासाचे कारण नाही. (११४)

भीष्मपितामह पुढे म्हणतात,

तस्मान्नित्यं दया कार्येचातुर्वर्ण्ये विपश्चिता ।

धर्मात्मा सत्यवाक्चैव राजा रञ्जयति प्रजा: ।। (११५)

(अर्थ : म्हणून विद्वान अशा शहाण्या राजाने चारही वर्णांच्या बाबतीत दयावृत्तीने वागावे. धर्म हाच ज्याचा आत्मा आहे अशा सत्यवृत्तीने वागणारा (सत्यनिष्ठ) राजाचा प्रजेला संतुष्ट करतो.)

यादृष्टीने पाहिले असता महाभारतातील सर्वच राजांचे वर्णन यादृष्टीने केलेले आढळते.

शिबी राजा हा अत्यंत दयाळू होता. तप, सत्य, धर्म, विनय, लक्ष्मी, सहनशक्ती हे सर्व गुण अप्रतिम अशा त्या शिबी राजाच्या अंगी होते. (११६)

राजा ययाती हा देखील धर्मानुसार राज्यपालन करीत असे. असे उल्लेख आदिपर्वात आले आहेत. (११७)

राजा शंतनुचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

१) स एव शंतनुर्धीमान् देवराजर्षिसत्कृत: ।

धर्मात्मा सर्वलोकेषु सत्यवागिति विश्रुत: ।।

दमो दानं क्षमा बुद्धिर्ह्री धृतिस्तेज उत्तमम् ।

नित्यान्यासन् महासत्वे शंतनौ पुरुषर्षभे ।। (११८)

(अर्थ – अत्यंत बुद्धिमान्, सत्कारित झालेला शंतनु हा धर्मात्मा व त्रिलोकात सत्यवाणी असलेला

---

११४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६.१७, १८)

११५) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६.३६)

११६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.८८.१९)

दानं तप: सत्यमथापि धर्मो

ह्री: श्री: क्षमा सौम्य तथा तितिक्षा ।

राजन् एतानि अप्रतिमस्य राज्ञ:

शिबे: स्थितानि अनृशंसस्य बुध ।।

११७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.८० श्लोक ३, ४, ५ व ६ )

११८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व ( १.९४.१ व २)

म्हणून प्रसिद्ध होता. दम, दान, क्षमा, विनय, धैर्य, तेजस्वीपणा हे सर्व गुण त्या महापराक्रमी, पुरुषसिंह शंतनुच्या अंगी सदैव वास करत.)

इक्ष्वाकुप्रभव महाभिष राजा हा देखील सत्यवाक् व सत्यविक्रम असाच होता. [११९]

राजा शंतनुचा व गंगेचा पुत्र देवव्रत हा त्याच्या सत्यावरील निष्ठेने व आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याच्या आपल्या प्रतिज्ञेनेच 'भीष्म' म्हणून विख्यात झाला. [१२०]

भीष्माचार्य अत्यंत शीलसंपन्न, ज्ञानी व महापराक्रमी होते. प्रत्यक्ष श्रीकृष्णाने त्यांच्या थोरवीचे वर्णन करताना अर्जुनाला म्हटले आहे की, 'कुरुकुलातील महापराक्रमी असे भीष्माचार्य अस्ताला गेल्यानंतर (त्यांच्या मृत्यूनंतर) जणू काही सर्वज्ञानच लयाला जाईल. [१२१]

पाच पांडवांमधील सर्वात थोरला युधिष्ठिर हा धर्मराज म्हणून अतिशय विख्यात होता. धृतराष्ट्राने युवराजपद दिले ते त्याचे अंगभूत असे गुण पाहूनच.

'धैर्य, स्थिरवृत्तीत्व, सहनशीलता, दयाळूवृत्ती (कठोरपणाचा अभाव), आर्जव, सेवकांबद्दल अनुकंपा आणि सदैव मैत्रीभाव हे गुण व शीलसंपन्नता यामुळे युधिष्ठिराने आपल्या पित्याच्या कीर्तीलाहि मागे टाकले. [१२२]

युधिष्ठिराच्या वृत्तीचा एवढेच नव्हे तर जीवनाचाच स्थायीभाव 'धर्म' हा होता. ऐहिक लाभाचा विचार न करता सदैव कर्तव्याचे व सत्याचेच पालन त्यांनी केले.

वनपर्वात द्रौपदीला आपल्या वागण्याचे स्पष्टीकरण देताना युधिष्ठिरांनी दिलेले उत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर स्वच्छ प्रकाश टाकते.

'नाहं कर्मफलान्वेषी राजपुत्रि चराम्युत।
ददामि देयमित्येव यजे यष्टव्यमित्युत।।
अस्तु अत्र फलं मा वा कर्तव्यं पुरुषेण यत्।
गृहे वा वसता कृष्णे यथाशक्ति करोमि तत्।। [१२३]

---

११९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९१.१)

१२०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व ( १.९७ श्लोक १५ ते १८ तसेच १.१०३.१५)

१२१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.४६२३)
तस्मिन् अस्तमिते भीष्मे कौरवाणां धुरन्धरे।
ज्ञानानि अस्तं गमिष्यन्ति तस्मात्त्वां चोदयाम्यहम्।।

१२२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१३९.१.२)

१२३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.३२.२, ३)

(अर्थ – हे राजपुत्रि (राजकन्ये) मी कर्माच्या फळाचा कधीच विचार करत नाही. निर्हेतुकपणे द्यायचे म्हणून मी दान देतो. यज्ञ करावयाचा म्हणून मी यज्ञ करतो. कोणतेही फळ मिळो वा न मिळो घरात राहणाऱ्याने –गृहस्थाने– जे कर्म करावयाचे ते मी यथाशक्ती करतो.)

कुंती व विदुर या दोघांनीही युधिष्ठिराच्या गुणवत्तेचे कौतुक केले आहे. कुंती म्हणते, 'युधिष्ठिर अतिशय नम्र, सत्यनिष्ठ, धैर्यवान व निग्रही आहे. भूतमात्रावर दया करणे हा त्याचा स्वभाव आहे. काम व द्वेष या विकारांवर त्याने विजय मिळविलेला आहे. सज्जनांच्या मार्गानेच तो नेहमी जातो. धर्मज्ञ, शीलसंपन्न व सदाचारी असा हा युधिष्ठिर आहे. सर्व गुणांनी युक्त असा तो त्रैलोक्याचा राजा होण्याच्या योग्यतेचा आहे. (१२४)

तर धृतराष्ट्राला उपदेश करताना युधिष्ठिराबद्दल विदुर म्हणतो,

'यस्मिन् धृतिः अनुक्रोशः क्षमा, सत्यं पराक्रमः ।

नित्यानि पाण्डवे ज्येष्ठे, स जीयेत रणे कथम् ।।

(अर्थ– ज्याच्यामध्ये धैर्य, संतोष, दया, क्षमा, सत्य, पराक्रम या गोष्टी सतत निवास करत असतात, त्या ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला युद्धात कोण जिंकेल ?)(१२५)

एवढेच नव्हे तर वनवासात असताना सात्यकीला भगवान श्रीकृष्णांनी सांगितले की अधर्माने प्रत्यक्ष देवांचे राज्य मिळाले तरी युधिष्ठिर घेणार नाही. धर्माने एखाद्या गावाचे राज्य मिळाले तरी चालेल.(१२६)

पांडव वनवासात असताना सर्व प्रजाजन युधिष्ठिर व पांडवांमागून वनात जाण्यास निघाले. ते युधिष्ठिर इत्यादिंच्या सहवासात राहू इच्छित होते. ते देखील युधिष्ठिराचा सदाचार व सद्गुण याविषयी त्यांना जी खात्री होती त्यामुळेच ! याविषयीचे सविस्तर वर्णन वनपर्वात आले आहे. (१२७)

---

१२४) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.८८.१८.२०.२, २१.१)

ह्रीमान् सत्यधृतिर्दान्तो भूतानामनुकम्पिता ।

कामद्वेषौ वशे कृत्वा सतां वर्त्मानुवर्तने ।। (२०.२)

शीलवृत्तोपसम्पन्नो धर्मज्ञः सत्यसङ्गरः ।

राजा सर्वगुणोपेतः त्रैलोकस्यापि यो भवेत ।। (२१.१)

१२५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१९२.१९)

१२६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१२०.२३)

अधर्मयुक्तं न च कामयेत् राज्यं सुराणामपि धर्मराजः ।

धर्मार्थयुक्तं तु महीपतित्त्वं ग्रामेऽपि कस्मिंश्चिदयं बुभूषेत् ।।

१२७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१.१५, १८, १९ १२ ते ३८)

१)	नेयमस्ति मही कृत्स्ना यत्र दुर्योधनो नृप: ।

साधु गच्छामहे सर्वेयत्र गच्छन्ति पाण्डवा: ।।

२)	क्व गमिष्यथ भद्रं व: त्यक्त्वास्मान्दु:खभागिन: ।

वयमप्यनुयास्यामो यत्र यूयं गमिष्यथ ।।

३)	अधर्मेण जिताञ्श्रुत्वा युष्मांस्त्यक्तघृणै: परै: ।

उद्विग्ना: स्म भृशं सर्वेनास्मान्हातुमिहार्हथ ।।

युधिष्ठिराचे वर्णन प्रात:स्मरणीय श्लोकातही 'पुण्यश्लोको युधिष्ठिर:' असे आले आहे.

यक्षप्रश्नांच्या प्रसंगाच्या वेळीही युधिष्ठिराच्या धर्मनिष्ठ वृत्तीची साक्ष पटते. यक्षाने 'तुझ्या एका भावाला मी प्राणदान देईन' असे सांगितल्यानंतर युधिष्ठिरांनी सांगितले, 'नकुलाला प्राणदान द्यावे.' त्यांनी यक्षाला अशी विनंती केल्यावर यक्ष आश्चर्यचकित झाला. आपल्या कुंतीमातेप्रमाणे आपली दुसरी सावत्र आई माद्री ही देखील पुत्रवती रहावी अशी त्यांची इच्छा होती. [१२८]

तसेच महाप्रस्थानपर्वात स्वर्गात आपल्याबरोबरीने आलेल्या कुत्र्यालाही प्रवेश देण्याची मागणी त्यांनी केली. हा प्रसंगही युधिष्ठिरांच्या धर्मनिष्ठा तसेच सत्यनिष्ठा यांची साक्ष देतो.

विदुर हा धृतराष्ट्राचा बंधु व प्रधानामात्य होता. तो दासीपुत्र होता. परंतु सत्यापासून कधीही विचलित न होणारा होता. अत्यंत सदाचारी व चारित्र्यवान् अशी त्याची ख्याती होती.

महर्षी व्यासांनी त्याच्या जन्मापूर्वीच त्याचे श्रेष्ठत्व खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

'त्रैलोक्यात विदुराप्रमाणे नेहमी धर्माला अनुसरून आचरण करणारा, धर्माचे संपूर्ण रहस्य जाणणारा असा कोणीच नसेल.' [१२९]

'धर्म व अर्थ या दोहोंमध्ये कुशल, लोभ व संताप यापासून पूर्ण मुक्त, दूरदृष्टी असणारा, अत्यंत संयमी आणि कुरुकुळाच्या हिताचीच सदैव इच्छा करणारा असा विदुर आहे. [१३०]

---

१२८)	BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७)

१२९)	BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१००.२६)

'त्रिषु लोकेषु न त्वासीत् कश्चित् विदुरसंमित: ।

धर्मनित्यं तथा राजन् धर्मेच परमं गत: ।।

१३०)	BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०८.१९)

'धर्मेचार्थेच कुशल: लोभक्रोधविवर्जित: ।

दीर्घदर्शी शमपर: कुरुणां च हिते रत: ।।

'विदुर अत्यंत विवेकी व स्पष्टवक्ता होता. पुत्रमोहाच्या आहारी गेलेल्या धृतराष्ट्राला विदुराने अनेक वेळा स्पष्ट शब्दात त्याची चुकीची विचारसरणी दाखविली आहे. तसेच योग्य अशा आचरणाचा उपदेशही केला आहे. उद्योगपर्वातील अध्याय ३३ ते ४० हे 'प्रजागरपर्व' अथवा 'विदुरनीती' या नावाने प्रसिद्ध आहेत.

अर्जुन हादेखील 'सत्यवाक्' असा होता. त्याचे वर्णन 'सत्यसन्धपरायण' असे केले आहे. एखादा पांडव द्रोपदीबरोबर एकांतात असताना दुसऱ्याने तेथे जावयाचे नाही अशी अट ठरलेली होती. शस्त्रागारात युधिष्ठिर द्रोपदीबरोबर असताना अर्जुन शस्त्रे घेण्यासाठी तेथे गेला. अटीचा भंग झाला. तेव्हाचे अर्जुनाचे शब्द त्याची सत्यावरील निष्ठा दाखविणारे आहेत.

'कोणत्याही मिषाने कर्तव्यापासून च्युत होऊ नये असे मी आपल्याकडून ऐकले आहे. मी सत्यापासून विचलित होणार नाही. तर सत्य आचरण, सत्याचे पालन करूनच मी शस्त्रे मिळविन.' (१३१) असे म्हणून तो बारा वर्षे वनवासासाठी गेला.

अर्जुन हा अत्यंत शीलसंपन्न व चारित्र्यवान होता. अर्जुन इंद्रलोकात गेला असता इंद्राने उर्वशी या अप्सरेला त्याच्या सेवेसाठी पाठविले. परंतु 'आपला पूर्वज पुरुरवा याची तू पत्नी असल्याने तू मातेप्रमाणे मला वंद्य आहेस.' असे सांगून अर्जुनाने तिला परत पाठविले. (१३२)

पांडवांचा अज्ञातवासाचा काल संपल्यानंतर आपली कन्या उत्तरा हिच्याशी विवाह करावा अशी विराट राजाची इच्छा होती. परंतु बृहन्नडा वेशात अर्जुनाने तिला नृत्य शिकविल्याने ती त्याची शिष्या होती. तिचा पत्नी म्हणून स्वीकार करणे शक्य नाही असे अर्जुनाने सांगितले. तसेच सून म्हणून तिचा स्वीकार करून विराटाचे मनही राखले. यावरून अर्जुनाची चारित्र्यसंपन्नता लक्षात येते. (१३३)

नकुल आणि सहदेव हेदेखील सत्यसंध व सत्यधर्मपरायण होते.

ऋषीसत्तम नारदांचे वर्णनही 'सत्यवाक्' असेच आले आहे.

क्षमा – क्षमावृत्तीचे उत्तम उदाहरणही आपल्याला युधिष्ठिराच्या वृत्तीत पहावयास मिळते. जयद्रथाने द्रौपदीला पळवून नेण्याचा प्रयत्न केला. भीमार्जुनांनी पराक्रमाने द्रौपदीची मुक्तता केली. जयद्रथाला ठार

---

१३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.२०४.२९)
न व्याजेन चरेद्धर्ममिति मे भवत: श्रुतम्।
न सत्यात् विचलिष्यामि सत्येनायुधमालभे ॥

१३२) फाटक न.र. – महाभारताचे सुरस मराठी भाषांतर, भांडारकर प्रत क्रिटिकल नोटस् ४५. वनपर्व खंड २रा भांडारकर प्रतीत गाळलेला.

१३३) BORI प्रमाणित प्रत म.भा. विराटपर्व (४.६६.२९ ४.६७. २ ते ९)

मारावे असा त्यांचा विचार होता. मात्र युधिष्ठिर म्हणाला, 'आपली चुलत बहीण दु:शला हिचा तो पती आहे. तेव्हा त्याला सोडून द्या.' यावरून त्याच्या क्षमाशील वृत्तीचा प्रत्यय येतो. (१३४)

तसेच पांडव वनवासात असताना आपले वैभव त्यांना दाखवून खिजविण्यासाठी दुर्योधन लवाजमा घेऊन तेथे गेला. त्यावेळी चित्ररथ गंधर्वाने त्याला पकडून नेले. युधिष्ठिराने क्षमाशील वृत्ती दाखवून भीमार्जुनांना त्याची सुटका करण्यास सांगितले. यावरून त्याच्या विवेकी वृत्तीचाही परिचय होतो. (१३५)

दयाबुद्धी –

१) वनपर्वातील वैवस्वतमनूच्या कथेत मनूने दयाबुद्धीने माशाचे प्राण कसे वाचविले ही कथा आली आहे. वैवस्वतमनू हा 'कृपया अभिपरिप्लुत:' असा होतो असे त्याचे वर्णन केले आहे. (१३६)

२) अगस्तीऋषींनी नहुषाला सर्पयोनीचा शाप दिला. मात्र त्याने पश्चाताप व्यक्त केल्यावर त्याला लगेच उ:शाप दिला. येथे ऋषींची दयाबुद्धी दिसून येतो. (१३७)

३) कौशिक ब्राह्मणाला पतिव्रतेच्या कथेत पतिव्रतेने त्याला क्रोधाचे दुष्परिणाम सांगितले. तसेच दयाबुद्धीच्या आचरणाचा उपदेश त्याला केला. (१३८)

वनपर्वातच अध्याय १९० मध्ये मण्डूपोख्यान आले आहे. वामदेव ऋषींच्या बाबतीत राजा असत्य आचरण करतो. परीक्षितपुत्र शल, वामदेव ऋषींचे वामी नावाचे घोडे आपल्या मृगयेसाठी घेतो. परंतु कबूल केल्याप्रमाणे काम झाल्यावर परत करत नाही. तेव्हा मुनी क्रोधाने त्याला ठार करतात. त्याचा बंधु दल हाही असत्य आचरण करून घोडे द्यायचे नाकारतो. तेव्हा मुनी त्याला शाप देतात. परंतु त्याच्या पत्नीने क्षमायाचना केल्यावर दयाबुद्धीने लगेच उ:शापही देतात. (१३९)

दान –

प्राचीन काळी दान करणे अतिशय पुण्यकारक समजले जाई. राजे लोक यज्ञामध्ये भरपूर दानधर्म करीत असा उल्लेख येतो. युधिष्ठिराने राजसूय यज्ञाच्या वेळी विपुल दाने दिली. तसेच रघुवंशात विश्वजित् यज्ञ केल्यानंतर दानधर्मामध्ये सर्वच दान दिल्याने रघुराजा निष्काञ्चन झाला होता असे उल्लेख आढळतात.

---

१३४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३. अ. २५१ ते अ. २५६)

१३५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२२९ ते २३५)

१३६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१८५)

१३७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१७८.३० ते ४४)

१३८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७.३१ ते ३३)

१३९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९०.४३ ते ८२)

स्वत:चे प्राण धोक्यात असताना प्राणांचीही पर्वा न करता केलेले दान हे उच्चतम कोटीचे मानले जाते.

यादृष्टीने कर्णाने कवचकुंण्डलांचे दान केल्यामुळे तो अद्वितीय असा दानशूर म्हणून विख्यात झाला.

तीच गोष्ट शिबी राजाची ! कपोताचे प्राण वाचविण्यासाठी त्याने स्वत:च्या शरीराचे मांस दिले.

त्याग –

त्यागाचे पराकोटीचे उदाहरण दधीची ऋषींचे म्हणता येईल. समाजाला उपद्रव देणाऱ्या वृत्रासुराचा नाश व्हावा म्हणून त्यांनी स्वत:च्या शरीरातील हाडेही इंद्राचे वज्र बनविण्यासाठी काढून दिली.

समाजातील श्रेष्ठ लोक राजा, ऋषीमुनी, पुरोहित यांचे वर्तन अशाप्रकारे सदाचारयुक्त होते. चिरंतन मूल्यांचे पालन कसोशीने करण्याचा प्रयत्न ते करत. त्यापासून कधीही विचलित होत नसत. वैयक्तिक अशा नीतीमान् आचरणाने समाजातील नीतीदेखील उच्च प्रकारची असे, असे आपल्याला आढळून येते. यासाठीच प्रत्येक व्यक्तीच्या वर्तणुकीत ही चिरंतन मूल्ये दृढ होतील यादृष्टीने सुसंस्कार होणे अतिशय गरजेचे ठरते.

*****

## प्रकरण २ रे
# राष्ट्रासंबंधी विविध कल्पना

प्रस्तावना –

वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचा परस्परसंबंध व आवश्यकता यामध्ये आपण पाहिले की, मनुष्य हा स्वभावत: समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे पती, पत्नी, मुले व इतर नातेवाईक यांचे कटुंब बनते. अशा अनेक कुटुंबाचा समाज होतो. व्यक्तींच्या नीतीमूल्यांवरच समाजाची नीतीमूल्ये ही ठरतात. जर व्यक्ती सदाचरणी व नीतीमान असेल तरच समाज त्यानुसार वर्तन करेल. म्हणजेच समाजाच्या नीतीमूल्यांवरच राष्ट्राची नीतीमत्ता ठरत असते. यासाठी राष्ट्र ही संकल्पना काय आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

## १) वेदातील राष्ट्रासंबंधीची कल्पना :–

वेदकाळात राष्ट्रासंबंधी निश्चित कल्पना होत्या असे दिसून येते. तसेच ऋग्वेदात राष्ट्र हा शब्द राज्याचा भूप्रदेश अशा अर्थाने आलेला आढळतो. तसेच राष्ट्राचा शासक म्हणून राजाचा उल्लेख केलेला आढळतो.

ऋग्वेदाच्या चौथ्या मंडलात 'सर्व देव, क्षत्रिय आणि विश्वायु (मनुष्यांचा प्रमुख) असे माझे दोन प्रकारचे राष्ट्र आहे. देवाधीश व मनुष्याधीश अशा क्षत्रियांवर माझे अधिराज्य आहे. त्यांना स्वेच्छेनुरूप फिरविणारा राजाधिराज वरूण मीच आहे.' असा 'राष्ट्र' व 'राजा' हा स्पष्ट उल्लेख आहे. [१]

तसेच ऋग्वेदातील ७व्या मंडलात वरुण हा राष्ट्रसम्राट नदीपती, जयिष्णु सामर्थ्याचे प्रतीक असा उल्लेख आहे. [२]

ऋग्वेदाच्या याच ७व्या मण्डलात 'द्यावापृथिवीसम्राट इन्द्रावरुण यांना त्रैलोक्याचा विस्तार करण्याची विनंती केली आहे. [३]

---

१) ऋक् (४.४२.१ व २ )

मम द्विता राष्ट्रं क्षत्रियस्य विश्वायो विश्वे अमृता यथा न:।

ऋतुं सचन्ते वरुणस्य देवा राजामि कृष्टेरुपमस्य वर्वे:।।

अहं राजा वरुणो मह्यं तान्य सुर्याणि प्रथमा धारयन्त।

२) ऋक् (७.३४.११) – राजा राष्ट्रानां पेशो नदीनामुनुत्तमस्मै क्षत्रं विश्वायु।

३) ऋक् (७.८४.२) – युवो राष्ट्रं बृहदिन्वति द्यौर्योसेतृभिररज्जुभि: सिनीथ:।

ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातही 'दीर्घसेवित देवांना मी त्यजिल्यामुळे इंद्र, अग्नी, सोम, वरुण पदच्युत झाले. तेव्हा मी परत येऊन राष्ट्राचे रक्षण केले' असे अग्निसूक्तात म्हटले आहे. [४]

तसेच याच मंडलातील १७४ व्या सूक्तात अभिषिक्त राजाची स्तुती करून त्याला खालीलप्रमाणे अनेक आशीर्वाद दिले आहेत.

१) 'हे प्रजाश्रित राजन्, राजा म्हणून प्रजाजन तुझा स्वीकार करोत. नित्य आणि स्थिर राहून तू चिरस्थायी राज्याचा स्वामी बन.

२) 'हे राजन, स्वर्गीय इंद्रासदृश अथवा पृथ्वीलोकाच्या पर्वतासदृश स्थिर राहून राष्ट्ररक्षण कर. तू अढळ रहा.

३) 'हे राजन, वरूण, बृहस्पति, इंद्र आणि अग्नी तुला आणि तुझ्या राज्याला चिरस्थायी करोत. [५]

वरील सर्व विवेचनावरून प्रजेच्या रक्षणासाठी राजा ही संस्था अस्तित्वात आली असे दिसते. राजा नसलेल्या भूप्रदेशात लोकांना सुरक्षित वाटत नसे. बलवान लोक अशक्तांना त्रास देत. तेव्हा दुर्बल, अशक्त अशांच्या रक्षणासाठी ईश्वराने राजाची निर्मिती केली. ऋग्वेदात वरूण, इंद्र यांचा राजा म्हणून वरील ऋचात उल्लेख केलेला आढळतो.

ऐतरेय ब्राह्मणात अशी कथा आहे की, देव आणि असुर यांच्यातील युद्धात देवांचा सतत पराभव होत असे. 'राजा नसल्याने आपला सतत पराभव होतो. तेव्हा आपण राजा करुया.' [६]

ऋग्वेदकाली आर्यांनी व्यापलेल्या प्रदेशात त्यांची अनेक लहान लहान राज्ये होती. त्यांच्यात आपापसात युद्धे होत. असुरांबरोबरही त्यांची युद्धे होत. यातील पराभव टाळण्यासाठी जेव्हा ते ब्रह्मदेवाला शरण गेले. तेव्हा सर्वात बलवान म्हणून ब्रह्मदेवाने इंद्राला राजा नेमले. [७]

दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख यादृष्टीने लक्षणीय आहे.

अथर्व वेदातही अनेक ठिकाणी राजा, राष्ट्र असे स्पष्ट उल्लेख आले आहेत. राजधर्माचेही अनेक अंगांनी विवरण या वेदात केले आहे.

---

४) ऋक् (१०.१२४.४)

अग्निः सोमो वरुणस्ते च्यवन्ते पर्यावद्राष्ट्रं तदवाभ्यायन्।

५) ऋक् (१०.१७३.१,२,५)

६) ऐतरेय ब्राह्मण (१.१४)

'अराजतया वै नो जयन्ति राजानं करवावहै।'

७) मराठी विश्वकोश खण्ड १७ वा.

‘हे राजा, तू पर्वताप्रमाणे स्थिर रहा. इंद्राप्रमाणे दृढ आणि अढळ रहा. राष्ट्राचे धारणपोषण कर.[८]

हे राजा, तुझ्या हितासाठी राजा वरूण ठाम उभा राहिलेला आहे. इंद्र व अग्नी तुझे राज्य टिकवून धरोत ![९]

त्याकाळी प्रजेकडून राजा निवडला जात असे हे खालील ऋचेवरून स्पष्ट होते.

‘त्वं विशो वृणतां राज्याय ।

त्वां इमा: प्रदिश: पञ्च देवी: ।

वर्ष्मन् राष्ट्रस्य ककुदिश्रयस्य ।

ततो न उग्रो विभजा वसूनि ।।[१०]

‘हे राजा, लोकांनी तुला राजा म्हणून निवडून दिले आहे. राष्ट्राच्या सर्वोत्तम स्थानी रहा. मोठ्या संख्येने लोकांनी आपला प्रमुख म्हणून निवडले आहे. तेव्हा उदार व ममतायुक्त अंत:करणाने, न्यायी वृत्तीने तू संपत्तीचे विभाजन कर.’

राजादेखील प्रजेला अभिवचन देत असे.

‘अहं राष्ट्रस्याभिवर्गेनिजो भूयांसमुत्तम: ।[११]

‘मी राष्ट्रातील जनांमध्ये त्यांचा म्हणून राहीन व प्रजेच्या विश्वासास पात्र ठरेन.’

राजा शासक असला, तरी तो प्रजेशी एकनिष्ठ असे. सर्वांच्या सहकार्याने राजाची निवड होत असे. खालील ऋचेवरून हे स्पष्ट होते.

‘जे राजे आहेत, राजा बनविणारे आहेत, जे सूत आहेत, जे गावातील पुढारी आहेत, त्या सर्वांना हे पर्णमणे, तू माझ्याभोवती असणारे कर.’

अशाप्रकारे एकूण २६ ठिकाणी प्राचीत वेद वाङमयात राष्ट्र, राजा असे शब्द स्पष्टपणे आले आहेत.[१२]

‘वेदातील राष्ट्रदर्शन’ या बाळशास्त्री हरदासांच्या पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतरात असे म्हटले आहे की,

---

८) अथर्व (मण्डल ६.९७)

९) अथर्व (मण्डल ६.८८)

१०) अथर्व (मण्डल ३.४.२)

११) अथर्व (मण्डल ३.५.७)

‘ये राजानो राजकृत: सूता: ग्रामण्याश्च ये ।

उपस्तीन्पर्ण, मह्यं त्वं सर्वन् कृष्वमितो जनान् ।।

१२) वैदिक पदानुक्रम कोश (खण्ड ४ था)

"In the oldest Book of the Vedas, viz 'Rig-Veda' we get about 40 names of kings. In this Veda, King was described as the protector of the people. The word 'Raja-king' recurs very often. It is derived from the root 'रट्' which means to rule or to control." (१३)

तर 'एकात्म भावजीवन असलेला समाज म्हणजे राष्ट्र होय. वेदकालातील समाजजीवनात असे एकात्म भावजीवन आढळून येते.' असे बाळशास्त्री हरदास यांनी साधार सिद्ध केले आहे. (१४)

अथर्ववेदातील अनेक सूक्तात राजा कसा असावा, त्याची कर्तव्ये कोणती, यासंबंधी पुष्कळ विचार आला आहे.

राजाला सर्व बाबतीत साहाय्य करण्यासाठी पुरोहित असे. तो वेदवेत्ता व मंत्रतंत्रात कुशल असे.(१५)

तसेच समाजातील प्रतिष्ठित अशा अनेक लोकांनी बनलेली सभा व समिती राजाला शासनव्यवस्थेत मदत करत. करार असा स्पष्ट उल्लेख नसला तरी आपले संरक्षण करण्याच्या अटीवर बलाढ्य व्यक्तीची राजा म्हणून निवड करण्यात येत असे.(१६)

२) कौटिल्याच्या काळातील राष्ट्रकल्पना :-

कौटिल्याचा काळ इ.स.पूर्व ४ थे शतक, हा मानला जातो. या काळातच 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथाची निर्मिती झाली. राज्यसंस्थेची निर्मिती कशी झाली यासंबंधी अर्थशास्त्रात पुढील कल्पना दोन गुप्तहेरांच्या संवादात आली आहे.

'मात्स्यन्यायाभिभूता: प्रजा: मनुं वैवस्वतं राजानं चक्रिरे। धान्यषड्भागं पण्यदशभागं च हिरण्यं चास्य भागधेयं प्रकल्पयामासु:। तेन भूता: राजान: प्रजानां योगक्षेमावह: ।।' (१७)

वैदिक काळामध्ये बाहेरील आक्रमणांपासून दुर्बल अशा प्रजाजनांचे संरक्षण करण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली. समाजातील समर्थ व्यक्तीची राजा म्हणून निवड झाली. त्याला साहाय्य करण्यासाठी युद्ध करण्यास समर्थ अशा क्षत्रियवर्णाची निर्मिती झाली. परंतु पुढील काळात समाजातून धर्माने वागण्याची प्रवृत्ती लोप पावली. समाजातील सबल लोक काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपुंच्या

---

१३) Glimpses of the Vedic Nation - P.No. 486.

१४) वेदातील राष्ट्रदर्शन -बाळशास्त्री हरदास, प्रकरण १ पृ.क्र. ४.

१५) भारतीय सांस्कृतिक कोश (खण्ड ९वा)

१६) मराठी विश्वकोश (खण्ड १७)

१७) कौ.अ. -अधिकरण १ अध्याय १३.

आहारी गेले. समाजातील दुर्बल लोकांची पिळवणूक करून अथवा परस्परांशी स्पर्धा करून स्वत:चे हित साधण्याची प्रवृत्ती वाढीला लागली. जसे समुद्रातील लहान माशांना मोठा मासा गिळंकृत करतो, तसे लोक वागू लागले. यामुळे समाजातील दुर्बल लोकांच्या योगक्षेमाची काळजी घेण्यासाठी व दुर्वर्तन करणाऱ्या लोकांवर वचक बसविण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली. प्रजेने धान्याचा एकषष्ठांश भाग, तर व्यापाराचा दहावा भाग, सुवर्ण या गोष्टी राजाला कररूपाने द्याव्यात, त्याबदली राजाने दण्डनीतीचा वापर करून प्रजेचे संरक्षण करावे, तसेच तिच्या योगक्षेमाची काळजी वाहावी, असे यावरून दिसते. त्यामुळे 'राजेशाही हेच शासनाचे स्वरूप होय.' असे कौटिल्याचे मत आहे. त्या राजाच्या अधिपत्याखालील भूभाग व त्यावरील प्रजा म्हणजे राज्य होय. (१८)

'सुखस्य मूलं धर्म:। धर्मस्य मूलम् अर्थ:। अर्थस्य मूलं राज्यम्। दण्डनीतिम् अधितिष्ठन् प्रजा: संरक्षति।' असे कौटिल्याने म्हटले आहे.

'चतुर्वर्णाश्रमो लोको राज्ञा दण्डेन पालित:।

स्वधर्मकर्माभिरतो वर्तते स्वेषु वर्त्मसु।। (१९)

'सुखाचे मूळ म्हणजे कर्तव्यनिष्ठा, कर्तव्यनिष्ठाही धनावर अवलंबून असते. धनसंपत्तीचे मूळ राज्य हे होय. दंडनीतीच्या मदतीने प्रजेचे रक्षण करतो तो राजा !

चार वर्ण व चार आश्रम यांचे आचरण करणारी ही, राजा जिचे दण्डनीतीच्या साहाय्याने पालनपोषण करतो, अशी व स्वत:च्या कर्तव्यपूर्तीच्या कर्मात गढून गेलेली अशी ही प्रजा आपापल्या जीवनमार्गावर स्थित असते.

वैदिक कालापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे समाजात चार वर्ण मानले गेले आहेत. व्यक्तीच्या अंगातील गुण, स्वभाव व कर्म यानुसार समाजाची या चार वर्णात विभागणी केली होती. (२०)

तसेच ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम अशी व्यक्तीच्या आयुष्याची चार आश्रमात विभागणी केली होती. या चारी वर्णातील व चारी आश्रमातील लोकांचे राजाने दण्डनीतीने पालन व संरक्षण करावे असे कौटिल्याने म्हटले आहे.

राजाला आपल्या धर्माच पालन करताना दण्डनीतीची फार आवश्यकता असते. कारण राष्ट्रातील प्रजाजन आपापल्या कर्तव्यांचे योग्य पालन करतात, ते केवळ त्यांना राजदण्डाची भीती असते म्हणून होय.

---

१८) कौ.अ. – हिवरगावकर ब.रा. प्रस्तावना – भागवत दुर्गाबाई – पृ.क्र.५.

१९) कौ.अ. – कंगले आर्.पी. (अधि. १ अध्याय ४)

२०) 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागश:। (भगवद्गीता अ ४, श्लो. १३)

'सुविज्ञातप्रणीतो हि दण्ड: प्रजा: धर्मार्थकामै: योजयति।'

'योग्य कारण असेल तर चौकशी करून दण्डाचा उपयोग केला तर प्रजा, धर्म, अर्थ व काम या तीन गोष्टी मिळविण्याचा मार्गाला लागते. [२१]

सर्व प्रजा ही दण्डनीतीनेच ताब्यात ठेवता येते. कारण अतिशय शुद्ध चारित्र्याची व्यक्ती ही फार दुर्मिळ असते. केवळ दंडाच्याच भीतीने लोक कर्तव्यपालन करतात.[२२]

मात्र दंडनीतीचा वापर करताना फार कठोर अशा दंडामुळे प्रजा उद्विग्न होते. तर अति मृदु असा दंडाचा वापर केल्यास प्रजेवर नियंत्रण राहात नाही. म्हणून दंडाचा वापर जपून करावा, विचारपूर्वक करावा असे कौटिल्य सांगतो. [२३]

कौटिल्याने राज्याचेही विविध प्रकार सांगितले आहेत.

१) एकछत्री साम्राज्य –

ज्या राज्यात एकाच व्यक्तीचा अंमल असतो. त्या राज्याला 'एकछत्री साम्राज्य' असे म्हटले आहे. हिंदुस्थानातील बहुतेक राज्ये या प्रकारची होती. उदा. चंद्रगुप्त मौर्याचे राज्य.

२) द्वैराज्य –

एकाच राज्यात ज्यावेळी दोन राजे राज्य करीत असतात त्यास द्वैराज्य म्हणत असत. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकात विदर्भात 'द्वैराज्य' असावेअसा राजाने हुकूम दिला होता. कौटिल्याच्या मते द्वैराज्य म्हणजे पितापुत्रांचे किंवा दोन भावांचे राज्य होय.

३) वैराज्य –

द्वैराज्यात दोन राजात वितुष्ट येऊन राज्याची दोन शकले होण्याचा प्रसंग येतो त्यास वैराज्य असे म्हटले आहे. वैराज्य हे द्वैराज्याप्रमाणे वेगळे शासन नव्हे तर. कौटिल्याच्या मते वैराज्य म्हणजे परक्या राजाचा अंमल होय. काहींच्या मते वैराज्य म्हणजे 'अराजक' किंवा राजा नसलेले राज्य असा आहे. [२४]

---

२१) कौ. अ. – कंगले आर.पी. (अधि १.४)

२२) म.स्मृती – (अध्याय ७.२२).

२३) कौ. अ.(अधि. १ अध्याय ४)

२४) कौ. अ. – कंगले आर.पी. (प्रकरण ५).

याखेरीज संघ व गण असे शब्दही कौटिलीय अर्थशास्त्रात वापरलेले आढळतात. संघ किंवा गण हे शब्द 'संस्था' किंवा 'राष्ट्र' या अर्थाने योजिले आहेत.[२५]

'कुलसंघो हि दुर्जय: । यातील व 'संघवृत्त' या प्रकरणातील संघ शब्द 'राजकीय पद्धत' या अर्थाने योजला आहे. गौतमबुद्धाच्या काळात लोकशाही पद्धतीची निदर्शक अशी अनेक गणराज्ये अस्तित्वात होती, असे बौद्ध वाङ्मयात आढळते. तसे अलेक्झांडरच्या हिंदुस्थानवरील स्वारीत त्याला राजेशाहीखेरीज अनेक गणराज्ये आढळली असे मॅगेस्थेनीसने नमूद केले आहे.[२६]

३) महाभारतकालीन राज्याची कल्पना :–

महाभारताच्या १२ व्या शांतिपर्वात राजधर्माचे विवरण आले आहे. त्यावेळी युधिष्ठिराने भीष्माचार्यांना प्रश्न विचारला की, राज्यसंस्थेची उत्पत्ती कशी झाली ? या प्रश्नाच्या उत्तरात यासंबंधी अतिशय विस्तृत असे वर्णन भीष्माचार्यांनी केले आहे.

१) फार प्राचीन काळी राज्यसंस्था अस्तित्वात नव्हती. कारण प्रजेतील लोक धर्माला अनुसरून वागत. तसेच ते परस्परांचे रक्षण करीत. त्यामुळे संरक्षणासाठी राजासारख्या व्यक्तीची आवश्यकता नव्हती.

परंतु पुढे मनुष्यांच्या मनात काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपुंचे प्राबल्य वाढले. एकमेकांना सहकार्य करण्याची बुद्धि नष्ट झाली. सबल लोक दुर्बल लोकांशी स्पर्धा करू लागले. कर्तव्य कोणते, अकर्तव्य कोणते, काय योग्य, काय अयोग्य याचा विचार नष्ट झाला. तेव्हा देव ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवाने त्यांना दंडनीती सांगितली. परंतु नुसत्या दंडनीतीचा उपयोग होणार नाही. तिचा योग्य उपयोग करणारा राजा हवा. म्हणून सर्व देव श्रीविष्णूकडे गेले. श्रीविष्णूंनी आपल्या अंगीच्या तेजाच्या सामर्थ्याने 'विरजस्' या पुत्राची उत्पत्ती केली. परंतु त्याच्या अंगी संन्यासी वृत्ती असल्याने तो ही जबाबदारी स्वीकारण्यास तयार होईना. त्याचा कीर्तिमान् नावाचा पुत्र होता. परंतु तोही विरक्त वृत्तीचा होता. या कीर्तीमानाचा कर्दम हा पुत्र होता. परंतु कर्दमालाही तपश्चर्येची आवड होती. कर्दमाचा अनंग नावाचा पुत्र होता. तो दंडनीती या शास्त्रात अतिशय प्रवीण होता. तसेच नीतिमानहि होता. त्याचा अतिबल नावाचा पुत्र अतिशय सदाचारी होता. परंतु तो सुखोपभोगांच्या आहारी गेला. मृत्युची सुनीथा ही मानसकन्या होती. अतिबलापासून तिला 'वेन' नावाचा पुत्र झाला. तो अनीतीने वागत असे. तसेच प्रजेवर जुलूम करीत असे.

---

२५) कौ. अ. – (अधि. १ अ.१७).

२६) कौ.अ. – हिवरगावकर ब.रा. – प्रस्तावना (पृ. ६८, ६९)

तेंव्हा ब्रह्मवादी ऋषींनी त्यास ठार केले. त्याचा पृथु हा पुत्र दंडनीती, धनुर्विद्या व इतर सर्व शास्त्रे यात अतिशय पारंगत होता. त्याला देव, ऋषी, ब्राह्मण यांच्यासह इंद्र व श्रीविष्णु यांनी राज्याभिषेक केला. त्यापूर्वी त्याने खालीलप्रमाणे शपथ घेतली.

'मी भूमीतलावर वास्तव्य करणाऱ्या ब्रह्माचे, अर्थात वेदांचे आणि ब्राह्मणांचे संरक्षण करीन. मी केंव्हाही स्वतंत्रपणे न वागता राज्यनीतीमध्ये जे धर्म नित्य म्हणून सांगितले आहेत त्यांचे नि:शङ्कपणे आचरण करीन. [२७]

पालयिष्यामि अहं भौमं ब्रह्म इत्येव चासकृत्। यश्चात्र धर्मोनित्योक्तो दण्डनीतिव्यपाश्रय:। तमशङ्क: करिष्यामि स्ववशो न कदाचन।)

२) राजा नसेल तर राष्ट्र निर्बल होते. त्यातील धर्म नष्ट होतो. पाण्यातील मासे ज्याप्रमाणे परस्परांना खातात त्याप्रमाणे प्रजेतील लोक परस्परांना त्रास देतात. राष्ट्रात कोणी शासक नसेल तर शत्रू ते राष्ट्र आक्रमण करून हस्तगत करतात. अशी जेंव्हा परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा सर्व लोक ब्रह्मदेवाला शरण गेले. तेव्हा ब्रह्मदेवाने मनूला पन्नास पशूंपैकी एक पशू, सुवर्णाच्या पन्नास भागांपैकी एक भाग, व धान्याचा एक दशांश भाग देण्याचे कबूल केले. नंतर मनूने राज्यपदाचा स्वीकार केला. [२८]

३) रुद्र व दानव यांच्यामध्ये युद्ध झाल्यानंतर रुद्राने दानवांचा संहार करणारे खड्ग श्रीविष्णूला दिले. हे खड्ग दंडासाठी वापरून त्यासाठी राजाची निर्मिती झाली.

असिं धर्मस्य गोप्तारं ददौ सत्कृत्य विष्णवे।
विष्णुर्मरीचये प्रादात् मरीचिर्भगवानपि ।।६६ ।।
महर्षिभ्यो ददौ खड्गमृषयो वासवाय च।
महेन्द्रो लोकपालेभ्यो लोकपालास्तु पुत्रक ।।६७ ।।
मनवे सूर्यपुत्राय ददु: खड्गं सुविस्तरम्।
ऊचुश्चैनं तथा वाक्यं मानुषाणां त्वमीश्वर:।
असिना धर्मगर्भेण पालयस्व प्रजा इति ।।।६८,६९ ।। [२९]

('श्रीविष्णूंनी ते खड्ग मरीचीला दिले. त्यांनी ते ऋषींना दिले. तर ऋषींनी ते इंद्राला दिले. इंद्राने ते लोकपालांना दिले. लोकपालांनी ते सूर्यपुत्र मनूला दिले. ते लोकपाल मनूला म्हणाले, 'तू मनुष्यप्राण्यांचा ईश्वर (शासनकर्ता) हो. कर्तव्याचरणयुक्त अशा खड्गाने तू प्रजेचे परिपालन कर.)

---

२७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अध्याय ५९, श्लोक १३ ते १८).

२८) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व ( अध्याय ६७ श्लोक १८ ते २३)

२९) BORI प्रमाणित प्रत म.भा. (अध्याय १६६)

४) महाभारतकाली असणारी राज्ये –

महाभारतकालात अनेक छोटी छोटी राज्ये अस्तित्वात होती.

१) मत्स्यदेशाचा राजा विराट हा होता. त्याच्या विराटनगरीत पांडव अज्ञातवासात असताना राहिले होते.

२) राजा द्रुपदाचा देश पाञ्चाल हा होता. द्रौपदी ही त्याचीच कन्या होती.

३) अंग देशाचा राजा कर्ण. दुर्योधनाने त्याला अंग देशाचा राजा बनविले.

४) कौरवांची आई गांधारीही गांधार देशाची राजकन्या होती.

५) बलराम व श्रीकृष्ण हे द्वारकेचे राजे होते.

६) मद्र देशाचाराजा शल्य होता.

७) अवंती हे राजा विंद व अनुविंद यांचे राज्य होते.

८) जरासंध हा मगध देशाचा राजा होता.

९) शिशुपालाचे राज्य म्हणजे चेदि देश.

१०) कौरवांचे राज्य कुरुपांचाल देश. त्याची राजधानी हस्तिनापूर ही होती.

११) जयद्रथ हा सिंधु–सौवीर देशाचा राजा होता.

१२) पांडव इन्द्रप्रस्थ नगरीचे राजे होते.

याखेरीज महाभारतात केकय, विदेह, कलिंग, काम्बोज, सात्वत, वंग, पुंड्र, आंध्र या इतर राज्यांचाही उल्लेख येतो. जेथे राजा ते राष्ट्र अशी कल्पना याकाळी दिसते. महाभारतकालात अशी अनेक राष्ट्रे होती. [३०]

अशाप्रकारे राज्यसंस्था व तिचा अधिपती राजा आस्तित्वात आले.ही संस्था कशी अस्तित्वात आली यासंबंधीच्या विविध कथा मागे दिल्या आहेत. समाजाचे नियमन करणारी व्यक्ती म्हणजे राजा ! जर राजा नसेल तर समाजाची अवस्था कशी होते याचे वर्णन मनुस्मृती तसेच महाभारतात यथातथ्य केले आहे. तसेच राजधर्माचे पालन करताना दण्डनीतीचा यथायोग्य वापर केलाच पाहिजे हेही वरील ग्रंथात आग्रहाने सांगितले आहे.

दंडास योग्य असणाऱ्या पापी लोकांना, राजा जागरूक राहून जर दंड न करेल तर बलवान लोक बलहीन लोकांना सुळावर धरून माशांप्रमाणे भाजून खातील. कावळादेखील यज्ञातील पुरोडाश खाऊन टाकेल. तसेच कुत्राही पायसासारखे हविर्दव्य खाऊन टाकील. कोणी कोणाच्या धाकात राहणार नाही. जे क्षुद्र

---

३०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (अध्याय १९)

आहेत तेच स्वसामर्थ्याने श्रेष्ठ ठरतील. (३१)

चराचरात बलवान लोकांच्या भीतीने सर्वत्र हाहाकार उडाला असताना परमेश्वराने सर्वांच्या रक्षणासाठी राजाला निर्माण केले. (३२)

अर्थात् अशी समर्थ व्यक्ती केवळ बलवान नाही तर तिच्या अंगी देवाचा अंश आढळतो अशी कल्पनाही प्राचीन वाङ्मयात आढळते.

इंद्र, अग्नी, वायु, यम, सूर्य, वरुण, चंद्र, वित्तेश या देवतांच्या अंशापासून परमेश्वराने राजाची निर्मिती केली. म्हणून तो सामर्थ्य व पराक्रमाने सर्वांपेक्षा वरचढ ठरतो. (३३)

तसेच विष्णूच्या अंशापासून राजांची निर्मिती होते असे विष्णुपुराण व अग्नीपुराणामध्ये म्हटले आहे. पूर्वीच्या व भविष्यातील सर्व काळात हे सत्य आहे. (३४) असे म्हटले आहे.

शुक्रनीतीमध्ये राजाने कोणत्या देवतांप्रमाणे कोणते गुण अंगी बाणवून राष्ट्राचा प्रमुख व्हावे याचे वर्णन केले आहे.

'इंद्रानिलयमार्काणामग्नेश्च वरुणस्य च चन्द्रवित्तेशयोश्चापि मात्रा निहृत्य शाश्वती: । जङ्गमस्थावराणां च हीश: स्वतपसा भवेत् ।' (३५)

अर्थ – इंद्र ज्याप्रमाणे हविर्भाव घेऊन लोकरक्षण कर्मात दक्ष राहतो, त्याप्रमाणे राजाने आपला भाग म्हणजे कर घेऊन प्रजेचे रक्षण करावे. सुगंधाची वा दुर्गंधाची कल्पना देणाऱ्या वायुप्रमाणे राजाने प्रजेला सत्, असत् कर्मांची जाणीव करून द्यावी. अंधकाराचा नाश करून प्रकाश देणाऱ्या सूर्याप्रमाणे राजाने अधर्माचा नाश करून धर्माचरणास प्रोत्साहन द्यावे. पापकृत्यांबद्दल दंड करणाऱ्या यमाप्रमाणे राजानेही प्रजेमध्ये दुष्कर्म करणाऱ्या लोकांना शिक्षा करावी. अग्नी ज्याप्रमाणे हविर्भाग भक्षण करून नित्य पवित्र असतो. त्याप्रमाणे राजाने प्रजारक्षणासाठी करभार घेऊन समाजात पावित्र्य राखावे. वरूण आपल्या आद्रतेने समग्र सृष्टीचे पोषण करतो, त्याप्रमाणे राजाने धनाने प्रजेचे संवर्धन करावे. आपल्या शीतल किरणांनी सर्वांना आल्हाद देणाऱ्या चंद्राप्रमाणे आपले सद्‌गुण व सद्वर्तन यांच्या योगाने राजाने प्रजेला आनंदित करावे. कुबेराप्रमाणे दक्ष राहून आपल्या धनाचे रक्षण करावे. (३६)

---

३१) म.स्मृती (अध्याय ७–२०.२१)

३२) म. स्मृती (अध्याय ७.३)

३३) म. स्मृती (अध्याय ७.४.५)

३४) अग्नीपुराण (२७६.२५) व विष्णुपुराण (५७.१२)

३५) शुक्रनीति अध्याय (१–७२.७३) मनुस्मृती (अध्याय ७.४)

३६) कौ. अ. – हिवरगावकर ब. रा. पृ. क्र. ६४.

जरी राजामध्ये देवांश असला तरी राजाला देवदत्त अधिकार अथवा हक्क नाहीत. परंतु अशातऱ्हेने सर्वगुणसंपन्न राजाच प्रजेला प्रिय असतो.

वरील विवेचनावरून राजाची कर्तव्ये कोणती याची कल्पना येते. ती कशाप्रकारे सांगितली आहेत ते पाहू.

राजाची कर्तव्ये :-

१) प्रजेचे संरक्षण – राजाने प्रजेचे संरक्षण हे दोन प्रकारे करावे असे सांगितले आहे.

अ) परकीय आक्रमणापासून संरक्षण.

ब) समाजातील दुर्बल घटकांचे सबलांपासून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण.

प्रजेचे पालन करणे हा राजाचा सर्वश्रेष्ठ धर्म होय. [३७]

ज्याने प्रजेचे पालन केले नाही. त्याचे सर्व यज्ञ व तप ही निष्फळ होत. उत्तम प्रकारे रक्षण केलेली अशी ज्याची प्रजा सुरक्षित आहे त्याचे राष्ट्र हे स्वर्गतुल्यच होय. [३८]

तर प्रजेबद्दल अनुकंपा असणारा राजा त्यांचा प्रत्यक्ष पिताच होय. [३९]

२) प्रजेचे परिपालन – प्रजाजनांचा योगक्षेम व्यवस्थित चालावा यासाठी दक्ष राहणे हेही राजाचे प्रमुख कर्तव्य होय. यासाठी शेती, पशुपालन, व्यापार यांची वाढ होईल असे प्रयत्न राजाने करावे. नव्या वसाहती स्थापन करणे, दुर्ग बांधणे या गोष्टी राजानेकरणे आवश्यक आहे. त्यासाठी आन्विक्षिकी व वार्ता या विद्यांचे अध्ययन राजाने करावे असे कौटिल्याने म्हटले आहे. [४०]

प्रजेचे संरक्षण व परिपालन करताना राजाला दंडनीतीचे सम्यक् ज्ञान असणे अतिशय आवश्यक आहे, असे मनुस्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र व महाभारत या तीनही ग्रंथात आग्रहाने सांगितले आहे.

'यत्र श्यामो लोहिताक्षो दण्ड: चरति पापहा ।

प्रजास्तत्र न मुह्यन्ति नेता चेत् साधु पश्यति ।

'ज्या देशामध्ये पापाचा नाश करणारा, श्यामवर्ण व लोहिताक्ष असा दण्ड अस्तित्वात असतो, तेथे दण्ड करणारा योग्य प्रकारे आपले कर्म करून त्याचा वापर करेल, तर तेथील प्रजा कधीही व्याकूळ होणार नाही. [४१]

---

३७) म.स्मृती (अ.७.१४४)

३८) अग्निपुराण (२२३.९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (२१.९)

३९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१३७.१००).

४०) कौ.अ. (अधिकरण १, अ.२)

४१) म.स्मृती (अध्याय ७.२५)

तसेच कौटिलीय अर्थशास्त्रात दण्डनीती ही 'अलब्धलाभार्था, लब्धपरिरक्षणी, रक्षितविवर्धिनी, वृद्धस्य तीर्थेषु प्रतिपादिनी' अशी चार गुणांनी युक्त असावी असे म्हटले आहे. (४२)

दण्डनीतीचा योग्य वापर करून राजाने धन मिळवावे. मिळालेल्या धनाचे योग्य प्रकारे रक्षण करावे, तसेच रक्षित धन अथवा राष्ट्र यांची वृद्धि कशी होईल हे पहावे. या वृद्धि पावलेल्या धनाचा योग्य विनियोग राजाने करावा. तरच राष्ट्रातील प्रजा सुखी व आनंदी राहते.

अशाप्रकारे प्रजेचे जे सुख, तेच राजाचे सुख, प्रजेला जे हितकारक, ते राजालाही हितकारक असते. स्वत:ला, स्वत:चे असे राजाला काहीही हितकारक नसते. असे कौटिल्याने म्हटले आहे. (४३)

अशातऱ्हेने प्रजेचे योग्य प्रकारे संरक्षण व परिपालन करणारा राजा प्रजेला पित्याप्रमाणे वाटतो, नव्हे, राज्यातील प्रजेबद्दल ज्याला करुणा वाटते तो राजा प्रजेचा प्रत्यक्ष पिताच असतो. (४४)

तर आपल्या औरस पुत्राचे पिता ज्याप्रमाणे रक्षण करतो. तसे राजाने सर्व प्रकारे प्रजेचे रक्षण करून राजधर्माचे योग्य पालन करावे असे अग्निपुराणात म्हटले आहे. (४५)

राजा या शब्दाची व्युत्पत्ती 'रट्' – राज्य करणे किंवा नियमन करणे या धातूपासून असली तरी रञ्ज्–सुखी ठेवणे या धातूपासूनही त्याचा उगम मानतात. म्हणूनच प्रजानुरञ्जन हे राजाचे प्रधान कर्तव्य मानले आहे. राजा हाच प्रजेचा कर्ताकरविता असतो तर त्यांच्या नाशासही तो कारणीभूत होतो असे शांतिपर्वात म्हटले आहे. (४६)

प्रजेचे रञ्जण करणे –प्रजेला सुखी ठेवणे हेच राजाचे आद्य कर्तव्य आहे. तसेच त्याने सत्याचेही रक्षण करावे असे शांतिपर्वातील अध्याय ५७.११ येथे भीष्माचार्यांनी सांगितले आहे.

प्रजेचे संरक्षण दोन प्रकारच्या आपत्तींपासून करावे लागते. (१) मानवी आपत्ती (२) दैवी आपत्ती.

परकीयांचे आक्रमण, स्वदेशातील चोर, लुटारू, निर्बल लोकांना त्रास देणारे दुर्जन या मानवी

---

४२) कौ.अ. (अधिकरण १, अध्याय ४)

४३) कौ. अ. (अधिकरण १ अ. १९)

'प्रजासुखे सुखं राज्ञः, प्रजानां च हिते हितम्।

नात्मप्रियं हितं राज्ञः, प्रजानां च प्रियं हितम्।।

४४) BORI प्रमाणित प्रत म. भा. शांतिपर्व (१३७.१००)

पिता हि राजा राष्ट्रस्य प्रजानां च यो अनुकम्पकः।

४५) अग्निपुराण (२२३.३२)

४६) BORI प्रमाणित प्रत म.भा.शांतिपर्व (९२. ८ ते १०)

आपत्ती होत. यांच्यापासून राजाने स्वपराक्रमाने त्यांचे रक्षण करावे. तर आग, दुष्काळ, पूर, रोगराई या दैवी आपत्ती होत. यांच्या निवारणासाठी राजाने यज्ञयाग करावे असे अग्निपुराणात सांगितले आहे. (४७)

२) वर्णाश्रमधर्माचे रक्षण :–

हे राजाचे दुसरे प्रमुख कर्तव्य होय. वैदिक परंपरेप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण समाजात रूढ होते. त्या प्रत्येक वर्णाची विहित कर्तव्ये निश्चित होती. जसे अध्ययन, अध्यापन, यजन या गोष्टी ब्राह्मण वर्गाचे कर्तव्य होते. तर पराक्रम गाजविणे, तेजस्वी वृत्ती, धैर्य, दाक्षिण्य हे गुण अंगी बाणवून स्वामित्व दर्शविणे, युद्धात पराङ्मुख न होणे, दान करणे, प्रजेचे संरक्षण व परिपालन करणे ही क्षत्रियाची कर्तव्ये होती. शेती, पशुपालन, व्यापार हे वैश्यांचे कर्तव्य होते. तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या त्रैवर्णिकांची सेवा करणे हे शूद्राचे कर्तव्य मानले जाई. (४८)

या चारही वर्णातील लोक आपापल्या आचारधर्माचे योग्य पालन करतील यावर नियंत्रण ठेवणे हे राजाचे महत्त्वाचे कर्तव्य असे. वर्णधर्माचे उल्लंघन करणाऱ्यास योग्य ते शासन करण्याचा अधिकार राजाला होता. रामाच्या राज्यात अपमृत्यू झाला. तेव्हा शंबूक नावाच्या शूद्राने वेदाध्ययन केले, असे आढळले. शूद्राने आपल्या आचारधर्माचे उल्लंघन केल्याने ही अपमृत्यूची घटना घडली. तेव्हा तत्कालीन नियमाप्रमाणे रामाने त्याला देहदंडाची शिक्षा दिली ही रामायणातील कथा राजाचा वरील अधिकारच दर्शविते.

तसेच धार्मिक कृत्ये व यज्ञयाग यांचे संरक्षण करणे हेही राजाचे प्रमुख कर्तव्य मानले जाई. केवळ नगरातील धार्मिक कृत्येच नव्हे तर समाजाबाहेर आश्रमात राहून तपश्चर्या व यज्ञयाग करणाऱ्या ऋषी व मुनी यांच्या आश्रमांचे व तेथे चालणाऱ्या सर्व धार्मिक कृत्यांचे रक्षण करणे हेही राजाचे कर्तव्य असे. (४९)

विश्वामित्र ऋषींनी दशरथ राजाकडे येऊन यज्ञाच्या रक्षणासाठी, यज्ञात विघ्ने आणणाऱ्या असुरांपासून यज्ञयाग वाचविण्यासाठी रामलक्ष्मणांची मागणी केली. दशरथ राजानेही विश्वामित्रांच्या या विनंतीला मान दिला. रामलक्ष्मणांनी असुरांशी युद्ध करून त्यांच्या यज्ञक्रिया निर्विघ्न पार पाडल्या. ही रामायणातील कथाही प्रसिद्ध आहे.

अशातऱ्हेने राजा हा वर्णाश्रमधर्माचे पालन करीत असे.(५०)

---

४७) अग्निपुराण (२४१–१४.१५).

४८) गीता – अध्याय १८ (श्लोक ४२, ४३, ४४).

४९) कौ. अ. (१.२.१) कंगले आर. पी.

चतुर्णां वर्णानाम् आश्रमाणां च स्वधर्मस्थापनात् औपकारिक: ।

५०) म.स्मृती (७.३५ ) स्वे स्वे धर्मेनिविष्टानां सर्वेषामनुपूर्वश: । वर्णानााश्रमाणांच राजा सृष्टोऽभिरक्षिता ।

३) राजाची न्यायदानासंबंधी कर्तव्ये –

प्रजेचे संरक्षण व प्रजाजनांचे परिपालन याबरोबरच राजाचे दुसरे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे न्यायदान हे होय.

राजा प्रत्यक्ष कायदे करत नसे. ते धर्मशास्त्रकारांनी निश्चित केलेले असत. वर्णाश्रमधर्माच्या नियमांचे योग्य पालन केले जाईल याविषयी राजा दक्ष असे. हे नियम उल्लंघून टाकणाऱ्या लोकांना तो शासन करत असे.

तसेच आपल्या समोर आलेल्या गुन्ह्यांची शिक्षा देताना धर्मशास्त्रात निष्णात असे विद्वान सल्ला देत असत. तो न्यायदानातील सर्वोच्च असा न्यायाधीश मानला जात असे. तसेच न्याय नि:पक्षपाती असावा यासाठी तो नेहमीच दक्ष असे.

गुन्हा सिद्ध करताना प्रत्यक्ष साक्ष व इतर पुरावे हे ग्राह्य धरले जात. तर काही वेळा दिव्य करावयास लावून गुन्हेगार निर्दोष आहे की दोषी हे ठरविले जात असे. तुरुंगवास ही शिक्षा प्रामुख्याने दिली जात असे. परंतु शिक्षा वर्णानुसार दिल्या जात. ब्राह्मणाला कमीत कमी शिक्षा करावी असे मनूने म्हटले आहे. (५१)

तसेच राजाने न्यायसभेत दररोज जाणे अपेक्षित असे. म्हणून त्याच्या दैनंदिन कामकाजात न्यायदानाचे कर्तव्य प्राचीन तज्ज्ञांनी समाविष्ट केले आहे. (५२)

प्रजेच्या मनात विश्वास निर्माण व्हावा, तसेच आपले चारित्र्य निष्कलंक असावे यासाठी राजा अतिशय दक्ष असे. म्हणूनच नि:पक्षपाती न्याय देऊन प्रजेसमोर आदर्श निर्माण करीत असे.

४) धार्मिक कृत्यांबद्दलची राजाची कर्तव्ये –

राजाच्या दैनंदिन वेळापत्रकात अनेक विधी व धार्मिक कृत्ये यांचा समावेश केलेला असे. राष्ट्रावर येणारी संकटे दूर व्हावीत व प्रजेचे कल्याण व्हावे यासाठी ही धार्मिक कृत्ये सांगितलेली असत.

राजाने रात्रीच्या शेवटच्या प्रहरी मुखमार्जन इत्यादि आटोपून अनन्य चित्ताने अग्निहोत्र होम करावा. ब्राह्मणांची पूजा करावी. यानंतर वास्तुलक्षणांनी युक्त अशा आपल्या सभेत प्रवेश करावा, असे मनुस्मृती या

---

५१) म.स्मृती (८.३८०)

न जातु ब्राह्मणं हन्यात् सर्व पापेष्वपि स्थितम्।

राष्ट्रादेनं बहि: कुर्यात् समग्र धनमक्षतम्।

५२) कौ.अ. (१.१९–१०.२६) द्वितीये पौरजानपदानां कार्याणि पश्येत् अपस्थानगत: कार्यार्थिनामद्वारासङ्ग कारयेत्॥

ग्रंथात सांगितले आहे. (५३)

ज्या सभेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद हे सर्व वेद जाणणारे ब्राह्मण व एक विद्वान् ब्राह्मण असे असतात, ती सभा चतुर्मुखब्रह्मदेवस्वरूप सभाच होय. (५४)

तसेच कौटिलीय अर्थशास्त्रात अधिकरण १ मधील एकोणिसाव्या अध्यायामध्ये राजाचा दैनंदिन कार्यक्रम सांगितला आहे. आठव्या (दिवसाच्या) भागात ऋत्विज, पुरोहित व आचार्य यांच्याकडून आपले अभिष्टचिंतन करून घ्यावे. संध्या करावी. सवत्स धेनूला व बैलाला प्रदक्षिणा घालावी. अग्निशाळेत जाऊन वैद्य, तपस्वी यांना अभ्युत्थान देऊन प्रणाम करावा, असे विधी सांगितले आहेत. (५५)

याखेरीज आपल्या सामर्थ्याने समुद्रवलयांकित पृथ्वीचे साम्राज्य प्राप्त केल्यानंतर राजसूय व अश्वमेध हे यज्ञही राजे पार पाडत असत. रामायणामध्ये रामाने अश्वमेध यज्ञ केला होता हे प्रसिद्ध आहे. तसेच महाभारतात युधिष्ठिराने राजसूय यज्ञ केल्याचा उल्लेख आहे.

प्रजापालनाचे आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडणारा व शिक्षेस पात्र असणारांना योग्य शासन करणारा राजा सतत यागच करीत असतो. असे मनुस्मृतीत म्हटले आहे. (५६)

या सर्व कर्तव्यांमध्ये स्वत:चे विहित कर्तव्य निष्ठेने व योग्य तऱ्हेने पार पाडणे हेच राजाचे प्रमुख कर्तव्य होय. उदा. प्रजासंरक्षण व प्रजेचे परिपालन असे भगवद्गीतेत म्हटले आहे. (५७)

राजाला आवश्यक असणारे गुण –

१) प्रजाजनांचे संरक्षण व प्रजापरिपालन ही राजाची प्रमुख कर्तव्ये मानली गेली आहेत. त्यासाठी समर्थ, बलवान् अशा व्यक्तीची राजा म्हणून नेमणूक करावी हे इष्टच आहे, परंतु त्याखेरीज इतर अनेक गुणांनी राजा संपन्न असला पाहिजे. असे प्राचीन ग्रंथकारांनी वर्णन केले आहे.

१) राजा हा इंद्र, अनिल, यम, सूर्य, अग्नी, वरूण, कुबेर या देवतांच्या अंशाने व त्यांच्यातील गुणांनी युक्त असा असला पाहिजे. असे शुक्रनीती (५८) व मनुस्मृती (५९) या दोन्ही ग्रंथात वर्णन केले आहे.

---

५३) म.स्मृती (७.१४५)

५४) म.स्मृती (८.११)

५५) कौ.अ. (अधिकरण १ अध्याय १९ श्लोक १७ ते २३)

५६) म. स्मृति (८.३०६)

रक्षन्धर्मेण भूतानि राजा वध्यांश्च घातयन्।

यजंतेऽहरहर्यज्ञै: सहस्त्रशतदक्षिणै:।।

५७) गीता (अ. २.३१)

५८) शुक्रनीती (१.७२.७३)

५९) म. स्मृती (अ. ७.४)

याचा अर्थ या देवतांच्या अंगी असणाऱ्या गुणांनी राजा समृद्ध असला पाहिजे इंद्र हविर्द्रव्य घेतो व असुरांपासून रक्षण करतो, त्याप्रमाणे राजाने करभार घेऊन प्रजेचे रक्षण करावे. सुगंधाची कल्पना देणाऱ्या वायुप्रमाणे प्रजेला सत् आणि असत् कर्मांची जाणीव द्यावी. प्रकाश देणाऱ्या सूर्याप्रमाणे अधर्मरूप अंध:काराचा नाश करून कर्तव्यनिष्ठारूपी धर्माचरणास प्रोत्साहन द्यावे. कुबेराप्रमाणे संपत्तीचे रक्षण करून व धनाची वाढ करून प्रजेचे परिपालन करावे. तर यमाप्रमाणे दंडनीतीचा वापर करून न्यायाचे रक्षण करावे. चंद्राप्रमाणे आपल्या अंगच्या सद्‌गुणांनी व सदाचरणाने प्रजेला संतुष्ट ठेवावे. राजा हाच प्रजेचा पिता व बंधु असतो.

२) कौटिल्याच्या मते राजा हा दीर्घोद्योगी, धार्मिक आचरणाचा, न्यायबुद्धीचा असावा. तसेच तो दानी वृत्ती असणारा व दानशूर असला पाहिजे. [६०]

याखेरीज राजा हा श्रेष्ठ कुलामध्ये जन्माला आलेला असणे आवश्यक आहे. तो बुद्धिमान, सत्त्वगुणी, अनुभवी लोकांचे ऐकणारा, धर्मनिष्ठ, पराक्रमी, शूर व दक्ष असावा असेही कौटिल्याने म्हटले आहे. [६१]

तसेच सर्व वर्णाश्रमांना आवश्यक असणारे असे जे गुण, म्हणजे अहिंसा, सत्य, शौच, अनसूया, अनृशंस्य, क्षमा हेहि गुण राजाच्या ठिकाणीही असणे आवश्यक आहे असे कौटिल्याने म्हटले आहे. [६२]

आता क्रमाने या गुणांचा विचार करू.

१) उत्तम कुळात जन्म –

ज्याचे बीज शुद्ध आहे अशा उच्च कुळात – उत्तम वंशात राजाचा जन्म झालेला असावा अशा वंशात ज्याचा जन्म झालेला आहे अशा राजाबद्दल प्रजेच्या मनात आदर असतो. यामुळेच विविध वंशातील राजे हे वंशपरंपरेने –ज्येष्ठतेच्या क्रमानुसार राज्यावर येत असत व राज्यकारभार पहात असत. उदा. राम हा सूर्यवंशातील होता. तसेच पांडव व कौरव हे कुरुवंशातील होते.

२) सौंदर्य –

राजाचे व्यक्तिमत्त्व हे आकर्षक व प्रजाजनांवर प्रभाव पाडणारे असावे उमदी वृत्ती व देखणेपणा या गुणांची आवश्यकता राजपद भूषविणाऱ्या व्यक्तीकडे असणे गरजेचे आहे असे कौटिल्याने म्हटले आहे.

---

६०) कौ.अ. (अधि १.१९)

६१) कौ.अ. (अधि. ६.१.१३)

'महाकुलिनो,देवबुद्धि, सत्त्वसम्पनौ, वृद्धदर्शी धार्मिक:। सत्यवाग् विसंवादक: कृतज्ञो, स्थूललक्ष्यो, महोत्साहो, दीर्घसूत्र: शक्यसामन्तो, दृढबुद्धिरक्षुद्र परिषत्को विनयकाम: ।।

६२) कौ. अ. (१.३.१३)

३) शौर्य व पराक्रम –

प्रजेचे, तसेच राष्ट्राचे संरक्षण हे राजाचे प्रमुख कर्तव्य मानले गेले आहे. युद्ध करणे हे राजाचे प्रमुख कार्य होय. तसेच 'संग्रामेषु अनिवर्तित्वम्' (रणांगणात शत्रूला कधीही पाठ दाखवायची नाही.) ही राजकर्तव्यातील अनिवार्य अशी प्रमुख वृत्ती राजाच्या बाबतीत मानली जाई. त्यामुळे रणांगणात लढता लढता मरण आले तर क्षत्रियासाठी–राजासाठी ती मोक्षप्राप्ती असेच मानले जाई.

'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।

ततो युद्धाय युज्यस्व, नैवं पापमवाप्स्यसि ।।'

असे महाभारत युद्धाच्या प्रसंगी भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले आहे. (६३)

४) संयम –

इंद्रियांवर विजय – वश्येन्द्रियता हा राजाचा प्रमुख गुण मानला आहे. 'काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्‌रिपुंवर राजाने मात करणे आवश्यक आहे. अर्थ व काम या दोहोंचा उपभोग घेताना तो कधीही कर्तव्यापासून च्युत होता कामा नये. 'धर्मात् अर्थश्च कामश्च ।' अर्थात् धर्म हा पुरुषार्थ त्याच्या जीवनात अग्रक्रमी असला पाहिजे. राज्याचा स्वामी असला तरी प्रसंगी राष्ट्रहितासाठी त्याला स्वसुखाचा पराकाष्ठेचा स्वार्थत्याग करावा लागतो. यामुळे त्याची पदवी 'ना विष्णु: पृथिवीपति: ।' अशी सर्वख्यात आहे. इंद्रियांवर जय मिळाल्यानेच त्याला विद्या व विनय या गोष्टी प्राप्त होतात, असे कौटिल्याने म्हटले आहे. (६४)

५) शास्त्राध्ययनसंपन्नता –

क्षत्रियांच्या स्वधर्मामध्ये अध्ययन, यजन, दान, तसेच शस्त्रास्त्रांचा उपयोग व भूतरक्षण ही महत्त्वाची कर्तव्ये सांगितली आहेत. यामध्ये शास्त्राध्ययन हे अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य सांगितले आहे. तसेच राजाचा प्रमुख गुण म्हणजे विद्यासंपन्नता हा सांगितला आहे. आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीती या चार विद्या (६५) असे कौटिल्याने सांगितले आहे. सांख्ययोग व तर्कशास्त्र यामुळे आन्वाक्षिकी विद्या प्राप्त होते. त्रयी विद्येमध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तीन वेदांचे अध्ययन व शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व

---

६३) गीता (अध्याय २.३७)

६४) कौ. अ. (अधिकरण १.६)

६५) कौ. अ. (अधिकरण १ अ. २.१)

ज्योतिष या सहा वेदाङ्गांचे अध्ययन यांचा समावेश होतो. त्यामुळे राजाला धर्म व अधर्म यांचे योग्य ज्ञान होते. वार्ता म्हणजे कृषी, गोरक्ष व वाणिज्य. यांच्या ज्ञानामुळे अर्थ व अनर्थ यांचे ज्ञान होते. तर दंडनीतीमुळे राजाला न्याय, अन्याय यांचा योग्य तो विचार, निवाडा करता येतो. अशा तऱ्हेने ज्ञानसंपन्न राजाची बुद्धि संकट अथवा उत्कर्ष या काळात आन्विक्षिकी विद्येमुळे स्थिर राहते असे कौटिल्याने म्हटले आहे. (६६)

६) विनय –

विद्यासंपन्न राजा हा विनयशील असला, वृद्ध व ज्ञानसंपन्न लोकांची राजाने सेवा केली की, त्यामुळे त्याचा कधीही विनाश होत नाही. तो लोकांच्या आदरास पात्र होतो. उद्धटपणामुळे (अविनयाने) वेन, सुदास, नहुष, सुमुख व निमि या राजांचा नाश झाला. तर पृथु व मनु यांना विनयामुळे राज्य मिळाले. कुबेराला विनयामुळे ऐश्वर्य प्राप्त झाले. विश्वामित्राला ब्राह्मणत्वाचा लाभ झाला. अशातऱ्हेने विनयशील राजा सर्वांनाच प्रिय असतो. विनयामुळे त्याचा उत्कर्ष होतो. तर अविनयामुळे सर्वनाश होतो. म्हणूनच विनय हा गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. (६७)

७) नि:पक्षपातीपणा –

दण्डनीतीचा सुयोग्य वापर करणारा राजा प्रजाजनात अतिशय प्रिय होतो. अतिशय कठोरपणे दंडनीतीचा वापर केल्यास प्रजा त्रासून जाते, उद्विग्न होते. जर दंडाचा वापर मृदुपणे केला अथवा अजिबात न वापरला तर प्रजेमध्ये मात्स्यन्याय बळावतो. तेव्हा तारतम्याने दंडाचा वापर करणे हे राजाच्या बाबतीत अतिशय आवश्यक आहे. न्याय करताना राजाने नि:पक्षपाती असले पाहिजे. तसेच दंडनीतीच्या बाबतीतही राजाचा नि:पक्षपातीपणा आवश्यक मानला आहे. (६८)

८) सत्यप्रियता –

सत्यनिष्ठा हा राजाच्या बाबतीतील अत्यंत महत्त्वाचा गुण होय. सर्व गुणांच्या मुळाशी सत्य हे मूल्य सर्वच ग्रंथकारांनी श्रेष्ठ मानले आहे. सत्यसंध राजाच सर्व बाबतीत प्रामाणिक व निष्ठावान राहू शकतो.

---

६६) कौ. अ. (अधि १, अध्याय २)

६७) मनुस्मृती (अध्याय ७, श्लोक ३८ ते ४२).

६८) कौ. अ. (अधिकरण १ अ. ४).

९) दानीवृत्ती –

दानशूरता हा राजाचा सर्वात मोठा गुण मानला जाई. ‘याचक दारातून विन्मुख जाणे हा फार मोठा कमीपणा मानला जाई. यज्ञामध्ये राजे लोक आपल्या सर्व संपत्तीचे दान करत असत. रघुराजाने विश्वजित् नावाच्या यज्ञात आपल्या सर्व संपत्तीचे दान केल्याचा उल्लेख रघुवंशात आला आहे. तसेच युधिष्ठिरानेही राजसूय यज्ञात मोठमोठी दाने दिल्याचा उल्लेख आहे.

याखेरीज बुद्धिमत्ता, विश्लेषणात्मक शक्ती, काळवेळ यांचा योग्य अंदाज बांधण्याचे कौशल्य, जागरूकता, आतिथ्य हे इतर गुणही राजाच्या बाबतीत महत्त्वाचे मानले जात.

महाभारतात वर्णन केलेला राजधर्म –

महाभारतात अनेक वेगवेगळ्या राजांची नावे आली आहेत. तसेच त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या वेगवेगळ्या राष्ट्रांची नावेही आपण पाहिली. त्यांचा तपशीलवार उल्लेख मागे आला आहे.

महाभारत युद्ध संपल्यानंतर युधिष्ठिराने भीष्माचार्यांना राजधर्म समजावून सांगण्याची विनंती केली. त्याचे कारण सांगताना युधिष्ठिराने म्हटले आहे की, जसे अश्वाला लगाम लागतात, हत्तीसाठी अंकुशाची गरज भासते. त्याप्रमाणे प्रजाजनांना आवर घालण्याचे कार्य राजधर्माला करावे लागते. (६९)

शांतिपर्वातील ५६व्या अध्यायात युधिष्ठिराने राजधर्माची आवश्यकता व महत्त्व सांगितले आहे. शांतिपर्वातील अध्याय छप्पन्न, सत्तावन्न व अठ्ठावन्न या तीन अध्यायात राजधर्माचे विस्तृत वर्णन भीष्माचार्यांनी केले आहे.

राजा कसा असावा हे सांगताना भीष्माचार्य म्हणतात, राजा हा अत्यंत गुणवान्, सदाचारसंपन्न, दमनशील (संयम बाळगणारा) दयाळू, धर्मावर (कर्तव्याचरणावर) निष्ठा असणारा, इंद्रियांवर विजय मिळविलेला, प्रसन्नमुख (दिसावयास आकर्षक–सुदर्शः) व दानशूर असा असावा. असा राजा कधीही संपत्तीहीन होत नाही. (७०)

सर्व कार्ये करताना त्याची वृत्ति व वर्तन अतिशय सरळ असावे. राजनीतीचा विचार करताना मात्र आपल्यातील उणेपणा (छिद्रे) गुप्त ठेवणे, इतरांच्या (शत्रूंच्या बाबतीत) त्यांच्या दोषांच्या (कमकुवतपणाचा शोध) व त्याविषयी उपाय या गोष्टींबाबत मात्र सरळपणा उपयोगी नाही हे लक्षात ठेवावे. (७१)

---

६९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५६.५)

७०) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५६.१९, २०)

७१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व

राजाच्या आचरणाबाबत भीष्माचार्यांनी राजाच्या सत्यनिष्ठ वृत्तीवर भर दिला आहे. सत्याचरणानेच राजाची सर्व कार्येसिद्धीला जातात. सत्यवृत्तीमध्ये एकनिष्ठ असणाऱ्या राजालाच इहलोकी व परलोकीही आनंद प्राप्त होतो. ऋषींचे ज्याप्रमाणे सत्य हे मोठेच धन असते त्याप्रमाणे सत्यनिष्ठ राजा प्रजेच्या विश्वासास पात्र होतो. (७२)

दंडनीतीचे आचरणही राजाने कशापद्धतीने करावे याचे विवेचन भीष्माचार्यांनी कौटिल्याप्रमाणेच केले आहे. राजाने तीष्णदंड जसे असू नये तसेच अतिशय मृदु वृत्तीने दंडाचा उपयोगही करू नये. राजाकडे धैर्यवृत्ती असणे अतिशय आवश्यक आहे. दंडाचा यथायोग्य वापर धैर्यवृत्तीनेच –निर्भयपणे राजाने करावा. गर्भाला हितकारक आचरण करणाऱ्या गर्भिणीप्रमाणे प्रजेला जे हितकारक असेल त्याचप्रमाणे राजाने वागावे असे भीष्माचार्यांनी सांगितले आहे.

शहाण्या राजाने चारही वर्णाच्या लोकांशी नेहमी दयाबुद्धीने वागावे. धर्मनिष्ठ (कर्तव्यनिष्ठ व सत्यवचनी राजाच प्रजेला सुखी ठेवू शकतो असे भीष्माचार्य सांगतात. (७३)

अयोग्य वर्तन करणाऱ्या कोणासही शासन करताना राजाने मृदु वर्तन करू नये. अत्यंत अहंकारी, योग्य, अयोग्य कर्तव्यासंबंधी ज्ञान नसणाऱ्या व गैरमार्गाचे अवलंबन करणाऱ्या गुरुलादेखील शिक्षा करणेच योग्य होय असे भीष्माचार्याचे मत आहे. (७४)

यासाठी भीष्माचार्यांनी दोन उदाहरणे दिली आहेत. पहिले उदाहरण ज्ञानसंपन्न सगर राजाचे आहे. त्याने गैरवर्तन करणाऱ्या, प्रजेला उपद्रव देणाऱ्या आपल्या असमंजस नावाच्या पुत्राचा त्याग केला होता. तर ब्राह्मणांशी उद्धटपणे वागणाऱ्या आपल्या श्वेतकेतू या पुत्राचा उद्दालक मुनींनी त्याग केला. (७५)

प्रजेला सतत आनंदात ठेवणे, सत्यवृत्तीचे पालन व रक्षण करणे, तसेच व्यवहारात सरळ वृत्ती ठेवणे हा राजांचा सनातन असा धर्म आहे.

तसेच ज्या राजाच्या प्रदेशात आपल्या वडिलांच्या घरात वावरल्याप्रमाणे प्रजा निर्भयपणे संचार करते तो राजाच श्रेष्ठ असा राजा होय. (७६)

एवढे राजाचे व दंडनीतीचे महत्त्व असल्यामुळे भीष्माचार्य पुढे म्हणतात की, प्रथम उत्तम, आदर्श असा राजा मनुष्यांनी मिळविला पाहिजे.नंतर पत्नी व नंतर धन मिळवावे. जर चांगला राजा शासन करत

---

७२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५६.१७.१८)

७३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व ५६.३६)

७४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५७.७)

७५) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५७)

७६) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५७.११,३३)

नसेल तर पत्नी कोठून मिळणार व धन तरी कोठून मिळणार. [७७ अ] ही गोष्ट एका राजाला रामचरित्र सांगताना महत्म्या भार्गवाने सांगितली.

एवढे राजाचे व दंडनीतीचे महत्त्व असल्यामुळे भीष्माचार्यांनी सागितलेले पुढील वचन किती सार्थ आहे हे आपल्या सहज लक्षात येईल.

'कालो वा कारणं राज्ञो, राजा वा कालकारणम् ।

इति ते संशयो मा भूत्, राजा कालस्य कारणम् ।। [७७ ब]

काळ हा राजाचे कारण असतो, की राजा काळाचे कारण असतो हा संशय तू मनामध्ये ठेवू नकोस. राजा हेच काळाचे कारण आहे. (चांगला, वाईट, कसा काळ यायचा हा राजावरच अवलंबून असते.)

त्यामुळेच प्राचीन काळी राजाने आपल्याला इष्ट अशा गोष्टींचा त्याग करून लोकहिताला प्राधान्य द्यावे अशीच प्रजेची राजाकडून अपेक्षा असे. राज्याचा तो उपभोगशून्य असा स्वामी असे. रामायणात रामाने केलेला सीतेचा त्याग ही घटना याचीच साक्ष पटवते. कालिदासाने केलेले रघूंचे वर्णन 'स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः' हे बऱ्याचशा राजांच्या बाबतीत सार्थ असेच वर्णन असे. 'रावण, कंस, जरासंध, शिशुपाल हे राजे अपवादात्मक ! त्यांचा विनाशच होई. तो अटळ असे.'

आतापर्यंत वेदिक काळापासून महाभारत कालापर्यंत पाहिलेल्या राष्ट्रासंबंधीच्या कल्पना, राजा, त्याची व्यक्तिगत व प्रजाविषयक कर्तव्ये यातून प्राचीन नीतिमूल्यांसंबंधी स्पष्ट कल्पना येते. वेदकाळापासून ते महाभारतकालात व पुढेही या नीतिमूल्यांचा आदर्शच राजांपुढे असे ही गोष्ट स्पष्ट होते.

४) सध्याची राष्ट्रविषयक व्यापक अशी कल्पना प्राचीन काळी नव्हती. परंतु बाळशास्त्री हरदास यांच्या शब्दात सांगायचे तर 'एकात्म भावजीवन असलेला समाज म्हणजे राष्ट्र होय.' [७८] या राष्ट्राच्या भावजीवनात विशिष्ट गोष्टींबद्दल आदराची भावना व अभिमान असतो. 'गंगा नदी, हिमालय पर्वत, रामायण, महाभारत ही महाकाव्ये, त्यांचे नायक, दाशरथी राम व भगवान कृष्ण, भगवद्गीता हा ग्रंथ, काशी रामेश्वरादि तीर्थक्षेत्रे या गोष्टींबद्दल आसेतुहिमाचल भारतीयांच्या मनात आदराची व अभिमानाची भावना आहे. यादृष्टीने प्राचीन काळापासून या राष्ट्राला बाळशास्त्री हरदास 'वैदिक राष्ट्र' असे संबोधतात. या राष्ट्रातील एकात्मतेची भावना त्यांनी ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील चार ऋचा देऊन स्पष्ट केली आहे.

---

७७) अ) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (५७.४१)

ब) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.७०)

७८) वेदातील राष्ट्रदर्शन – हरदास बाळशास्त्री (पृ.क्र. ४).

१) समाना मन्त्रा: समिती: समानी । समानं मन:, सह चित्तम् एषाम् ।।

समानं मन्त्रम् अभिमन्त्रये व: । समानेन व: हविषा जुहोमि ।।

अर्थ – आमचे मंत्र समान आहेत, आमचा गट समान आहे. आमचे मन व अन्त:करण यात एकवाक्यता आहे. एकाच मंत्राने आम्ही आवाहन करतो व एकाच तऱ्हेने अग्नीमध्ये आहुती देतो.

२) समानी व: आकूति: समाना हृदयानि व: ।

समानो अस्तु वो मनो यथा व: सुसहासति ।।

अर्थ – तुमचे (आमचे) विचार (आशाआकांक्षा) समान असोत, हृदये व मने यांची अशी एकता होवो की त्यामुळे सर्व कार्यात सुसंघटितपणा येवो. (७९)

याखेरीज खालील वैदिक प्रार्थना सुप्रसिद्ध आहेत.

३) सं गच्छध्वं, सं वदध्वं सं वो मनानि जानताम् ।

देवा भागं यथा पूर्वं, सं जानाना उपासते ।।

ॐ सह ना ववतु, सह नौ भुनक्तु, सह वीर्यं करवावहै ।

तेजस्वीनामधीतमस्तु मा विद्विषावहै: ।।

ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ।।

४) सर्वेऽत्र सुखिन: सन्तु सर्वेसन्तु निरामया: ।।

सर्वेभद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ।।

या वैदिक प्रार्थनांमधून ज्ञानेश्वरांची पसायदानाची कल्पनाच प्रतिबिंबित झालेली दिसते. या सर्वांच्या मुळाशी असणाऱ्या चिरंतन मूल्यांची साक्ष यात प्रतिबिंबित झालेल्या विचारात दिसते. याचा उपयोग आधुनिक भारतातील मूल्यशिक्षणामध्ये नक्कीच करून घेता येईल.

आधुनिक काळातील राष्ट्रसंकल्पना –

काहींच्या मते आधुनिक काळातील राष्ट्रसंकल्पना अशी आहे. 'आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरांचे भान ठेवून त्या परंपरेचे सातत्य राजकीय दृष्टीने म्हणजे राज्याच्या चौकटीत टिकवून ठेवणारा व विशिष्ट भौगोलिक प्रदेशनिष्ठा मनात बाळगणारा लोकसमूह किंवा समाज म्हणजे 'राष्ट्र' असे सामान्यपणे म्हटले जाते. (८०)

---

७९) ऋ.क् – मण्डल १० वे सूक्त १९१.

८०) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश – खण्ड १४ वा.

राष्ट्रनिर्मिती होण्यासाठी पाच घटकतत्त्वे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे

(१) रक्तसंबंध, (२) प्रादेशिकता, (३) इतिहास, (४) धर्म, (५) भाषा.

एकाच भूभागावर पिढ्यान्‌पिढ्या राहिल्यानंतर त्या भागाबद्दल, त्यातील निसर्ग, नद्या, पर्वत, झाडे, शेते याबद्दल तेथे राहणाऱ्या लोकांच्या मनात अतिशय उत्कट अशी आपुलकी निर्माण होते. यातूनच राष्ट्रीय भावनेचा उगम होतो. व ती भावना दृढमूल होते.

तसेच स्फूर्तीदायक इतिहासाच्या स्मृती यादेखील एखाद्या राष्ट्राच्या निर्मितीस कारण होतात. परक्या देशातील लोकांचे राज्य आले तर समाजातील लोकांच्या ज्या सामूहिक भावना असतात – सुखदु:खाच्या, अन्यायाच्या वा जय पराजयाच्या–यातून राष्ट्राची निर्मिती होते. परक्या इंग्रजी राजवटीविरुद्ध, त्यांनी केलेल्या अन्यायाच्या स्मृतींमुळे त्याविरूद्ध अवघा हिंदुस्थान एक झाला. एक मोठा स्वातंत्र्यलढा प्रजेने दिला व स्वतंत्र अशा आधुनिक भारतराष्ट्राची निर्मिती झाली. एक बहुभाषिक व विविधतेत एकता असणारे भारत राष्ट्र अस्तित्वात आले. मात्र पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या तत्त्वावर झाली.

परंतु जरी राष्ट्रनिष्ठा महत्त्वाची असली तरी तेथील समाजालाही संघटित राष्ट्रनिर्मिती होण्यासाठी एकछत्री अशा राजसत्तेचा आश्रय महत्त्वाचा असतो. [८१] मग ती राजसत्ता संसदीय लोकशाही या स्वरुपाची असो, किंवा अध्यक्षीय पद्धतीची असो.

अशी राजसत्ता स्थिर होण्यासाठी महाभारतकालापासून महत्त्वाची मानली गेलेली कर्तव्यनिष्ठा–धर्म, सत्य, न्याय, दया, क्षमा, अहिंसा, त्याग, पावित्र्य ही मूल्ये आवश्यकच ठरतात. ती जशी सत्तेतील लोकांमध्ये तसेच सामान्य लोकात असणेही अनिवार्य ठरते. तरच समाजाचे जीवन स्वस्थ व सुखाचे होते.

*****

---

८१) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश – खण्ड ८ वा.

# प्रकरण ३ रे
# महाभारताचे स्वरूप, महत्त्व व त्यातील राष्ट्रीय मूल्यविचार

## प्रस्तावना

महाभारत हे एक महान व ऐतिहासिक असे महाकाव्य आहे.

काव्याची दोन अंगे संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी मानली आहेत. एक काव्याचे बाह्यरूप म्हणजेच काव्याचे शरीर व काव्याचे अंतरंग म्हणजे त्याचा आत्मा! या दोहोंचा साकल्याने विचार करून विश्वनाथाने आपल्या साहित्यदर्पणात काव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

'वाक्यं रसात्मकं काव्यम्। [१]

'रसपरिपूर्ण अशा शब्दांनी तयार झालेली जी रचना ती म्हणजे काव्य होय.'

तसेच इतिहास या शब्दाची व्याख्या 'इति ह आस।' असे असे घडले अशी दिली आहे.

तर विष्णुपुराणातील श्रीधरस्वामीकृत टीकेत इतिहास शब्दाचा अधिक व्यापक अर्थ दिला आहे. तो खालीलप्रमाणे ,

'धर्मार्थकाममोक्षाणां उपदेशसमन्वितम्।
पुरावृत्तकथायुक्तम् इतिहासं प्रचक्षते।।'

'धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांच्या उपदेशाने व पूर्वी घडून गेलेल्या कथेने युक्त (असा जो वाङ्मयप्रकार) त्याला इतिहास असे म्हणतात.'

तर खुद्द व्यासमहर्षींनी आदिपर्वात महाभारताबद्दल असे सागितले आहे.

१) 'तपसा ब्रह्मचर्येण व्यस्य वेदं सनातनम्।
इतिहासमिमं चक्रे पुण्यं सत्यवतीसुत:।। [२]

२) 'इतिहासोत्तमाद् अस्मात् जायन्ते कविबुद्धय:।। [३]

(अर्थ– तपस्वी वृत्तीने व ब्रह्मचर्यपालन करून, प्राचीन वेदाचे अध्ययन करून सत्यवतीपुत्र (व्यासाने) ह्या पुण्यकारक इतिहासाचे लेखन केले.)

२) या उत्तम अशा इतिहासकथेतून (महाभारतातून) अनेक कवीवृत्तीचे लोक निर्माण होतात.

---

१) विश्वनाथ – साहित्यदर्पण – (परिच्छेद १ कारिका ३)

२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१.५४)

३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.२.२३७, १ ली ओळ)

तर ज्ञानेश्वरांनी महाभारताचा उल्लेख 'नवरससुधाब्धि' असा केला आहे. [४]

अशा प्रकारे महाभारत हे कौरव-पांडवातील ऐतिहासिक युद्धाची कथा वर्णन करते. ते नवरसपूर्ण असे काव्य आहे. याचा उल्लेख 'पुराण' असाही केला आहे. [५]

पुराण – 'पुरा नवं भवति।' 'प्राचीन असूनही जे नवे असते ते पुराण' अशी निरुक्तामध्ये यास्काचार्यांनी पुराणाची व्याख्या दिली आहे. तर वायुपुराणात,

'यस्मात् पुरा ह्यनतीदं पुराणं तेन स्मृतम्।'

अर्थ – 'जे प्राचीन परंपरेची कामना करते ते पुराण होयं.' असे म्हटले आहे.

प्राचीन काळी इतिहासालाही पुराण म्हणत व पुराणाला ही इतिहास म्हणत, याचमुळे महाभारत स्वत:ला इतिहास म्हणविते तरीही एखाद्या वेळी 'पुराण' शब्दाने स्वत:चे उल्लेख करते. [६]

महाकाव्याचे दोन प्रकारे मानले जातात.

(१) आर्ष महाकाव्ये (२) विदग्ध महाकाव्ये

प्राचीन ऋषींनी लिहिलेली महाकाव्ये ती आर्ष महाकाव्ये ! वाल्मीकी ऋषींनी लिहिलेले रामायण व महर्षि वेदव्यासांनी रचलेले महाभारत ही आर्ष महाकाव्ये होत. तर कालिदासाचे रघुवंश, कुमारसंभव, माघाचे शिशुपालवध, भारवी कवीचे किरातार्जुनीय तसेच श्रीहर्षाचे नैषधीयचरित ही विदग्ध महाकाव्ये म्हणून संस्कृत वाङ्मयात प्रसिद्ध आहेत.

महाकाव्याची लक्षणे साहित्यशास्त्रकार विश्वनाथाने आपल्या साहित्यदर्पणात खालीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१) महाकाव्याच्या कथानकासाठी इतिहासातील कथा सांगितलेली असते.

२) काव्याचे कथानक अनेक खंडातून सांगितलेले असे. या खण्डास 'सर्ग' असे नाव असे. दण्डी कवीने 'सर्गबन्धो महाकाव्यम्।' [७] असे म्हटले आहे.

३) सर्गामध्ये ३० ते ४० अथवा जास्त श्लोक असतात.

४) यातील नायक एक किंवा अनेक, नायिका, योद्धे, दूत, खलनायक इत्यादि पात्रे असतात.

५) या महाकाव्याच्या विषयात नगर, पर्वत, समुद्र, षड्ऋतू, चन्द्रसूर्याचे उदयास्त यांची वर्णने असतात. तसेच युद्ध, उद्यानक्रीडा, सलिलक्रीडा, राजकारण, प्रवास अशा विविध घटना व गोष्टी यांचाही यात समावेश असतो.

---

४) ज्ञानेश्वरी (अध्याय १.२९)

५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१७) 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेद्।'

६) भारतीय संस्कृति कोश – खण्ड ५.

७) दण्डी – काव्यादर्श – परिच्छेद १ श्लोक १४.

६) महाकाव्याची सुरुवात कुलदेवतेच्या नमनाने, आशीर्वादाने वा महाकाव्याचा विषय यापैकी एकाने व्हावी असा अनिश्चित संकेत आहे. तसेच वर्णने रसपरिपूर्ण व अलंकाराने युक्त असावीत.

७) सर्गसंख्या १५ ते २० यापेक्षा जास्त नसावी. (८)

ही सर्व लक्षणे महाभारताला कशी लागू पडतात ते पाहू.

महाभारत हे आर्ष महाकाव्य आहे. तसेच इतिहासातील कुरुक्षेत्रावर झालेल्या कौरव-पांडव यांच्यातील फार मोठे युद्ध हा या महाकाव्याचा विषय आहे.

महाभारताची कथा एकंदर अठरा पर्वांमधून सांगितली आहे.

पञ्च पांडव या कथेचे नायक तर द्रौपदी या महाकाव्याची नायिका आहे. याखेरीज धृतराष्ट्र, पांडु, विदुर, भीष्म, कृष्ण, दुर्योधन, कर्ण, कुंती, गांधारी इत्यादी अनेक पात्रे या कथानकात येतात.

अनेक आख्याने, उपाख्याने, सलिलक्रीडा, नगरवर्णने यात आहे. प्रवासाची अनेक वर्णने आहेत. उदा. पांडवांचा वनवासातील प्रवास, तसेच अटीचा भंग केल्यानंतर अस्त्रप्राप्तीसाठी अर्जुनाने केलेला प्रवास यातील अनेक वर्णने यामध्ये आहेत. आदिपर्वामध्ये आरुणि व उपमन्यु या आदर्श शिष्यांच्या गुरुभक्तीच्या कथा आहेत. तसेच मनुमत्स्यकथा, अमृतमंथनाची कथा, शकुंतलोपाख्यान इत्यादि कथा आल्या आहेत. तर वनपर्वात रामोपाख्यान, सावित्रीचे उपाख्यान, नल व दमयंती यांची कथा, धर्मव्याधाची कथा अशा अनेक कथा आल्या आहेत.

वीर, करुण, रौद्र, बीभत्स, भयानक, शांत इत्यादि अनेक रसांचे वर्णन यातील प्रसंगामधून दिसते. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठीचे मार्गदर्शन या काव्यामधून मिळते.

'नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्।

देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत्।।

महाभारतातील या प्रारंभीच्या श्लोकात नारायण म्हणजे श्रीविष्णु व विद्येची अधिष्ठात्री देवता सरस्वती यांना वंदन केले आहे. अशाप्रकारे महाकाव्याची म्हणून जी लक्षणे सांगितलेली आहेत ती 'महाभारत' या आर्ष महाकाव्याला यथार्थपणे लागू होतात यात संशय नाही.

१) महाभारत या ग्रंथाचे महत्त्व -

रामायण व महाभारत ही दोन महाकाव्ये आज हजारो वर्षेभारतीय जनमानसावर अधिराज्य गाजवून

---

८) जोग रा.श्री. - अभिनव काव्यप्रकाश (पृ. क्र.२२४)

विद्याभवन संस्कृत ग्रंथमाला- डॉ. सत्यव्रतसिंह - विश्वनाथप्रणीत साहित्यदर्पण १९५७

चौखम्बा विद्याभवन चौक वाराणसी १, भारत - (सहावा परिच्छेद श्लोक ३१५ ते ३२४.)

आहेत. रामायण हे आदर्श नातेसंबंधाचे व आदर्श जीवनाचे चित्रण करणारे काव्य आहे. तर महाभारत हे केवळ महाकाव्य नाही. ते जगातील सर्वात मोठे काव्य जसे आहे तसेच जगातील सर्व विषयांना सामावून घेणारे महावाङ्मय आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या मनुष्यप्राण्याच्या जीवनातील चारही पुरुषार्थांचे सर्वांगीण विवेचन महाभारतात आढळते. प्रत्येकालाच यात आपले अनुभव प्रतिबिंबित झालेले दिसतील. महाभारत हे जसे काव्य आहे, तसाच तो कौरव–पांडव युद्धाचा इतिहास आहे. तसेच याचे स्वरूप पुराणासारखेही आहे. खुद्द व्यासमहर्षींनीच 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेद्।' असा याचा उल्लेख केला आहे. [९]

छत्रपती शिवाजीमहाराजांसारखे लोकोत्तर नेतृत्त्व रामायण महाभारतातील कथा श्रवण करून निर्माण झाले अशी इतिहासाची साक्ष आहे. तर श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या ज्ञानेश्वरी अर्थात भावार्थदीपिका या ग्रंथात महाभारताचे श्रेष्ठत्व खालील शब्दात वर्णन केले आहे.

'महाभारताची कथा ही सर्व आश्चर्यकारक गोष्टींचे जन्मस्थान आहे. विवेकरूपी वृक्षांचे हे अभिनव उद्यान आहे. सर्व सुखांचे हे मूळ स्थान आहे. तर अनेक समस्यांचा हा महासागर आहे. विविध अशा नवरसरूपी अमृताचा हा सागर आहे. सर्व विद्यांचे हे विश्वविद्यालय आहे. सर्व शास्त्रांचे हे भांडार आहे. सर्व धर्मांचे माहेरघर तर सज्जनांचे मर्मस्थान आहे. विद्यादेवी शारदेचे हे लावण्यरत्नांचे भांडार आहे. महाबुद्धिवंत अशा व्यासमुखातून सांगितलेल्या वेगवेगळ्या कथांच्या रूपाने ही विद्यादेवी त्रिभुवनात प्रकट झाली आहे. त्यामुळे हा प्रचंड मोठा महाभारत असा अत्यंत रसाळ ग्रंथ निर्माण झाला आहे. महाभारतात जे नाही ते जगात (त्रैलोक्यात) कोठेच नाही. म्हणूनच 'व्यासोच्छिष्ट जगत्रय' अशी या ग्रंथाची ख्याती आहे. [१०]

केवळ ज्ञानेश्वरच नव्हेत तर भारतातील सर्व श्रेष्ठ नेत्यांनी महाभारताचे श्रेष्ठत्व मोठ्या गौरवाने मान्य केले आहे. आपल्या 'Discovery of India' या ग्रंथात पंडित नेहरू म्हणतात. 'या महाकाव्यातील प्रत्येक कथा आणि त्यातील नीतीतत्त्वे यांचा खोल ठसा भारतीय मनावर उमटला आहे. अशिक्षित जनतेलाही त्यातील कित्येक श्लोक मुखोद्गत आहेत. त्यांच्या संभाषणात यातील कथांचा संदर्भ सहज येतो. भारताच्या एकात्मतेचे हे एक प्रतीकच आहे. अनेक अमोल सिद्धांताच्या विविध बाजू दाखविणारे ते एक मौल्यवान् रत्नभांडारच आहे.' [११]

९) BORI प्रमाणित प्रत म.भा. (१.१७)

१०) ज्ञानेश्वरी – अध्याय १ ओव्या २८ ते ३३.

११) पंडित नेहरू – 'Discovery of India' P.No. 106.

महात्मा गांधींनी आपल्या 'यंग इंडिया' या वृत्तपत्रात महाभारताचा मोठेपणा खालील शब्दात वर्णन केला आहे.

'जो सत्यसिद्धांत अन्य पुस्तकोंमे है, वह संपूर्ण रूपसे महाभारतमें विद्यमान है इसलिए ये महाभारत श्रेष्ठ ग्रंथ है।''

तर तिलकस्मरण या पुस्तकात पृष्ठ क्र. १४७ वर लोकमान्य टिळकांचा नवतरुणांना दिलेला संदेश सांगितला आहे. 'नवयुवकोंको मेरा यही कहना है कि वे महाभारतका अध्ययन अवश्यही करे और भीष्मपितामहका दृढनिश्चय तथा श्रीकृष्णाचन्द्रका राजनीतीपटुत्व अपने अंदर बढानेका प्रयत्न करे।[१२]

श्रीपाद दामोदर सातवळेकरांनी म्हटले आहे की, ''संपूर्ण भरतखण्डका ऐक्य करनेवाला यह राष्ट्रीय ग्रंथ 'आसेतु हिमाचल' विख्यात है। इनमें अनंत आदर्श पुरुषोंके चित्रणमें विविध सद्‌गुण है – जैसे भीष्माचार्यका आदर्श ब्रह्मचर्य, श्रीकृष्णका राजकारणपटुत्व, अर्जुनका शौर्य, कर्णका औदार्य, धर्मराजका धर्माचरण इत्यादि।[१३]

'संपूर्ण भारतवर्षामध्ये एकात्मता आणणारा हा राष्ट्रीय ग्रंथ काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अतिशय प्रसिद्ध असाच आहे. अनेक आदर्श अशा व्यक्तिरेखांच्या सद्‌गुणांचे वर्णन या ग्रंथात आले आहे. भीष्माचार्यांची आमरण ब्रह्मचर्यव्रताची दृढ प्रतिज्ञा, भगवान् श्रीकृष्णांचे राजकारणातील चातुर्य, अर्जुनाचा पराक्रम, कर्णाचा दानशूरपणा आणि युधिष्ठिराची धर्माबद्दलची निष्ठा आणि इतर अनेक.

बाळशास्त्री हरदासांनी म्हटले आहे की, मनुष्याच्या श्रेष्ठ–कनिष्ठत्वाची महाभारतकारांची कसोटी, एखाद्याचे व्यक्तिगत सद्‌गुण अथवा दुर्गण यापेक्षाही शाश्वत स्वरूपाची नीतीमूल्ये व मानवाचे हिताहित हीच आहेत.[१४]

अनेक पाश्चात्य विद्वानांनाही महाभारत या ग्रंथाने विशेषत: त्यातील विविध कथा, विविध व्यक्तिरेखा, प्रसंग यांनी अतिशय भुरळ घातली आहे. जगातील विविध भाषांमध्ये उदा. जर्मन, इंग्लिश, फ्रेंच, रशियन यात या ग्रंथाची भाषांतरे झालेली आहेत.

प्रो. विन्टरनिटझ् यांनी म्हटले आहे की, 'फारच मर्यादित अर्थाने महाभाराताला केवळ महाकाव्य किंवा काव्य म्हणता येईल. खरे पाहता हे एक संपूर्ण वाङ्मयच आहे.'[१५]

---

१२) पं. श्री. दा. सातवळेकर – महाभारतकी समालोचना –पृ.क्र. ५.

१३) पं. श्री. दा. सातवळेकर – महाभारतकी समालोचना –तिलकस्मरण पृ.क्र. १४७.

१४) बाळशास्त्री हरदास – महाभारतावरील व्याख्याने – व्याख्यान 'कर्ण' पृ.क्र. २४०.

१५) Pro. Winternitz - History of Indian Philosophy Vol.1.

महाभारतात नीतीशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा अनेक शास्त्रांचे विवेचन असून हा एक विश्वकोशच आहे.

खुद्द श्रीव्यासमहर्षींनी महाभारताच्या आदिपर्वातील पहिल्या अध्यायात आपल्या ग्रंथाचे माहात्म्य अतिशय सविस्तर वर्णन केले आहे, ते खालीलप्रमाणे [१६]

१) 'तीनही लोकांमध्ये अतिशय विस्तारयुक्त व समासयुक्त असे हे ज्ञान व्यासमहर्षींनी प्रस्थापित केले आहे.

२) तपश्चर्या व ब्रह्मचर्य यांनी युक्त अशा सत्यवतीपुत्राने हा प्राचीन इतिहास लिहिला आहे.

३) 'भूत, भविष्य, वर्तमान या त्रिकालांचे ज्ञान या इतिहासपुराणस्वरूपी ग्रंथातून निर्माण केले आहे.'

४) या ग्रंथामध्ये विविध धर्म, चार आश्रम, चारी वेद यांचे विधान केले आहे.

५) विविध तीर्थे, पुण्यकारक देश, नद्या, पर्वत यांचे वर्णन या ग्रंथात केले आहे.

६) अज्ञानरूपी अंध:काराने अंध झालेल्या मनुष्यांचे नेत्र ज्ञानरूपी अंजनाच्या शलाकेने उघडणारे, तसेच धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारी पुरुषार्थांची प्राप्ती होण्यासाठी या भारतरूपी सूर्याने मानवांचा अंध:कार नष्ट केला आहे.

७) सर्व लेखक व कवींची ही उपजीविका ठरेल. तसेच हा भारतरूपी महान ग्रंथ–महावृक्षच असा पर्जन्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांना अक्षय संजीवनी देईल.

८) अत्यंत महत्त्वपूर्ण व आकाराने मोठा असा हा ग्रंथ असल्याने याला महाभारत हे नाव मिळाले आहे.

याखेरीज महाभारत या ग्रंथाच्या रसाळपणाचे वर्णन भगवान् श्री व्यासमहर्षींनी आणखीही खालीलप्रमाणे सांगितले आहे.

'श्रुत्वा त्विदमुपाख्यानं श्राव्यमन्यन्न रोचते ।

पुंस्कोकिलरुतं श्रुत्वा रुक्षा ध्वाङ्क्षस्य वागिव ।। [१७]

(अर्थ – हे आख्यान ऐकल्यानंतर इतर कोणतेही काव्य रुचिर वाटणार नाही. ज्याप्रमाणे कोकिल पक्षाचे मंजुळ कूजन ऐकल्यावर कावळ्याचे रुक्ष कावकाव हे ओरडणे कोण ऐकेल ?)

'इतिहासोत्तमादस्मात् जायन्ते कविबुद्धय: ।' [१८] असे महर्षि व्यासमुनींनी म्हटले आहे.

---

१६) BORI प्रमाणित प्रत म.भा. अदिपर्व (१.५४, ६३, ६४, ६५, ६८, ८४, ८५,९२, २७४))

१७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अध्याय २.२३६, २३७)

१८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व.

महाभारताच्या आधारानेच विविध काळात अनेक थोर साहित्यिकांनी वेगवेगळ्या साहित्यकृती निर्माण केल्या. त्यांजकडे दृष्टी टाकली तर वरील विधान किती सार्थ आहे ते कळून येते.

भास, कालिदास, माघ, भारवी इत्यादि संस्कृत कवी, मोरोपंतांसारखे पंडित कवी, तर अनेक आधुनिक लेखक या सर्वांचे स्फूर्तीस्थान महाभारतातील विविध कथा हेच आहे. असे दिसून येईल.

भासाच्या नाटकचक्रातील खालील नाटके पहा.

१) 'दूतघटोत्कच' हे नाटक घटोत्कचाच्या आख्यानावर आधारित आहे.

२) तर 'मध्यमव्यायोग' ही एकांकिका भीम व बकासुर यांच्या कथेवर आधारित आहे.

३) 'उरुभङ्गम्' ही एकांकिका दुर्योधनाच्या मांड्यांचे भीमाने गदेच्या प्रहाराने चूर्ण केले या घटनेनंतर घडलेल्या घटनांवर बेतलेली आहे.

४) तर 'कर्णभार' ही एकांकिका कर्णाने इंद्राला कवचकुण्डलांचे जे दान केले त्या घटनेचे नाट्यरूप आहे.

कालिदासाचे जगद्विख्यात नाटक 'अभिज्ञान शाकुंतलम्' त्याचे मूळ आदिपर्वातील शकुंतलाख्यानात [१९] आहे.

प्रसिद्ध संस्कृत कवी माघ याचे 'शिशुपालवध:' हे प्रसिद्ध महाकाव्य सभापर्वातील युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञ प्रसंगी भगवान श्रीकृष्णाने शिशुपालाचा जो वध केला त्या कथेवर रचलेले आहे.

तसेच भारवीचे 'किरातार्जुनीयम्' हे महाकाव्यही वनपर्वामध्ये अर्जुनाने पाशुपतास्त्राच्या प्राप्तीसाठी भगवान शंकरांशी जे युद्ध केले त्या कथेवरून स्फूर्ती घेऊन रचले आहे.

मराठीमधील पंडित कवी मोरोपंत यांनी 'आर्याभारत' रचले. या काव्याचा आधारही महाभारतच आहे. तसेच रघुनाथ पंडित, मुक्तेश्वर, वामनपंडित या पंडित कवींनी आपल्या काव्यांसाठी महाभारताचाच आधार घेतला आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेवर लिहिलेली जी टीका 'भावार्थदीपिका' अथवा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ म्हणजे भीष्मपर्वातील भगवद्गीतेचाच अनुवाद होय.

आधुनिक लेखकांमध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'शाकुंतल नाटक' तसेच नाट्याचार्य खाडिलकरांचे 'कीचकवध' हे नाटक या नाटकांचे प्रेरणास्थान महाभारत हेच आहे. इरावती कर्वे व दुर्गाबाई भागवत या दोन्ही विदुषींना महाभारतातील पात्रांनी अतिशय मोह घातला. इरावतीबाई कर्वे यांनी या व्यक्तिरेखांचे चित्रण करणारे 'युगान्त' हे पुस्तक लिहिले. तर दुर्गाबाई भागवतांनी 'व्यासपर्व' लिहिले.

---

१९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व अध्याय ६८.

शंकर केशव पेंडसे यांनीही 'महाभारतातील व्यक्तिरेखा' हे महाभारतातील प्रमुख पात्रांची वैशिष्ट्ये विशद केलेला ग्रंथ लिहिला. अगदी अलिकडच्या काळात आनंद जातेगावकरांनी 'व्यासांचा वारसा' लिहिले. तर दाजीशास्त्री पणशीकरांनी अत्यंत वेगळ्या दृष्टिकोनातून 'महाभारत– एक सूडाचा प्रवास' लिहिले. प्रसिद्ध कन्नड लेखक एस्. भैरप्पा यांनी 'पर्व' ही महाभारतावरील कादंबरी अतिशय वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून लिहिली. श्री.रवींद्र गोडबोले यांचे 'महाभारत– संघर्ष आणि समन्वय' हे नुकतेच प्रसिद्ध झालेले महाभारतावरील पुस्तक आहे. या सर्व साहित्यकृती म्हणजे अद्यापही भारतीय मनामध्ये महाभारतासंबंधी किती आकर्षण व कुतूहल आहे, याची साक्षच आहेत.

लोकमान्य टिळकांनी अधिकारवाणीने असे सागितले आहे. 'महाभारत हा एक अत्युत्तम राष्ट्रीय ग्रंथ आहे. हा ग्रंथ आम्हा हिंदुस्थानवासी लोकांस अत्यंत प्रिय होऊन, शेकडो वर्षेचतुर्विध पुरुषार्थ साधण्याचे कामी अचूक मार्गदर्शक झाला आहे.' [२०]

इरावतीबाई कर्वे'युगान्त'मध्ये म्हणतात, 'महाभारतातील कथेतील व्यक्तिरेखांच्या वर्तणुकीमागे अथवा कृतींमागे आचाराची आणि विचाराची एक घट्ट चौकट होती. [२१]

ज्या गोष्टी करावयाच्या त्या धर्म म्हणून, कर्तव्य म्हणून करावयाच्या

'धारणात् धर्ममित्याहु: धर्मोधारयते प्रजा: ।

य: स्यात् धारणसंयुक्त: स धर्म इति निश्चय ।।' [२२]

अर्थ– 'धर्म' शब्दाचा अर्थ धारण करणे हा आहे. सर्व लोकांना धर्माचेच अवलंबन असल्यामुळे धर्मच लोकांना धारण करतो. म्हणून ज्याच्या योगाने लोकांचे धारण केले जाते तो धर्म होय. शांतिपर्वामध्ये भीष्माचार्यांनी 'धर्म' शब्दाचा हा अर्थ विशद केला आहे. कर्तव्यनिष्ठा हाच 'धर्म' या पुरुषार्थाचा खरा अर्थ होय.

'भारतसावित्री' मध्ये म्हटले आहे 'इच्छा, लोभ, भीती किंवा प्राणरक्षणासाठी देखील धर्माचा म्हणजेच कर्तव्याचरणाचा त्याग करू नये. धर्म हा शाश्वत आहे. सुखदु:खे ही क्षणभंगुर आहेत. जसे आत्मा हा शाश्वत आहे. पण शरीर मात्र क्षणभङ्गुर आहे. [२३]

२०) प्रसाद मासिक वर्षारंभ महाभारत कथा अंक ऑगस्ट १९५५, पृ. क्र. २०६.

२१) डॉ. कर्वेइरावतीबाई – युगान्त – प्रकरण १०, पृ.क्र. २६७.

२२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१०९.१)

२३) भारतसावित्री –

न जातु कामान्न भयान्न लोभात्। धर्म त्यजेत् जीवितस्यापि हेतो: ।।

धर्मोनित्य: सुखदु:खे त्वनित्ये। नित्यो जीव: धातुरस्य तु अनित्य: ।।

तर 'समाजाला नीतीशिक्षण देणे हा महाभारतकारांचा प्रधान उद्देश आहे. सद्गुण आणि दुर्गुण, विचार आणि विकार, सत्य आणि असत्य यांचा संघर्ष दाखवून शेवटी सद्गुणांचा, विचाराचा व सत्याचा विजय,आणि दुर्गुणांचा, विकाराचा व असत्याचा पराजय त्यात दाखविला आहे.' असे शंकर केशव पेंडसे आपल्या 'महाभारतातील व्यक्तिरेखा' या ग्रंथात सांगतात. [२४]

दुर्गाबाई भागवत यांच्या मते महाभारताचे अंतरंग अतिशय रुचिर अशा नाट्याकृतींनी भरलेले आहे. मोठ्या नाट्यबंधात छोटे नाट्यप्रसंग व्यासांनी खच्चून भरलेले आहेत. त्यामुळेच महाभारत या कृतीला जबरदस्त भरीवपणा आला आहे. [२५]

अशा विविध दृष्टीकोनातून महाभारत ह्या ग्रंथाने अनेकांना मोहविले आहे. जे जे विविध प्रसंग महाभारतात वर्णिले आहेत ते रसाळपणात अमृतालाही मागे सारतील असे आहेत. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराजांनी या ग्रंथाला 'नवरससुधाब्धि' असे म्हटले आहे.

वनपर्वातील नलदमयंती आख्यानात शृंगाररसाचे दर्शन होते. तर भारतीय युद्धाचे वर्णन करणारी पर्वेउदा. भीष्मपर्व, द्रोणपर्व, कर्णपर्व, शल्यपर्व यातून वीररसाचे उत्कृष्ट असे प्रकटीकरण झाले आहे. भीष्मांनी युद्धात गाजविलेला अपूर्व असा पराक्रम, तसेच द्रोण, अर्जुन, भीम या सर्वांनीच युद्धामध्ये अपूर्व अशा पराक्रमाचे दर्शन घडविले आहे. विराटगोग्रहणप्रसंग, घोषयात्रेच्या प्रसंगी चित्ररथ गंधर्वाबरोबर अर्जुनाने केलेले युद्ध यातूनही वीररस हा उत्कृष्ट रीतीने प्रकट झाला आहे. द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगाच्या वेळचा द्रौपदीचा विलाप व तिची दीनवाणी स्थिती पाहून ज्याचे डोळे पाणावणार नाहीत असा वाचक विरळाच ! भारतीय युद्धानंतर सर्व वीरपत्नींनी केलेला शोक, अभिमन्यूचा वध झाल्यानंतर सर्व पांडव व त्यांच्या पत्नी यांची शोकाकुल अवस्था यातून करूणरस उत्कृष्ट रीतीने आविष्कृत झाला आहे.

पांडवांच्या अज्ञातवासाच्या काळात कौरवांनी विराटाच्या गाई पळविल्या. त्यावेळच्या युद्धाच्या वेळी विराट नगरीचा राजपुत्र उत्तर याची स्थिती व एकंदर सर्वच प्रसंग हास्यरसाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येईल.

कृष्णशिष्टाईच्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी दाखविलेले विश्वरूपदर्शन, तसेच वनपर्वात हनुमंताने आपल्या सामर्थ्याचे घडविलेले अचाट दर्शन, घटोत्कच युद्ध यातून अद्भुत रसाचे दर्शन होते.

भीमाने दु:शासनाची छाती फोडून त्यातील रक्त प्राशन करणे, यातून बीभत्सरस प्रकट होतो. तसेच युद्ध समाप्त झाल्यानंतर रणांगणावर पडलेला प्रेतांचा खच, रक्तमांसाचा चिखल, त्याभोवती घिरट्या

---

२४) पेंडसे शंकर केशव – महाभारतातील व्यक्तिरेखा (प्रकरण १, पृ.क्र. १५.)

२५) भागवत दुर्गाबाई – 'व्यासपर्व' (प्रस्तावना, पृ.क्र.९.)

घालणारी गिधाडे व हिंस्त्र पशु हे सर्व वर्णन बीभत्स रसाचा आविष्कार करते. तर भीष्मपर्वात सांगितलेली श्रीमद्भगवद्गीता, शांतिपर्व यातून शांतरसाचे दर्शन होते.

महाभारतात भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला जिचा उपदेश केला ती 'श्रीमद्भगवद्गीता' हा ग्रंथ हा जणू सर्व तत्त्वज्ञानातील मुकुटमणीच होय. तत्त्वज्ञानाचा हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ होय. सर्व उपषिदांचे सार या ग्रंथात आले आहे. कर्तव्य, अकर्तव्य यांचा निर्णय करण्याची वेळ आली तर गीताग्रंथ हा दीपस्तंभाप्रमाणे सर्वांना मार्गदर्शक ठरतो. आद्य शंकराचार्यांपासून, ज्ञानेश्वरादि संत, त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् यांसारखे व इतरही केवळ भारतीयच नव्हेत तर परदेशातील लोकांनाही या ग्रंथाने आकर्षून घेतले आहे.

अशातऱ्हेने भारतीयांच्या जीवनातच 'महाभारत' या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. खालील भारतगौरव श्लोकात ते यथार्थपणे वर्णिले आहे.

'यथा समुद्रो जलवान् यथा च हिमवान् गिरिः ।

ख्यातावुभौ रत्ननिधी तथा भारतमुच्यते ।।

अर्थ – ज्याप्रमाणे समुद्र हा रत्नाकर (रत्नांचा साठा) आहे, जसा हिमालय पर्वत हाही रत्नांचा खजिना आहे. त्याप्रमाणेच महाभारत ग्रंथ आहे.

२) महाभारत या ग्रंथाची रचना –

अ) महाभारत हे अतिप्राचीन असे महाकाव्य कृष्णद्वैपायन व्यासमुनींनी रचले.

'महत्त्वात् भारवत्त्वात् च महाभारतमुच्यते ।

निरुक्तमस्य यो वेद सर्वपापैः प्रमुच्यते ।।

अर्थ – श्रेष्ठतेमुळे व मोठ्या अशा आकारामुळे या ग्रंथाला महाभारत असे म्हणतात. याची ही व्युत्पत्ती जो सांगेल त्याची सर्व पापांपासून मुक्तता होते. (२६)

जरी महाभारताचे कर्तेम्हणून परंपरेने महर्षी वेदव्यास असे मानले असले तरी प्रत्यक्षात सध्या प्रचलित अशा महाभारत या ग्रंथाची रचना ३ टप्प्यांमध्ये झाली. तिचे कर्तेतीन आहेत. वेदव्यास, वैशंपायन व सौती अशा तिघांनी मिळून या ग्रंथाची रचना केली असे आदिपर्वातच सांगितले आहे.(२७)

---

२६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१.२०९)

२७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१७.२१)

१)	सुरुवातीला कृष्णद्वैपायन व्यासांनी सुमारे ८००० श्लोक असलेला 'जय' या नावाचाहा ग्रंथ लिहिला. यात त्यांनी कौरव–पांडवांची कथा सांगितली त्यांनी वैशंपायनादि आपल्या पाच शिष्यांना तो शिकविला.

२)	पांडवांचा नातू जो परीक्षित राजा, त्याचा पुत्र जनमेजय याने सर्पसत्र आरंभिले. त्यावेळी वैशंपायन ऋषींनी यात काही गोष्टींची भर घालून जनमेजयास हा इतिहास सांगितला. त्यावेळी या ग्रंथाची श्लोकसंख्या एकंदर २४,००० इतकी झाली.

३)	पुढे हे सर्पसत्र बारा वर्षेचालू होते. त्या सर्पसत्रासाठी अनेक ऋषीमुनी आले होते. त्यांचे मनोरंजन करण्यासाठी त्यावेळी लोमहर्षण सूताचा पुत्र उग्रश्रवा याने ही कथा सांगितली. मात्र यावेळी वैशंपायन ऋषींनी सांगितलेल्या मूळ कथेत उग्रश्रव्याने राक्षस, देवासुर, ऋषी, यक्ष इत्यादिकांच्या अनेक कथांची भर घातली. यावेळी ही श्लोकसंख्या एकंदर एक लाख श्लोक इतकी झाली. यावरून या महाकाव्यास 'शतसाहस्त्रिक संहिता' असे नाव पडले. 'इलियड' व 'ओडिसी या पाश्चात्य देशातील दोन्ही महाकाव्यांपेक्षा हे काव्य अतिप्रचंड असे झाले आहे.

महाभारत या शब्दाची व्याख्या सांगताना पाणिनीने 'भारत' हा शब्द 'भरत' या नावाच्या मानववंशाचा संग्राम या अर्थी सिद्ध केला आहे. (अष्टाध्यायी ४.२.५६) त्याला महान् हे विशेषण लावून 'महाभारत' हा शब्द सिद्ध केला आहे. –पाणिनी (अष्टाध्यायी ६.२.३८)

दुष्यन्त व शकुंतला यांचा पुत्र भरत हा सम्राट होता. त्याच्या वंशातील कोरव व पांडव यांच्यातील युद्धाची कथा यात सांगितली आहे. संपूर्ण महाभारताचा ही वीरगाथा हा गाभा आहे. [२८]

ब)	महाभारताची एकंदर अठरा पर्वे आहेत.

१)	आदिपर्व –

महाभारतातील हे पहिले पर्व असून यात एकंदर २२५ अध्याय आहेत. या पर्वामध्ये कुरू वंशाच्या उत्पत्तीची कथा सांगितली आहे. शंतनुचा सत्यवतीशी विवाह, भीष्मप्रतिज्ञा, शंतनुच्या चित्रांगद व विचित्रवीर्य या दोन मुलांचे जन्म, विवाह, विवाहानंतर निपुत्रिक अवस्थेतील त्यांचा मृत्यू हा कथाभाग आला आहे. या दोघांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पत्नी अंबिका व अंबालिका यांना नियोगविधीने श्रीव्यासमुनीपासून धृतराष्ट्र व पांडु हे पुत्र झाले. विदुर हा दासीपुत्र ही जन्माला आला. त्यांचे संगोपन, शिक्षण विवाहादि सर्व गोष्टी भीष्माचार्यांनी केल्या. धृतराष्ट्राची पत्नी गांधार देशाची राजकन्या गांधारी तर पांडुची पत्नी कुंतिभोज राजाची

२८)	तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश – खण्ड १२ वा (पृ.क्र.. १४०५ ते १४१४)

कन्या कुंती होय. पांडु राजत्याग करून वनात गेला. माद्री ही पांडुची आणखी एक पत्नी. धृतराष्ट्र त्यानंतर राज्यकारभार पाहू लागला. धृतराष्ट्राचे शंभर पुत्र कौरव होत. दुर्योधन हा धृतराष्ट्राचा ज्येष्ठ पुत्र होता. पांडूचे पाच पुत्र पांडव होत. पांडूचा वनात मृत्यू झाल्यानंतर माद्री सती गेली. पांडुची पत्नी आपल्या व माद्रीच्या मुलांना घेऊन हस्तिनापुरात परत आली. भीष्माचार्यांनी कौरव व पांडव यांच्या शिक्षणासाठी द्रोणाचार्यांची नेमणूक केली. पांडवांना लाक्षागृहात जाळून मारण्याचा दुर्योधनाचा कट फसला. पांडव निसटून वारणावताहून वनात गेले. द्रौपदीस्वयंवरानंतर द्रौपदीला जिंकून परत हस्तिनापुरात आले. तेंव्हा भीष्माचार्यांनी राज्याची वाटणी करून पांडवांना इंद्रप्रस्थाचे राज्य दिले. यानंतर पांडवांनी खांडववनाचा दाह करून आपले राज्य वाढविले. दिग्विजय करून मोठे ऐश्वर्य संपादन केले, येथपर्यंतचा कथाभाग आला आहे. या पर्वात धौम्य मुनींचे शिष्य उपमन्यु, आरुणि, वेद इत्यादि शिष्यांच्या गुरुभक्ती व गुरुनिष्ठेच्या कथा, आस्तिकपर्व, शकुंतलाख्यान, ययातीची कथा, बकासुराच्या वधाची कथा, तपतीची कथा इत्यादि अनेक कथा आल्या आहेत.

२) सभापर्व –

या पर्वात एकंदर बहात्तर अध्याय आहेत. पांडवांनी आपल्या राज्याची भरभराट करून भीम, अर्जुन, नकुल, सहदेव यांनी चारी दिशा जिंकल्या.'दिग्विजय' संपादन केला. तेव्हा युधिष्ठिराने श्रीकृष्णाच्या सल्ल्याने राजसूय यज्ञ करण्याचे ठरविले. या काळात भीमाने जरासंध या उन्मत्त राजाचा मल्लयुद्धात वध केला. तर अग्रपूजेच्या प्रश्नावरून श्रीकृष्ण व भीष्माचार्य यांची निंदा करणाऱ्या शिशुपालाचा श्रीकृष्णांनी वध केला. राजसूय यज्ञाच्या वेळी पांडवांचे वैभव बघून कौरव मत्सराने जळू लागले. ते ऐश्वर्य व त्यांचे राज्य बळकविण्यासाठी द्यूताचा कट कौरवांनी रचला. कौरवांचा मामा शकुनी याच्या कपटद्यूतांच्या बळावर कौरवांनी पांडवांच्या सर्व ऐश्वर्यासह व राज्यासह त्यांना व द्रोपदीला देखील जिंकले. यावेळी द्रौपदीला भर राजसभेत आणण्याचा लाजिरवाणा प्रसंग घडला. परंतु धृतराष्ट्राने द्रौपदीला दोन वर देऊन ते सर्व परत केले. परंतु दुर्योधनाने धृतराष्ट्राच्याच संमतीने युधिष्ठिराला पुन्हा द्यूत खेळण्यास बोलाविले. यात हरल्यामुळे पांडवांनी अटीनुसार बारा वर्षेवनवास व एक वर्षेअज्ञातवास ही शिक्षा भोगावी असे ठरले. अज्ञातवासात असताना ओळख पटल्यास पुन्हा बारा वर्षेवनवास असे ठरले. यानुसार पांडव पुन्हा वनवासात जाण्यास निघाले.

३)	वनपर्व –

या पर्वालाच आरण्यकपर्व असेही नाव आहे. या पर्वामध्ये एकंदर दोनशे नव्याण्णव अध्याय आहेत. पांडवांच्या वनवासाच्या काळातील घटनांचे यात वर्णन आहे. पांडवांना भेटण्यास अनेक ऋषी–मुनी येत असत. ते पांडवांच्या मनोरंजनासाठी कथा सांगत. यामुळे या पर्वात अनेक आख्याने व उपाख्याने आली आहेत. यात अर्जुनाचा द्रोपदीसंबंधीची अट मोडल्याने केलेला १२ वर्षेवनवास प्रवास आहे. तसेच पाशुपतअस्त्र मिळविण्यासाठी त्याने केलेली तपश्चर्या व शंकराशी युद्ध हा कथाभाग आला आहे. दुर्योधनाने पांडवांना आपले वैभव दाखवून खिजविण्याच्या इच्छेने लवाजम्यासह केलेली घोषयात्रा, चित्ररथ गंधर्वाने त्याला पकडले असता युधिष्ठिराने मोठ्या मनाने त्याची केलेली सुटका व ऐक्य व कुलधर्म यांचा उपदेश हा कथाभाग आला आहे. तीर्थयात्रा पर्व व यक्षाने युधिष्ठिराची घेतलेली परीक्षा, यक्षप्रश्नांना युधिष्ठिराने दिलेली समर्पक उत्तरे व त्याच्या मनाचा मोठेपणा हा भाग आला आहे. याखेरीज इंद्रवज्रासाठी स्वत:ची हाडे देण्याचा त्याग दाखविणाऱ्या दधिची ऋषींची कथा, अगस्ती ऋषींच्या समुद्रप्राशनाची कथा या कथा आल्या आहेत. तसेच गंगावतरणाची कथा, शिबीराजाच्या सत्त्वपरीक्षेची कथा, कर्तव्यनिष्ठेचा संस्कार करणारी धर्मव्याधाची कथा, पातिव्रत्याचे माहात्म्य, अष्टावक्रकथा, इत्यादि अनेक कथा आल्या आहेत. याखेरीज रामायणकथा, सावित्रीचे उपाख्यान, नलोपाख्यान ही अतिशय विस्तृत आख्यानेही या पर्वांत आली आहेत. या सर्व कथांमुळे व आख्यानांमुळे हे पर्व अतिशय मनोरंजक झाले आहे. तसेच सत्य, दान, त्याग, धर्म इत्यादि चिरंतन मूल्यांच्या संस्काराच्या दृष्टीनेही हे पर्व अतिशय महत्त्वाचे आहे.

४)	विराटपर्व –

या पर्वात एकंदर ६७ (सदुसष्ट) अध्याय आहेत. मत्स्य देशातील विराटनगरीचा राजा विराट याच्याकडे पांडवांनी एक वर्ष अज्ञातवासात रहावे असा यमधर्माने पांडवांना आदेश दिला होता. त्याप्रमाणे युधिष्ठिर हा कंक ब्राह्मण, व भीम–बल्लव म्हणून विराटाच्या पाकशाळेत अशा वेषाने राहू लागले. अर्जुनाने बृहन्नडा या वेषात स्त्रीरूप धारण करून तो अंत:पुरात नृत्यगायन शिकवू लागला. नकुल घोड्यांच्या पागेत तर सहदेवाने गोपालनाचे काम स्वीकारले. द्रौपदीने सैरंध्री दासी असे वेषांतर केले. ती विराटची राणी सुदेष्णा हिच्या अन्त:पुरात प्रसाधनाचे काम करण्यासाठी राहिली.

विराटाचा मेव्हणा कीचक याची पापी दृष्टी द्रौपदीवर पडताच भीमाने नाटकशाळेत जाऊन त्याला ठार मारले. तसेच गुप्तपणे स्मशानात जाऊन त्याने अनुकीचकांनाही ठार मारले.

कौरवांनी विराटाच्या गोशाळेवर हल्ला करून त्याच्या गायी पळविल्या. परंतु अर्जुनाने राजपुत्र

उत्तराला सारथी करून शौर्याने कौरवांवर विजय मिळविला. तो दिवस पांडवांचा अज्ञातवास संपून प्रकट होण्याचा दिवस होता. यानंतर विराटाची मुलगी उत्तरा व अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु यांचा विवाह होतो.

५) उद्योगपर्व –

या पर्वात एकंदर एकशे सत्याण्णव अध्याय आहेत. युद्धाची सूचना या पर्वातून मिळते. विवाहसोहळा पार पडल्यानंतर विराटाच्या सभेत पांडव, श्रीकृष्ण, सात्यकी, द्रुपद यांची सभा होते. १२ वर्षेवनवास व एक वर्ष अज्ञातवास ही अट पूर्ण झाल्याने पांडवांचे इंद्रप्रस्थाचे राज्य त्यांना धृतराष्ट्राने परत करावे असे सर्वानुमते ठरते. हा निरोप घेऊन द्रुपदाचा पुरोहित हस्तिनापुरास जातो. पांडव यानंतर उपप्लव्य नगरीत राहावयास येतात. द्रुपदपुरोहित युधिष्ठिराचा निरोप धृतराष्ट्रास सांगतो. त्यास भीष्माचार्य अनुमोदन देतात तर कर्ण विरोध करतो. युद्ध टाळण्यासाठी धृतराष्ट्र संजयाला दूत म्हणून युधिष्ठिराकडे पाठवतो. संजय शक्यतो युद्ध करू नये असे युधिष्ठिराला पटवू पाहतो. यावर युधिष्ठिर इंद्रप्रस्थाचे राज्य द्यायचे नसेल तर अविस्थल, वृकस्थल, वारणावत, माकंदी ही चार गावे व इतर कोणतेही एक गाव अशी पाच गावे द्यावीत असा निरोप संजयाबरोबर धृतराष्ट्राला पाठवितो. धृतराष्ट्र द्विधा मन:स्थितीत असतो. यावेळी विदुर त्याला अनेक नीतीवचने सांगून धर्मोपदेश करतो. हिताच्या अनेक गोष्टी सांगतो. विदुराच्या या उपदेशास प्रजागरपर्व असे नाव आहे. यानंतर विदुर सनत्सुजात या ऋषींचे स्मरण करून त्यांना धृतराष्ट्राच्या शंकांचे निरसन करण्यासाठी बोलावितो. त्यांनी धृतराष्ट्राला केलेला उपदेश सनत्सुजात–पर्व या नावाने प्रसिद्ध आहे. दुसऱ्या दिवशी संजयाने कौरवसभेत युधिष्ठिराचा निरोप सांगितला. भीष्माचार्य, विदुर, गांधारी, धृतराष्ट्र, सर्व दुर्योधनाची समजूत घालतात. यानंतर श्रीकृष्ण हा शिष्टाईसाठी हस्तिनापुरास येतो. परंतु दुर्योधन 'सुईच्या अग्रावर राहील एवढीही जमीन पांडवांना देण्याचे नाकारतो.' याचवेळी युद्ध निश्चित होणार याची सूचना या पर्वातून मिळते. दोन्ही बाजूंकडे वेगवेगळे राजे साहाय्यार्थ येतात. कृष्ण पांडवपक्षाकडे तर यादवांचे सैन्य दुर्योधनाकडे येते. भीष्माचार्यांकडे कौरवांचे सेनापतीपद व धृष्टद्युम्नाकडे पांडवांचे सेनापतीपद होते. कौरवांची सेना ११ अक्षौहिणी तर पांडवांचे सैन्य सात अक्षौहिणी होते. या पर्वात वृत्रासुराची कथा, नहुषाची कथा, नरनारायण आख्यान, मातलीची कथा, ययाती व गालव यांची कथा, विदुलेचे आख्यान, अंबोपाख्यान या इतर कथाही आल्या आहेत.

६) भीष्मपर्व –

या पर्वात एकंदर ११७ अध्याय आहेत. सर्वांच्या संमतीने कौरवांचे सेनापती भीष्माचार्य यांना

युधिष्ठिरादि पांडवांनी वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. युद्धास प्रारंभ होणार तोच अर्जुनाने आपला सारथी असलेल्या भगवान श्रीकृष्णांना विनंती करून आपला रथ दोन्ही सैन्याच्या मधे उभा करण्यास सांगितले. दोन्ही सैन्यांकडे नजर टाकताच अर्जुनाला आपले सर्व आप्तेष्ट,गुरू तसेच मित्र युद्धासाठी सज्ज झालेले दिसले. त्याचे अवसान गळून तो रथातच मटकन् खाली बसला. यावेळी भगवान श्रीकृष्णांनी अठरा अध्यायातून भगवद्‌गीतेद्वारा उपदेश करून त्याला कर्तव्याची जाणीव करू दिली. त्याचा मोह दूर झाला. युद्धाला प्रारंभ झाला. आठ दिवस युद्ध झाले. यावेळी भगवान व्यासांनी संजयाला दिव्य दृष्टी दिल्याने तो युद्ध प्रत्यक्ष पाहून धृतराष्ट्राला त्याचे वर्णन सांगत होता. नवव्या दिवशी भीष्माचार्यांनी अतुलनीय पराक्रम केला. तेव्हा त्यांच्या वधाचा उपाय पांडवांनी त्यांनाच विचारला. पूर्वजन्मी अंबा असलेली शिखंडी हा स्त्री म्हणून भीष्माचार्यांनी शस्त्र खाली ठेवून युद्ध करण्याचे नाकारले. तेव्हा अर्जुनाने शिखंडीच्या आडून भीष्माचार्यांवर बाणांचा वर्षाव केला. भीष्म धारातीर्थी पडले. हा युद्धाचा दहावा दिवस होता. उत्तरायण सुरु होईपर्यंत शरशय्येवर प्राण धारण करावयाचे असे भीष्माचार्यांनी ठरविले. या ठिकाणी भीष्मपर्व संपले. तत्त्वज्ञानातील मुकुटमणी असा 'भगवद्‌गीता' हा ग्रंथ, जो सर्व उपनिषदांचे सार समजला जातो, तो या पर्वात आहे. यामुळे हे पर्व अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते. [२९]

७) द्रोणपर्व –

या पर्वात एकंदर १७३ अध्याय आहेत. भीष्माचार्य पडल्यानंतर दुर्योधनाने द्रोणाचार्यांना सेनापती केले. धर्मराजाला जिवंत पकडून आणण्याची त्यांना आज्ञा केली. अर्जुन धर्मराजांचे रक्षण करत असल्याने पहिल्या दिवशी धर्मराजांना पकडणे शक्य झाले नाही. तेव्हा त्रिगर्ताचा राजा सुशर्मा व संशप्तक यांनी अर्जुनाला दुसरीकडे युद्धात गुंतविले. यावेळी द्रोणाचार्यांना युद्धातून परावृत्त करण्यासाठी 'अश्वत्थामा' या नावाचा हत्ती मारला. व 'अश्वत्थामा मेला' अशी आवई उठविली. द्रोणाचार्यांनी या वृत्ताचा खरेपणा पडताळण्यासाठी युधिष्ठिर म्हणजे धर्मराज याला विचारले. धर्मराज संदिग्धपणे 'नरो वा कुंजरो वा' असे म्हणाला. या त्याच्या वचनामुळे द्रोणाचार्यांनी शस्त्रत्याग करून लढण्याचे थांबविले. यावेळी त्यांचा मृत्यू झाला. या महत्त्वाच्या घटनेखेरीज आणखी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या.

१) कौरवसेनेने सैन्याची चक्रव्यूह रचना केली. जिचा भेद फक्त अर्जुनाला करणे येत होते. अभिमन्यु या अर्जुनाच्या पुत्राला फक्त चक्रव्यूहात शिरण्याची कला माहीत होती. त्यातून बाहेर येणे त्याला माहीत नव्हते. तेंव्हा कौरवांनी अभिमन्यूच्या या अज्ञानाचा फायदा घेऊन एकाकी अशा त्याला ठार मारले.

---

२९) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व – (६.२३ ते ६.४०)

२) अभिमन्यूच्या वधास कारणीभूत झालेल्या जयद्रथाचा सूर्यास्तापूर्वी वध करण्याची प्रतिज्ञा अर्जुनाने केली 'हा सूर्य हा जयद्रथ' अशी सुदर्शन चक्राच्या साहाय्याने व्यवस्था श्रीकृष्णाने केली. तेंव्हा अर्जुनाने जयद्रथाला ठार मारून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. मराठी वाङ्मयात अजूनही 'नरो वा कुंजरो वा' व 'हा सूर्य हा जयद्रथ' हे वाक्प्रचार अतिशय प्रसिद्ध व लोकांच्या रोजच्या व्यवहारात रुढ आहेत. याखेरीज आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे इंद्राकडून मिळालेल्या वासवी शक्तीचा उपयोग करून कर्णाने भीमपुत्र घटोत्कचाचा वध केला.

८) कर्णपर्व –

या पर्वात एकंदर ६९ अध्याय आहेत. भीष्माचार्य व द्रोणाचार्य या दोघांचे पतन झाल्यानंतर कर्ण हा कौरवांचा सेनापती झाला. पांडवांचा मामा मद्रपती शल्य याने कर्णाचे सारथ्य केले. परंतु तो सतत बोलून कर्णाचा तेजोभंग करत होता. कर्ण व अर्जुन यांच्यात घनघोर युद्ध झाले. त्यावेळी त्याच्या रथाचे एक चाक जमिनीत घुसले. परशुराम ऋषींनी त्याला दिलेल्या शापामुळे आयत्यावेळी त्यांनी शिकविलेल्या ब्रह्मास्त्राचे त्याला विस्मरण झाले. यावेळी अर्जुनाने त्याचा वध केला. या पर्वातच भीमाने दु:शासनाचा कंठ चिरून त्याचा वध केला. अर्जुनाने कर्णपुत्र वृषसेनाला ठार मारले. हा युद्धाचा सतरावा दिवस होता.

९) शल्यपर्व –

या पर्वात एकंदर ६७ अध्याय आहेत. या पर्वात युधिष्ठिराने शल्याला ठार मारले. यावेळी कौरव व पांडव दोघांच्याही सैन्यातील सर्व वीर ठार झाले. दुर्योधन एका डोहात लपून बसला. भीमाने त्याला गदायुद्धाचे आव्हान दिले. आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे त्याने दुर्योधनाची मांडी गदेने फोडली. दुर्योधन जखमी अवस्थेत रणांगणात होता. हायुद्धाचा अठरावा दिवस होता. यादिवशी भारतीय युद्ध समाप्त झाले.

१०) सौप्तिकपर्व –

या छोट्याश्या पर्वात एकंदर अठरा अध्याय आहेत. कौरवसैन्यातून वाचलेले अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा हे जखमी दुर्योधनाला भेटण्यासाठी आले. यावेळी दुर्योधनाने अश्वत्थाम्याला सेनापती केले. आपला पिता द्रोणाचार्य यांच्या वधाचा सूड घेण्यासाठी अश्वत्थामा रात्रीच्या वेळी पांडवांच्या शिबिरात गेला. पाचही पांडवांच्या पाच मुलांना त्याने ठार मारले. यावेळी जगाचा संहार करणारे ब्रह्मास्त्र त्याने व अर्जुनाने सोडले. परंतु नारदादिऋषींच्या विनंतीवरून दोघांनीही अस्त्र आवरले. भीमाने द्रौपदीने सांगितल्याप्रमाणे

अश्वत्थाम्याच्या मस्तकावरील मणी काढून घेतला. मस्तकांवरील भळभळती जखम घेऊन अश्वत्थामा तसाच फिरत राहिला. दुर्योधनाचाही मृत्यू झाला. हा सर्व कथाभाग या पर्वात आला आहे.

११) स्त्रीपर्व –

या पर्वात एकंदर सत्तावीस अध्याय आहेत. भयंकर अशा महाभारत युद्धाच्या समाप्तीनंतर सर्व स्त्रियांनी केलेल्या विलापाचे वर्णन या पर्वात आहे. कुरुक्षेत्रावरील सर्व प्रेतांना युधिष्ठिराने अग्नी दिला व सर्व मृतात्म्यांना तिलांजली दिली. कुंतीने कर्णजन्माचे रहस्य सांगून तो ज्येष्ठ पांडव असल्याने त्यालाही तिलांजली द्यावी असे युधिष्ठिराला सांगितले. युधिष्ठिराने यावेळी 'स्त्रियांच्या पोटात कोणतेही रहस्य राहणार नाही.' असा सर्व स्त्रियांना शाप दिला. गांधारीने श्रीकृष्णाला त्याच्याही कुलसंहाराचा शाप दिल्याची कथा या पर्वात आली आहे.

१२) शांतिपर्व –

महाभारत या ग्रंथातील हे सर्वात मोठे व महत्त्वाचे पर्व आहे. या पर्वात एकंदर तीनशे सतरा अध्याय आहेत. युधिष्ठिराला राज्यप्राप्ती झाली. परंतु त्याचे मन अशांत होते. राज्यत्याग करून वनात जाण्याची भाषा तो करू लागला. त्यावेळी श्रीकृष्णाच्या सांगण्यानुसार भीष्माचार्यांनी त्याला राजधर्माचा उपदेश करून कर्तव्य व अकर्तव्य यांचा उपदेश केला. यातील अध्यायांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

१) अध्याय १ ते अध्याय १२८ राजधर्माचा उपदेश आहे.

२) अध्याय १२९ ते अध्याय १६७ आपद्धर्म पर्व आहे.

३) अध्याय १६८ ते अध्याय ३१७ मोक्षधर्म सांगितला आहे.

१) पहिल्या राजधर्म प्रकरणातील १२८ अध्यायांमध्ये राजाची उत्पत्ति, राजाची कर्तव्ये (राजधर्म), वर्णाश्रमधर्म, वायु–पुरुरवासंवाद, ऐल काश्यप संवाद, मुचकुंदाचे आख्यान, वासुदेव–नारद व इंद्र–बृहस्पति संवाद, राष्ट्रसंरक्षण (महत्त्व व प्रकार) उतथ्यगीता, वामदेव गीता, कालकवृक्षीयोपाख्यान, सत्य–असत्य यांचे महत्त्व, सेवकांना वागविण्याची रीत, दंडनीतीचे महत्त्व, शीलाचे महत्त्व, ऋषभ–गीता इत्यादि विषय आले आहेत.

२)	आपद्धर्मपर्व – या पर्वामध्ये संकटप्रसंगी राजाचे वर्तन, कोशाची आवश्यकता, संचय व त्याचा उपयोग, बलाचे महत्त्व, मत्स्योपाख्यान, मार्जारमूषक संवाद, कणिकोपदेश, कपोत–कपोती यांची कथा, इंद्रोत–जनमेजय संवाद, शाल्मलीवृक्षाची कथा, तप व सत्य यांची प्रशंसा, आपद्धर्म – पातके व त्याची प्रायश्चित्ते इत्यादि विषय आले आहेत. (अध्याय १२९ ते अध्याय १६७)

३)	मोक्षधर्मपर्व – हे पर्व अतिशय विस्तृत असून अध्याय १६८ ते अध्याय ३१७, म्हणजे सुमारे १५० अध्याय या पर्वात आहेत. या पर्वात पूर्वकर्माचे प्राधान्य, शरीराचे पांचभौतिकत्व, वर्णाश्रमधर्माचे विवेचन, सत्वादिगुणांच्या लक्षणांचे वर्णन, प्रवृत्ति–निवृत्ति वर्णन, इंद्र–प्रल्हाद व इंद्र–बलि यांचे संवाद,सांख्य सिद्धांत वर्णन, ज्ञानी पुरुषाचे वर्णन, तुलाधार–जाजली संवाद, नारद व असित यांचा संवाद, वृत्रवधाची कथा, पाराशर –गीता, हंसगीता, मायानिवृत्तीवर्णन हे व यासारखे अध्यात्माशी संबंधित अनेक विषय आले आहेत.

शांतीपर्वामध्ये संस्कारक्षम अशा शङ्ख व लिखित यांची कथा, मत्स्योपाख्यान, पलित मूषक व लोमश मार्जार यांची कथा, कर्णाच्या ब्रह्मास्त्रप्राप्तीची कर्ण व परशुराम यांच्यातील कथा, वाघ व कोल्ह्याची कथा, लांब मान असणाऱ्या उंटाची कथा, वृक्ष व लव्हाळे यांची कथा, मुनी व कुत्रा यांची कथा, राजा प्रल्हादाची कथा, सेमल वृक्षाची कथा, बलिराजा व इंद्राची कथा, मुनी जाजली व तुलाधार वैश्य यांची कथा अशा अनेक कथा आल्या आहेत.

१३)	अनुशासनपर्व –

या पर्वामध्ये एकंदर १५४ अध्याय आहेत. या पर्वामध्ये उत्तरायण सुरु झाल्यामुळे भीष्माचार्यांनी योगमार्गाने आपल्या देहाचा त्याग केला. भीष्माचार्यांच्या अंतिम अशा मृत्यूसमयीचे वर्णन या पर्वात आले आहे. धृतराष्ट्र व पांडव या सर्वांना भीष्मांनी अखेरचा उपदेश केला व ते निजधामास गेले.

१४)	आश्वमेधिक पर्व –

या पर्वामध्ये ९६ अध्याय आहेत. युधिष्ठिराने आपल्या राज्यात चारी दिशांना विजय संपादन करून अश्वमेध यज्ञ केला. या यज्ञाचे वर्णन या पर्वात आले आहे.

१५)　आश्रमवासिक प्रश्न –

या पर्वात एकंदर ४७ अध्याय आहेत. धृतराष्ट्र, गांधारी, विदुर व कुंती हे वानप्रस्थात गेले. त्यावेळी कुंतीने धृतराष्ट्र व गांधारी यांची शेवटपर्यंत सेवा केली. हे तिघेही वणव्याला लागलेल्या आगीत जळून नष्ट झाले. विदुराचाही देहांत झाला. या सर्व कथाभागाचे वर्णन या पर्वात आले आहे.

१६)　मौसलपर्व –

या पर्वात ९ अध्याय आहेत. महाभारतातील सोळा, सतरा व अठरा ही तीन पर्वेलहान लहान आहेत. कुरु वंशांतील पांडव व यादव वंशातील कृष्ण व यादव यांच्या अंताच्या कथा या पर्वात आल्या आहेत. गांधारीच्या शापानुसार सर्व यादववीर आपापसात युद्ध करून नष्ट झाले. एका व्याधाने सोडलेला बाण श्रीकृष्णांच्या पायाला लागून श्रीकृष्णांचा अंत झाला.

१७)　महाप्रस्थानिक पर्व –

या पर्वात एकंदर ३ अध्याय आहेत. व्यासमहर्षींनी अर्जुनाला महाप्रस्थान करण्याचा आदेश दिला. राज्याभिषेकानंतर सुमारे १३० वर्षेराज्य करून युधिष्ठिर व त्याचे चार भाऊ तसेच द्रौपदी हे हिमालयात जाण्यास निघाले. अर्जुनाचा नातू परीक्षित याला त्यांनी हस्तिनापूर येथील राज्यावर बसविले. तसेच पांडवांचा पणतू व्रज याला इंद्रप्रस्थाचे राज्य त्यांनी दिले हा सर्व कथाभाग आला आहे.

१८)　स्वर्गारोहणपर्व –

हे महाभारताचे अंतिम पर्व होय. पांडव स्वर्गारोहण करत असताना प्रथम द्रौपदीचे पतन झाले. सहदेवाला आपल्या पांडित्याचा, गर्व, नकुलाला आपल्या सौंदर्याचा गर्व, अर्जुनाला आपण सर्वश्रेष्ठ धनुर्धर असल्याचा अभिमान, तर आपल्या सामर्थ्यापुढे इतरांना तुच्छ लेखण्याचा भीमाचा स्वभाव, या त्यांच्या दोषामुळे एकामागून एक पांडवांचे पतन झाले. द्रौपदी अर्जुनाच्या बाबतीत पक्षपात करत असल्याने सर्वप्रथम ती पडली. एकटा युधिष्ठिर त्याच्या बरोबर चालणाऱ्या कुत्र्यासह स्वर्गापर्यंत पोहोचला. कुत्र्यासहच स्वर्गात प्रवेश करण्याचा त्याचा निश्चय होता. कुत्र्याच्या रूपातील साक्षात् यमधर्मानेच युधिष्ठिराची परीक्षा पाहिली. युधिष्ठिराची दयाबुद्धी व कर्तव्यनिष्ठा पाहून यमधर्म प्रसन्न झाला. त्याने इंद्रासह व युधिष्ठिरासह स्वर्गात प्रवेश केला. या पर्वाच्या अखेरीस महाभारत हे अलौकिक काव्य समाप्त झाले. [२९]

---

२९)　BORI प्रमाणित प्रत म.भा. खण्ड १ ते २२, पर्वे अठरा.

३)	महाभारतात आढळणारा राष्ट्रीय मूल्यविचार –

महाभारत ही लक्षश्लोकात्मक संहिता आहे. हा फार मोठा ग्रंथ असल्याने मुख्यत्वेकरून ज्या पर्वात चिरंतन अशा नीतीमूल्यांचा विचार आला आहे, अशा पर्वांचाच मुख्यत्वे विचार केला आहे. ती पर्वेपुढीलप्रमाणे –आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, शांतिपर्वामधील राजधर्मविचार ही होत.

मनुष्यप्राणी हा इतर प्राण्यांहून भिन्न असाच आहे. त्याच्यामध्ये बुद्धि व भावना या दोन गोष्टी विशेष आहेत. या दोन गोष्टींचा उपयोग तो आपल्या वर्तनात करून आपले वर्तन समाजाला हितकारक असे करू शकतो. यालाच सदाचार असे म्हणतात. सदाचाराचे महत्त्व महाभारतकारांनी ठिकठिकाणी वर्णन केले आहे.

‘सर्व प्रकारच्या वेदविद्यांध्ये आचार हा सर्वश्रेष्ठ गणला जातो. आचारामधून धर्माचा (कर्तव्यनिष्ठतेचा) जन्म म्हणजेच उगम होतो. यामुळेच माणसाला दीर्घायुष्य प्राप्त होते. [३०]

अर्थात् कर्तव्यनिष्ठतेमुळेच मनुष्य सदाचारी बनतो. अशा अनेक व्यक्तींचे कुटुंब होते. कुटुंबाचा समाज होतो. त्यामुळे जर व्यक्ती सुसंस्कारित व सदाचारी असतील तरच समाज सुसंस्कारित व सदाचारी होतो. अशा या सदाचारात अनेक चिरंतन अशा मूल्यांचा अंतर्भाव होतो. महाभारतामध्ये आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, शांतिपर्व, अनुशासनपर्व या सर्व पर्वांमध्ये सत्य, अहिंसा, दान, तप, दम, क्षमा, समता, अस्तेय, अमात्सर्य अशा चिरंतन मूल्यांचे प्रतिपादन केले आहे.

१)	सत्य – हे अंतिम असे तत्त्व आहे. ‘कालत्रयाबाधितं यत् तत् सत्यम्।’ (अर्थ – वर्तमान, भूत, भविष्य या तीनही काळात जे बदलत नाही ते सत्य.) अशी सत्याची व्याख्या आपण प्रकरण एकमध्ये पाहिली. एखाद्या गोष्टीची न्याय्य बाजू म्हणजे सत्य होय.

सत्याचे महत्त्व महाभारतात ठिकठिकाणी प्रतिपादन केले आहे.

आदिपर्वामध्ये शकुंतलोपाख्यानात राजा दुष्यंताला शकुंतला खालीलप्रमाणे सत्याचे महत्त्व सांगते.

‘सत्याशिवाय सर्वश्रेष्ठ असा धर्म नाही. सत्याखेरीज (कर्तव्याचरण) यासारखी दुसरी सर्वश्रेष्ठ अशी गोष्ट नाही, आणि असत्यापेक्षा अधिक त्रासदायक दुसरे काहीही नाही. हे राजा, सत्य म्हणजेच सर्वश्रेष्ठ ब्रह्मतत्त्व होय. सत्य हेच सर्वश्रेष्ठ आचरण आहे, अशा सत्यरूपी आचरणाचा तू त्याग करू नकोस.

---

३०)	BORI प्रमाणित प्रत म.भा.

आगमानां हि सर्वेषां आचार: श्रेष्ठ उच्यते।

आचारप्रभवो धर्म: धर्मादायु: विवर्धते।।

सदा सत्याबराबेरच तुझा सहवास राहो. [३१]

तर ययातीने सत्याचे महत्त्व पुढील शब्दात वर्णन केले आहे.

'सत्येन मे द्यौश्च वसुन्धराश्च ।

तथैव अग्नि: ज्वलते मानुषेषु ।।

न मे वृथा व्याहृतमेव वाक्यम् ।

सत्यं हि सन्त: प्रतिपूजयन्ति ।।

सर्वेच देवा मुनयश्च लोका: ।

सत्येन पूज्या: इति मे मनोगतम् ।। [३२]

(अर्थ – सत्यामुळेच आकाश व पृथ्वी हे आहेत. तसेच मनुष्यातील अग्नी प्रज्वलित होतो तो सत्यानेच ! हे माझे बोललेले शब्द कधीही व्यर्थ ठरणार नाहीत. कारण सत्याचीच सज्जन लोक नेहमी पूजा करतात. सर्व देव, ऋषीमुनी, आणि सर्व लोक हे सत्यामुळेच पूजनीय ठरतात.)

'सत्य हे शंभर अश्वमेध यज्ञांच्या पुण्याच्या तुलनेइतके मानले जाते. एवढेच नव्हे तर शंभर अश्वमेध यज्ञांपेक्षाहि सत्याचे महत्त्व अधिक मानले आहे. [३३]

प्राणिमात्रांचे सर्वश्रेष्ठ पराकोटीचे हित म्हणजे सत्य होय. [३४]

सत्यासारखे श्रेष्ठ व्रत नाही. [३५]

धर्माचे रक्षण सत्यामुळेच होते. [३६]

कपटयुक्त असे जे असते ते सत्यच नव्हे. [३७]

तर अजगर युधिष्ठिर संवादात युधिष्ठिराने मूल्यांचे श्रेष्ठत्व खालीलप्रमाणे प्रतिपादन केले आहे.

'सत्य, क्षमा, दया, शील, आनृशंस्य (क्रूरपणाचा अभाव) संयम, करूणा हे गुण, हे नागेंद्रा, ज्या ठिकाणी दिसून येतात तोच खरा ब्राह्मण होय. [३८]

---

३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व – शकुंतलोपाख्यान (अ. १.६९.२४,२५)

३२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व अष्टक ययाति संवाद (अध्याय १.८८.२४, २५)

३३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.७४.१०३)

३४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२०९.४)

३५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२.१३.३०)

३६) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३४.३९)

३७) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३५.५८)

३८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (१७७.१६)

चातुर्वर्ण्य, सत्य, ब्रह्म प्रमाण मानणे, शूद्र व्यक्तीच्या ठिकाणीही सत्य, दानी वृत्ती, शांत वृत्ती, अक्रूरत्व, अहिंसा, दयाबुद्धी असे श्रेष्ठ चारित्र्यच प्रमुख म्हणून जाणतात तेच खरे तत्त्ववेत्ते होत. (३९)

पात्र व्यक्तीला दान करून, प्रिय असे सत्य बोलून, अहिंसानिष्ठ असाच मनुष्य स्वर्गात जाईल.(४०)

जे दानामध्ये मग्न आहेत. सत्य आणि अहिंसा हीच ज्यांची प्रधान कार्येआहेत, त्यांना इतर सर्व कमी महत्त्वाचे असते. (४१)

शांतिपर्वामध्ये म्हटले आहे की, अहिंसा, सत्य बोलणे, अनृशंस्य, इंद्रियविजय, दयाबुद्धी ही नीतीमूल्ये म्हणजे मोठेच तप होय असे बुद्धिमान लोक म्हणतात. (४२)

अशाप्रकारे महाभारतात सत्याचा महिमा फार मोठ्या प्रमाणावर कथन केला असला तरी प्रसंगविशेषी सत्याला मुरड घालणे आवश्यक असते. जे लोकांच्या हिताचे ते सत्य अशी व्याख्या केली आहे.

महाभारतातील मूल्यविचार :–

महाभारतात सत्य, अहिंसा ही मूल्ये व आचार यांना अतिशय महत्त्व दिले आहे.

परंतु व्यवहारामध्ये अंतिम परिणाम हा लक्षात घेऊन तारतम्याने मूल्यमापन करावे लागते. काही वेळा मूल्याचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी केलेलाही दिसतो.

दुष्यंत व शकुंतला यांच्या कथेत ज्यावेळी शकुंतला राजाला सत्याचे महत्त्व पटवून देते त्यावेळी व्यावहारिक दृष्टीने ती विचार करते. दुष्यंताला पूर्वी घडलेल्या सत्य घटनांचे स्मरण असूनही तो असत्य बोलतो आहे असे तिला वाटते. आपले नाते मान्य व्हावे हा तिचा हेतु आहे.

भीष्माचार्य हे जी प्रतिज्ञा, आमरण ब्रह्मचर्याची, करतात त्यावेळी त्यांची सत्यनिष्ठा ही निःस्वार्थ आहे. सत्यनिष्ठेने धर्माचे पालन ते करतात.

मात्र काही वेळा घटनेच्या परिणामाकडे लक्ष देऊन व्यवहारी वृत्तीने, आपद्धर्म म्हणून सत्याला मुरड घालावी लागते.

द्रोणवध हा लढाईतील, युद्धातील विजयाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने युधिष्ठिर अर्धसत्य बोलतो. अश्वत्थामा या हत्तीला मारल्यानंतर द्रोण युधिष्ठिराच्या सत्यनिष्ठेवर विश्वास ठेवून त्याला विचारतात. परंतु युधिष्ठिर 'नरो वा कुंज्ञरो वा' असे संदिग्ध उत्तर देतो.

---

३९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( १७७.१८)

४०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (१७८.२४)

४१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (१७८.२४)

४२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (७९.१८)

युधिष्ठिराने द्रोणवधासाठी अश्वत्थामा या हत्तीचा मृत्यू झाला असताना अश्वत्थामा 'नरो वा कुंजरो वा' (माणूस किंवा हत्ती असेल असे अर्धसत्य सांगितले. सत्याला मुरड घातली ती आपद्धर्म म्हणून. द्रोणाचार्यांनी असत्य पक्षाची बाजू घेतली होती. असत्य पक्षाचा पराभव होण्यासाठी द्रोणाचार्यांचा वध आवश्यक होता. अत्यंत अनिवार्य असेल तरच खोटे बोलावे. सत्याची प्रशंसा करून त्यामागून खोटे बोलण्याच्या सवलती नाहीत. त्यामुळे युधिष्ठिराला अर्धसत्य बोलावे लागले.

तीच गोष्ट अहिंसेची आहे. युद्धातील हिंसा क्षम्य मानली आहे. तसेच लोकहितासाठी नि:स्वार्थ बुद्धीने केलेली जरासंध, शिशुपाल या दुर्जनांची हिंसा क्षम्य मानली आहे. चिरंतन मूल्यांचे पालन करताना विवेक व तारतम्य या दोन्ही गुणांचे पालन आवश्यक आहे. लोकहित ही प्रमुख गोष्ट मूल्यपालन करताना लक्षात घेणे आवश्यक आहे. ही मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. केवळ आंधळेपणाने मूल्यांचे केलेले पालन हे हितावह ठरणार नाही हे आपद्धर्माच्या विवेचनात भीष्माचार्यांनी स्पष्ट केले आहे.

आपदधर्मपर्वातील मार्जार मूषक कथा [४३], ब्रह्मदत्त पूजनी यांचा संवाद, कणिकनीती, कपोतव्याध कथा, शाल्मली वृक्षाची कथा [४४] यातून हे मुद्दे स्पष्ट झाले आहेत.

दानाचे महत्त्व महाभारतात वेगवेगळ्या प्रकारे फार चांगल्या तऱ्हेने ठसविले आहे.

दु:खीकष्टी माणसाला आधार द्यावा. आश्रयास आलेल्याला बसण्यास आसन द्यावे. तहानलेल्या पाणी तर भुकेलेल्या अन्न द्यावे. [४५]

या जगात दान करण्याइतकी दुसरी कोणतीही कठीण गोष्ट नाही. [४६]

भीष्मपर्वातील भगवद्गीतेत 'दैवासुरसंपद्विभागयोग' यामध्ये दैवी संपत्तीचे वर्णन करताना अनेक मूल्यांवर भर दिला आहे.

अभयं सत्त्वसंशुद्धि: ज्ञानयोगव्यवस्थिति: ।

दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्याय: तपमार्जवम् ।।१ ।।

अहिंसा सत्यमक्रोध: त्याग: शान्तिरपैशुनम् ।

दया भूतेष्वलोलुप्तं मार्दवं ह्रीरचापलम् ।।२ ।।

---

४३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व आपद्धर्म (१२.१३८)

४४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१५४)

४५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२.५५)

४६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२५६.२८)

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता।

भवंति संपदं दैवीमभिजातस्य पांडव ।।३ ।।[४७]

(अर्थ – निर्भयता, शुद्ध सात्विक वृत्ति, ज्ञानयोग आणि कर्मयोग यांची योग्य व्यवस्था, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञ, वेदाध्ययन, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, शांतवृत्ती, कर्मफलाचा त्याग, शांती, दुष्टपणाचा अभाव, भूतदया, लोभ नसणे, मृदुवृत्ति, दुष्कर्माविषयी लज्जा, इंद्रियांच्या स्वैर हालचालींवर ताबा, तेज, क्षमावृत्ती, धैर्य, मानसिक व शारीरिक शुद्धता, द्रोह न करणे व वृथा अभिमान न बाळगणे हे सर्वच गुण सदाचारात अंतर्भूत होतात.)

अर्थात् नीतीमध्ये या सर्व मूल्यांचा समावेश होतो. नीती ही वैयक्तिक जशी तशीच सामाजिकही असते. सदाचारी अशा अनेक व्यक्तींचा बनलेला समाज हाच सदाचारी असू शकतो.

मात्र ही सर्व मूल्ये समाजाला नियंत्रित करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी असतील तर सामान्य व्यक्ती तो आदर्श मानून त्याप्रमाणे आचरण करतील.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे. की 'श्रेष्ठ व्यक्ती ज्या ज्या गोष्टींचे आचरण करेल, त्याप्रमाणे इतर लोक आचरण करतात. ती ज्या गोष्टी आदर्श किंवा प्रमाणभूत मानेल त्यांचेच अनुकरण इतर सामान्य लोक करतात.[४८]

महाभारत कालात प्रजेचे पालन व रक्षण करणारा हा राजाच असल्याने तो या सर्व गुणांनी युक्त असावा हे अपेक्षित होते.

शांतिपर्वामध्ये राजधर्माचे महत्त्व खालील शब्दात सांगितले आहे,

'ज्याप्रमाणे अश्वांसाठी लगाम आवश्यक असतात, किंवा हत्तीला ताब्यात ठेवण्यासाठी अंकुश लागतो त्याप्रमाणे प्रजेसाठी राजधर्माचा अंकुश महत्त्वाचा असतो.''[४९]

राजधर्माचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

सत्याशिवाय राजाला राजधर्माचे (कर्तव्याचे) पालन करणे अशक्य आहे. राजधर्माचे पालन करण्यासाठी राजाला सत्याशिवाय अन्य साधन नाही. सत्याचरणात मग्न असा राजा इहलोकी त्याप्रमाणे परलोकीही आनंदित राहतो. ऋषीमुनींच्या बाबतीत सत्य हेच सर्वश्रेष्ठ धन आहे. तर राजाच्या बाबतीत सत्य असे आचरण हेच विश्वासाचे कारण आहे.[५०]

---

४७) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व – श्रीमद्भगवद्गीता – अध्याय १७ वा (श्लोक १ ते ३).

४८) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व – श्रीमद्भगवद्गीता (अध्याय ३:२१).

४९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६.५).

५०) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६.१७, १८)

राजाचे अंगी कोणते गुण असावेत याचे तपशीलवार वर्णन, चपखल अशा शब्दात भीष्माचार्यांनी शांतिपर्वातील राजधर्म प्रकरणात केले आहे.

'सद्गुणी, चारित्र्यसंपन्न, इंद्रियांवर विजय मिळविलेला, शांतवृत्तीचा, मृदु , दर्शनीय, स्थूललक्ष्य, अशा राजाचे ऐश्वर्य कधीही नष्ट होत नाही. (५१)

'कर्तव्यनिष्ठ व सत्यवचनी असा राजाच प्रजेला संतुष्ट करतो. (५२)

महाभारतात ज्या ज्या राजांची वर्णने आली आहेत त्या सर्व राजांचे गुणवर्णन अतिशय तपशीलवार केले आहे. आदिपर्वाच्या ८८ व्या अध्यायात शिबि राजाचे वर्णन आले आहे.

शिबि राजा हा अप्रतिम असा असून त्याच्या ठिकाणी दानी वृत्ती, सत्यप्रियता, कर्तव्यनिष्ठा, क्षमावृत्ती, तपाचरण, सहनशीलता, ऐश्वर्य, पापाचरणाबद्दल लज्जा असे अनेक गुण निवास करतात. (५३)

तसेच राजा शंतनु हाही धर्माचरणी व सत्यवचनी असे त्याचे वर्णन केले आहे. तो इंद्रियांवर ताबा ठेवणारा, दानी, क्षमाशील वृत्तीचा, पापाचरणाबद्दल लज्जा बाळगणारा असा आहे. हे सर्व गुण त्याच्या अंगी नित्य वास करतात. महासत्त्व असा हा शंतनु राजा आहे. (५४)

तर इक्ष्वाकु वंशातील महाभिष राजाही सत्यवचनी व सत्यपराक्रमी होता असा त्याचा उल्लेख आला आहे. (५५)

ययाति, मान्धाता, नहुष, नाभाग हे सर्वच राजे सत्यवचनी व क्षत्रधर्मपरायण होते अशी त्यांची स्तुती आदिपर्वात केली आहे. (५६)

रामायणातील तसेच महाभारताच्या रामोपाख्यानातील राम हा 'सत्यवचनी' या विशेषणानेच गौरविला जातो.

कुरु वंशातील भीष्माचार्य– मूळचा राजपुत्र देवव्रत याने आजन्म ब्रह्मचर्याची शपथ घेतली. हा त्याचा दृढनिश्चय त्याने खालील शब्दात व्यक्त केला आहे. 'मी त्रैलोक्याच्या राज्याचाही त्याग करेन, एकवेळ पृथ्वी गंधाचा त्याग करेल, पाणी रसगुण सोडूनदेईल, अग्नी–तेज आपल्या रूपाचा त्याग करेल. वायु स्पर्शगुण

५१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६, १९, २०)

५२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५६.३६)

५३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.८८.१९)

५४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व ( १.९४, १, २)

५५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९१.१)

५६) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व (६.१७.१०)

सोडेल, सूर्य प्रकाशाचा त्याग करेल, धूमकेतु उष्णता सोडेल, आकाश शब्दगुण सोडून देईल, चंद्र शीतलता सोडेल. एकवेळ इंद्र पराक्रमाचा त्याग करेल, यमधर्म धर्म सोडेल, परंतु मी सत्याचा त्याग करणार नाही.' (५७)

या घोर प्रतिज्ञेमुळे देवव्रताचे भीष्माचार्य झाले. तसेच उद्योगपर्वात भीष्माचार्यांनी आपल्या कठोर क्षात्रधर्माची ग्वाही दिली आहे. (५८)

त्याचप्रमाणे पांडवांमधील ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर हा त्याच्या पवित्र आचरणाने लोकांना संतुष्ट करत असे असा आदिपर्वात उल्लेख आहे. भीमाचे धैर्य, अर्जुनाचा पराक्रम, वडिलधाऱ्यांची कुंतीने केलेली सेवा व नकुल सहदेवांची विनयशील वृत्ती यामुळे प्रजाजन अतिशय प्रसन्न होत अशी सर्व पांडवांच्या गुणांची प्रशंसा आदिपर्वात केली आहे. (५९)

खुद्द भीष्माचार्यांनी शांतिपर्वात युधिष्ठिराच्या गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. भीष्माचार्य म्हणतात, ''धर्म हाच ज्याचा आत्मा आहे, अशा ह्या युधिष्ठिराच्या जन्माने सर्व ऋषींना आनंद झाला. धर्माचरण करणाऱ्या तेजस्वी कुरुकुलातील वीरांमध्ये युधिष्ठिरासारखा अन्य कोणीच नाही. धैर्य, क्षमावृत्ती, कर्तव्यनिष्ठा, ओज, पराक्रम, सत्यनित्यता, ज्ञाननिष्ठा, शांती, दाक्षिण्य, हे सर्व गुण, त्याच्या ठिकाणी आहेत. नातेवाईक, अतिथी, सेवक यांचा सत्कारपूर्वक जो सन्मान करतो तो युधिष्ठिर, मला मार्गदर्शन करण्याविषयी विचारत आहे. (६०)

हे युधिष्ठिराचे गुणगान स्वत: भीष्माचार्यांनी केलेले आहे. हे लक्षात घेतले की, युधिष्ठिराचे श्रेष्ठत्व सिद्धच होते.

यक्षप्रश्नांच्या प्रसंगी शेवटी यक्ष युधिष्ठिराला, 'तुझ्या कोणत्या भावाला सजीव करु?' असा प्रश्न विचारतो. त्यावेळी युधिष्ठिर नकुलाला प्राणदान देण्याची विनंती यक्षाला करतो. यक्षाला आश्चर्य वाटते. 'भीम वा अर्जुनाला प्राणदान न मागता नकुलाला प्राणदान कशासाठी ?' असे यक्ष विचारतो. त्यावेळी 'कुंती व माद्री या आपल्या दोन्ही माता पुत्रवती असाव्यात असे मला वाटते.' असे युधिष्ठिर सांगतो. यावरून त्याची नि:पक्षपाती व निर्मळ वृत्ती प्रकट होते. (६१)

सर्वच पांडवांच्या ठिकाणी सत्यता हे मूल्य आढळून येते.

---

५७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९७ .१५, १६, १७, १८)

५८) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.१७८.११)

५९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१.८०, ८१)

६०) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.५५)

६१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७)

मागे उल्लेख केलेल्या महाभारतातील सर्व राजांच्या ठिकाणी व पांडवांच्या ठिकाणी सत्य, दानी वृत्ती, कर्तव्यनिष्ठता, क्षमा, अहिंसा, दया, इंद्रियांचा निग्रह हे गुण आढळून येत असल्यानेच त्यांना राष्ट्रीय मूल्यांचे स्वरूप प्राप्त झाले. प्रजादेखील त्याप्रमाणेच आचरण करीत असल्याने चारित्र्यसंपन्नता हा विशेष गुण मानला जाई.

'सत्य हे स्वर्गप्राप्तीचे उत्तम साधन आहे. तर शील हे सुखाचे एकमेव साधन आहे. (६२) असे वनपर्वात शीलाचे महत्त्व सांगितले आहे.

वैयक्तिक नीतीमूल्यांचा उपदेश वनपर्वातील अजगर–युधिष्ठिर संवाद, यक्षप्रश्न यामध्ये केला आहे. तर उद्योगपर्वात प्रजागरपर्व (विदुरनीती), सनत्सुजातपर्व, आदिपर्वात अष्टक–ययाति संवाद यामध्ये आला आहे.

१) आदिपर्व – अष्टक – ययाति संवाद –

मनुष्यांमध्ये असणारे, दानी वृत्ती, तप, संयम, शांतवृत्ती, सरळपणा, (दुष्कर्माविषयीची) लज्जा, सर्व प्राणीमात्रांबद्दल असणारी करुणा, हे गुण, दुरभिमानाच्या अंध:काराने ग्रासले असता सदैव नष्ट होतात असे सज्ज्न लोक सांगतात. (६३)

तर सत्याचे फार मोठे महत्त्व अठ्ठ्याऐंशीयाव्या अध्यायात खालीलप्रमाणे सांगितले आहे.

'माझ्या या सत्यवृत्तीमुळेच आकाश, पृथ्वी व मनुष्य यांचे ठायी अग्नी प्रज्वलित होतो. मी कधीच व्यर्थ, निष्कारण खोटे बोलत नाही. कारण सज्जन लोक सत्याचीच सर्वत्र पूजा करतात. (सत्याचाच मान राखतात.) सर्व देव, ऋषी, मुनी आणि सर्व जग सत्यामुळेच पूजनीय होते असे मला वाटते. (६४)

२) वनपर्व (अ) अजगर युधिष्ठिर संवाद –

या पर्वातील १७७ व्या अध्यायात व्यक्तीच्या अंगी आवश्यक अशा मूल्यांचे कथन केले आहे.(६५)

श्लोक २ – योग्य त्या व्यक्तीला (पात्र व्यक्तीला) दान देऊन, सत्याची कास धरून (सत्य बोलून), अहिंसेमध्ये मग्न असून, हे युधिष्ठिरा, स्वर्गातच जाईल.

श्लोक ४ – दानामध्ये मग्न असणे, सत्य आणि अहिंसा ज्याला प्रिय आहेत अशा ह्यांच्या कार्याच्या मोठेपणातून त्याप्रकारचे तारतम्य प्रकट होते.

---

६२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७.३९)

६३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.८५.२२)

६४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व ( १.८८.२४)

६५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१७७.२, ४, १६, २८)

१६) हे नागश्रेष्ठा, सत्य, क्षमा, दया, शील, कठोर वृत्तीचा अभाव, संयमवृत्ती, करुणावृत्ती हे गुण ज्याठिकाणी दिसतात, तोच खरा ब्राह्मण असे मानले जाते.

२८) वर्णाश्रमधर्म हा ज्यांना प्रमाण असतो, सत्य ब्रह्माचे ज्ञान, शूद्र अशा व्यक्तींच्या बाबतीत जो सत्यवृत्ती, दानी वृत्ती, शांतवृत्ती, कठोरवृत्तीचा अभाव, अहिंसा, दया हे गुण, युधिष्ठिरा, आणि अतिशय हवेसे वाटणारे चारित्र्य हे ज्यांच्या ठिकाणी असतात व जे ते जाणतात तेच खरे तत्त्व जाणणारे होत.

३) वनपर्वातील यक्षप्रश्न–

दोनशे सत्याण्णव या अध्यायात यक्षाचे रूप घेतलेल्या यमधर्माने युधिष्ठिराला अनेक प्रश्न विचारले. त्यांची जी उत्तरे युधिष्ठिराने दिली त्यामधून त्याचे ज्ञान, विवेक व शहाणपण हे गुण प्रकट होतात.

उदाहरणादाखल खाली काही प्रश्नोत्तरे दिली आहेत.

प्रश्न१ – भूमीपेक्षा मोठे कोण ? आकाशापेक्षा उंच कोण? वायूपेक्षा वेगवान कोण? गवतापेक्षा जड काय?

उत्तर – आई भूमीपेक्षाही मोठी आहे. आकाशाहूनही वडील उंच आहेत. मन वाऱ्यापेक्षाही जास्त चपळ आहे. चिंता ही गवतापेक्षाही जड आहे. (६६)

प्रश्न २– प्रवास करणाऱ्याचा खरा मित्र कोण ? घरात गृहस्थाचा मित्र कोण ? रोग्याचा जवळचा मित्र कोणता ? मरणपंथाला लागलेल्यांचा मित्र कोण ?

उत्तर – सहप्रवासी हा प्रवासातील खरा मित्र होय. गृहस्थाची पत्नी ही त्याचा खरा मित्र आहे. रोग्याचा मित्र वैद्य तर मरणपंथाला लागलेल्याचा मित्र दान होय. (६७)

प्रश्न ३– कोणती गोष्ट सोडून दिल्यास मनुष्य प्रिय होतो ? कोणत्या गोष्टीचा त्याग केल्यास शोक करावा लागत नाही ? कोणती गोष्ट सोडून दिल्यास तो धनिक होतो ? कोणती गोष्ट सोडल्यास तो सुखी होतो ?

उत्तर – मान सोडून दिल्यास तो प्रिय होतो. संताप सोडल्यास त्याला शोक करावा लागत नाही. अतीव इच्छा सोडल्यास तो धनिक होतो. लोभ सोडून दिल्यास तो सुखी होतो. (६८)

याशिवाय श्रेष्ठ दान ज्ञानदान, सर्वश्रेष्ठ लाभ आरोग्य, उत्तम सुख संतोष, व श्रेष्ठ धर्म दया होय. अशीही उत्तरे युधिष्ठिराने यक्षाच्या प्रश्नांना दिली आहेत.

---

६६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( ३.२९७.४०)

६७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७.२०)

६८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपव (३.२९७.५७)

यक्षप्रश्नामध्ये यक्षाचे रूप घेतलेल्या यमधर्माने असे अनेक प्रश्न (सुमारे ८० ते ८५) विचारून युधिष्ठिराची परीक्षा घेतली.

या प्रश्नांना युधिष्ठिराने जी उत्तरे दिली त्यावरून युधिष्ठिराच्या अंगचे शहाणपण, विवेकीवृत्ती, तारतम्य, ज्ञानी वृत्ती अशा अनेक गुणांचे दर्शन होते. अनेक चिरंतन मूल्यांचा संस्कार त्याच्या या उत्तरातून होतो. म्हणून यक्षप्रश्नांचे महत्त्व मूल्यसंस्कारात अतिशय आहे.

४) उद्योगपर्वातील प्रजागरपर्व –

प्रजागरपर्वालाच विदुरनीती असे दुसरे नाव आहे. पांडव १२ वर्षेवनवासाला गेल्यानंतर धृतराष्ट्र अतिशय अस्वस्थ झाला. त्याचे मन अशांत झाले. तेंव्हा त्याचे अस्वस्थ झालेले मन शांत करण्यासाठी त्याने विदुराला बोलाविले. यावेळी विदुराने शहाणपणाचे जे तत्त्वज्ञान त्याला सांगितले त्यासच प्रजागरपर्व किंवा विदुरनीती असे नाव आहे.

उद्योगपर्वातील अध्याय ३३ ते ४० यास प्रजागरपर्व असे म्हणतात. यामध्ये धृतराष्ट्र–विदुर संवादात विदुराने धृतराष्ट्राला केलेला हितोपदेश व धर्मोपदेश आला आहे.

विदुरनीतीमध्ये एकंदर १४९ श्लोक आहेत. श्लोक सोळा ते श्लोक एकोणतीस अशा चौदा श्लोकांमध्ये पंडितांनी लक्षणे दिली आहे. श्लोक ३० ते ४० यामध्ये मूर्खांची लक्षणे आली आहेत. तसेच यापुढील ५ श्लोकात क्षमेचे महत्त्व सांगितले आहे. अशा प्रकारे वैयक्तिक आचरणासंबंधी अतिशय महत्त्वाचे, अर्थपूर्ण व सुरेख असे विचार विदुराने सांगितले आहेत. उदाहरणादाखल विदुराचे काही विचार सांगणारे श्लोक खाली दिले आहेत.

१) ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या मनुष्याने सहा दोषांचा त्याग करावा. झोप, तंद्रीत असणे, भीती, संताप, आळशीपणा व दीर्घसूत्री वृत्ती. [६९]

२) पूर्वी ज्यांच्यावर उपकार केले आहेत अशांचा हे सहाजण नेहमी अपमान करतात. (१) ज्यांना आचार्यांनी शिकविले आहे असे शिष्य त्या गुरुंचा (२) ज्याने विवाह करून पत्नी घरात आणली आहे असा पुत्र मातेचा अपमान करतो. (३) इच्छा तृप्त झालेली स्त्री इच्छा तृप्त करणाऱ्याचा (४) ज्याचे मनोरथ पूर्ण झालेले आहेत असा मनुष्य योजना करणाऱ्याचा (५) अरण्य वा नदी ओलांडल्यानंतर ती ओलांडण्यास मदत करणाऱ्या नाविकाचा, (६) तर ज्याचा रोग बरा झाला आहे असा रोगी वैद्याचा, उपकारकर्त्यांचा अपमान करणारे हे सहाजण आहेत. [७०]

---

६९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३३.६६)

७०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३३.५८, ५९)

३) (१) झाडाची कच्ची फळे जो गोळा करतो त्याला फळाचा रसही मिळत नाही व त्यातील बीजही नष्ट होते. (२) जो योग्यवेळी छान पिकलेले फळ तोडतो, त्यालाच फळातील गोड रस मिळतो व बीजापासून फळही मिळते. [७१]

४) सतत संपत्ती मिळत राहणे, उत्तम आरोग्य, गोड बोलणारी आणि आवडती प्रिय पत्नी, आज्ञाधारक पुत्र, व जिच्यापासून धनाचा लाभ होतो अशी विद्या ही या पृथ्वीतलावरील हे राजा, सहा खरी सुखे होत. [७२]

५) तरूण वयात अशा गोष्टी कराव्यात की ज्यामुळे वृद्धपणी समाधानाने राहता येईल. आयुष्यभर अशा गोष्टी कराव्यात की ज्यामुळे मरण पावल्यावर सुखाने राहता येईल. [७३]

खऱ्या विद्यार्थ्याने कसे असावे यासंबंधी मार्मिक असा विचार विदुराने खालील श्लोकात सांगितला आहे.

श्लोक – सुखार्थिन: कुतो विद्या, नास्ति विद्यार्थिन: सुखम्।

सुखार्थी वा त्यजेत् विद्यां विद्यार्थी चेत् त्यजेत् सुखम्।। [७४]

(अर्थ– सुखाची इच्छा असणाऱ्याला विद्या कोठून मिळणार, विद्यार्थी जो खरा असेल त्याला सुख मिळत नाही. सुखाची इच्छा असेल तर त्याने विद्येचा त्याग करावा व ज्याला विद्या हवी असेल त्याने सुखाचा त्याग करावा.)

विदुराने याप्रमाणे हिताचा उपदेश केल्यानंतर धृतराष्ट्राला जन्म–मृत्यू यासंबंधीचे अधिक ज्ञान जाणून घेण्याची इच्छा झाली. तेव्हा विदुराने हे ज्ञान देण्यासाठी सनत्कुमार या प्राचीन ऋषींचे स्मरण करून त्यांना बोलविले. त्यांनी केलेल्या उपदेशास सनत्सुजातपर्व असे नाव आहे. हे उद्योगपर्वात अध्याय ऐक्केचाळीस ते अध्याय सेहेचाळीस या एकूण सहा पर्वांमध्ये हा उपदेश आला आहे. मौनादींचे गुणदोष, ब्राह्मण कोणास म्हणावे, ब्रह्मचर्याची आवश्यकता, ब्रह्मविद्येचे प्रतिपादन, परमात्म्याच्या रूपाचे वर्णन इत्यादि विषय या पर्वात आले आहेत. [७५]

---

७१) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३४, १५, १६)

७२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.)

७३) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व –विदुरनीती (५.३५.५८)

७४) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व – विदुरनीती (५.४०.५)

७५) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व – सनेत्सुजाताचा उपदेश (५.४१ ते ४६)

५)	महाभारतातील व्यक्तिरेखा –

महाभारतातील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे पाच पांडव, भीष्म पितामह, विदुर, कर्ण, भगवान कृष्ण, दुर्योधनादि कौरव इत्यादि पुरुषपात्रे, तर गांधारी, कुंती, द्रौपदी, सत्यवती या स्त्री व्यक्तिरेखा व्यासांनी रेखाटल्या आहेत.

१)	भीष्म पितामह –

भीष्म पितामह म्हणजे युवराज देवव्रत ! युवराज देवव्रताने आपल्या पित्याच्या सुखासाठी आजन्म ब्रह्मचर्याची घोर शपथ घेतली. त्या शपथेचे त्याने प्राणपणाने पालन केले. त्यामुळेच त्याला भीष्म अशी उपाधी प्राप्त झाली. त्यांचा दृढनिश्चय व सत्यनिष्ठा यांचे अनुकरण सर्वांनीच करण्यासारखे आहे. अशी प्रतिज्ञा असूनही जवळजवळ चार पिढ्या त्यांनी कुलासाठी आपला देह झिजवला. निष्काम कर्मयोग व कठोर कर्तव्यनिष्ठा यांचे भीष्माचार्य हे मूर्तिमंत उदाहरण आहेत.

२)	युधिष्ठिर –

पाच पांडवातील युधिष्ठिर हा ज्येष्ठ पांडव होय. धर्मात्मा म्हणून युधिष्ठिरांची ख्याती होती. कोणत्याही ऐहिक लाभालाभाची पर्वा न करता केवळ कर्तव्यासाठी कर्तव्य या भावनेनेच त्यांचे आचरण असे. त्यामुळेच कौरवांनी अनेक वेळा शत्रुत्व दाखवूनही घोषयात्रेच्या प्रसंगी गंधर्वांच्या तावडीतून त्यांनी दुर्योधनाला सोडविले. 'वयं पञ्चाधिकं शतम्।' ही त्यांची उक्ती प्रसिद्ध आहे. कमालीचा विवेक, सत्यनिष्ठा यांचा ते आदर्शच होत. त्यांचा शहाणपणा, त्यांनी यक्षप्रश्नांच्या वेळी यक्षाला दिलेल्या उत्तरातून स्पष्ट होतो.

३)	भीम –

भीमाची बलसंपन्नता अवर्णनीय अशीच आहे. दुर्जनांच्या तावडीतून सामान्य लोकांची मुक्तता करण्याची त्याची वृत्ती अनुकरणीय अशीच आहे. भीम व बकासुर या कथेतून ही गोष्ट प्रकट होते. तसेच जुलमी राजा जरासंध याचा वध करून त्याने कैदेत टाकलेल्या सर्व राजांची मुक्तता भीमाने केली.

४)	अर्जुन –

अर्जुनाला नरोत्तम असे नामाभिधान श्री.बाळशास्त्री हरदास यांनी दिले आहे. भगवान श्रीकृष्ण हे नारायणाचाअवतार तर अर्जुन हा सर्वश्रेष्ठ नर असे महाभारतकार व्यासमुनी म्हणतात. यातच त्याचे श्रेष्ठत्व

सिद्ध होते.

अर्जुन हा देव व मनुष्य यांच्यामध्ये आपल्या स्वाभाविक गुणांनी अत्यंत प्रसिद्ध असाच होता.अनेक शस्त्र व अस्त्रे यांचे ज्ञान त्याने प्राप्त करून घेतल्यामुळे अत्यंत पराक्रमी व सर्वश्रेष्ठ धनुर्धर म्हणून विख्यात होता.

द्रोणाचार्यांचा तो अत्यंत प्रिय असा शिष्य होता. विद्या संपादन करताना कमालीची एकाग्रता त्याने प्रकट केली आहे. लक्ष्यवेध प्राप्त करण्यासाठी त्याने अपार कष्ट घेतले. या सर्व गोष्टी विद्यासंपादनाबद्दल त्याला वाटणारी कळकळ स्पष्ट करतात.

शीलसंपन्नता हा त्याच्या अंगातील वेधक असा गुण होता. इंद्राकडे अस्त्रप्राप्तीसाठी गेला असता इंद्राने उर्वशी या अप्सरेला त्याच्याकडे पाठविले. मात्र त्याने तिला नकार दिला. विराट राजाने आपली कन्या उत्तरा, हिच्याबरोबर विवाहाचा प्रस्ताव मांडला. मात्र ती अर्जुनाची शिष्या असल्याने त्याने पत्नी म्हणून तिचा स्वीकार करण्यास नकार दिला. सून म्हणून तिचा स्वीकार केला. या दोन्ही घटनातून ही शीलसंपन्नता प्रकट होते.

अर्जुन हा अत्यंत पराक्रमी होताच. पण त्याचबरोबर तो सत्यनिष्ठ, विनयशील, मानवता गुणाने युक्त व भगवान कृष्णाचा प्रियसखा होता. या त्याच्या अंगातील सर्व गुणांचे वर्णन श्री. हरदास बाळशास्त्री यांनी सविस्तर केले आहे. [७६]

५) नकुल व सहदेव –

हे जुळे भाऊ अश्विनीकुमारांचे अंश होते. प्रजागरपर्वात सहदेवाचे वर्णन तो सत्यवादी, महाबल व सर्वधर्मोपपन्न असा होता असे केले आहे. [७७] मात्र हे दोन्ही भाऊ युधिष्ठिर इत्यादि पांडवांचे सावत्र भाऊ असूनही त्या सर्व भावंडांशी ते पूर्ण एकरुप होऊन गेले होते. आज्ञापालन हा त्यांच्या अंगातील सर्वश्रेष्ठ असा गुण होता.

६) विदुर –

विदुर हा पांडु व धृतराष्ट्र यांचा भाऊ ! तो दासीपुत्र होता. अगदी पहिल्यापासूनच तो धृतराष्ट्राचा महामंत्री होता. अत्यंत सत्यवादी, अतिशय शहाणा व चारित्र्यसम्पन्न अशी त्याची ख्याती होती. त्याची

---

७६) श्री. हरदास बाळशास्त्री – महाभारतावरील व्याख्याने (प्रकरण २५, पृ.क्र. ७३६ ते ८३९.)

७७) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.४७.२६)

शीलसंपन्नता व स्पष्टवक्तेपणा हे गुण महाभारतात अनेक प्रसंगी प्रकट झाले आहे. धर्माची शापित देवता म्हणजे विदुर होय. मांडव्य ऋषींच्या शापामुळे प्रत्यक्ष धर्म मनुष्यरूपात पृथ्वीवर जन्मास आला, तोच विदुर होय. (७८)

'धर्म व अर्थ या पुरुषार्थात तो अत्यंत कुशल असून लोभ व क्रोध या रिपूंचा त्याच्या अंगी लवलेशही नव्हता. दूरदर्शी व शांतवृत्तीचा असा तो असून कुरुकुलाचे सदैव हितच होईल याविषयी तो अतिशय तत्पर असे.'' (७९)

विदुराची विवेकशक्ती अतिशय प्रशंसनीय अशी होती. प्रजागरपर्वात धृतराष्ट्राला उपदेश करताना त्याने जे विचार मांडले आहेत त्यातून फारच उत्तमरीतीने हे प्रकट होते. धृतराष्ट्र तर वेळोवेळी त्याचा सल्ला घेत असेच पण भीष्म पितामहांनाही त्याचा सल्ला मोलाचा वाटत असे. (८०) पांडवांना लाक्षागृहातील प्रसंगातून वाचविण्याच्या त्याच्या कृतीने त्याचे राजकारणपटुत्वही सिद्ध होते.

७) भगवान श्रीकृष्ण –

दशावतारातील पूर्णावतार – पूर्ण पुरुष असे भगवान श्रीकृष्णांचे वर्णन केले जाते. जुलमी, कपटी व दुर्जन अशा त्या काळातील राजसत्ता नष्ट करून सज्जनांचे रक्षण करण्याचे व्रत त्यांनी घेतले होते. (८१) जरासंध, कंस, शिशुपाल या जुलमी राजांचा नाश त्यांनी केला. यात त्यांचा वैयक्तिक कोणताच स्वार्थ नव्हता. अर्जुनाचा सारथी होणे, राजसूय यज्ञात उष्टी काढणे यातून वृत्तीची लीनता जशी प्रकट होते, तशीच प्रसंगी उचित निर्णय घेऊन दुष्टांचा संहार करण्यामध्ये राजकारणपटुत्वही सिद्ध होते. अर्जुन व द्रौपदी यांचा प्रियसखा ही त्यांची भूमिका मनोहर अशीच आहे.

८) कर्ण–

कर्ण हा कुंतीचा कानीन पुत्र होता. कौमार्यावस्थेत झाल्यामुळे कुंतीने त्याचा त्याग केला. अधिरथ हा सूत व त्याची पत्नी राधा यांनी त्याचे पालनपोषण केल्याने तो सूतपुत्र म्हणून ओळखला जाऊ लागला. वास्तविक तो सूर्यपुत्र ! अर्जुनाइतकेच धनुर्विद्येत त्याने प्रावीण्य प्राप्त केले होते. पुढे दुर्योधनाने त्याला अंग

---

७८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०६.२७, २९)

७९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०८.१९)

८०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.११०.१ ते ७)

८१) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व (६.२८.७,८) –भगवद्गीता (अ.४)

देशाचा राजा केला. त्यामुळे तो दुर्याधनाचा परममित्र झाला. कर्णाच्या दातृत्व या गुणामुळे तो आदर्श ठरला. आपल्या प्राणांचीही पर्वा न बाळगता अंगभूत अशा कवचकुंडलांचे दान त्याने केले. 'दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम् ।' ही त्याची उक्ती अनेकांना प्रेरणादायी ठरली आहे.

९) कुंती –

कुंती ही पांडवांची माता ! आदर्श माता असेच तिचे स्वरूप आहे. पांडूचा मृत्यू झाल्यानंतर व माद्री सती गेल्यावर ती हस्तिनापुरला पाची पांडवांना घेऊन आली. त्यांच्या शिक्षणाची सोय भीष्म पितामहांच्या करवी तिने केली. आपले पुत्र युधिष्ठिर, भीम व अर्जुन आणि माद्रीचे पुत्र नकुल–सहदेव यांच्यात तिने कधीही भेदभाव केला नाही. पांडवांचा बारा वर्षेवनवास व एक वर्षाचाअज्ञातवास ही तेरा वर्षेमुलांचा वियोग सहन करत ती मुकाट्याने विदुराच्या घरी राहिली. श्रीकृष्णाची शिष्टाई असफल झाल्यावर तिने आपल्या पुत्रांना विदुलेची वीरगाथा सांगून प्रोत्साहित केले. वानप्रस्थात तिने धृतराष्ट्र व गांधारी यांची जी सेवा केली यातून तिच्या वृत्तीचा थोरपणा प्रकट होतो. धृतराष्ट्राने आयुष्यभर तिच्या मुलांचे अहितच चिंतिले, परंतु ते तिने मनावर घेतले नाही. यातून तिची क्षमाशील वृत्ती प्रकट होते हे सर्व गुण अनुकरणीय असेच आहेत.

१०–११) गांधारी व द्रौपदी –

पातिव्रत्याचा मूर्तिमंत आविष्कार या दोन स्त्रीपात्रांच्या द्वारा व्यासमहर्षींनी दाखविला आहे. आपला पती अंध असल्याचे समजल्याबरोबर गांधारीने स्वत:च्या डोळ्यावर आयुष्यभर पट्टी बांधली. आयुष्यभर पांडवांच्या सत्य अशा पक्षाचीच बाजू घेऊन दुर्योधनाला समजाविण्याचा सतत प्रयत्न केला. द्रौपदीची वृत्तीही अत्यंत तेजस्वी अशीच होती. आपल्या पाचही पतींच्या सुखदु:खात तिने आयुष्यभर साथ दिली. उत्तम असे आदर्श गृहिणीचे चित्र तिच्या रूपाने व्यासांनी रेखाटले आहे. तिने सत्यभामेला केलेल्या उपदेशातून तिची कर्तव्यनिष्ठा व जबाबदारीची जाणीव उत्कृष्टपणे व्यक्त होते. यामुळेच पञ्च पतिव्रतांमध्ये तिची गणना केली जाते.

६) महाभारतामधील संस्कारपूर्ण अशा कथा –

ज्याद्वारा मूल्यसंस्कार घडविता येतील अशा अनेक विविध कथा महाभारतामध्ये आहेत. या कथांचे दोन भाग पडतात.

१) महाभारतातील कौरव व पांडव यांच्या जीवनात घडलेले प्रसंग.

२) विशिष्ट मूल्यांचा संस्कार घडविणाऱ्या विविध कथा.

महाभारतातील आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, शांतिपर्व या पर्वांमध्ये अशा अनेक कथा आल्या आहेत.

अ) कौरव–पांडव यांच्या जीवनातील संस्कारक्षम कथा–

१) भीष्मप्रतिज्ञा –

युवराज देवव्रताने आमरण ब्रह्मचर्य पाळण्याची जी शपथ घेतली त्यासंबंधीची कथा. असामान्य व पराकोटीच्या त्यागाचे दर्शन या कथेमधून घडते. [८२]

२) अर्जुनाची एकाग्रता –

द्रोणाचार्यांनी आपल्या शिष्यांची परीक्षा पाहण्यासाठी नेम धरून भास पक्ष्याचा डोळा फोडण्यास सांगितले. सर्व कौरव व युधिष्ठिर भीमादि कोणाही पांडवाला ही एकाग्रता साधली नाही. त्यांचे भोवताली सर्व ठिकाणी लक्ष होते. एकट्या अर्जुनाचे लक्ष फक्त भास पक्ष्याच्या डोळ्यावर केंद्रित होते. त्यावेळी अर्जुनाची एकाग्रता पाहून द्रोणाचार्य प्रसन्न झाले. तीच गोष्ट लक्ष्यवेधाची ! शब्दाच्या अनुरोधाने बाण अचूक मारणे. अर्जुनाने अत्यंत जिद्दीने अंधारात शब्दवेधाचा सराव करून त्यात कौशल्य प्राप्त करून घेतले. [८३]

३) एकलव्याची अपार गुरुनिष्ठा –

एकलव्य हा निषाद असल्याने द्रोणाचार्यांनी त्याला आपला शिष्य करून घेण्याचे व शिक्षण देण्याचे नाकारले. तेव्हा एकलव्याने द्रोणाचार्यांचा पुतळा करून सराव सुरू केला. तो धनुर्वेदात निष्णात झाला. एवढेच नव्हे तर गुरुदक्षिणा म्हणून आपल्या उजव्या हाताचा अंगठाही त्याने गुरुंना तोडून दिला. [८४]

४) भीम व बकासुराची कथा –

लहान मुलांमध्ये विलक्षण लोकप्रिय अशी ही कथा आहे. वारणावत नगरीत असताना लाक्षागृहाला

---

८२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.९४, ८८, ९०) (१.९७.१४ ते १७ )

८३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१२३.४५ ते ६७)

८४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१२३.९ ते ३९/२४)

लागलेल्या आगीतून पांडव सुखरूप बाहेर पडले. ते प्रवास करत करत एकचक्रा नावाच्या नगरीत आले. ते तेथे भिक्षा मागत असताना तेथील एका ब्राह्मणाने त्यांना आश्रय दिला. एके दिवशी ब्राह्मणाकडे सर्व रडत आहेत असे पाहून पांडवांनी चौकशी केली. त्यावेळी नगराबाहेरील बकासुर नावाच्या राक्षसाकडे रोज एक रेडा, एक मनुष्य व गाडाभर अन्न पाठवावे लागते असे कळले. त्या दिवशी ब्राह्मणाच्या घरच्या माणसाची पाळी होती असे ब्राह्मणाने सांगितले. तेव्हा ब्राह्मणाच्या घरच्या माणसाऐवजी भीमाने जाण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे तेथे जाऊन बकासुर राक्षसाचा त्याने वध केला. एकचक्रानगरीतील लोकांवर आलेले बकासुर राक्षसाचे संकट भीमाने दूर केले. आपल्या उपकारकर्त्यावर आलेले संकट स्वत:च्या अंगावर घेऊन त्याने जुलमी राक्षसाचा वध केला. (८५)

५) घोषयात्रेची कथा –

द्यूतात हरल्यामुळे वनवासात गेलेल्या पांडवांना आपले ऐश्वर्य दाखवून खिजवावे अशी इच्छा कर्णाच्या सल्ल्यामुळे दुर्योधनाच्या मनात निर्माण झाली. आपले घोष म्हणजे गवळीवाडे–गाईची खिल्लारे पाहण्याच्या निमित्ताने मोठा लवाजमा व सैन्य घेऊन दुर्योधन द्वैतवनात गेला. गवळीवाडे पाहून परतताना वाटेत एक सरोवर लागले.. तेथे जलक्रीडा करावी अशी इच्छा दुर्योधनाला झाली. परंतु चित्ररथ गंधर्व आपल्या स्त्रियांसह तेथे जलविहार करत होता. त्याने दुर्योधनाला तेथून जाण्यास सांगितले. परंतु दुर्योधनाने ते न ऐकता तो चित्ररथ गंधर्वाशी युद्ध करू लागला. तेव्हा चित्ररथन गंधर्वाने सर्व कौरवसैन्याचा पराभव केला. कर्ण पळून गेला. चित्ररथ गंधर्व दुर्योधनाला पकडून घेऊन जाऊ लागला. त्यावेळी दुर्योधनाचे अमात्य युधिष्ठिराकडे मदतीसाठी गेले. त्यावेळी भीम व अर्जुन यांचा दुर्योधनाची सुटका करण्यास विरोध होता. त्यावेळी युधिष्ठिराने 'वयं पञ्चाधिकं शतम्।' अशी ऐक्याची शिकवण भीम व अर्जुन यांना दिली. परक्या शत्रूच्या तावडीतून त्याने दुर्योधनाची मुक्तता केली. (८६)

६) यक्षप्रश्नांची कथा –

द्वैतवनात प्रवास करत असताना तहानेने व्याकुळ झालेल्या पांडवांना एक सरोवर आढळले. परंतु तेथे सरोवराचे रक्षण करणारा एक यक्ष होता.आपल्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिल्याखेरीज तो कोणालाही सरोवरातील पाणी घेऊन देत नव्हता. भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे चारही पांडव यक्षाच्या प्रश्नांची योग्य

---

८५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१४१.१ ते १.१५२.१९)

८६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२२९ ते २३५)

उत्तरे देऊ शकले नाहीत. त्यामुळे ते मृत झाले. शेवटी युधिष्ठिर त्यांची वाट पाहून पाणी आणण्यास गेला. त्याने यक्षाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे अतिशय योग्य रीतीने दिली. त्या उत्तरातून युधिष्ठिराची विद्वत्ता व शहाणपण दिसून आले. यामुळे यक्षाने प्रसन्न होऊन चार भावांपैकी एकाला जिवंत करण्याचे आश्वासन युधिष्ठिराला दिले. यावेळी युधिष्ठिराने नकुल जिवंत व्हावा अशी इच्छा प्रकट केली. आपल्या कुंती व माद्री या दोन्ही माता पुत्रवती असाव्या अशी त्याची भावना होती. युधिष्ठिराच्या धर्मबुद्धीवर प्रसन्न होऊन यक्षाने त्याच्या चारही भावांना जिवंत केले. प्रत्यक्ष यमधर्मानेच युधिष्ठिराची ही परीक्षा घेतली होती. त्यात युधिष्ठिर पूर्णपणे उत्तीर्ण झाला. [८७]

७) कर्णाची दानी वृत्ती व स्वकर्तृत्वावरील त्याचा विश्वास –

कर्ण हा अतिशय दानशूर होता. कोणीही याचक विन्मुख जाणार नाही अशी त्याची प्रतिज्ञा होती. कर्णाजवळ जन्मत: असलेली त्याची कवचकुंडले हे त्याचे संरक्षक अस्त्रच होते. ती असेपर्यंत त्याचा मृत्यू हा अशक्यच होता.अर्जुनाचा जीव वाचविण्यासाठी इंद्राने ब्राह्मण वेशात येऊन कवचकुंडले हे दान म्हणून मागण्याचे ठरविले. यासंबंधी सूर्याने स्वप्नात येऊन कर्णाला सावध केले. कवचकुंडले देणे म्हणजे प्रत्यक्ष आपल्या मृत्युलाच निमंत्रण देणे. हे आधी कळूनही कर्ण आपल्या व्रतापासून क्षणभरही विचलीत झाला नाही. कर्णाने इंद्राला त्याने मागितलेले कवचकुंडलांचे दान आनंदाने दिले. 'दानी वृत्तीचा परमोच्च आविष्कार – दानशूर अशी त्याची ख्याती त्रिभुवनात झाली.[८८]

कर्णाने अर्जुनाइतकेच शस्त्रविद्येत व अस्त्रविद्येत प्रावीण्य ळिविले होते. परंतु सूतपुत्र म्हणून त्याची सतत हेटाळणी होत असे. अशावेळी 'दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम्।' (अर्थ – जन्म कोणत्या कुळात व्हायचा ही दैवाच्या हातातील गोष्ट आहे. परंतु पुरुषार्थ – पराक्रम गाजविणे ही माझ्या स्वाधीन असलेली गोष्ट आहे.) हे त्याचे उद्गार स्वकर्तृत्वावरील त्याचा दुर्दम्य विश्वास प्रकट करतात.[८९]

ब) महाभारतातील विविध पर्वात आलेल्या संस्कारक्षम कथा

१) आदिपर्व – आदिपर्वांमध्ये आरुणी व उपमन्यु या आदर्श शिष्यांच्या कथा आल्या आहेत.

---

८७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७ श्लोक ६५ ते ७४)

८८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अ. ३०० ते ३१०)

८९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वेणीसंहार (३.३७)

क)	आरुणीची कथा –

धौम्य ऋषींचा शिष्य आरूणी हा गुरूंचा मोठा भक्त होता. एकदा शेताचा बांध फुटला होता. त्यावेळी गुरूजींनी बांध घालून वाहून जाणारे पाणी थांबविण्यास सांगितले. खूप प्रयत्न करूनही वाहून जाणारे पाणी थांबविणे आरूणीला शक्य झाले नाही.  त्यावेळी आरूणी स्वत: शेतात आडवा पडला. त्याने आपल्या शरीराचाच बांध शेतात घातला. बरेच दिवसात आरूणी न दिसल्याने गुरूजींनी चौकशी केली, तेव्हा त्यांना खरा प्रकार समजून आला. गुरूंच्या आज्ञेचे आरुणीने तंतोतंत पालन केले. धौम्य ऋषींनी घेतलेल्या या परीक्षेत तो उत्तम प्रकारे सफल झाला. [९०]

ख)	उपमन्युची कथा –

धौम्य ऋषींचा उपमन्यु हा आणखी एक शिष्य होता. पराकाष्ठेची गुरुभक्ती त्याच्या ठायी होती. एकदा धौम्य ऋषींनी वनात गाईंना चरायला नेण्यास सांगितले. तो सुदृढ दिसत असल्याने त्याने काय खाल्ले अशी गुरुंनी विचारणा केली. त्यानंतर गुरूंनी आज्ञा दिल्याप्रमाणे पहिली भिक्षा गुरुंना दिली. परंतु दुसऱ्यांदा भिक्षा मागितली नाही. त्यांच्याच आज्ञेवरून गाईचे दूध अथवा त्यावरील फेसही तो प्यायला नाही. निराहार असल्याने भुकेने व्याकुळ झाल्यामुळे त्याने अर्कपत्रे (रूईची पाने) खाल्ली. त्यामुळे अंधत्व येऊन तो विहीरीत पडला. परंतु गुरुंची आज्ञा मोडली नाही. अश्विनीकुमारांची स्तुती केल्यावर त्याचे अंधत्व दूर झाले. परंतु त्यांनी दिलेला अपूप गुरुंना दिल्याखेरीज खाण्यास त्याने नकार दिला. कोणत्याही प्रलोभनाला तो बळी पडला नाही. धौम्य ऋषींनी त्याचीही ही परीक्षाच घेतली होती. त्यात तो सफल झाला. [९१]

या दोन्हीही कथा पराकोटीची गुरुनिष्ठा–गुरुभक्ती व प्रामाणिक वृत्ती यांचे दर्शन घडवितात.

ग)	अमृतमंथनाची कथा –

या पर्वातील तिसरी कथा अमृतमंथनाची आहे. अमृताच्या प्राप्तीसाठी देवदानवांनी क्षीरसागराचे मंथन केले. मेरुपर्वताची रवी व वासुकी सापाचा दोर करून हे अमृतमंथन झाले. या अमृतमंथनातून चौदा रत्ने बाहेर पडली. वेगवेगळी अनेक रत्ने समुद्रातून बाहेर पडली. लक्ष्मी, कौस्तुभ मणी, पारिजात वृक्ष, सुरा

---

९०)	BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अ. १.३. श्लोक १९ ते ३१)

९१)	BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.३.३२ ते ७८)

(दारु), चंद्र, हलाहल विष, ऐरावत हत्ती, उच्चैश्रवस घोडा, इत्यादि. परंतु अमृताची प्राप्ती झाल्याशिवाय देवांनी व दानवांनी आपले प्रयत्न थांबविले नाहीत. (९२)

अखंड प्रयत्न, चिकाटी यांचे ही कथा एक उदाहरण आहे. तसेच आरूणी, उपमन्यूची कथा व अमृतमंथनाची गोष्ट यातून श्रमप्रतिष्ठेचीही शिकवण मिळते.

२) वनपर्वातील कथा –

१) मत्स्योपाख्यान – वैवस्वत मनूची कथा.

छोट्या माशाला आश्रय देऊन वैवस्वत मनूने त्याचे प्राण वाचविले. त्याचा आकार जसजसा वाढत गेला, तसतसे मनूने त्याला प्रथम घटात, घटातून विहीरीत, विहीरीतून गंगा नदीत सोडले. यानंतर खूप वाढल्यानंतर मनूने त्या माशाला समुद्रात नेऊन सोडले. प्रलयाच्या वेळी मासा मनूच्या या उपकाराची फेड करतो. सर्व बियाणांनी भरलेली मनूची नाव तो हिमालयाच्या शिखराला आणून बांधतो. अशाप्रकारे मनू व सर्व सृष्टी यांचे प्रलयापासून रक्षण करतो. (९३)

या कथेतून मनूची दयाबुद्धी, तर माशाची कृतज्ञताबुद्धी हे गुण प्रकट होतात.

२) पतिव्रतेची कथा –

आपल्या वृद्ध आईवडिलांना सोडून कौशिक ब्राह्मण तपश्चर्येसाठी गेला होता. त्याने पुष्कळ वर्षेउग्र तपश्चर्या केली. त्याच्या अंगावर बगळीने घाण केली. तेव्हा कौशिक ब्राह्मणाने आपल्या तप:सामर्थ्याने बगळीला जाळून भस्म केले. तो भिक्षा मागावयास गेला तेव्हा पतिव्रता स्त्रीने ब्राह्मणाला तिष्ठत ठेवून प्रथम पतीची सेवा केली. त्याला पाय धुवायला पाणी देऊन जेवायला दिले. तेव्हा कौशिक ब्राह्मणाचा क्रोध अनावर झाला. त्यावेळी त्या स्त्रीने ब्राह्मणाला धर्माचे खरे स्वरूप समजावून सांगितले. क्षमावृत्ती हे खऱ्या ब्राह्मणाचे लक्षण आहे. संयम, इंद्रियांवर जय ही खरी तपश्चर्या होय. (९४)

३) धर्मव्याधाची कथा –

पतिव्रता स्त्रीने कौशिक ब्राह्मणाला धर्मव्याधाकडे जाण्यास सागितले. तो खऱ्या धर्माचरणाचा उपदेश तुला करेल' असे तिने ब्राह्मणाला सांगितले. तेव्हा कौशिक ब्राह्मण आश्चर्यचकित होऊन मिथिला नगरीत

९२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१६ अध्याय १७)

९३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१८५, १० ते १६)

९४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७.३१ ते ४०)

धर्मव्याधाकडे गेला. धर्मव्याधाचे मांसविक्रीचे दुकान होते. दिवसभर व्यवसाय करून संध्याकाळी ब्राह्मणाला घेऊन तो घरी गेला. 'माझे आईवडील ही माझी सर्वश्रेष्ठ दैवते आहेत. त्यांच्या बाबतीतले तसेच माझ्या कुटुंबाच्या बाबतीतले कर्तव्य मी प्रामाणिकपणे पार पाडतो. सत्य,दान, क्षमा, संयम, आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान यांचे आचरण मी यथाशक्ती करतो.' हा उपदेश धर्मव्याधाने ब्राह्मणाला केला. खऱ्या धर्माचे स्वरूप त्याला स्पष्ट करून सांगितले. [९५]

४) रामोपाख्यान –

या आख्यानात रामकथा आली आहे. पितृवचन पाळण्यासाठी रामाने चौदा वर्षेवनवास स्वीकारला. तसेच प्रजानुरञ्जन हे ब्रीद पाळण्यासाठी त्याने स्वपत्नीचाही त्याग केला. सत्यवचनी हे रामाचे ब्रीद या प्रसंगातून सिद्ध होते. तसेच त्याची कठोर कर्तव्यनिष्ठा ही प्रत्ययास येते. वैयक्तिक सुखदु:खे, त्याच्या कर्तव्याचे पालन करण्याच्या आड कधीच आली नाहीत. [९६]

५) सावित्रीची कथा –

सावित्रीने स्वत:साठी सत्यवान हा वर निश्चित केला होता. परंतु नारदमुनींनी तो अल्पायुषी असून त्याचे आयुष्य एकच वर्ष आहे,असे सांगितले. अश्वपती राजा तिचा पिता ! त्याने तिचे मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु सावित्रीने आपले मन बदलले नाही. एका वर्षाने सत्यवानाचे प्राण नेण्यासाठी यमधर्म आला, तेव्हा सावित्रीने चातुर्याने यमाशी संवाद करून त्याच्याकडून तीन वर मागून घेतले. आपल्या पित्याला पुत्रप्राप्ती, सासू–सासऱ्यांना त्यांची दृष्टी व राज्य व अखेर आपल्या पतीचे प्राण तिने परत मिळविले.

सावित्रीची सत्यनिष्ठा, चातुर्य, पातिव्रत्य या गुणांची साक्ष कथेतून पटते. [९७]

६) वनपर्वात दधिची ऋषींचे आख्यान आले आहे. वृत्रासुराचा वध करण्यासाठी इंद्राला शस्त्र करावयाचे होते. त्यावेळी दधीची ऋषींनी ते वज्र बनविण्यासाठी आपली हाडे दिली. पराकोटीच्या त्यागभावनेचे दर्शन त्यामधून घडते. [९८]

---

९५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३. अ.१९८ ते अ. २०८)

९६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२५८ ते २७६)

९७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व –सावित्री उपाख्यान (अ. ३.२७७ ते २८३)

९८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व = (३ अ ९८.१ ते २४)

७) तसेच याच पर्वात अगस्ती मुनींनी समुद्रप्राशन केले ती कथा.

८) शिबी राजाच्या सत्वपरीक्षेची कथा या कथाही आल्या आहेत. [९९]

९) याखेरीज उद्योगपर्वामध्ये एका पारध्याची गोष्ट विदुराने सांगितली आहे. पारध्याने पसरलेल्या जाळ्यात दोन पक्षी सापडले. जाळे घेऊन ते उडाले. पारधी त्यांच्यामागून धावत असता एका मुनींनी कारण विचारले. तेव्हा पारधी म्हणााल 'ते आपापसात वाद करू लागले की माझ्या तावडीत सापडतील.' त्याप्रमाणेच घडले. तेव्हा विदुर म्हणतो, 'दुहीचे फळ विनाश हेच असते. हे धृतराष्ट्रा, वेगवेगळी लाकडे फक्त धूर काढतात. पण एकत्र असलेली तीच पेट घेतात. तेव्हा अशा कोलिताप्रमाणेच कुळे नाश पावतात. या कथेतून एकीचे महत्त्व पटवून दिले आहे.

'धूमायन्ते व्यपेतानि ज्वलन्ति सहितानि च ।

धृतराष्ट्रोलमुकानीव ज्ञातय: भरतर्षभ ।। [१००]

१०) तसेच याच पर्वात लोभाचे फळ किती वाईट असते. हे दाखविणारी मधाच्या पोळ्याची गोष्ट विदुर सांगतो. [१०१]

३) शांतिपर्वातील कथा –

१) असत्य वर्तणुकीचे परिणाम किती वाईट असतात हे सांगणारी कर्णाची कथा शांतिपर्वातील दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायात आली आहे.

कर्ण ब्राह्मण नसल्याने त्याला ब्रह्मास्त्र शिकविण्याचे द्रोणाचार्यांनी नाकारले. तेव्हा तो महेंद्र पर्वतावर राहणाऱ्या परशुराम मुनींकडे गेला. ब्रह्मास्त्राची प्राप्ती होण्यासाठी आपण भार्गव कुलातील ब्राह्मण असल्याचे त्याने खोटेच सांगितले. त्याचे सामर्थ्य, गुरूसेवा व संयम पाहून परशुराम प्रसन्न झाले. त्यांनी कर्णाला ब्रह्मास्त्राचे ज्ञान दिले.

परंतु एकदिवस उपवासाने कृश झालेले परशुराम कर्णाच्या मांडीवर डोके ठेवून झोपले होते. त्यावेळी अलर्क नावाचा किडा कर्णाची मांडी पोखरून रक्त पिऊ लागला. वाहणाऱ्या त्या रक्ताच्या ओलसर स्पर्शाने परशुरामांना जाग आली. कर्ण सर्व वेदना सहन करत बसला होता. ते पाहून परशुराम कर्णाला म्हणाले, 'इतकी सहनशीलता ज्याच्या अंगी आहे तो तू ब्राह्मण नक्कीच नाहीस.' तेव्हा कर्णाने खरी गोष्ट

---

९९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३ अ. १०१, १०२ व १०३)

१००) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३६.५८)

१०१) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.६२.६ ते ५. ६२. २४)

परशुरामांना सांगितली. परशुराम अत्यंत क्रोधित झाले. त्यांनी त्याला शाप दिला. 'अत्यंत समबल शत्रूशी युद्ध करताना तू हे ज्ञान विसरून जाशील. कारण असत्याने,कपटवृत्तीचा आश्रय करून तू हे ज्ञान मिळविले आहेस.' तेव्हा कर्ण लज्जित होऊन परत फिरला.

असत्याचा, कपटवृत्तीचा शेवट विनाशातच होतो. हेच यावरून सिद्ध होते. (१०२)

२) शङ्ख व लिखित यांची कथा– (१०३)

एखाद्याची वस्तू त्याला न विचारता घेणे ही चोरीच होय. हे असत्य वर्तनच आहे. या वर्तनाचे परिणाम किती वाईट होतात हे या कथेत सांगितले आहे.

शङ्ख व लिखित हे दोन भाऊ बाहुदा नदीच्या तीरावर तपश्चर्या करत राहात असत. एकदा शङ्ख लिखिताच्या आश्रमात गेला होता. त्या ठिकाणी लिखित नव्हता. त्यावेळी शङ्खाने त्याला न विचारताच त्याच्या बागेतील फळे तोडून खाल्ली. 'हे वर्तन योग्य नव्हे' असे लिखित त्याला म्हणाला. शङ्खाने आपली चूक मान्य केली. तेंव्हा राजाने या गुन्ह्याची शिक्षा म्हणून त्याचे हात तोडले. शङ्खाचा प्रामाणिकपणा पाहून लिखिताने आपल्या तपोबलाने त्याचे हात त्याला प्राप्त करून दिले.

३) आळशी उंटाची कथा –(१०४)

अरण्यामध्ये तपश्चर्या करीत एक उंट रहात होता. त्यामुळे ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले. तेव्हा उंटाने आपली मान शंभर योजने लांब व्हावी असा वर मागितला. नंतर त्याने चरण्यास जाणे आळसामुळे सोडून दिले. बसल्या जागेपासून आपली मान त्याने गुहेत नेली. त्या लांबच्या गुहेतील गवत तो खाऊ लागला. अचानक जोराचा पाऊस आला. त्यावेळी एक कोल्हा आपल्या बायकामुलांसह त्या गुहेत आश्रयास आला. उंटांची मान कुरतडून खाण्यास सुरुवात करून हळूहळू मानेचे सर्व मांस त्यांनी कुरतडले. उंटाने मान मागे घेण्याचा प्रयत्न केला. परंतु मान कुरतडली गेल्याने तो मरण पावला.

उदरभरणार्थ उद्योग सोडून आळसाने वागल्याने उंटाचा नाश झाला. तेव्हा राजाने सतत उद्योगात राहिले पाहिजे.

---

१०२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अध्याय १२.२१ ते १२.३.३३)

१०३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व ( १२.२४.1 ते १२.२४.३०)

१०४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११२)

४) एखाद्याचा जन्मजात स्वभाव बदलणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे.

मुनी व कुत्रा यांची गोष्ट [१०५]

एका अरण्यात इंद्रियाचा निग्रह करणे एक सात्विकवृत्ति मुनी तपश्चर्या करीत रहात होते. त्यांच्याजवळ एक कुत्रा अत्यंत निष्ठेने रहात असे. एकदा एक भुकेलेला चित्ता तेथे आला. कुत्र्याला खाण्याची इच्छा करणाऱ्या चित्त्याला पाहून कुत्र्याला त्याची भीती वाटली. तेव्हा मुनींनी त्याला चित्ता बनविले नंतर एक भयंकर असा वाघ तेथे आला. तेव्हा चित्त्याच्या रूपातील कुत्रा मुनींना शरण गेला तेव्हा मुनींनी त्याला वाघ केले. तो मांसभक्षण करू लागला. नंतर क्रमाक्रमाने मुनींनी त्याला सिंह, शरभ बनविले. तो अत्यंत बलाढ्य झाला व मुनींनाच खाण्याची इच्छा करू लागला. तेव्हा मुनींनी ग्राम्य अशा स्वजातिधर्मांवर गेलेल्या शरभाला तपोबलाने पुन्हा कुत्रा बनविले.

तेव्हा माणसाच्या मूळ स्वभावाची पारख असणे जसे राजाला महत्त्वाचे तसेच समाजातील व्यक्तींच्या अंगी हा गुण असणेही महत्त्वाचे आहे.

५) प्रल्हाद व इंद्र यांची कथा– [१०६]

दैत्यराज प्रल्हाद हा अत्यंत शीलसंपन्न होता. त्याने देवेंद्राचे राज्यही मिळविले व त्रैलोक्याचे राज्यही प्राप्त केले. तेव्हा इंद्र ब्रह्मदेवांना शरण गेला. ब्रह्मदेवाने त्याला ज्ञानाचा उपदेश केला. अधिक ज्ञानप्राप्तीसाठी त्याला शुक्राचार्यांकडे जाण्यास सांगितले. त्यांनी ज्ञान दिल्यानंतर अधिक ज्ञानप्राप्तीसाठी प्रल्हादाकडे जाण्यास सागितले. त्याने प्रल्हादाची निष्ठापूर्वक सेवा केली. आपल्याला त्रैलोक्याचे राज्य शीलसंपन्नतेने प्राप्त झाले, असे त्याने इंद्राला सांगितले. तसेच तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. इंद्राच्या गुरुसेवेने संतुष्ट होऊन त्याने इंद्राला वर मागण्यास सांगितले. तेव्हा इंद्राने प्रल्हादाचे शील मागितले. प्रल्हादाने वचनाप्रमाणे ते इंद्राला दिले. परंतु शील नष्ट झाल्याबरोबर प्रल्हादाच्या शरीरातून शील, धर्म, वृत्त म्हणजे सदाचार, व बल ही चारी तेज निघून गेली. त्यांच्यापाठोपाठ स्त्रीरूपी लक्ष्मीही निघून गेली.

शीलाचे, चारित्र्यसंपन्नतेचे महत्त्व या कथेतून स्पष्ट केले आहे.

---

१०५) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११६.११७)

१०६) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१२४)

६)	अनागतविधाता व दीर्घसूत्र माशाची गोष्ट – [१०७]

मत्स्योपाख्यान असे या कथेचे नाव आहे. भरपूर मासे असणाऱ्या तलावात दूरदर्शी, अनागतविधाता व दीर्घसूत्री असे परस्परांचे मित्र असणारे तीन मासे रहात होते. दूरदर्शी हा दूरवर विचार करणारा होता. तर अनागतविधात्याची बुद्धी समयसूचक होती. तर तिसरा हा अल्पबुद्धी व आळशी होता. पुढे काही कोळी तेथे आले. त्यांनी तलावाला छिद्रे पाडून पाणी खोल भागात सोडले. तलाव कोरडा होईल हे लक्षात घेऊन दूरदर्शी दुसऱ्या भरपूर पाणी असणाऱ्या तलावात गेला. पाणी कमी झाल्यावर कोळ्यांनी माशांना पकडले. अनागतविधाता ते  कोळी मासे धुवत असताना पटकन दुसऱ्या जलाशयात गेला. मात्र दीर्घसूत्री माशाने कोणताच प्रयत्न न केल्याने तो मरण पावला.

मनुष्याने कर्तव्य, अकर्तव्य याचा सारासार विचार करून त्वरित योग्य कृती करणे आवश्यक आहे. हे या कथेचे सार आहे.

याखेरीज शांतिपर्वात ‘वेळ पाहून वागावे’ हे सांगणारी वृक्ष व लव्हाळे यांची कथा (अ.११३) पलित मूषक व लोमश मार्जार यांची कथा (अ. २६१ ते २६४) या व इतरही अनेक कथा सांगितल्या आहेत.

वरील विवेचनावरून ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते की,राजा, ऋषी,सामान्य प्रजाजन या सर्वांच्याच बाबतीत चिरंतन मूल्यांना–सदाचरणाला सर्वप्रथम, श्रेष्ठ असे स्थान आहे. ही चिरंतन मूल्ये –सत्य, दया, क्षमा, धैर्य, दान, अहिंसा – यांनाच राष्ट्रीय मूल्यांचे स्थान प्राप्त झाले आहे.

त्यामुळे राष्ट्रीय मूल्यसंदर्भात महाभारताचे स्थान अनन्यसाधारण आहे असेच म्हणावे लागते.

*****

---

१०७)	BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१३५)

# प्रकरण ४ थे

# प्राचीन काळातील मूल्यशिक्षणाची पार्श्वभूमी व आधुनिक काळातील मूल्यशिक्षणाची पार्श्वभूमी

## १) प्राचीन भारतीय जीवनपद्धती :-

प्राचीन भारतीयांची जीवनपद्धती ही चार वर्ण व चार आश्रम या पद्धतीवर आधारलेली होती.

हे चार वर्ण पुढीलप्रमाणे होते.

१) ब्राह्मण वर्ण, २) क्षत्रिय वर्ण, ३) वैश्य वर्ण, ४) शूद्र वर्ण.

१) ब्राह्मण वर्ण – हा वर्ग अध्ययन व अध्यापनाचे कार्य करीत असे. यज्ञ करणे, इतरांना यज्ञात साहाय्य करणे हे या वर्णाचे प्रमुख कार्य मानले जाई. तसेच दान, प्रतिग्रह ही यांची अन्य कार्येमानली जात. [१]

२) क्षत्रिय वर्ण – या वर्णाचे कार्य समाजाचे – प्रजेचे बाहेरील आक्रमणापासून रक्षण करणे, शासनव्यवस्था पाहणे, दान, अध्ययन करणे, विषयोपभोगांबाबत अनासक्ति ठेवणे ही सांगितली आहेत. [२]

३) वैश्य वर्ण – पशूंचे रक्षण, दान, यज्ञ करणे, अध्ययन, वाणिज्य म्हणजे व्यापार, व्याजबट्टा व शेती ही वैश्यांची कर्मेआहेत. [३]

४) शूद्र वर्ण – वरील तीन वर्णांच्या म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची सेवा–शारीरिक कष्टाची कामे करणे ही शूद्रांची कर्तव्ये आहेत. [४]

प्राचीन काळी समाजातील हे चार वर्ण जन्मावर आधारित नसून व्यक्ती जे कार्य निवडीत असे त्यावरून ठरत असत. जो तो आपापल्या पात्रतेनुसार व आवडीनुसार काम करे. जे काम जो करे त्याचा तो वर्ण ठरत असे.

---

१) म.स्मृती (अ..१. ८७) अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत्।।

२) म.स्मृती (अ.१.८८) प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च।
विषयेष्व प्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः।।

३) म.स्मृती ( अ.१.८९) पशूनां रक्षणं दानं इज्याध्ययनमेव च।
वणिक्पथं कुसीदं वैश्यस्य कृषिमेव च।

४) म.स्मृती (अ.१.९०) एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत्।

'जन्मना जायते शूद्रः, संस्कारात् द्विज उच्यते।

वेदपाठी भवेत् विप्रः, ब्रह्म जानाति ब्राह्मणः ।।

– (शंकर दिग्विजय)

अर्थ – प्रत्येक मनुष्य हा जन्मतः शूद्रच असतो. उपनयनादि संस्कारांमुळे यानंतर त्याला द्विज म्हणतात. जो वेदांचे पठण करतो त्याला विप्र असे म्हणतात. तर परब्रह्माचे ज्ञान ज्याला आहे तो ब्राह्मण होय.

याचप्रमाणे मनुष्याच्या आयुष्याची विभागणी ही चार आश्रमांमध्ये केलेली होती. [५]

१) ब्रह्मचर्याश्रम – ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचा उपनयनविधी झाल्यानंतर गुरूगृही त्यांचे अध्ययन सुरू होई, ते सुमारे १२ वर्षेगुरूगृही राहात. या काळात विद्याध्ययन व भावी आयुष्याचा पाया या काळात घातला जात असे.

२) गृहस्थाश्रम – ब्रह्मचर्याश्रम म्हणजेच अध्यनाचा काल संपल्यावर समावर्तनविधी हा पार पडे. गुरु शिष्याला जीवनात कसे आचरण करावे याचा उपदेश करीत. ब्रह्मचर्याश्रमातील कर्तव्ये संपल्यानंतर व्यक्तीने विवाह करून कौटुंबिक जीवन व्यतीत करावे असा प्रघात असे. प्रजनन – संतती व समाजाबद्दलची कर्तव्ये व्यक्तीने पार पाडावीत असे मानले जाई.

३) वानप्रस्थाश्रम – कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर पुढील पिढीवर कुटुंबाची जबाबदारी सोपवून व्यक्तीने वनात जावे. ब्रह्मचर्य, जना–अजनादिकांचे धारण करणे, अग्निहोत्र, स्नान–संध्या, देवपूजा, पितर व अतिथी यांची पूजा, वनातील फळमूळांचा आहार घेणे हा वानप्रस्थांचा धर्म आहे.

४) संन्यासाश्रम – अंतर्बाह्य शुद्धता, इंद्रियनिग्रह, अनासक्त वृत्ति, निष्कांचनता, अलिप्त वृत्ति, भिक्षाटन हा संन्याशांचा धर्म मानला जाई. या आश्रमात व्यक्तीने परमोच्च ध्येय 'मोक्ष' किंवा निःश्रेयसप्राप्ती यासाठी तपस्वी वृत्तीने रहावे असे मानले जाई.

वरील वर्णाश्रमपद्धतीप्रमाणे व्यक्तीच्या जीवनातील चार प्राप्य गोष्टी मानल्या जात. त्यांना पुरुषार्थ ही संज्ञा आहे. पुरुषार्थ ही हिंदु आचरणपद्धतीतील वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना आहे. 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे ते चार पुरुषार्थ मानले जातात. अर्थ म्हणजे संपत्ती व काम म्हणजे सुखोपभोगाची इच्छा. पञ्च ज्ञानेन्द्रियांचे – श्रोत्र, चक्षु, जिव्हा, घ्राण व त्वचा, यांना सुख देणाऱ्या विषयांच्या प्राप्तीची इच्छा. यांचे विषय अनुक्रमे शब्द, रूप, रस, गंध व स्पर्श होत. या सर्व गोष्टी म्हणजे अर्थ व काम मनुष्याने धर्मपालनाने म्हणजे कर्तव्यांचे पालन

---

५) कौ.अ. – अधिकरण १ अध्याय ३ रा.

करीत मिळवाव्यात अशी अपेक्षा असे. पुरुषार्थ याचा अर्थ मानवाच्या आयुष्याची प्रयोजने होत. यात धर्म हा प्रथम क्रमांकाचा पुरुषार्थ मानला गेला आहे. कारण धर्म हा नैसर्गिक प्रवृत्तींचे नियंत्रण व नियमन करण्याचे कार्य करतो. मोक्ष हा चौथा पुरुषार्थ आयुष्यातील अंतिम ध्येय मानला गेला आहे. नि:श्रेयसप्राप्ती, जन्ममरणचक्रातून मुक्तता हे मनुष्याचे जीवनातील अंतिम साध्य असावे असे मानले जाई.

## २) वेदांच्या काळातील शिक्षणपद्धती :–

वेदकाळात उपनयन हा विधी झाल्यानंतर साधारण वयाच्या आठव्या वर्षी मुलाची गुरुगृही पाठवणी होत असे. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तीन वेदांचे अध्ययन शिष्य करीत असे. गुरुगृही राहून, गुरुंच्या सहवासात हे शिक्षण घेतले जात असे. गुरू सांगेल ती कामे शिष्याला करावी लागत. यामधून आज्ञापालन, स्वावलंबन व साधी राहणी यांचे संस्कार शिष्यावर होत. गुरूगृही राहणाऱ्या या शिष्यासाठी मनुस्मृतीमध्ये आचरणांसंबंधी अतिशय विस्तृत व कडक असे नियम सांगितले आहेत. [६]

लेखनाची कला अवगत नसल्याने संथा पद्धतीने गुरुंच्या समोर बसून शिष्य हे शिक्षण घेई. त्यामुळे स्वराघात व शुद्ध उच्चार यांचे शिक्षण शिष्यांना मिळत असे.

अध्ययन संपल्यानंतर समावर्तन हा विधी केला जात असे. गुरू फी घेत नसत, तर अध्ययन संपल्यानंतर शिष्य आपल्या ऐपतीनुसार व इच्छेनुसार गुरदक्षिणा देत असे. विद्या शिकविणे, ज्ञान देणे हे दान समजले जात असे. विद्यादान हाच शब्द रूढ होता.

गुरुंचे आश्रम हे नगराबाहेर असत. तेथे तपस्वी व मुनी वृत्तीने गुरु राहात असत. ऐहिक सुखोपभोगांपासून ते अलिप्त असेच असत.

वेदकालात प्रामुख्याने आर्य व दस्यु हे दोनच वर्ग अस्तित्वात होते. त्यावेळी कर्मानुसार मनुष्याचा वर्ण निश्चित होत असे. [७]

## ३) उपनिषत्कालातील शिक्षणाचे स्वरूप :–

ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य, तैत्तिरीय, छांदोग्य, बृहदारण्यक, ऐतरेय अशी एकंदर दहा प्रमुख उपनिषदे आहेत.

उप+नि+सद् (६प) ह्या धातूचा अर्थ जवळ बसणे. गुरूजवळ बसून जे ज्ञान घ्यायचे ते

---

६) म.स्मृती – अध्याय २ रा (श्लोक १७२ ते श्लोक २४४)

७) हिवरगावकर ब. रा – कौ. अ. प्रस्तावना पृ.क्र. २९.

उपनिषदातील ज्ञान होय. उपनिषदांमध्ये तत्त्वज्ञानाचा विचार प्रामुख्याने आढळतो. जीव, जगत्, आत्मा, ब्रह्म याविषयीचे विचार यात प्रामुख्याने आलेले दिसतात. तत्त्वज्ञानाचे हे शिक्षण घेणाऱ्या गुरू–शिष्यांच्या अनेक जोड्यांचे व गुरू शिष्यांचे उल्लेख उपनिषदांमध्ये आढळतात.

१) केन उपनिषद – यामध्ये गुरु–शिष्य यांचा संवाद आला आहे. या संवादातून शिष्याला ब्रह्माचे स्वरूप गुरुंनी समजावून सांगितले आहे. अग्नि, वायु व इंद्र यांना ब्रह्माचे ज्ञान उमा या स्त्रीकडून झाले. (८)

२) कठोपनिषद – यात वाजश्रवाचा पुत्र वाजश्रवस याचा पुत्र नचिकेत याची कथा आली आहे. नचिकेताने यमाशी संवाद करून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतले. (९)

३) प्रश्नोपनिषद् – या उपनिषदात पिप्पलाद ऋषींच्या सहा शिष्यांचा उल्लेख आला आहे. भरद्वाजपुत्र सुकेश, शिबिपुत्र सत्यकाम, गर्गगोत्रातील सौर्यायणि, अश्वलपुत्र कौसल, विदर्भ देशातील भार्गव व कत्याचा पुत्र कबंधी हे ते सहा शिष्य होत.

पिप्पलाद ऋषींनी या शिष्यांना हे उपनिषद सांगितले असा उल्लेख आहे.

४) मुण्डकोपनिषद् – या उपनिषदात ब्रह्मविद्येची परंपरा सांगितली आहे. ब्रह्मदेवाने ही विद्या आपला ज्येष्ठ पुत्र अथर्वाला, त्याने ती अंगि: याला , त्याने भारद्वार गोत्रातील सत्यवहाला व सत्यवहाने तीअंगिरस ऋषींना सांगितली. अंगिरस मुनींकडे शौनक हा या विद्येचे शिक्षण घेण्यासाठी आला. तेव्हा परा व अपरा या विद्यांचे शिक्षण त्यांनी शौनकला दिले. (१०)

५) तैत्तिरीयोपनिषत् – या उपनिषदात खालीलप्रमाणे गुरू–शिष्य या दोघांचे उल्लेख आले आहेत.

'सह नौ यश: ।। सह नौ ब्रह्मवर्चसम् ।।

(अर्थ – आम्हा दोघांना समान यश प्राप्त होवो. आम्हा दोघांचे ब्रह्मचर्य–तेज समान असो.) (११)

६ व ७) छांदोग्योपनिषत् व बृहदारण्योकपनिषत् –ही अतिशय मोठी व तत्त्वज्ञानाचे विस्तृत व तपशीलवार विवेचन करणारी अशी उपनिषदे आहेत.

यापैकी छांदोग्योपनिषदात सत्यकाम जाबाल, नारद, सनत्कुमार, श्वेतकेतू इत्यादि सोळा कथा आल्या आहेत. जानश्रुती राजा हा रैक्व या गाडीवानाकडे ज्ञानप्राप्तीसाठी गेला होता अशी कथा आहे. (१२)

---

८) केन उपनिषद् – खण्ड ३ व खण्ड ४.

९) कठोपनिषद् – अध्याय १, २, ३.

१०) मुण्डक – खण्ड १ ला.

११) तेत्तिरीय – तृतीय अनुवाक (पृ. क्र. १४७)

१२) छांदोग्य – अध्याय ४ था.

सत्यकाम जाबाल हा जबाला या दासीचा पुत्र होता. त्याला आपले गोत्र माहीत नव्हते. परंतु तो सत्यवक्ता होता. हरिद्रुमत याच्याकडे तो ज्ञानप्राप्तीसाठी गेला. गाईंची संख्या एक हजार होईपर्यंत वनात राहण्याची गुरुंनी त्याला आज्ञा केली त्याप्रमाणे गाईंची संख्या एक हजार होईपर्यंत तो वनात राहिला. त्याचे आज्ञापालन व सत्य बोलण्याचे धैर्य यामुळे गुरुंनी त्याला ज्ञान दिले. (१३)

कमलपुत्र उपकोसल हा सत्यकाम जाबालाचा शिष्य होता. केकयपुत्र अश्वपती राजा हा क्षत्रिय असूनही अनेक श्रुतिसंपन्न ब्राह्मण त्याच्याकडे ब्रह्मज्ञान शिकण्यासाठी गेले. (१४)

बृहदारण्यकोपनिषदात बालाकि हा गर्विष्ठ असा वादविवादपटु होता. तो ब्रह्मज्ञान शिकण्यासाठी काशीचा राजा अजातशत्रू याच्याकडे गेला. (१५)

तसेच या उपनिषदाच्या तिसऱ्या अध्यायात याज्ञवल्क्य व गार्गी वाचक्नवी यांचा संवाद आला आहे. तर चौथ्या अध्यायाच्या पाचव्या ब्राह्मणभागात याज्ञवल्क्याने आपली पत्नी मैत्रेयी हिला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला असे वर्णन आले आहे.

वरील सर्व विवेचनावरून उपनिषत् कालातील शिक्षणासंबंधी खालील बाबी लक्षात येतात.

१) उपनिषत्कालात धार्मिक व तत्त्वज्ञानप्रधान अशा शिक्षणाला महत्त्व होते.

२) गुरुकुलपद्धतीने – गुरुंच्या आश्रमात राहूनच ही शिक्षणप्रक्रिया चालत असे.

३) जन्मावर आधारित अशी व्यवस्था नव्हती. एखाद्याचा वर्ण त्याच्या शिक्षणाच्या इच्छेच्या आड येत नसे. तर सर्वांना शिक्षणाची समान संधी होती असे म्हणता येते.

४) विदेह देशाचा राजा जनक, काशीचा राजा अजातशत्रू, केकय देशाचा राजा अश्वपती या क्षत्रिय राजांकडे अनेक वेदज्ञ ब्राह्मण शिकण्यासाठी जात असत.

५) तसेच वाचक्नवी गार्गी, मैत्रेयी यासारख्या स्त्रिया या ब्रह्मवेत्या होत्या. त्यांना वेदशिक्षण घेण्यास मनाई नव्हती. पात्रता व बुद्धिमत्ता याच्या बळावर स्त्रिया ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊ शकत. स्त्रीत्व हे शिक्षणाच्या आड येत नसे. स्त्री व पुरुष याबाबतीत याठिकाणी समानतेचे तत्त्व आचरणात आणलेले दिसते.

गुरू–शिष्य संबंधाचा विचार केल्यास अतिशय हृद्य असे चित्रण आढळते. शिष्य गुरुगृही राहात असल्याने गुरू हाच पित्याच्या ठिकाणी मानला जात असे.

---

१३) छांदोग्य – खण्ड ४ था

१४) छांदोग्य – अध्याय ५ वा

१५) बृहद् – अध्याय २ रा

'गुरुः ब्रह्मा गुरुः विष्णुः गुरुः देवो महेश्वरः ।

गुरुस्साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।। [१६]

या श्लोकावरून गुरूचे सर्वश्रेष्ठ असे जे स्थान शिष्याच्या जीवनात असे त्याची यथार्थ कल्पना येते.

ज्ञानप्राप्ती कशी करून घ्यावी याचे मार्गदर्शन भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत केले आहे.

'सर्व कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।

तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया ।। [१७]

(अर्थ – सर्व कर्माचा शेवट, हे पार्था, ज्ञानामध्येच होतो. ही ज्ञानप्राप्ती विनयी, नम्र वृत्ती ठेवून, प्रश्न विचारून (कुतूहल–औत्सुक्य जागृत ठेवून) व सेवावृत्तीने (गुरूच्या सहवासात राहून) करून घ्यावी.)

या काळात शिष्य गुरुगृहीच राहात असल्याने गुरुंच्या आचरणाचा प्रभाव त्याच्यावर पडत असे. सत्यवृत्ती, शुद्ध आचरण, धर्माचे पालन (कर्तव्यपालन) या मूल्यांचे संस्कार त्याच्यावर आपोआपच होत असत. आज्ञापालन हा शिष्याचा सर्वोत्तम गुण मानला जाई.

'आज्ञा गुरुणां हि अविचारणीया ।' असेच मानले जाई. सत्यकाम जाबालाला त्याचा गुरू गौतम गोत्री हरिद्रुमत याने गाईंची संख्या १००० होईपर्यंत वनात राहण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे तो तेथे राहिला. [१८]

तर धौम्यशिष्य आरुणि, उपमन्यु व वेन हेहि त्यांच्या आज्ञापालनाबद्दल सुप्रसिद्ध आहेत. [१९]

शिष्यांसाठी आचारसंहिता असे. त्यांनी स्वावलंबी असावे, साधे रहावे, गुरुपत्नीला मातेसमान मानून गृहकार्यात मदत करावी अशी अपेक्षा असे. पाणी भरणे, जळणासाठी वनातून लाकडे आणणे यासारखी कामे शिष्य करत असत. त्यामुळे नकळतच श्रमप्रतिष्ठा या मूल्याचे शिक्षण मिळत असे.

उपनिषदांमध्ये शिष्याला 'अन्तेवासिन्' अशी संज्ञा होती. शिक्षणाद्वारा विद्यार्थ्यांना वेद व तत्त्वज्ञान यांचे शिक्षण जसे दिले जात असे तसेच त्यांच्यात चारित्र्यसंपन्नता ही देखील विविध संस्काराद्वारा निर्माण केली जात असे.

सत्यपालन व सदाचार यांना मोठेच महत्त्व उपनिषद काळात होते असे आढळून येईल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याच्या दृष्टीने जसे प्रयत्न केले जात तसेच विविध कर्तव्यांची जाणीव त्यांच्या

---

१६) स्कंद – गुरुगीता, (श्लोक ३४.)

१७) गीता – (अध्याय ४.३३.२, ३४. १)

१८) छांदोग्य – (अध्याय ४)

१९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.३ अध्याय ३ रा)

ठिकाणी निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात. अशाप्रकारे शिक्षणाद्वारा विविध उद्दिष्टे साध्य करण्याचे प्रयत्न होत असते.

शिक्षणाच्या विविध पद्धती :–

मुख्यत: तत्त्वज्ञानाचे शिक्षण देताना शिक्षणाच्या विविध पद्धतींचा वापर केला जात असे.

१) उपमा किंवा रूपक पद्धती – श्वेताश्वेतर उपनिषदात जगाच्या विशालत्वाची कल्पना स्पष्ट करण्यासाठी समुद्राचे रूपक वापरले आहे.

२) दंतकथनात्मक पद्धती – केन उपनिषदात लीनतेचे महत्त्व स्पष्ट करताना इंद्र व अप्सरा यांची गोष्ट सांगितली आहे. अग्नी व वायु यांना आपल्या सामर्थ्याचा गर्व होता. त्यामुळे त्यांना ब्रह्म म्हणजे काय हे समजले नाही. परंतु इंद्र स्तब्ध राहिला. तेव्हा उमा या अप्सरासदृश स्त्रीने त्याला ब्रह्माचे ज्ञान दिले.[२०]

३) सादृश्य पद्धती – बृहदारण्यकोपनिषदात याज्ञवल्क्य व मैत्रेयी यांचा संवाद आहे. याज्ञवल्क्य मैत्रेयीला आत्म्याचे ज्ञान सांगतो. तसेच जीवात्मा व परमात्मा यांच्यातील अभेद स्पष्ट करून सांगतो. त्यावेळी अनेक पुष्पातील रस व गंध एकच असतो. सर्व नद्यांचे जल समुद्राला मिळाल्यावर एकरूपच होते. त्याप्रमाणे जीवात्मा हा परमात्म्याला मिळाल्यावर एकरूप होतो. असे सादृश्य वर्णन केले आहे.[२१]

४) संवाद पद्धती – उपनिषदांमध्ये तत्त्वज्ञान हे संवादरूपाने समजावून दिले आहे. कठोपनिषदातील यम–नचिकेत संवाद, बृहदारण्यकोपनिषदातील अजातशत्रू– गार्ग्य संवाद, याज्ञवल्क्य –मैत्रेयी संवाद, हे संवाद प्रसिद्ध आहेत.[२२]

५) समन्वय पद्धती – बृहदारण्यकोपनिषदात जनक राजाने सहा प्रश्न विचारले.

(१) पुरूषाची ज्योति कोणती ? (२) आदित्य अस्त पावल्यानंतर पुरूषाची ज्योति कोणती? (३) आदित्य , चंद्र अस्त पावल्यानंतर पुरूषाची ज्योती कोणती ? (४) सूर्य, चंद्र अस्त पावले, अग्नी शांत झाल्यावर पुरुषाची ज्योती कोणती ? (५) सूर्य, चंद्र अस्त पावले, अग्नी व वाणी शांत झाले की पुरूषाची ज्योती कोणती ?

---

२०) केन – खण्ड ३ व ४.

२१) बृहदा – अध्याय २ रा.

२२) कठ– अध्याय १ व २, बृहदारण्यकोपनिषद् अध्याय २ रा.

याचे उत्तर समन्वयाने याज्ञवलक्याने 'आत्मा' असे दिले. 'हा विज्ञानमय, हृदयामध्ये अंतर्ज्योती व पूर्ण आहे.' (२३)

वेदकाल व ब्राह्मणकाल या काळात मुख्यत: ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या वेदत्रयीतील वैदिक मंत्राचे शिक्षण दिले जात असे. परंतु यानंतरच्या उपनिषत्कालात ज्ञानाच्या विषयांमध्ये भर पडलेली दिसते. वेदत्रयीच्या शिक्षणाबरोबरच तत्त्वज्ञानाचे शिक्षण महत्त्वाचे मानले जात असे. यातच सहा वेदाङ्गे – शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष यांचाही विद्याशाखात समावेश केला गेला. नारद सनत्कुमाराकडे ब्रह्मविद्या शिकण्यासाठी गेला. त्यावेळी चौदा विद्या व चौंसष्ट कला यात तो प्रवीण होता. परंतु आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी तो सनत्कुमाराकडे आला होता अशी कथा आहे. (२४)

हे अध्यापन करणाऱ्यांना गुरू, उपाध्याय व आचार्य असे म्हणत असत.

'गर्भाधानादि सर्व विधी करून जो शिष्यांना वेदांचे ज्ञान देतो तो गुरू होय. (२५)

जो उपनयन संस्कार करून वेदांचे ज्ञान देतो तो आचार्य असे म्हणत. (२६)

तर वेदांचा केवळ एक भाग जो शिकवितो तो उपाध्याय असे म्हटले आहे. (२७)

वेदाध्ययन पूर्ण झाल्यानंतर समावर्तन विधी पार पडल्यानंतर गुरु शिष्याला उपदेश करीत असत. (२८)

'वेदमनूच्य आचार्य: अन्तेवासिनमनुशास्ति– सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमद:। आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सी:। सत्यान्न प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्। कुशलान्न प्रमदितव्यम्। भूत्यै न प्रदितव्यम्। स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्। देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम्। मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव। यानि अनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि। यान्यस्माकं सुचरितानि, तानि त्वयोपास्यानि। नो इतराणि।'

(अर्थ– खरे (सत्य) बोल धर्माचे (कर्तव्याचे) पालन कर. (स्वत:) अध्ययन करण्यास विसरू नकोस. सत्यापासून विचलीत होऊ नकोस. धर्मापासून (कर्तव्यपालनापासून) परावृत्त होऊ नकोस.

---

२३) बृडद् – अध्याय ४, तृतीय ब्राह्मण १ ते ७.

२४) छांदोग्य – अध्याय ७ वा

२५ व २६) स गुरु: क्रिया: कृत्वा वेदमस्मै प्रयच्छति।
उपनीय ददत् वेदमाचार्य: स: उदाहृत:।।
याज्ञवलक्यस्मृति – १/३४

२७) एकदेशमुपाध्याय:। याज्ञवल्क्यस्मृति १/३५

२८) तैत्तिरीय – ११ वा अनुवाक.

स्वत:चे अध्ययन व इतरांना शिकविणे (प्रवचन) यापासून च्युत होऊ नकोस. देव व पितर यांच्या बाबतीतील योग्य त्या कार्यापासून तू विचलित होऊ नकोस. माता ही देवस्वरूप मान. पिता हाही तुला देवस्वरूप असो. तुझे गुरू हे तुला देवाप्रमाणे असोत. दारी आलेला अतिथी हाही देवस्वरूप असो. जी अनिंद्य अशी कर्मेआहेत त्यांचेच आचरण करावे.इतर (निंद्य) कर्मांचे आचरण करू नये. आमचे जे चांगले गुण आहेत, जी सत्कर्मेआहेत त्यांचेच अनुकरण तू करावेस. इतर (दोषयुक्त) कर्मांचे आचरण तू करू नयेस.)

शिष्याला केलेल्या वरील उपदेशावरून भावी जीवनात त्याने कोणत्या मूल्यांचे आचरण करावे याचे उचित असे मार्गदर्शन गुरूंनी शिष्याला केलेले आहे. सत्य, विनयशीलता, कर्तव्यपालन, वडीलधाऱ्यांचा सन्मान हे गुण शिष्याने सदैव आचरणात आणावेत. देव, अतिथी, पितर याबाबतची कर्तव्ये, म्हणजेच सामाजिक जबाबदारीची जाणीव त्याने ठेवली पाहिजे. असे गुरू सांगतात. मूल्यांखेरीज शिक्षण ही कल्पनाच वेदोपनिषत् कालात नव्हती.

## ४) महाभारताचा कालातील शिक्षणपद्धती :-

वेद व उपनिषद् या काळात गुरु हा शिष्याचा आध्यात्मिक पिता मानला जात असे. विद्याध्ययन संपल्यावर शिष्य आपल्या इच्छेनुसार गुरूदक्षिणा देत असे. ऐहिक सुखोपभोगांबद्दल गुरू हे निरिच्छ असत. साधी राहणी व उच्च विचारसरणी अशीच त्यांची जीवनपद्धती असे. गुरूच्या आश्रमात राहूनच वेद वेदाङ्गे व तत्त्वज्ञान यांचे शिक्षण घेतले जात असे.

महाभारताच्या काळात या पद्धतीत थोडा बदल झालेला आढळतो. गुरूंच्या आश्रमात जाऊन शिक्षण घेण्याची पद्धतीही होती. आदिपर्वात धौम्य ऋषींच्या आश्रमात शिक्षण घेणारे त्यांचे तीन शिष्य आरुणि, उपमन्यु व वेद यांच्या कथा आल्या आहेत. (२९)

त्याचप्रमाणे भारद्वाज मुनींच्या आश्रमात त्यांचा पुत्र द्रोण याच्याबरोबर पांचाल देशाचा राजपुत्र द्रुपद हाही शिकत होता. असा उल्लेख आदिपर्वात आला आहे. (३०)

त्याप्रमाणे ब्रह्मास्त्राची प्राप्ती करून घेण्यासाठी कर्ण हा परशुराम मुनींच्या आश्रमात गेला होता. ही कथा शांतिपर्वात आली आहे. (३१)

---

२९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व - अध्याय १.३.

३०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व - अध्याय १.१३८.

३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व - अध्याय २ व ३.

सांदीपनी मुनींच्या आश्रमात कृष्ण व सुदामा शिक्षणासाठी एकत्र रहात होते ही कथाही सुप्रसिद्ध आहे. राजपुत्र व सामान्य विद्यार्थी असा भेद आश्रमात नसे. सर्वांसाठी सारखेच नियम असत.

असे असले तरी थोडा बदल असा होता की, कौरव व पांडव यांच्या शिक्षणासाठी द्रोणाचार्य व कृपाचार्य यांची नियुक्ती भीष्म पितामहांनी केली होती. आपल्या गरीबीचा उद्वेग येऊन व पांचालनरेश द्रुपदाने केलेल्या वचनभंगामुळे नाईलाजाने का होईना द्रोणाचार्यांनी कौरव–पांडवांचे गुरू म्हणून कुरुवंशाचा आश्रय घेतला. द्रोणाचार्य व कृपाचार्य हे कौरवांचे आश्रित झाले. [३२]

राजपुत्रांना शिक्षण देण्यासाठी गुरू, शिक्षक नेमण्याची पद्धत सुरू झाली असे यावरून दिसून येते. पांडवांच्या अज्ञातवासामध्ये अर्जुन राजकन्या उत्तरेला नृत्य शिकविण्यासाठी बृहन्नडेच्या वेशात विराटाच्या अन्त:पुरात राहिला होता. [३३]

यावरून स्त्रियांना घरच्याघरी शिकविण्यासाठी शिक्षक नेमण्याचा प्रघात या कालात होता असे दिसते.

महाभारत हे सतत भर पडत गेलेले महाकाव्य असल्याने यात अनेक विषयांचा उहापोह केलेला दिसतो. वेदोपनिषत् कालाप्रमाणे केवळ वेद व तत्त्वज्ञान यांचेच शिक्षण नव्हते. तर अनेक विषयांची भर शिक्षणात पडली होती. राज्यसंस्था ही प्रामुख्याने कार्यरत असल्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांसाठी काही अभ्यासविषय समान तर काही अभ्यासविषय विशिष्ट असे वर्णिले आहेत.

'त्रयी, आन्वीक्षिकी चैव वार्ता च भरतर्षभ।

दण्डनीतीश्च विपुला विद्यास्तत्र निदर्शिता ।। [३४]

अर्थ – हे भरतश्रेष्ठा, त्रयी (तीन वेद), तर्कशास्त्र, शेती, गोपालन, वाणिज्य या तीन विषयांखेरीज दण्डनीती (राज्यशासन) किंवा राजनीती ही देखील महत्त्वाची विद्या मानली गेली आहे.

'ज्याप्रमाणे घोड्यासाठी लगाम किंवा हत्तीसाठी अंकुश हा महत्त्वाचा त्याप्रमाणे राज्यातील प्रजेसाठी राजधर्म (राज्यशासन) हा महत्त्वाचा मानला गेला आहे.' असे शांतिपर्वात म्हटले आहे. [३५]

---

३२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१३१)

३३) BORI प्रमाणित प्रत म.भा.विराटपर्व (४.१०.१ ते १३, १०.१०,११)

३४) BORI प्रमाणित प्रत म.भा.शांतिपर्व (१२.५९.३३)

३५) BORI प्रमाणित प्रत म.भा.शांतिपर्व (१२.५६.५)

यथा हि रश्मयोऽश्वस्य द्विरदस्याङ्कुशो यथा।

नरेन्द्रधर्मोलोकस्य तथा प्रग्रहणं स्मृतम्।।

याखेरीज महाभारतात अनेक विषयांच्या अभ्यासास महत्त्व दिले आहे. पूर्वीच्या काळापासून कठोपनिषदात सांगितल्याप्रमाणे परा विद्या व अपरा विद्या असे विद्येचे दोन प्रकार मानले जात. परा विद्येमध्ये वेद, वेदाङ्गे, तत्त्वज्ञान, पुराणे व नीती यांचा समावेश होता. तर अपरा विद्येमध्ये इतिहास, अर्थशास्त्र, ज्योतिष, खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र, वनस्पतीशास्त्र यांचा समावेश होतो. [३६]

या सर्व प्रकारच्या विद्यांचे ज्ञान महत्त्वाचे असले तरीही दंडनीतीला म्हणजेच राजधर्माला महाभारतात अत्यंत महत्त्वाचे असे स्थान दिलेले आहे असे आपणास दिसून येते.

'राजधर्म ज्यात मुख्य आहे, असेच सर्व धर्म आहेत. राजधर्मातच सर्व धर्मांचे पालन आहे. सर्व प्रकारचे त्याग राजधर्मातच समाविष्ट आहेत. त्यागातच धर्मग्रंथ व पुराणे समाविष्ट आहेत असे म्हणतात.

'दंडनीती जर प्रभावहीन झाली तर वेदत्रयीचा नाश होईल. सर्व धर्म विपरीत होतील. पुराणात क्षात्रवृत्तीचा राजधर्म व्यक्त झाल्यास सर्व धर्म, सर्व आश्रमांमध्ये (चार आश्रम) विलीन होतील. सर्व प्रकारचे त्याग, सर्व दीक्षा, सर्व योग हे राजधर्मातच समाविष्ट होतात. राजधर्मातच सर्व धर्म प्रवेश करतात.'[३७]

याठिकाणी राजधर्म हा शब्द राज्यशासन या अर्थाने योजला आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

जरी दंडनीती–राजधर्म–राज्यशासन हे महत्त्वाचेअसले तरी महाभारतात मूल्यांना अत्यंत महत्त्व दिले आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ महाभारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे मानले जात.

प्रो. प्रतीव वर्मा म्हणतात,

'The Mahabharat layo great strees on the Values of Dharma, Artha, Kama, which help the realisation of Moksha. i.e. the complete welfare of the indivisual & the community. Moksha is the supreme value for a man.' [३८]

'महाभारत धर्म,अर्थ आणि काम यांना प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक अशा मूल्यांवर फार मोठा भर देते. अर्थ आणि काम या पुरुषार्थांची प्राप्ती धर्माचे पालन करूनच केली तरच व्यक्ती आणि समाज यांचे कल्याण होते. हाच मोक्षप्राप्तीचा खरा मार्ग आहे. 'मोक्ष' किंवा 'नि:श्रेयसप्राप्ती' हे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे.

---

३६) Gupta N.L. - 'Education & Value in Maha. (P.No. 32-33.)

३७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.६३. २७ ते २९).

३८) Pro. Prative Verma - Social Philosophy in Mahabharat & Manusmriti' P.No. 130.

'धर्म हा सर्वश्रेष्ठ मूल्य' असे महाभारत म्हणते.

'धारणात् धर्ममित्याहु: । धर्मोधारयते प्रजा: ।।' [३९]

धर्म शब्दाचा अर्थ धारण करणे हा आहे. सर्व लोकांना धर्माचेच अवलंबन असल्यामुळे धर्मच लोकांना धारण करतो. म्हणून ज्याच्या योगाने लोकांचे धारण केले जाते तो धर्म होय. अर्थात् याठिकाणी धर्म म्हणजे कर्तव्याचरण असाच अर्थ आहे.

'धर्म' या मूल्याच्या पालनासाठी अत्यंत महत्त्वाचे दुसरे मूल्य म्हणजे सत्य होय. सत्याशी प्रामाणिक अशी व्यक्तीच धर्मपालन एकनिष्ठेने करू शकते.

'पितामह भीष्म' हे नामाभिधान प्राप्त झालेल्या युवराज देवव्रताने 'आमरण ब्रह्मचर्याच्या आपल्या शपथेचे सत्यनिष्ठेने पालन केले. त्यामुळेच त्यांची व्यक्तिरेखा महाभारतात अमर झाली. [४०]

याउलट असत्याचा आश्रय घेऊन कर्णाने परशुराममुनींकडून ब्रह्मास्त्राची प्राप्ती करून घेतली. त्यामुळे त्याची विद्या निष्फळ ठरण्याचा शाप त्याला मिळाला. ऐन युद्धाच्या वेळी त्याला आपल्या विद्येचे विस्मरण झाले. [४१]

तसेच सत्याचे महत्त्व 'शकुन्तलोपाख्यानात' खालीलप्रमाणे वर्णन केले आहे. शकुंतला दुष्यंताला सांगते,

१) नास्ति सत्यात्परो धर्म: न सत्यात्विद्यते परम् ।
न हि तीव्रतरं किञ्चिदनृतदिह्व विद्यते ।।

२) राजन्, सत्यं परं ब्रह्म सत्यं च समय: पर: ।
मा त्याक्षी: समयं राजन् सत्यं संगतमस्तु ते ।।

अर्थ– सत्याशिवाय श्रेष्ठ असा धर्म नाही. सत्याखेरीज दुसरे श्रेष्ठ असे काहीच नाही, आणि असत्याखेरीज अत्यंत दु:खदायक असे या जगात काहीच नाही.

२) सत्य हेच सर्वश्रेष्ठ असे ब्रह्म आहे. सत्याशिवाय श्रेष्ठ असे आचरण नाही. हे राजा, सत्याचरणाचा त्याग करू नकोस. सत्य हेच सतत तुझ्याबरोबर राहो. [४२]

त्याचप्रमाणे आदिपर्व अध्याय ८८ मध्ये अष्टक–ययाति संवादात अनेक दैवी गुणांचे वर्णन आले

---

३९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१०९.१).

४०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व अ. ९४ (श्लोक ८८ ते ९०) अ. ९७ (श्लोक १५ ते १८).

४१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. २ व ३.)

४२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१. ६९. २४, २५).

आहे. ययाती, शिबी, शंतनु हे राजे अत्यंत सत्यनिष्ठ होते, असे आदिपर्व अध्याय अठ्ठ्याऐंशी मध्ये वर्णन आले आहे.

युधिष्ठिर व पाचही पांडवांचे वर्णन ते सत्यसन्ध व सत्यधर्मपरायण होतेअसे आदिपर्वातच म्हटले आहे. (४३)

याबरोबरच अहिंसा, दान, सदाचार, आर्जव, दया, दम, शांति (शांतवृत्ती) या मूल्यांचा उपदेश महाभारतात ठिकठिकाणी आला आहे.

'दु:खीकष्टी मनुष्याला आसराद्यावा, थकलेल्याला आसन द्यावे, तहानलेल्याला पाणी द्यावे, तर भुकेल्याला भोजन द्यावे.' असे दानाबद्दल सांगितले आहे. (४४)

तर दानापेक्षा कठीण असे कोणतेच काम नाही. (४५) असेही सांगितले आहे.

महाभारतातील कर्ण हा त्याच्या दानशूर वृत्तीमुळे 'दान' या गुणाचा आदर्श म्हणूनच विख्यात अहे. 'कवचकुंडलांचे दान' म्हणजे आपला मृत्यूच होय.' हे कर्णाला पूर्णपणे माहीत होते. इंद्र कपटाने ब्राह्मणवेष धारण करून ती मागत आहे हेही त्याला ठाऊक होते. याबाबतीत त्याचा पिता सूर्य याने स्वप्नात येऊन त्याला सावध केले. त्यावेळी कर्णाने त्याला दिलेले उत्तर त्याच्या पराकोटीच्या दानी वृत्तीची साक्ष देते, तसेच त्याच्या सत्यप्रियतेचीही ग्वाही देते.

'इदं त्वमनुजानीहि सुरश्रेष्ठ, व्रतं मम।

भिक्षते व्रजिणं दद्यामपि जीवितमात्मन: ।।

अर्थ – हे सुरश्रेष्ठा, माझे हे व्रत आहे असे तू जाण. याचना करणाऱ्या इंद्राला मी प्रत्यक्ष माझे प्राणदेखील देईन. ही संपूर्ण कथा वनपर्वात आली आहे. (४६)

आचाराचे महत्त्व शांतिपर्वात खालीलप्रमाणे सांगितले आहे.

नापृष्ट: कस्यचित्ब्रूयात् न चान्यायेन पृच्छत: ।

जानन्नपि मेधावी जडवत् लोके आचरेत् ।। (४७)

अर्थ – एखादी गोष्ट माहीत असली तरी बुद्धिमान माणसाने विचारल्याशिवाय कोणालाही सांगू नये. तसेच अन्यायाने एखादा विचारत असेल तरी सांगू नये. या जगात अशावेळी मंदबुद्धी असलेल्या

४३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.२००.६, ७ )

४४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२.५५)

४५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२५६.२८)

४६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९४ श्लोक १ ते १७)

४७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२८७.३५)

माणसाप्रमाणे वागावे.

आर्जवाचे महत्त्व खालील श्लोकात मार्मिक रीतीने स्पष्ट केले आहे.

सर्व जिह्म मृत्युपदम्, आर्जवं ब्रह्मण: पदम्।

एतावाञ्ज्ञानविषय: किं प्रलाप: करिष्यति ।। (४८)

अर्थ – कुटिलता हे खरोखर मृत्यूचे स्थान आहे. तर याउलट सरळवृत्ति हे ब्रह्मपदाचे (शाश्वत सुखाचे) स्थान आहे. ज्ञानाचा हाच खरा विषय आहे. व्यर्थ बडबडीचा काय उपयोग ?

अहिंसेचे महत्त्व फार मोठे सांगितले आहे.

अहिंसा परमो धर्म: । अहिंसा परमो दम: । अहिंसा परमं दानम्।

अहिंसा परमं तप: । अहिंसा परमं सत्यं ततो धर्म: प्रवर्तते। (४९)

अर्थ – अहिंसा म्हणजेच सर्वश्रेष्ठ कर्तव्यपालन. अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ संयम आहे. तसेच अहिंसा हे फार मोठे सत्य आहे. त्यातूनच कर्तव्याचरणाची प्रवृत्ती होते.

भगवद्गीता म्हणजे उपनिषद्रूपी गाईंचे दोहन करून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णरूपी गोपालाने काढलेले अमृतासारखे गोड असे दुग्ध असे म्हटले आहे. गीतेच्या सतराव्या अध्यायात पहिल्या तीन श्लोकात दैवी संपत्तीचे वर्णन केले आहे. ही दैवी संपत्ती म्हणजे चिरंतन अशी सर्वश्रेष्ठ मूल्येच होत.

'अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थिति:।

दानं दमश्च यज्ञश्च स्वाधायस्तप आर्जवम् ।।१ ।।

अहिंसा सत्यमक्रोधस्त्याग: शान्तिरपैशुनम्।

दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलम् ।।२ ।।

तेज: क्षमा धृति: शौचमद्रोहो नातिमानिता।

भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य पाण्डव ।।३ ।। (५०)

(निर्भयता, शुद्ध सत्त्वप्रधान वृत्ति, ज्ञानयोग आणि कर्मयोग यांची योग्य व्यवस्था, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञ, वेदाध्ययन, तप, सरळवृत्ति, अहिंसा, सत्य, क्रोधावर मात, कर्मफलाचा त्याग, शांती, दुष्टपणाचा अभाव, भूतदया, लोभ नसणे, मृदुपणा, दुष्कर्माविषयी लज्जा, इंद्रियांच्या चंचलतेवर मात, तेज, क्षमावृत्ती, धैर्य, (मानसिक व शारीरिक) द्रोह न करणे, दुरभिमान नसणे ही दैवी संपत्ती म्हणजेच सद्गुण आहेत.)

---

४८) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.७९.२१)

४९) BORI प्रमाणित प्रत म.भा. अनुशासनपर्व (११६.२५)

५०) गीता (अ. १७. १, २, ३)

परंतु मूल्यांची केवळ यादीच देऊन महाभारत थांबत नाहीत. तर वेगवेगळ्या प्रसंगातून महाभारतातील व्यक्तींच्या अंगची मूल्यनिष्ठा दिसून येते.

यक्षप्रश्नांच्या प्रसंगी यक्ष युधिष्ठिराच्या उत्तरांनी प्रसन्न होऊन त्याला त्याच्या एका भावाचे जीवदान देऊ करतो. त्यावेळी भीमार्जुन या सख्खया भावांना सोडून युधिष्ठिर नकुलाचा जीव परत मागतो. कुंती व माद्री या आपल्या दोन्ही माता पुत्रवती असाव्यात अशी आपली इच्छा असल्याचे तो सांगतो. यावरून त्याची मूल्यनिष्ठाच प्रकट होते.

कौरव स्वत:चे वैभव दाखविण्यासाठी घोषयात्रेच्या निमित्ताने गेले. चित्ररथ गंधर्वाशी युद्ध चालू असताना तो दुर्योधनाला कैद करून चालला असता युधिष्ठिराने विवेकबुद्धी जागृत ठेवून त्याची मुक्तता केली, किंवा जयद्रथाने द्रौपदीचे हरण केले असता भीमार्जुन त्याला ठार करावे असे म्हणत होते. परंतु याप्रसंगीही धर्मपालन करून धर्मराजाने त्याला मुक्त केले. या कथांवरून सदाचार व मूल्ये यांचे महत्त्व उत्तम प्रकारे स्पष्ट होते.

आदिपर्वामध्ये अर्जुनाची कथा सांगितली आहे. द्रौपदी पाच पांडवांची पत्नी. परंतु कुणा एकाबरोबर ती असताना दुसऱ्याने तेथे जावयाचे नाही ही अट होती. अट मोडल्यास त्या व्यक्तीने बारा वर्षेवनवासात जावयाचे ही अट होती. एकदा युधिष्ठिर द्रौपदीबरोबर शस्त्रागारात असताना अर्जुनाला शस्त्रे घेण्यासाठी तेथे जाण्याचा प्रसंग आला. ठरलेली अट मोडली गेल्याने अर्जुन आपल्या सत्यप्रियतेला जागून बारा वर्षेवनवासात गेला. यावेळी अर्जुन म्हणतो,

'न व्याजेन चरेत् धर्ममिति मे भवत: श्रुतम् ।

न सत्यात् विचलिष्यामि त्येनायुधम् आलभे ।।'

(असत्यवृत्तीने कर्तव्यपालन करू नये (धर्मपालन करू नये) असे मी आपल्याकडून ऐकले आहे. मी सत्यापासून ढळणार नाही. तर सत्याचा आश्रय करूनच शस्त्रास्त्रे मिळवीन.) (५१)

या ठिकाणी अर्जुनाला 'सत्यवाक्' असे म्हटले आहे. हा संपूर्ण कथाभाग आदिपर्वात आला आहे.

अर्जुन, युधिष्ठिर या सर्वांवरच मूल्यांचे किती दृढ संस्कार होते हे यावरून दिसून येते.

आधुनिक अर्थाने शिक्षणातून मूल्यशिक्षण अशी त्यावेळी कल्पना नसली तरी 'मूल्यांविना शिक्षण' ही कल्पनाच त्याकाळी नव्हती. शिक्षण व मूल्यसंस्कार ही अभेद्य अशी जोडीच होती.

---

५१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.२०४.५ ते ३०) वरील श्लोक २९ वा.

तत्कालीन ऋषीमुनी हे वनवासामध्ये पांडवांच्या भेटीला जात. त्यावेळी अनेक कथा, आख्याने, उपाख्याने सांगून ते पांडवांचे मनोरंजन करत. परंतु या गोष्टी वा आख्याने केवळ मनोरंजनात्मक नसत. तर त्यातून सत्य, धर्मपालन इत्यादि अनेक मूल्यांचे हृद्य असे दर्शन होत असे.

वनपर्वात अशा अनेक कथा आल्या आहेत. मत्स्योपाख्यानात वैवस्वतमनूची कथा आली आहे. ऋषी मनु हा 'कृपया अभिपरिप्लुत' असा होता. त्याने दयाबुद्धीने माशाला वाचविले. त्यामुळे प्रलयाच्या वेळी माशानेही त्याचा जीव वाचविला. सर्व सृष्टीच्या पुनर्निर्माणास मदत केली. (५२)

मण्डूकोपाख्यानात परीक्षित राजा व मण्डूक राजकन्या यांचा पुत्र बल याची कथा आली आहे. मृगयेसाठी त्याने वामदेव ऋषींचे दोन घोडे घेतले. मात्र ते परत करण्याची त्याने टाळाटाळ केली. उलट मुनीवधाची इच्छा केली. यासाठी मुनी त्याला शाप देण्यास उद्युक्त झाले.

असत्यवृत्तीचे घोर परिणाम यातून दिसून येतात. (५३)

वनपर्वातच पतिव्रता स्त्रीची कथा आली आहे. पतिसेवेचे कर्तव्य पार पाडणाऱ्या पतिव्रता स्त्रीने कौशिक ब्राह्मणाला धर्मोपदेश केला. तिने दम (संयम) व सत्य यांचे महत्त्व त्याला सांगितले. यानंतर मिथिला नगरीत राहणाऱ्या धर्मव्याधाकडे खरा धर्म समजून घेण्यासाठी जाण्यास तिने कौशिक ब्राह्मणाला सांगितले. (५४)

त्याप्रमाणे कौशिक ब्राह्मण धर्मव्याधाकडे गेला. धर्मव्याध मिथिला नगरीत उपजीविकेसाठी मांसविक्रयाचे आपले विहित कर्तव्य करीत असे. आपल्या वृद्ध माता पित्यांशी अत्यंत आदराने वागून त्यांची सेवा करत असे. आपली पत्नी व मुले या आपल्या कुटुंबाबद्दलचे आपले कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडत असे. हे खरे धर्माचरण (कर्तव्यपालन) असे मानणारा धर्मव्याध कौशिक ब्राह्मणाला सत्यधर्म, दया, अहिंसा, सदाचार, दान, संयम, क्षमा, इत्यादि मूल्यांचा उपदेश करतो. हा धर्मव्याधाचा उपदेश अतिशय विस्तृत असा सहा अध्यायात सांगितला आहे. (५५)

यादृष्टीने खाली दिलेले हे श्लोक मननीय आहेत.

शक्त्या अन्नदानं सततं तितिक्षा धर्मनित्यता ।

यथार्हं प्रतिपूजा च सर्वभूतेषु वै दया ।।

त्यागात् न अन्यत्र मर्त्यानां गुणास्तिष्ठन्ति पुरुषे ।।

---

५२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( ३.१८५)

५३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९० श्लोक १ ते ९२)

५४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( ३.१९७ श्लोक १ ते ४४)

५५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८, १९९, २०१ ते २०६)

मृषावादं परिहरेत् कुर्यात् प्रियम् अयाचित: ।

न च कामात् न संरभात् द्वेषात् धर्मम् उत्सृजेत् ।। [५६]

(अर्थ– यथाशक्ती दान करणे, सहनशीलता, नित्य कर्तव्यपालन, योग्यतेप्रमाणे आदरसत्कार, सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी दया, आणि त्यागवृत्ती याखेरीज मनुष्यांच्या अंगी असणारे गुण इतर ठिकाणी नसतात. असत्य टाळावे, न सांगता (मागितल्याशिवाय) एखाद्याचे प्रिय करावे. लोभामुळे, गोंधळून जाऊन अथवा द्वेषामुळे कर्तव्याचा त्याग करू नये.)

आपल्या माता–पित्यासंबंधी धर्मव्याध सांगतो,

पिता माता च भगवन् एतौ मे दैवते परम् ।

यत् देवतेभ्य: कर्तव्यम् तदेताभ्यां करोम्यहम् ।। [५७]

(अर्थ – भगवन्, आई–वडील हीच माझी सर्वश्रेष्ठ अशी दैवते आहेत. जे देवतांच्या बाबतीत करणे उचित, तेच मी यांच्या बाबतीतही आचरणात आणतो.)

वनपर्वातच रामायणकथा आली आहे, रामाला 'पितृवचनकरिन' असे विशेषण दिले आहे. 'राजा सत्यो भवत्विति ।' असे आपल्या वनवासात जाण्याचे कारण राम देतो. [५८]

तसेच याच पर्वात सावित्रीचे उपाख्यान आले आहे. सत्यवानाला सावित्री पती म्हणून निवडते. तो गुणी परंतु अल्पायुषी असतो. तेव्हा त्याचा विचार सोडून देऊन अन्य वर निवडावा असे सावित्रीचे वडील – राजा अश्वपती तिला सांगतात. यावर सावित्रीने दिलेले उत्तर मननीय आहे.

'मनसा निश्चयं कृत्वा ततो वाचा अभिधीयते ।

क्रियते कर्मणा पश्चात् प्रमाणं मे मनस्तत: ।। [५९]

(अर्थ – मनाने निश्चय करून नंतर वाणीने बोलले जाते. त्यानंतर कृती केली जाते. म्हणून माझे मन हेच मला प्रमाण आहे.)

वनपर्वाचे व त्यातील कथांचे महत्त्व 'महाभारतकालीन भारतीय संस्कृती' या पुस्तकात खालीलप्रमाणे सांगितले आहे.

---

५६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८. ३९, ४०)

५७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२०४. १७)

५८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व ( ३.२६०.२७)

५९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२७८.२७)

१) 'महाभारतके वनपर्वमे मानवीय एवं सामाजिक धर्मकी प्रधानता हैं। अन्य जीवोंसे मनुष्यकी विभिन्नता उसके इस मूल वैशिष्ट्यमे है जिसके कारण वह न केवल अपने व्यक्तित्व के अनुरूप इंद्रियोंके विषयोंके प्रति प्रवृत्त रहता है बल्कि वह उनसे परे भी सूक्ष्म तत्त्वोंके विषयका चिंतन, मनन करता है। इसी धर्मको 'मानवीय धर्म कहा जाता है। मानवीय धर्म के अंतर्गत परोपकार, दान, तप, सत्यवादिता, इंद्रियोंका निग्रह आदि अनेकों गुण है। [६०]

२) धर्ममें संलग्न होने के लिए केवल एकही तत्त्व आवश्यक है – विवेक । लौकिक अभ्युदय एवं पारलौकिक नि:श्रेयसकी सिद्धीका एकमात्र साधन धर्म है। [६१]

बाराव्या शांतिपर्वामध्ये सामान्यनीती सांगणाऱ्या अनेक कथा आहेत.

एखाद्याच्या परवानगीशिवाय त्याच्या मालकीची वस्तू घेणे ही चोरीच होय. शङ्ख आणि लिखित या दोन भावांच्या गोष्टीवरून हे तत्त्व शिकविले आहे. [६२]

वेळ पाहून वागणे लाभदायी ठरते हे तत्त्व वृक्ष आणि लव्हाळे यांच्या कथेतून स्पष्ट केले आहे. [६३]

आळशी वृत्तीचे दुष्परिणाम काय होतात हे लांब मान असलेल्या उंटाच्या गोष्टीवरून विशद केले आहे. [६४]

एखाद्याचा मूळ स्वभाव कितीही प्रयत्न केले तरी बदलू शकत नाही ही गोष्ट मुनी व कुत्रा या कथेतून सांगितली आहे. [६५]

'दूरदर्शी, अनागतविधाता, व दीर्घसूत्री या तीन माशांच्या कतेतून चेंगटपणे विचार करून झटकन् कृती न करणाऱ्याचा नाश कसा होतो हे स्पष्ट केले आहे. [६६]

अशाप्रकारे रोजच्या जीवनात कोणत्या गुणांचा आश्रय करून वागले असता कल्याणकारक होते हे शांतिपर्वात अनेक कथांच्या द्वारा विशद केले आहे.

वनपर्वातील यक्षप्रश्न व उद्योगपर्वातील विदुरनीती यामधून सामान्य नीतीमूल्यांचे दर्शन होते.

---

६०) सिन्हा सुजाता, सिंह उर्मिला, वर्मा हेमा 'महाभारतकालीन भारतीय संस्कृती' पृ. क्र. १०४. १०५.

६१) सिन्हा सुजाता, सिंह उर्मिला, वर्मा हेमा 'महाभारतकालीन भारतीय संस्कृती' पृ. क्र. ८६.

६२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. २३).

६३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. ११३).

६४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. ११२).

६५) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. ११६, ११७).

६६) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अ. १३५)

खाली उदाहरणादाखल यक्षप्रश्नातील काही प्रश्न व उत्तरे दिली आहेत. [६७]

१)प्रश्न –भूमीपेक्षा अधिक पूज्य कोण ? आकाशाहून उंच कोण ? वाऱ्यापेक्षाही वेगवान काय ? गवतापेक्षाही पुष्कळ मोठे काय ?

उत्तर – भूमीपेक्षाही आई (माता) जास्त पूज्य असते. आकाशाहून पिता उंच असतो. वाऱ्यापेक्षाही अधिक वेगवान मन होय. तर चिंता गवतापेक्षाही अधिक जड असते.

२)प्रश्न – परिपूर्ण असे धर्माचरण कोणते ? परिपूर्ण अशी कीर्ती कोणती ? परिपूर्ण अशी स्वर्गप्रद गोष्ट कोणती ? परिपूर्ण असे सुख कोणते ?

उत्तर – दक्षता हे परिपूर्ण धर्माचरण आहे. दान ही परिपूर्ण अशी कीर्ती आहे. सत्य हेच परिपूर्ण स्वर्ग देणारे आहे. तर शील (चारित्र्य) हे परिपूर्ण असे सुख आहे.

३)प्रश्न – कोणती गोष्ट सोडल्यास मनुष्य लोकांना आवडतो ? कोणती गोष्ट सोडल्यास त्याला शोक करावा लागत नाही ? कोणती गोष्ट सोडल्यास तो धनवान होतो ? कोणती गोष्ट सोडल्यास तो सुखी होतो ?

उत्तर – अभिमान सोडल्यास मनुष्य इतरांना प्रिय होतो. संतापीपणा सोडल्यास त्याला शोक करावा लागत नाही. उपभोगाची इच्छा सोडल्यास तो धनवान होतो. तसेच लोभ सोडल्यास तो सुखी होतो.

युधिष्ठिराने यक्षाला जी उत्तरे दिली आहेत. त्यावरून त्याची प्रगल्भ अशी वृत्ती दिसून येते. जीवनाविषयी त्याला असणारे सत्य असे ज्ञान जसे दिसते तसेच त्याच्यावर असणारे उच्चतम मूल्यांचे संस्कारही दिसून येतात.

हेच विदुरनीतीबद्दलही म्हणता येईल. विदुराचे वर्णन तो अत्यंत सत्यसंध असून, कमालीचा चारित्र्यवान् व स्पष्टवक्ता असा होता असे महाभारतात केलेले आढळते.

‘धर्म व राज्यशास्त्र यात अत्यंत कुशल, लोभ व क्रोध यापासून मुक्त, दूरदृष्टीचा, विकारांवर पूर्ण विजय मिळविलेला, तसेच कुरुकुलाचे सदैव हित चिंतणारा असाच विदुर हा होता.’ [६८]

धृतराष्ट्र व दुर्योधन दोघांनाही त्याचा धाक होता. उद्योगपर्वामध्ये ३२व्या अध्यायात संजय धृतराष्ट्राला युधिष्ठिराचा निरोप सांगतो. त्यावेळी संजयाशी झालेल्या संवादानंतर धृतराष्ट्र अस्वस्थ होतो.

---

६७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अ. २९७)

६८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१०८.१९)

अशांत मन असल्याने त्याला झोप लागत नाही. त्यावेळी विदुराला निरोप पाठवून तो बोलावून घेतो. याप्रसंगी विदुराने शहाणपणाच्या अनेक गोष्टी त्याला सांगून जो उपदेश केला तो प्रजागरपर्व किंवा विदुरनीती या नावाने प्रसिद्ध आहे. यातील काही श्लोक खाली दिले आहेत.

१) ज्यांची प्रशंसा होईल अशी कृत्ये जो करतो, निंदास्पद कृत्ये करत नाही, असा नास्तिक नसणारा व श्रद्धाळू असा जो पुरुष त्याला पंडित असे म्हणतात.

२) स्वत:चा सन्मान झाला असता जो आनंदित होत नाही. अपमानाने दु:खी होत नाही. संथ वाहणाऱ्या गंगेतील डोहाप्रमाणे जो असतो तोच खरा पंडित होय. [६९]

३) गोड पदार्थ एकट्याने खाऊ नये. एकट्यानेच संपत्तीचा विचार करू नये. एकट्याने प्रवास करू नये. सगळे झोपले असता एकट्यानेच जागे राहू नये.

४) सतत पैसा मिळत राहणे, आरोग्यसंपन्न आयुष्य, गोड बोलणारी व प्रिय अशी पत्नी, आज्ञाधारक पुत्र व पैसा मिळवून देणारी विद्या, हे राजा, ही या पृथ्वीतलावरील सहा सुखे होत.

५) जो वृक्षाची कच्ची फळे तोडतो, त्याला त्यापासून रसही मिळत नाही. तसेच त्यातील बीजाचाही नाश होतो.

६) परंतु योग्य वेळी तयार झालेले, पिकलेले फळ जो घेतो त्याला त्या फळापासून रसही मिळतो. तसेच बीपासून पुन्हा फळही मिळते.

७) मनुष्यामध्ये चारित्र्य, शीलसंपन्नता ही प्रमुख महत्त्वाची आहे. ज्याचे शील नष्ट होते, त्याच्या जन्माचा, संपत्तीचा व बांधवांचाही काहीच उपयोग नाही.

८) बालपणी (आधीच्या आयुष्यात) अशी कृत्ये करावी की ज्यामुळे वृद्धावस्थेत सुखी जीवन जगता येईल. सर्व आयुष्यात अशी कृत्ये करावी की मृत्यूनंतर सुखाने राहता येईल. (मोक्षप्राप्ती होईल.)[७०]

वानगीदाखल दिलेल्या या विचारांवरून विदुराचा शहाणपणा, मूल्यांवरची त्याची श्रद्धा व विवेकीवृत्ती या गुणांचे दर्शन होते.

महाभारतकालीन शिक्षणपद्धतीबद्दल खालील मुद्दे, वरील विवेचनावरून लक्षात येतील.

१) शिक्षण देण्याची प्रमुख जबाबदारी ही ब्राह्मण वर्णाची मानली होती. केवळ वेदविद्याच नव्हे तर इतर विद्यांचे अध्यापनही त्यांनी करावे. ही गोष्ट मान्य होती. राजे लोक त्यांच्या चरितार्थाची व्यवस्था करीत असत.

---

६९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अ. ३३)

७०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व विदुरनीती (प्रजागरपर्व) (अ. ३३ ते ४०)

२) त्रैवर्णिकांच्या प्रत्येक मुलाने शिकलेच पाहिजे हा नियम होता. त्यासाठी धर्मात उपनयन हा संस्कार महत्त्वाचा मानला जाई. भोजनाची व राहण्याची सोय गुरूगृहीच असे. परंतु विद्याशुल्काची सक्ती नव्हती. मात्र गुरूशिवाय वेदविद्या शिकू नये हा समज होता. 'यवक्रीताने गुरूशिवाय अध्ययन केले म्हणून त्याला दु:ख भोगावे लागले ही कथा वनपर्वात आली आहे. (७१)

३) शूद्रांना वेदविद्या शिकण्याचा अधिकार नव्हता. परंतु इतर विद्या शिकण्यास हरकत नव्हती.

४) क्षत्रियांना मुख्यत्वे धनुर्वेद व राजनीती यांचे शिक्षण आवश्यक होते. तर वैश्यांना कृषी, गोरक्षण, व्यापार यांचे शिक्षण असे.

५) धंदेशिक्षण हे पितापुत्र परंपरेने मिळत असे.

६) स्त्रियांना घरच्याघरी पिता, वडील भाऊ किंवा विद्वान अतिथी यांच्याकडून धार्मिक शिक्षण मिळत असे.

### ३) कौटिल्याच्या काळातील शिक्षणपद्धती –

कौटिल्याच्या काळामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी वर्णव्यवस्था महाभारत कालाप्रमाणेच निश्चित अशी होती.

तसेच ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम हे चार आश्रमही निश्चित होते. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ प्रधान मानले जात.

कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये अधिकरण १ मधील अध्याय दोन, तीन, चार व पाच या अध्यायांमध्ये कौटिल्याने शिक्षण–म्हणजेच विद्या याची चर्चा केली आहे.

अध्याय दोनमध्ये विद्या किती प्रकारची आहे याबद्दल पूर्वीच्या विद्वानांची मते सांगून त्यानंतर कौटिल्याने स्वत:चे मत सांगितले आहे.

मनूचे चार अनुयायी वेदविद्या, वार्ता आणि सामदामदण्डात्मक नीती अशा तीन विद्या मानतात. बृहस्पतीचे अनुयायी दंडनीती व राजनीती अशा दोन विद्या मानतात. त्यांच्या मते वेदविद्या ही व्यवहारचतुर अशा माणसाची कला आहे. तर शुक्राचार्यांचे अनुयायी राजनीती ही एकच विद्या मानतात. राजनीतीत सर्व विद्यांचा बीजरूपाने समावेश होतो असे त्यांचे मत आहे.

कौटिल्याच्या मते तर्कशास्त्र, वेदविद्या, शेती वगैरे अर्थशास्त्र आणि राजनीती अशा चार विद्या आहेत.

---

७१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अ. १३८)

'आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता, दण्डनीतिश्चेति विद्या: । चतस्त्र: एव विद्या: इति कौटिल्य: । [७२]

ज्या विद्येमुळे धर्म आणि अधर्म, अर्थ आणि अनर्थ समजतो अशी जी विद्या तीच खरी विद्या होय. वेदविद्येमुळे धर्म आणि अधर्म समजतो. वार्ताशास्त्रामुळे अर्थ आणि अनर्थ समजतो. याचा अर्थच या विद्यांमुळे माणसामधील विवेकबुद्धी ही जागृत होऊन तिची चांगली वाढ हेच या विद्याध्ययनाचे मुख्य असे कार्य होय. मूल्यशिक्षण हे यामुळेच होऊन मनुष्य सदाचारी बनणे हाच कौटिल्याच्या मते विद्या शिकण्याचा मुख्य उद्देश आहे.

सांख्ययोग आणि तर्कशास्त्र मिळून आन्विक्षिकी विद्या होते. तर राजनीतीमध्ये न्याय, अन्याय याचा विचार येतो. यामुळे उत्कर्ष वा अपकर्ष यात बुद्धी स्थिर राहते. विचार, उच्चार व आचार यात चातुर्य येते असे कौटिल्याचे मत आहे. त्यामुळेच आन्विक्षिकी विद्या ही सर्व विद्यांमध्ये प्रमुख मानली आहे.

यानंतर पहिल्या अधिकरणाच्या तिसऱ्या अध्यायात या विद्यांचे उपयोग सांगितले आहेत. वेदत्रयी ही चारही वर्णांचे तसेच चारही आश्रमांचे धर्म निश्चित करते. त्यामुळे वेदत्रयीचे अध्ययन अतिशय महत्त्वाचे व उपकारक मानले आहे. यानंतर चारही वर्णांचे धर्म सांगितले आहेत. [७३]

ब्राह्मणांचा स्वधर्म अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह हा सांगितला आहे.

क्षत्रियांचा अध्ययन, यजन, दान, शस्त्र बाळगणे व सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करणे हा आहे.

अध्ययन, यजन, दान, शेती, व्यापार व पशुपालन हा वैश्यांचा धर्म आहे.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांना वेदाध्ययन करण्याचा अधिकार आहे.

आतापर्यंत शूद्रांनी त्रैवर्णिकांची सेवा करावी असा त्यांचा धर्म सांगितला जात असे. मात्र कौटिल्य सेवाधर्म करत असताना त्याबरोबरच कारागिरीची कामे त्यांनी करावी असे सांगतो. [७४] शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार मात्र नाही. यानंतर अध्याय ३ मध्ये चारी आश्रमांचे धर्मही कौटिल्याने सांगितले आहेत. [७५]

ब्रह्मचर्याश्रमात अध्ययन, होमहवन, गुरूसेवा व आश्रम बंधूची सेवा या धर्माचे पालन करावे.

गृहस्थाश्रमात वर्णाला अनुरूप असा व्यवसाय, पतिधर्माचे पालन, देव, पितर, अतिथी, सेवक यांना तृप्त करून नंतर भोजन या धर्माचे पालन करावे.

जटा, अजनादिकांचे धारण,अग्निहोत्र, स्नानसंध्या, देव, पितर, अतिथी यांची सेवा, फळमूळांचा आस्वाद हा वानप्रस्थ या आश्रमात प्रवेश केलेल्यांचा धर्म आहे.

---

७२) कौ.अ. (१.२.१)

७३) कौ. अ. (अधिकरण १ अध्याय ३)

७४) कौ. अ. (अधिकरण १, अध्याय ३)

७५) कौ. अ. (अधिकरण १, अध्याय ३)

तर इंद्रियनिग्रह, कर्मासंबंधी. अनासक्ती, निष्काञ्चनता, भिक्षाटन व अरण्यात निवास हा संन्यासाश्रमी लोकांचा धर्म आहे.

सर्व वर्ण व सर्व आश्रम या सर्वांनी अहिंसा, सत्य, अस्तेय, शौचम्, अनसूया, आनृशंस्य, क्षमा हे गुण आचरणात आणलेच पाहिजेत असे कौटिल्याने सांगितले आहे. (७६)

'स्वधर्म: स्वर्गीय आननन्याय च । तस्यातिक्रमे लोक: संकरात् उच्छिद्येत ।' (७७)

(अर्थ – स्वधर्माचे पालन करण्यानेच स्वर्गप्राप्ती होते. तसेच मोक्ष मिळतो. स्वधर्माचे उल्लंघन करण्याने वर्णसंकर होतो. त्या समाजाचा वा व्यक्तीचा नाश होतो.)

अर्थातच समाजामध्ये सर्वांनी स्वधर्मांचे योग्य पालन करावे यासाठी दण्डनीतीचे किंवा राजनीतीचे योग्य शिक्षण राजाने घेणे आवश्यक आहे. कारण यामुळेच तीनही विद्यांचे (वेदत्रयी, आन्विक्षिकी व वार्ता) अध्ययन व अध्यापन योग्य तऱ्हेने होऊ शकते. राजाने प्रजेला योग्य ते शिक्षण (विनय हा शब्द कौटिल्याने शिक्षण याअर्थी वापरला आहे.) मिळण्याची तजवीज करावी. राजशासन अतिशय कठोर असेल तर प्रजा उद्विग्न होते. राजशासन अतिमृदु असेल तर प्रजेमध्ये मात्स्यन्याय बळावतो. सबल लोक दुर्बलांचे शोषण करतात. म्हणून सुविहित अशा शासनाने राजाने सर्व वर्णातील व सर्व आश्रमातील लोकांचे रक्षण करावे. असे राजशासन प्रजेला धर्मपूर्वक अर्थ व काम या पुरुषार्थांची प्राप्ती करण्यास प्रवृत्त करते. (७८)

ज्या व्यक्तीच्या जवळ आज्ञाधारक वृत्ती, अभ्यास, ग्रहणशक्ती, धारणाशक्ती, विवेक व तर्कशक्ती हे गुण असतात. तसेच जो तैलबुद्धीचा असतो तोच योग्य ती विद्या प्राप्त करून घेऊ शकतो. (७९)

विद्येने ज्याच्या अंगी विनीतवृत्ती आली आहे. असा राजाच प्रजेच्या विद्याध्ययनाच्या बाबतीत दक्ष राहतो. तोच पृथ्वीचे शासन करू शकतो. असा राजा सर्व प्राणीमात्रांचे कल्याण करण्यात सदैव मग्न असतो. (८०)

तसेच धर्माच्या (कर्तव्याचरणाच्या) विरोधी जाऊन अर्थप्राप्ती किंवा इच्छापूर्ती ही करू नये. परंतु सुखोपभोग न घेता त्याने आचरण करावे असा त्याचा अर्थ नव्हे असे कौटिल्याचे मत आहे. (८१)

---

७६) कौ. अ. (अधिकरण १, अध्याय ३.१३)

७७) कौ. अ. (अधिकरण १, अध्याय ३.१४.१५)

७८) कौ. अ. अधिकरण १ (अध्याय ३, १६.१७).

७९) कौ. अ. अधिकरण ४ .

८०) कौ. अ. अधिकरण ५. (१६, १७).

८१) कौ. अ. अधिकरण ७ ( ३ व ४).

अथातच् कौटिल्याने अर्थाला प्रमुख स्थान दिले आहे. कारण संपत्तीशिवाय राजशकट हा व्यवस्थित चालू शकत नाही.

कौटिलीय अर्थशास्त्राच्या सहाव्या अध्यायात इंद्रियाजयाचे म्हणजेच 'दम' या मूल्याचे महत्त्व वर्णन केले आहे. या अध्यायात पंञ्चेन्द्रियांच्या आहारी जाऊन काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्‌रिपुंना बळी पडल्यामुळे ज्यांचा सर्वनाश झाला अशा अनेक राजांची उदाहरणे दिली आहेत. भोजकुलातील दांडक्य राजा, तसेच वैदेह कुलातील कराल राजा हे कामवश झाल्यामुळे त्यांनी अधर्माचरण केले. म्हणून त्यांचा नाश झाला. क्रोधाच्या आहारी जाऊन ब्राह्मणांशी अमर्यादिने वागणारा जनमेजय राजा, तसेच तालजध राजा यांचाही नाश झाला. तसेच राज्यलोभामुळे कौरवांचा, उन्मत्तपणाने यादवांचा, गर्वामुळे रावणाचा नाश झाला. या सर्वांचा नाश त्यांचा आपल्या इंद्रियांवर ताबा नसल्याने झाला. यासाठी केवळ राजाच नव्हे तर कोणत्याही माणसासाठी इंद्रियांवर जय हा अत्यंत महत्त्वाचा असा गुण आहे असे कौटिल्य सांगतो. [८२]

वरील सर्व विवेचनावरून मूल्ये व सदाचार यांना जीवनात किती महत्त्वाचे स्थान होते हे लक्षात येते. वेद उपनिषदांचा काळ, महाभारत–रामायणाचा काळ ते थेट कौटिल्याचा काळ या सर्व काळात सदाचार व त्यात अंतर्भूत असणाऱ्या सर्व मूल्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. तसेच हे मूल्यांचे व सदाचरणाचे संस्कार शिक्षणाच्या काळात केले जात असत, नव्हे ते तसे केले जावेत हेच अपेक्षित होते ही गोष्ट स्पष्ट होते.

यानंतर मोगल राजवट व इंग्रजी राजसत्ता यांच्या काळात शिक्षणामध्ये मूल्यांच्या संदर्भात किंवा शिक्षणामध्ये मूल्यांचा अंतर्भाव असावा यादृष्टीने काही फार विचार झाल्याचे दिसत नाही. मुगल राजवटीत मदरशांमधून प्रामुख्याने धार्मिक शिक्षणावर भर होता. इंग्रजी राजवटीत शक्यतो शासनव्यवस्थेला ज्याची मदत होईल असे लोक तयार करण्याचे शिक्षण प्रामुख्याने दिले जात असे.

### आधुनिक राष्ट्रीय मूल्यशिक्षणाची पार्श्वभूमी :–

१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. १९५० साली भारताची राज्य घटना आस्तित्वात आली. भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले.

भारताच्या राज्यघटनेच्या कलम २८ व कलम ३० यामध्ये नैतिक व धार्मिक शिक्षणासंबंधी

---

८२) कौ. अ. अधिकरण १ ले, (अध्याय ६ ).

खुलासा करण्यात आला आहे. यात अनुच्छेद २६ ते ३१ यामध्ये धर्मस्वातंत्र्याचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून मानला गेला आहे.

कलम २८ व ३० नुसार प्रत्येक व्यक्तीला सद्सद्विवेकबुद्धीने वागण्याचे स्वातंत्र्य, तसेच धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. कोणताही मनुष्य आपल्या धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहू शकतो. एखाद्या विशिष्ट धर्माचे संवर्धन करण्यासाठी देणगी घेऊ शकतो. तसेच एखाद्या विवक्षित शिक्षणसंस्थेत धार्मिक शिक्षणासाठी किंवा एखाद्या धार्मिक उपासनेसाठी उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्यही त्याला घटनेने दिले आहे. (८३)

अर्थात धर्मनिरपेक्षता हे धोरण भारताने स्वीकारलेले असल्याने कोणत्याही धार्मिक शिक्षणाद्वारा नैतिक शिक्षण अथवा मूल्यांचे शिक्षण व्यक्ती घेऊ शकते.

धर्म शब्दाचे कर्तव्य, सदाचरण, कायदा, नीतीनियम अथवा उपासनापद्धती असे विविध अर्थ आहेत. 'धर्मनिरपेक्षता' या शब्दातील धर्म शब्दाचा अर्थ उपासनापद्धती असा आहे. त्यामुळे कोणत्याही उपासनापद्धतीद्वारा नैतिक अथवा मूल्यांचे शिक्षण व्यक्ती घेऊ शकते.

'मूल्यशिक्षणात आध्यात्मिक व नैतिक संस्कार अभिप्रेत आहेत. सुसंस्कृत मानवी जीवनाच्या दृष्टीने नियमन करणारी जी महत्त्वाची जीवनमूल्ये आहेत त्यांचे संस्कार करणे म्हणजे मूल्यशिक्षण होय.' अशी मूल्यशिक्षणाची व्याख्या केली आहे. (८४)

१) यानंतर १९४८–४९ या वर्षात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना झाली. 'धर्मनिरपेक्षता हे तत्त्व आचरणात येण्यासाठी उच्च शिक्षणामध्ये सर्व धर्मांच्या मूलभूत तत्त्वांचे शिक्षण समाविष्ट करावे अशी शिफारस या आयोगाने केली. सर्व–धर्म–समभाव प्रत्यक्षात आणण्यासाठी या शिक्षणाद्वारा सामाजिक, नैतिक व धार्मिक मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न करावा असे या आयोगाने सुचविले. (८५)

२) यानंतर १९५२ – ५३ साली मुदलियार समिती स्थापन झाली. माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात या आयोगाने काम केले.

भारताने धर्मनिरपेक्ष लोकाशाही राज्यव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे यासाठी आवश्यक व पोषक अशा, व्यक्तिमत्त्वातील सवयी, हेतु यांनी युक्त अशा सुजाण नागरिकत्वाची घडण शिक्षणाद्वारा व्हावी

---

८३) भारतीय संविधान – पृ.क्र. १० व ११ – कलम २८ व ३०.

८४) मूल्यांचे शिक्षण – शि. ह. पु. (१ ली ते ८ वी) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.

८५) मराठी विश्वकोश – खण्ड १८ वा, पृ.क्र. ९८ ते १००.

असे या समितीने प्रतिपादन केले.

शिस्त, सहसंवेदना, सहनशीलता, सहकार्य, देशभक्ती या विविध गुणांचे संवर्धन माध्यमिक शिक्षणाद्वारा केले जावे. यातूनच वैश्विक नागरिकत्वाची कल्पना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी असे या समितीने प्रतिपादन केले.

यासाठी हे संस्कार होण्याची तीन स्थाने समितीने प्रतिपादन केली. (१) कुटुंब, (२) शाळा व शिक्षक (३) समाजातील लोकांचे आचरण. (८६)

मात्र या समितीने नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची आवश्यकता प्रतिपादन केली तरी त्यासाठी ठोस असा कोणताच कार्यक्रम दिला नव्हता.

हे सर्व सांगितले गेले तरी विद्यार्थ्यांमधील वाढती बेशिस्त, विविध धार्मिक अशा गटातील तेढ या गोष्टी वाढल्याने हा चिंतेचा विषय बनला. धर्मनिरपेक्षता या तत्त्वाने धर्माधर्मातील परस्पर सामंजस्य व सलोखा यांची वाढ न होता परस्परांबद्दल संशयाचे वातावरण व संघर्ष याचेच ते कारण होते की काय असे वाटू लागले.

३) यामुळे यावर विचार करण्यासाठी व शिक्षण प्रक्रियेमध्ये योग्य नियोजन करण्यासाठी १९५९ साली श्री. श्रीप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली.

शिक्षणाची तीन उद्दिष्टे या समितीने सांगितली. ती खालीलप्रमाणे –

१) आवश्यक अशी ज्ञानप्राप्ती.

२) चारित्र्याची घडण करण्यासाठी संस्कारांची प्राप्ती.

३) योग्य त्या व्यवसायाची निवड.

मात्र 'धार्मिक शिक्षण हे चारित्र्याची घडण करण्यासाठी आवश्यक' हे शब्द या समितीने वापरले नाहीत. 'धर्म' या शब्दाने निर्माण होणारी घटनात्मक अडचण टाळण्यासाठी त्याऐवजी 'नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार' असे शब्द वापरले गेले. (८७)

'इतरांशी योग्य रीतीने वागण्यासाठी ज्यांची मदत होते ती नैतिक मूल्ये होत.

तसेच इतरांकरिता किंवा श्रेष्ठ प्रतीच्या उदात्त हेतुसाठी नि:स्वार्थपणे व कल्याण भावनेने वागण्याची व त्यागाची प्रेरणा ज्या मूल्यांतून मिळते ते आध्यात्मिक मूल्य होय.' अशी नैतिक मूल्य व आध्यात्मिक मूल्य यांची व्याख्या या समितीने केली आहे. (८८)

---

८६) मुदलियार समितीचा अहवाल – पृ.क्र. २३ ते पृ. क्र. २७

८७) 'Education in Democracy' – श्री. श्रीप्रकाश पृ.क्र. १२५.

८८) नीतीमूल्ये व शिक्षण – पृ. क्र. ३०.

प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठातील शिक्षणापर्यंत उद्याचा आदर्श नागरिक घडवून त्याच्या मदतीने देशाचे ऐक्य, अखंडत्व व स्वातंत्र्य टिकविण्याचे अमोल साधन नैतिक व आध्यात्मिक शिक्षण हेच ठरेल' असे या समितीने अहवालाच्या शेवटी म्हटले आहे.

यादृष्टीने या समितीने नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या संस्कारांसाठी प्राथमिक स्तरापासून ते विद्यापीठीय स्तरांपर्यंत ठोस असे कार्यक्रम सुचविले आहेत.

४) यानंतर १९६४ ते ६६ या साली स्थापन झालेला कोठारी आयोग हा अहवाल शैक्षणिक मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. या आयोगाने राधाकृष्णन् समितीच्या शिफारशींचा पुन्हा उल्लेख केला. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे शिक्षण हे धर्मनिरपेक्ष लोकशाही स्वीकारलेल्या देशासाठी अतिशय आवश्यक आहे हे श्रीप्रकाश समितीचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे.असेही कोठारी आयोगाने म्हटले आहे. [८९]

## आध्यात्मिक शिक्षण – नैतिक शिक्षण – धार्मिक शिक्षण – धर्मनिरपेक्षता

१) शिक्षणाविषयी विविध समित्यांची मते – [९०]

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर स्वतंत्र भारतात शिक्षण कसे असावे यासंबंधी विचार सुरु झाला. यासाठी विचार करताना १९४८ सालच्या राधाकृष्णन् समितीने सर्वप्रथम उच्च शिक्षणात सामाजिक, नैतिक व धार्मिक मूल्ये बिंबविण्याच प्रयत्न करावा असे सुचविले.

यानंतर १९५२ सालची मुदलियार समिती, १९५९ सालची श्रीप्रकाश समिती यांनीही शिक्षणात नैतिक व धार्मिक मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न करावा असे सुचविले.

यानंतर १९५२ सालची मुदलियार समिती, १९५९ सालची श्रीप्रकाश समिती यांनीही शिक्षणात नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची आवश्यकता प्रतिपादन केली.

१९६४–६६ या काळात शिक्षणासंबंधी विचार करण्यासाठी स्थापन झालेला 'कोठारी आयोग' हा यासंबधात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या आयोगाने राधाकृष्ण् समिती, तसेच श्रीप्रकाशसमिती यांच्या शिफारशींचा पुन्हा आवर्जून उल्लेख केलाच, परंतु त्याचबरोबर शिक्षणाचे

---

८९) कोठारी आयोग अहवाल – नैतिक व आध्यात्मिक शिक्षण (१–७६) पृ. क्र. २०.

९०) अ) मुदलियार समिती अहवाल –पृ.क्र. २३ ते २७.

ब) श्री श्रीप्रकाश समिती – Education in democracy P.No. 125.

क) कोठारी आयोग अहवाल – नैतिक व आध्यात्मिक शिक्षण (१.७६) पृ. क्र. २०.

आधुनिकीकरण करताना तंत्रज्ञानाबरोबरच नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कारही अतिशय आवश्यक आहेत असे प्रतिपादन केले.

यासाठी आध्यात्मिक शिक्षण, नैतिक शिक्षण तसेच धार्मिक शिक्षण या संकल्पनांचे अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे.

१) आध्यात्मिक शिक्षण – आध्यात्मिक यात अंतर्भूत असणारा शब्द म्हणजे अध्यात्म हा होय. गीर्वाणलघुकोश हा जो संस्कृत–मराठी शब्दकोश त्यामध्ये अध्यात्म शब्दाचा अर्थ 'आत्मा' अथवा 'मन' असा दिला आहे. [९१]

'आत्मन्' शब्दाची व्युत्पत्ति खालीलप्रमाणे सांगितली जाते. जी दोन प्रकारांनी आहे.

१) आत्मन् – आत्मानमधिकृत्य यत् तत्।

तत् ज्ञानम् नाम आत्मज्ञानम्।

यामध्ये शरीरातील प्राणतत्त्व असा जो आत्मा–जीव, तसेच भोवतालचे जग, तसेच विश्वाचे नियमन करणारे ब्रह्म– अंतिम तत्त्व यांच्या परस्परसंबंधाविषयी विचार केलेला असतो. वेगवेगळ्या प्रकारे हा संबंध स्पष्ट करणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखा यातून निर्माण झाल्या आहेत. हेच आत्मज्ञान सांगणारे तत्त्वज्ञान होय. जे बुद्धिवादी लोकांचे शास्त्र आहे. [९२]

२) 'आत्मन्' शब्दाची दुसरी व्युत्पत्ती अशी आहे.

'आत्मन: अधिष्ठानम् यद्, तद् नाम शरीरम्।' अशी दिली जाते.

'आत्मन: अधिष्ठानम्' म्हणजे आत्म्याचे निवासस्थान. म्हणजेच शरीर होय. जे चक्षु (नेत्र), श्रोत्र (कर्ण), नासिका (नाक), जिव्हा (जीभ) व त्वक् (त्वचा) अशा पाच ज्ञानेन्द्रिंनी बनले आहे. या पञ्च ज्ञानेंद्रियांचे विषय रूप, शब्द, गंध, रस व स्पर्श हे आहेत. तशीच शरीरात पाच कर्मेंद्रिये आहेत. ती अनुक्रमे वाक् (वाणी), पाणि (हात), पाद (पाय), वायु (उत्सर्जन संस्था), व उपस्थ (जननेंद्रिये) अशी आहेत. यांची कार्येअनुक्रमे बोलणे, कृती करणे, चालणे, उत्सर्जन व पुनरूत्पत्ती ही आहेत. मात्र प्राणतत्त्वाशिवाय यांचे कोणतेच कार्य होऊ शकत नाही. त्यामुळे आत्मा व शरीर हे दोन्ही परस्परपूरक आहेत. [९३]

या दोन्हीच्या साहाय्यानेच मनुष्याला आध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ती होते. फार प्राचीन काळापासून

---

९१) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

९२) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

९३) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

मनुष्याला 'मी कोण आहे ?' ' हे भोवतालचे जग म्हणजे काय आहे ? विश्वाचे नियमन करणारी शक्ती कोणती ? यांचा परस्परसंबंध काय ? हे प्रश्न पडले आहेत. यांचा परस्परसंबंध जाणून घेण्याचा प्रयत्न मनुष्य पूर्वीपासून करत आला आहे.

भारतीय परंपरेनुसार विश्वाचे नियमन करणारे अंतिम तत्त्व 'ब्रह्म–परब्रह्म' हे मानले गेले आहे. यासंबंधीचे जे ज्ञान ते आध्यात्मिक ज्ञान होय. भारतीय तत्त्वज्ञानानुसार 'नि:श्रेयसप्राप्ती' अथवा मोक्ष हे परमोच्च ध्येय मानले गेले आहे, ज्या ध्येयाची प्राप्ती आध्यात्मिक ज्ञानामुळेच होते. मात्र हे ज्ञान करून घेण्यासाठी व मोक्षप्राप्ती होण्यासाठी 'सदाचरण' अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. म्हणजेच 'सत्य' अहिंसादि चिरंतन मूल्यांच्या संस्कारांनी सुरू असे नैतिक आचरण आवश्यक ठरते. [९४]

नैतिक म्हणजे नीतीने, म्हणजे चिरंतन मूल्यांनी संस्कारित असे शिक्षण होय. म्हणजेच सदाचाराचा संस्कार ज्यातून होतो असे शिक्षण ! मात्र नीती हा शब्द 'वेगवेगळ्या क्षेत्रात आचरणात आणावयाची, वागण्याची विशिष्ट पद्धत, अथवा 'व्यवस्था' अशा अर्थानेही येतो. जसे 'राजनीती, अर्थनीती, सामाजिक नीती इत्यादि. त्यामुळे केवळ 'न्याय्य वर्तनाची पद्धत' अथवा 'सदाचार' या अर्थाने नैतिक शिक्षण हा शब्द अडचणीचा ठरतो.

तीच गोष्ट 'धार्मिक शिक्षण' यातील 'धार्मिक' शब्दाबद्दल आहे.

'धर्म हा शब्द थेट वेदकालापासून ते अर्वाचीन काळापर्यंत वेगवेगळ्या अर्थांनी वापरलेला आढळतो. 'गीर्वाणलघुकोशात 'धर्म' शब्दाचे विविध अर्थ दिले आहेत. जसे संप्रदाय, चाल, पुण्यकर्म, आचार, कायदा, न्याय, नीती इत्यादी. [९५]

वेदकालात धर्म शब्दाचा अर्थ 'पोषक तत्त्व, नैतिक कायदे, आचार, आचाराची निश्चित तत्त्वे, वरूणाचे नीतीनियम' अशा प्रकारे भिन्न भिन्न अर्थांनी आला आहे. [९६]

उपनिषद्कालात मानवाचे विशिष्ट अधिकार किंवा कर्तव्ये, वर्णाश्रमानुसार आचरणात आणावयाचे नियम असा आहे. [९७]

भगवद्गीतेत माणसाची विहित कर्तव्ये याअर्थी 'धर्म' शब्दाचा उल्लेख केला आहे. [९८]

---

९४) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश खण्ड १ ला.

९५) गीर्वाणलघुकोश पृ.क्र. २५१

९६) ऋग्वेद (मण्डल १, ४, ६, १०)

९७) तैत्तिरीय उपनिषद (११.१)

९८) गीता (३.३५)

तर समाजाला एकत्रित जो बांधून ठेवतो तो धर्म असे भीष्माचार्यांनी महाभारतात म्हटले आहे. धार्मिक शिक्षणात त्यामुळे अशा सदाचरणास प्रवृत्त करणाऱ्या सत्य, अहिंसा, दान, दया, दम, या चिरंतन मूल्यांचा समावेश होतो. [९९]

भारतीय राज्यघटनेने 'धर्मनिरपेक्षता' हे धोरण स्वीकारले आहे. त्याठिकाणी मात्र 'धर्म' हा शब्द 'विशिष्ट उपासनापद्धती' या मर्यादित अर्थानेच वापरला आहे. म्हणजे 'धर्मनिरपेक्षता' या शब्दातील 'धर्म' शब्दाने हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध, जैन अशा विविध उपासनापद्धतींचा निर्देश केला जातो.[१००]

यानुसार प्रत्येकाला आपापल्या श्रद्धेनुसार कोणत्याही उपासनापद्धतीचा स्वीकार, आचरण व अवलंबन करण्याचे स्वातंत्र्य घटनेने बहाल केले आहे. कोणत्याही व्यक्तीला विशिष्ट उपासनापद्धतीची सक्ती कोणावरही करता येणार नाही, असे घटनेने नमूद केले आहे.

तेव्हा 'धर्म' हा शब्द अत्यंत मर्यादित अर्थाने घटनेत घेतला आहे, असे लक्षात येते. 'धर्म' या शब्दाने निर्माण होणारी घटनात्मक अडचण टाळण्यासाठी 'धार्मिक शिक्षण' या शब्दाऐवजी 'आध्यात्मिक व नैतिक शिक्षण' असे शब्द सर्वच आयोगांनी वापरले आहेत.

हे शिक्षण देणे म्हणजेच सत्य, अहिंसादि चिरंतन मूल्यांचा संस्कार करणे. म्हणूनच 'मूल्यशिक्षण' या शब्दाचा उपयोग केला आहे. ज्यामुळे सदाचरणाचा संस्कार होतो.

समाजात सुव्यवस्था व शांतता राहून समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालण्यासाठी 'मूल्यशिक्षण' अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे ठरते.

'आधुनिकीकरण म्हणजे नैतिक व आध्यात्मिक मूल्ये आणि आत्मसंयमन यांचे महत्त्व नाकारणे नव्हे. तर उलट त्यासाठी लागणारी चैतन्यशक्ती यामधून मिळू शकते. तंत्रज्ञानातून विकसित होणारी कौशल्ये, तसेच नीती आणि धर्म यातून विकसित होणारी जीवनमूल्यविषयक अंतर्यामी दृष्टी यांच्यात समतोल राखला जावा.

'धर्मनिरपेक्षता म्हणजे अधार्मिकता किंवा धर्मविरोध नव्हे किंवा धर्माचे महत्त्व कमी करणे नव्हे. प्रत्येक नागरिकाला आपाल्या श्रद्धेनुसार धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे. त्यातून सर्व धर्मांप्रती सहिष्णुता व आदरभाव ठेवण्याचे कार्य शिक्षणातून साधले जावे.

---

९९) BORI प्रमाणित प्रत म.भा. (१२.१०९.१)

१००) भारतीय संविधान – कलम २८.३०.

भारतासारख्या अनेक धर्मीय लोकशाही राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अहिंसा, सहनशीलता–संयम इत्यादि नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता आहे. यादृष्टीने उच्च शिक्षणात प्रथम वर्षापासून वेगवेगळ्या धर्मातील मूलभूत तत्त्वांचा तौलनिक अभ्यास अभ्यासक्रमात ठेवला जावा. असेही या समितीने सुचविले आहे. (१०१)

५) १९६८ साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. त्यापूर्वी १९६७ साली संसद सभासदांची एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने (१) मानवतावाद, (२) आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन (३) चारित्र्यनिर्मितीसाठी उपयुक्त शिक्षण यावर भर दिला. तसेच शालेय व सहशालेय उपक्रमातून नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करण्यावर विशेष भर दिला.

६) १९७५ साली 'राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद' या संस्थेने दहा वर्षाचा शिक्षणक्रमाचा आराखडा प्रकाशित केला. यात राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक न्याय, सत्य, समता, विज्ञाननिष्ठा यासारख्या नैतिक व सामाजिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी मूल्यशिक्षणावर भर दिला गेला.

७) न्यायमूर्ती व्ही.एम्. तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने १९७८ ते १९८७ या दहा वर्षासाठी शिक्षणाचे धोरण निश्चित केले. त्यामध्ये आधुनिक जीवनदृष्टी व नवसमाजनिर्मिती यादृष्टीने मूल्यसंस्कार केले जावेत असे प्रतिपादन केले आहे. यादृष्टीने शैक्षणिक व शारीरिक श्रमातील समतोल, चारित्र्यसंवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपोष व सांस्कृतिक मूल्यांचा परिपोष यावर भर देण्यात आला आहे.

८) यानंतर मे १९८१ मध्ये सिमला येथे नैतिक शिक्षण याबद्दल एक चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रात शिक्षणातून व्यक्तीच्या अंगी सत्य, न्याय, प्रेम, सहकार्य व अहिंसा ही मानवी मूल्ये रूजवायला हवीत असे प्रतिपादन करण्यात आले.

९) या चर्चासत्रानंतर यातील धोरणाचा पाठपुरावा करण्यासाठी ऑगस्ट १९८१ मध्ये औरंगाबाद येथे एक चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रानंतर महाराष्ट्र शासनाने जानेवारी १९८३ ते मार्च १९८३ या कालावधीत शिक्षणतज्ज्ञांच्या साहाय्याने तीन कृतीसत्रांचे आयोजन करून नैतिक शिक्षणाची एक मार्गदर्शन पुस्तिका तयार केली. (१०२)

---

१०१) कोठारी आयोग अहवाल (१.७६) पृ. क्र. २०.

१०२) शि. ह. पु. ( ९वी, १० वी, ) पृ.क्र. १ ते ३.

१०) यानंतर ऑगस्ट १९९९ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यामिक शिक्षण मंडळाने इयत्ता नववी व इयत्ता दहावीच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मूल्यशिक्षणाची एक शिक्षक हस्तपुस्तिका तयार केली. तसेच मार्च २००४ मध्ये 'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने इयवा पहिली ते इयत्ता आठवीच्या शिक्षकांसाठी 'मूल्यांचे शिक्षण' अशी मार्गदर्शनपर हस्तपुस्तिका तयार केली.

या दोहोंमध्ये एकंदर १० मूल्ये निश्चित केली आहेत. ती खालीलप्रमाणे [१०३]

१) राष्ट्रभक्ती

२) राष्ट्रीय एकात्मता

३) सर्वधर्मसहिष्णुता

४) स्त्री–पुरुष समानता

५) श्रमप्रतिष्ठा

६) वैज्ञानिक दृष्टिकोन

७) सौजन्यशीलता

८) संवेदनशीलता

९) वक्तशीरपणा

१०) नीटनेटकेपणा

या मूल्यांचा निश्चित अर्थ काय हे पाहणे आवश्यक आहे.

१) राष्ट्रभक्ती –

राष्ट्रभक्ती या मूल्याचा दोन बाजूंनी – दोन प्रकारे विचार करता येतो.

अ) 'हे राष्ट्र – हा देश माझा आहे.' याचा अर्थ माझ्या स्वतःच्या वस्तूबद्दल मला जे प्रेम व जी काळजी वाटते तेच दृढ प्रेम मला माझ्या राष्ट्राबद्दल वाटले पाहिजे. देशाचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय बोधचिन्ह, भारताची राज्यघटना, तसेच थोर राष्ट्रीय व्यक्ती यांच्याबद्दल नितांत आदर व अभिमान हा प्रत्येकच व्यक्तीच्या ठायी असलाच पाहिजे.

ब) तसेच राष्ट्राच्या उन्नतीसाठी आपापल्या शक्तीप्रमाणे–शक्तीनुसार प्रत्येकाने झटले पाहिजे. राष्ट्राचे व त्याच्या मानबिंदूचे रक्षण ही आपली जबाबदारी अशी भावना प्रत्येकाच्या मनात या मूल्याच्या संस्काराने निर्माण करता येईल.

---

१०३) शि. ह. पु. (१ ली ते ८ वी ) पृ.क्र. ६

राष्ट्रभक्तीची व्याख्या – 'म्हणूनच आपला देश, समाज, संस्कृती, परंपरा, साहित्य, कला, राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या बाबी, देशबांधव निसर्ग या सर्वांबद्दल सार्थ अभिमान बाळगणे व त्यानुसार कृती करणे म्हणजेच राष्ट्रभक्ती होय.' (१०४)

२) राष्ट्रीय एकात्मता –

भारत हा विविध भाषा, विविध चालिरीती, वेषभूषा, आहारपद्धती, धर्म, जाती यांनी बनलेला संमिश्र लोकजीवन असणारा, विशाल असा देश आहे. या सर्व प्रकारात भाषा, पोषाख, सणसमारंभ, अन्नप्रकार या सर्वांमध्ये मोठी भिन्नता वेगवेगळ्या प्रांतात आढळून येते.

एकात्मता म्हणजे माणसामाणसांची मने जोडणारी प्रक्रिया होय. इतरांच्या सुखदु:खाशी समरस होण्याची वृत्ती निर्माण झाली की, एकात्मता ही निर्माण होते. आपण सारे एकाच देशाचे नागरिक म्हणजे भारतीय आहोत, ही भावना या सर्व भिन्नतेला एकत्रित बांधणारी भावना आहे. त्यामुळे राष्ट्राची प्रगतीविषयक आपुलकी, राष्ट्रावर संकट आले असता एकजुटीने वागण्याची प्रवृत्ती म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय.

व्याख्या – यामुळे धर्म, वंश, भाषा, चालिरीती, आहारविहार, कला, संस्कृती, क्रीडाप्रकार, सण–उत्सव, भौगोलिक परिस्थिती यात वेगळेपणा असूनही भारताबद्दलची अस्मिता, मानचिन्हांबद्दल आदरबुद्धी असणे, विधायक मार्गाने, परस्पर सहकार्याने, समाजाची उन्नती साधण्याची वृत्ती म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता होय. (१०५)

३) सर्वधर्मसहिष्णुता –

भारतात अनेक वर्षापासून अनेक धर्मांचे लोक राहतात. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारशी असे विविध धर्माचे लोक भारतात आहेत.

भारतीय राज्यघटनेतील कलम २८ व कलम ३० या कलमांनुसार घटनेने प्रत्येकाला वैयक्तिकदृष्ट्या आपापल्या धर्मानुसार वागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. आपली राज्यपद्धती ही धर्मनिरपेक्ष अशी लोकशाही राज्यपद्धती आहे.आपल्या धर्माप्रमाणे दुसऱ्याच्या धर्माबद्दल आस्था बाळगणे,आदर दाखविणे हे शहाणपणाचे धोरण ठरते. यासाठी उदार मनोवृत्ती ठेवूनच स्वत:च्या धर्माचे पालन करणे जरूरीचे आहे. राष्ट्राची प्रगती, विकास, समृद्धी व शांतता हे सर्व सर्वधर्मसहिष्णुता या मूल्यावरच अवलंबून आहे.

---

१०४) मूल्यांचे शिक्षण – शि.ह.पु. (इ. १ ली ते ८ वी) पृ.क्र. २६.

१०५) मूल्यांचे शिक्षण – शि. ह. पु. पृ. क्र. २६.

व्याख्या – प्रत्येकाला आपल्या धर्माबद्दल आपुलकी वाटते. धर्मातील शिकवणुकीबद्दल त्याच्या मनात आदर असतो. तसेच आपल्या धर्माच्या लोकांबद्दल आदरभाव व आपुलकी असते. आपल्या धर्माबद्दल आपल्या मनात असणाऱ्या या भावभावना इतर धर्मीयांच्या मनातही त्यांच्या धर्माबाबत तशाच आहेत. याची जाणीव ठेवणे. या सर्व भावभावना अन्य धर्मियांबद्दल बाळगणे. तसेच समाजात वावरताना त्या आपल्या कृतीतून व्यक्त करणे, सर्वधर्मसहिष्णुता होय. (१०६)

४) स्त्री–पुरुष समानता –

समाजामध्ये अनेक व्यक्ती असतात. स्त्री व पुरुष या दोहोंचा मिळून समाज बनलेला असतो. स्त्री व पुरुष यांच्यामध्ये बौद्धिक भेद नसतो. तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने कार्य करू शकते. गृहिणीपद तर स्त्री अत्यंत कुशलतेने सांभाळते. पण त्याचबरोबर शिक्षण, साहित्य, कला, उद्योगक्षेत्र, राजकारण, शास्त्रीय संशोधन, वैद्यकीय क्षेत्र, स्थापत्य इत्यादि नानाविध क्षेत्रात अनेक स्त्रिया आपल्या बुद्धिमत्तेने व कर्तृत्वाने तळपताना दिसतात. अनेक उच्च पदांवरी जबाबदाऱ्या स्त्रिया लीलया पार पाडताना दिसतात.

प्राचीन काळातील पंडिता गार्गी व मैत्रेयी या तत्त्ववेत्त्या, तसेच झाशीची राणी लक्ष्मीबाई, इतिहासातील जिजाबाई, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले या शिक्षण क्षेत्रातील स्त्रिया, संशोधिका मादाम मेरी क्यूरी या प्रसिद्ध आहेत. अगदी अलिकडच्या काळातील राजकारणात इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, उद्योगक्षेत्रात लीला पूनावाला, अनु आगा, पद्मविभूषण सुमती मोरारजी, अरुंधती भट्टाचार्य या उद्योग क्षेत्रातील अत्यंत नामवंत अशा स्त्रिया आहेत. यांच्याप्रमाणेच नृत्य, गायन–वादनादि कला, अभिनय, अंतराळ, क्रीडा ही क्षेत्रे आपल्या कर्तृत्वाने गाजविणाऱ्या अनेक स्त्रियांची नावे आपणास सांगता येतील. आपल्या राज्यघटनेनेही स्त्री–पुरुष समानता हे तत्त्व मान्य केले आहे. एक स्त्री शिकली तर सर्व कुटुंबास साक्षर करते. सुसंस्कृत व सुशिक्षित करते. यामुळेच राष्ट्रात साक्षरता वाढण्यास मदत होते.

व्याख्या – सर्व मानवजात एक आहे. स्त्री व पुरुष हे समान आहेत, याची जाणीव ठेवून व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय विकास साधला पाहिजे. यासाठी सर्वांना समान संधी, समान हक्क व अधिकार देऊन व्यक्तिमत्त्व विकासाची समान संधी देऊन सहजीवन जगणे म्हणजे स्त्री–पुरुष समानता होय. (१०७)

---

१०६) शि. ह. पु. (इयत्ता १ ली ते ८ वी) पृ. क्र. २४.

१०७) शि. ह. पु. – (इयत्ता १ ली ते ८ वी ) पृ. क्र. २२.

५) श्रमप्रतिष्ठा –

कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी सतत कष्ट व प्रयत्न यांची अत्यंत आवश्यकता असते.

'असाध्य ते साध्य करिता सायास

निश्चयाचे बळ तुका म्हणे ।।

हे संत तुकाराम महाराजांचे वचन प्रसिद्ध आहे. कोणतेही कार्य सिद्धीस नेण्यासाठी कठोर परिश्रमांची अत्यंत गरज असते. यामुळेच व्यक्ती, समाज किंवा राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी इच्छेच्या जोडीला श्रमाची जोड असणे अतिशय आवश्यक आहे. केवळ मनोरथ रचून वा स्वप्ने रंगवून कार्य सफल होत नाही.

शारीरिक कष्टांमुळे बुद्धी सतेज राहते. प्राचीन काळी गुरूगृही राहणाऱ्या शिष्यांना गुरूंच्या घरी जे पडेल ते काम करावे लागे. त्यामुळे नकळतच शारीरिक कष्टांचीही सवय होवून 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य आपोआपच मनावर बिंबत असे.

विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगतीमुळे अनेक कामे यंत्राद्वारा होऊ लागली. अनेक सोयी–सुविधांचा लाभ झाल्यामुळे शारीरिक दृष्ट्या कष्टाचे काम, घरकाम, सफाईकाम याकडे माणसाचे दुर्लक्ष होऊ लागले. ही कामे हलक्या दर्जाची आहेत असे मानण्याची प्रवृत्ती वाढू लागली.

यामुळेच बौद्धिक काम व शारीरिक कष्टाचे काम ही दोन्ही समान दर्जाची आहेत. या दोन्हीलाही समान महत्त्व देण्याचे शिक्षण देणे गरजेचे भासू लागले. हे शिक्षण बालपणापासूनच विद्यार्थ्यांना द्यावे अशी तीव्र गरज निर्माण झाली. यासच श्रमसंस्कार, श्रमप्रतिष्ठा असे नाव दिले गेले.

व्याख्या – कोणतेही शारीरिक कष्टाचे काम हलके किंवा कमी महत्त्वाचे असे न मानता ते हौसेने, मनापासून करणे, तसेच असे काम करणाऱ्या श्रमिकांबद्दल आदर बाळगणे, त्यांचा मान राखून त्यांच्या कामात सहभागी होणे म्हणजेच श्रमप्रतिष्ठा होय [१०८]

६) वैज्ञानिक दृष्टिकोन –

सध्या विज्ञान व तंत्रज्ञान या दोहोंमध्ये कमालीची प्रगती झाली आहे. या दोहोंचा उपयोग स्वयंपाक घरापासून ते थेट अंतराळापर्यंत होत आहे. मानवाने आधुनिक उपकरणांद्वारे आपले जीवन अधिकाधिक सुखकर असे बनविले आहे. या शोधांमुळे अनेक शास्त्रीय सत्ये उघडकीस आली आहेत. परंतु याचा उपयोग समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, चालीरीती, गैरसमज हे दूर करण्यासाठी झाला पाहिजे. परंतु नव्या सत्यांचा

---

१०८) शि. ह. पु. – (इयत्ता १ ली ते ८ वी.) पृ. क्र. १९.

चटकन् स्वीकार करणे माणसाला सहजपणे जमत नाही.

यासाठी वैज्ञानिक विचारपद्धतीचा स्वीकार हा अत्यंत महत्त्वाचा आहे. सृष्टीचे नियम व घटना या शास्त्रीय सत्यावर आधारीत असतात. त्यामुळे कोणत्याही घटनेचा वस्तुनिष्ठ, तर्कसंगत विचार करून योग्य तो निष्कर्ष काढणे यालाच वैज्ञानिक दृष्टिकोन असे म्हणता येईल.

एखादी गोष्ट केवळ ऐकून त्यावर आंधळा विश्वास ठेवणे योग्य नसते. प्रत्यक्ष खात्री करून घेऊन, प्रयोगाच्या कसोटीवर सत्यासत्य पारखून घेणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करणे होय.

व्याख्या – आपल्या आसपास घडणाऱ्या गोष्टींचा तर्कसंगत कार्यकारणभाव मांडणे, तसेच त्यानुसार योग्य ती कृती करणे. म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करणे होय. (१०९)

७) सौजन्यशीलता –

मनुष्ट हा समाजप्रिय प्राणी आहे. तो एकटा नसतो. तर हरघडी त्याला अनेक व्यक्तींच्या कुटुंबामध्ये अथवा समाजामध्ये रहावे लागते. असे अनेक व्यक्तींच्या सहवासात राहणे त्याला आवडते. कुटुंबात अथवा समाजात त्याला अनेक व्यवहार पार पाडावयाचे असतात. अशावेळी संघर्ष टाळून सुरळीत व्यवहार पार पाडणे महत्त्वाचे असते. परस्परांमध्ये सहकार्य राखणे व समंजस वर्तन ठेवणे यामुळे व्यक्तीचा विकास होतो. तसेच समाजाचे हितही साधले जाते. यासाठी आपल्याप्रमाणेच इतरांच्या सुखदु:खाची जाणीव असणे अगत्याचे आहे. इतरांच्या आनंदाने आनंदित होणे, दुसऱ्याचे दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करणे, तसेच दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर बाळगणे. या गुणांचा सौजन्यशीलता या मूल्यात समावेश होतो.

अर्थात् या मूल्याच्या मध्येच आर्जव, नम्रता, मार्दव, विनय या गुणांचा अंतर्भाव होतो. यामुळे मनुष्यामनुष्यांतील संबंध सुरळीत राहतात.

व्याख्या – आपल्या आचारविचारातून बोलण्यातून इतरांबद्दलचा आदरभाव, सद्भाव व्यक्त करणे. तसेच कोणालाही न दुखवता व्यवहार करणे म्हणजेच सौजन्यशीलता होय. (११०)

८) संवेदनशीलता –

ईश्वराने माणसाला पाच कर्मेंद्रिये जशी दिली आहेत, तशीच पाच ज्ञानेंद्रियेही दिली आहेत. रूप, रस,

---

१०९) शि.ह.पु. – (इ. १ली ते ८ वी ) पृ. क्र. १५.

११०) शि.ह.पु. – (इ. १ ली ते ८ वी) पृ. क्र. १७.

गंध, स्पर्श, शब्द अशा पाच संवेदनांचा अनुभव डोळे, जिव्हा, नाक, त्वचा व मुख अशा पाच ज्ञानेंद्रियांनी तो घेतो. याखेरीज मन, अंत:करण, बुद्धी या इतर प्राण्यांपेक्षा अधिक अशी इंद्रिये मनुष्याजवळ आहेत. भावना, विचार व विवेकशक्ती या मानवाला मिळालेल्या ईश्वरदत्त देणग्या त्याच्याजवळ आहेत. अर्थात् मनाचा हळुवारपणा असेल तरच या संवेदनाची जाणीव त्याला होईल. इतरांची सुखदु:खे तो स्वत:च्या सुखदु:खांइतक्याच हळुवारपणे जाणू शकेल. तसेच निसर्गातील सौंदर्य, पशु व पक्षी याबद्दलचा जिव्हाळा, अनाथ व अपंग यांच्याबद्दलची कणव ही संवेदनशीलतेतूनच निर्माण होते. त्यामुळे दया या मूल्याचा संस्कार होण्यासाठी संवेदनशील मनोवृत्तीच उपकारक ठरते.

संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे तर –

दया तेथ धर्मु। धर्मु तेथे सुखागमु।

सुखी पुरुषोत्तमु। असे जैसा ।।

(अर्थ– अशाप्रकारे संवेदनशील मनातून निर्माण झालेल्या दयावृत्तीतून कर्तव्यभावनेचा उदय होतो. कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडले की मन संतुष्ट राहते. सुखाची प्राप्ती होते. हे आनंदी मन म्हणजेच परमेश्वराची प्राप्ती होय.)

सर्व कलाकार, कवी, लेखक, समाजसेवक, देशभक्त, संत यांच्यातील संवेदनशीलता अत्यंत तीव्र असते.

तहानलेल्या गाढवाला काशीयात्रेहून येताना आणलेले गंगाजल पाजणारे संत एकनाथ, कुष्ठरोग्यांसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे बाबा व साधनाताई आमटे, स्त्री शिक्षणासाठी आयुष्य वेचणारे महर्षी कर्वे, ज्योतिबा फुले; बॅरिस्टर सावरकर, महात्मा गांधी यासारखे देशभक्त, भगतसिंग व त्याच्यासारखे क्रांतिकारक ही थोर माणसे संवेदनशील वृत्तीची उत्तम उदाहरणे आहेत. संवेदनशीलता हा उदात्त जीवनाचा पाया आहे. सकारात्मक संवेदनेमुळेच मानवाचा विकास होऊ शकतो.

व्याख्या – बाह्य जगात घडणाऱ्या घटनांचा, प्रसंगांचा, सभोवतालच्या परिसराचा, परिस्थितीचा व सहवासात येणाऱ्या व्यक्तीच्या वागण्याबोलण्याचा व्यक्तीच्या मनावर परिणाम होऊन घडणारी प्रतिसादात्मक कृती म्हणजे संवेदनशीलता होय. [१११]

९) वक्तशीरपणा –

कोणतेही काम योग्य वेळी व योग्य वेळेत पार पाडणे म्हणजे वक्तशीरपणा होय. व्यक्तीचा विकास

१११) शि.ह.पु. – (इ. १ ली ते ८ वी) पृ. क्र. ८.

साधण्याच्या मध्ये वक्तशीरपणा हा गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण व्यवस्थित वेळ पाळल्याने इतरांचा वेळ वाचतो. तसे न केल्यास दुसऱ्याचा अमूल्य असा वेळ वाया जातो. याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला असणे अतिशय महत्त्वाचे आहे. एखाद्या व्यक्तीला दिलेली वेळ कटाक्षाने पाळणे, एखादा समारंभ वेळेवर सुरू करणे, कोणतेही काम त्याचे नियोजन करून योग्य वेळेत पूर्ण करणे यातून वक्तशीरपणा या गुणाचे दर्शन घडते. कोणतेही काम दर्जेदार होणे, आत्मविश्वास वाढणे यासाठीही वक्तशीरपणा हा गुण अंगी बाणणे अतिशय आवश्यक आहे. एकदा गेलेली वेळ परत येत नाही, नंतर त्याबाबतीत पश्चाताप करून काहीच उपयोग होत नाही. यादृष्टीने खालील संस्कृत सुभाषित अत्यंत महत्त्वाचे आहे.

'क्षणश: कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् ।

क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।।

(अर्थ – क्षणाक्षणाने विद्या व कणाकणाने धन मिळवावे.क्षणांचा त्याग केल्यास विद्या कोठून मिळणार ? व कणांचा त्याग केल्यास धन कोठून मिळणार ?)

व्याख्या – वेळेचे महत्त्व जाणून कोणतेही काम वेळेवर करणे, तसेच वेळेचा काटेकोर उपयोग करून सामाजिक आणि राष्ट्रीय हित जोपासणे म्हणजेच वक्तशीरपणा होय. (११२)

१०) नीटनेटकेपणा –

माणसाच्या जीवनात त्याला सौंदर्यदृष्टी असणे अतिशय महत्त्वाचे आहे. याच्याशीच नीटनेटकेपणा हे मूल्य निगडित आहे. हे जसे बाह्यरूपात असणे, बाह्यरूपाच्या बाबतीत आवश्यक आहे. तसचे मनुष्याचे अंतरंगही तसेच असावे हे अपेक्षित आहे. स्वच्छ व नीटनेटके राहणारी व्यक्ती सर्वांना आकर्षित करते. त्यासाठी व्यवस्थितपणा हा गुणही आवश्यक आहे. जसे वस्तू व्यवस्थित व नीटनेटक्या ठेवलेल्या असल्या, मनुष्याचा पोषाख व्यवस्थित असला की मनुष्याचे मन प्रसन्न राहते. तसेच मनुष्याचे विचार, उच्चार व आचार यातही नीटनेटकेपणा हवा. यात समतोलपणा व प्रमाणबद्धता असेल तरच हे शक्य होते. अशा गुणांचा समाजावर प्रभाव पडतो. तसेच सामूहिक जीवनातही नीटनेटकेपणा आवश्यक आहे. सामाजिक स्वच्छतेबाबत हा गुण अतिशय महत्त्वाचा आहे.

सार्वजनिक ठिकाणी – बागा, राष्ट्रीय स्मारके, प्रेक्षणीय स्थळे, रस्ते याठिकाणी स्वच्छता राखणे, कचरा व कागद वाटेल तेथे न फेकणे, सांडपाण्याला योग्य ती वाट करून देणे याद्वारा नीटनेटकेपणा या

---

११२) शि.ह.पु. – (इ. १ ली ते ८ वी) पृ. क्र. १०.

मूल्याचे दर्शन होईल. सौंदर्यदृष्टी जोपासली असेल तरच या गोष्टी शक्य होतील. यामुळे वैयक्तिक व समाजाचेही आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. तसेच मनुष्याचे जीवन अधिक कार्यक्षम व यशस्वी होण्यास या मूल्याची मदत होईल.

व्याख्या – व्यक्तीने वैयक्तिक (व्यक्तिगत), कौटुंबिक व सामाजिक या सर्व पातळ्यांवर सुयोग्य वर्तन ठेवणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयी लावून घेणे, वस्तूंचा व सार्वजनिक सुविधांचा वापर व निगा याविषयी योग्य कृती करणे म्हणजे नीटनेटकेपणा होय. (११३)

वरील दहाही राष्ट्रीय मूल्यांचा विचार केल्यास असे आढळेल की, यातील काही मूल्यांचा समावेश सामाजिक मूल्यात करता येईल. तर काही मूल्ये ही वैयक्तिक मूल्ये असे म्हणता येईल.

यापैकी राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म सहिष्णुता, स्त्रीपुरुष समानता ही पहिली चार मूल्ये सामाजिक मूल्ये आहेत. तर श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता, संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा या मूल्यांना वैयक्तिक मूल्ये असे म्हणावे लागेल.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. अनेक व्यक्तींचे मिळून एक कुटुंब होते. तसेच अनेक कुटुंबांचा मिळून एक समाज होतो. तेव्हा समाज हा सुसंस्कृत व नीतीमान असण्यासाठी कुटुंब सुसंस्कृत असावे लागते. जर कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत, असेल तरच कुटुंब नीतीमान व सुसंस्कृत होईल. यासाठी वरील सर्व मूल्यांचे संस्कार प्रत्येक व्यक्तीवर त्याच्या बालपणापासूनच होणे अगत्याचे आहे.

भारतीय मूल्यविचारात नि:श्रेयसमाप्ती हे सर्वोच्च व अंतिम असे अत्यंत महत्त्वाचे ध्ये मानले गेले आहे. 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष' या चार पुरुषार्थांपैकी मोक्ष हा चौथा पुरुषार्थ म्हणजेच नि:श्रेयस प्राप्ती होय. हे ध्येय साध्य करण्याचे साधन म्हणजे सदाचार हा आहे. सदाचारमध्ये 'सत्य, अहिंसा, दान, दया, ऋजुता, परोपकार, दम, अस्तेय, समता, सहनशीलता, अमात्सर्य या मूल्यांचा समावेश होतो.

अर्थ आणि काम या पुरुषार्थांची प्राप्ती धर्माचे पालन करत केली तरच व्यक्तीचे, पर्यायाने समाजाचे व राष्ट्राचे हित साधले जाते.

राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, या व एकंदर सर्वच मूल्यांचे योग्य पालन होण्यासाठ व्यक्तीच्या अंगी प्रामाणिकपणा पाहिजे. सत्यनिष्ठा ही महत्त्वाची ! तेंव्हा सत्य या मूल्याच्या संस्काराने ही राष्ट्रीय मूल्ये प्रत्यक्षात येतील.

---

११३) शि.ह.पु. – (इ. १ ली ते ८ वी) पृ. क्र. १३.

सर्वधर्मसहिष्णुता, स्त्री–पुरुष समानता ही मूल्ये प्रत्यक्षात येण्यासाठी संयमीवृत्तीची नितांत आवश्यकता आहे. ‘दम’ हे मूल्य त्यासाठी महत्त्वाचे ! काम (उपभोगाची तीव्र लालसा) क्रोध (पराकोटीचा संताप) लोभ (वस्तूबद्दलची आसक्ती), मोह (अनिवार आकर्षण), मद (अहंकार), मत्सर (दुसऱ्या व्यक्तीबद्दल वाटणारा हेवा) हे जे सहा शत्रू–ज्यांना षड्रिपु असे म्हटले जाते. त्यांच्यावर मात करून भावनांवर नियंत्रण म्हणजे दम होय. कोणत्याही भावनेचा अतिरेक वाईटच. सौजन्यशीलता व संवेदनशीलता अंगी बाणण्यासाठी दया (करुणावृत्ती) व दान ( औदार्य) या मूल्यांचे संस्कार महत्त्वाचे ! श्रमप्रतिष्ठा हे समता या मूल्याचेच दुसरे नाव आहे. वर उल्लेखिलेली दम, दया, दान ही मूल्ये अहिंसा या मूल्यातच अंतर्भूत होतात. ही मूल्ये म्हणजे अहिंसेचेच वेगवेगळे प्रकार असे आचार्य विनोबा भावे यांचे मत आहे.

तेव्हा या चिरंतन मूल्यांचे संस्कार बालपणापासूनच कुटुंब, शाळा यांच्याद्वारा – यांच्यामार्फत झाले तर समाजाची प्रगती दूर नाही.

‘महाभारत’ हे महाकाव्य फार प्राचीन आहे. यातील कथा, प्रसंग, व्यक्ती व उपदेश यातून या मूल्यांचे संस्कार निश्चितच प्रभावीपणे करता येतील.

मात्र ‘वैज्ञानिक दृष्टिकोन’ हे मूल्य आधुनिक काळातील आहे. तर ‘वक्तशीरपणा व नीटनेटकेपणा’ ही वैयक्तिक मूल्ये आहेत. राष्ट्रीय मूल्यसंस्कारांसाठी महाभारताचा विचार करताना ही मर्यादा नक्कीच लक्षात घ्यावी लागेल.

******

# प्रकरण ५ वे
# महाभारत आणि राष्ट्रीय मूल्यशिक्षण

प्रस्तावना

अ) मूल्यांचे महत्त्व :–

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आपले कुटुंब, नातीगोती, गाव, शहर, प्रांत, देश (राष्ट्र) आणि विश्व अशाप्रकारे त्याचा सामाजिक परिसर अधिकाधिक विशाल होत जातो. तसेच सभोवतालचा निसर्ग, व पशुपक्षी या इतर घटकांशीही त्याचा संबंध येतो. हे संबंध सुरळीत राहणे, समाजाची सुस्थिर अशी अवस्था असणे हे मनुष्याच्या, पर्यायाने समाज व राष्ट्र यांच्या विकासाच्या व उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. यासाठी व्यक्ती ही सुसंस्कारित, सदाचारयुक्त व कर्तव्यनिष्ठ असणे फार महत्त्वाचे आहे. असंस्कृत, दुराचारी व स्वार्थी व्यक्तींमुळे समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येते. समाज अस्थिर होतो. यादृष्टीने मनुष्याच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या जीवनातही मूल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यादृष्टीने मूल्यांची दोन प्रकारे विभागणी करता येते.

(१) चिरंतन मूल्ये (२) राष्ट्रीय मूल्ये

१) चिरंतन मूल्ये :–

भूत, भविष्य व वर्तमान या तीनही काळात न बदलणारे म्हणजेच 'त्रिकालाबाधित' असे जे मूल्य ते चिरंतन मूल्य होय. सत्य, अहिंसा, दान, दया, क्षमा, संतोष, धैर्य, अस्तेय, शांतवृत्ती, दम, तितिक्षा, आर्जव, शौच (पावित्र्य), निर्लोभी वृत्ती ही सर्व मूल्ये चिरंतन मूल्ये म्हणून मानली आहेत. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारशी या सर्वच धर्मात थोड्याफार फरकाने याच मूल्यांचा समावेश केलेला आपणास दिसतो. या मूल्यांनाच भगवद्गीतेत दैवी संपत्ती असे म्हटले आहे. प्रामुख्याने सत्य व अहिंसा या दोन मूल्यांच्या पोटातच इतर मूल्ये समाविष्ट होतात असे आचार्य विनोबा भावे यांनी आपल्या 'गीताप्रवचने' या पुस्तकात म्हटले आहे.[१]

क) राष्ट्रीय मूल्ये –

भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाल्यानंतर नवीन शिक्षणपद्धतीचा विचार सुरू झाला. वेगवेगळे आयोग व समित्या स्थापन झाल्या.

---

१) आचार्य विनोबा भावे – 'गीताप्रवचने' अध्याय १६ वा. पृ.क्र. २०६.

उदाहरणार्थ – राधाकृष्णन् समिती, श्रीप्रकाश समिती, कोठारी आयोग इत्यादि. या सर्वांनीच नैतिक व मूल्यशिक्षणावर भर दिला आहे. यादृष्टीने महाराष्ट्र सरकारने औरंगाबाद येथे नैतिक शिक्षणविषयक जे चर्चासत्र घेतले त्यामधून दहा राष्ट्रीय मूल्ये म्हणून निश्चित करण्यात आली. ती खालीलप्रमाणे –

१) राष्ट्रभक्ती

२) राष्ट्रीय एकात्मता

३) सर्वधर्मसहिष्णुता

४) स्त्री–पुरुष समानता

५) श्रमप्रतिष्ठा

६) वैज्ञानिक दृष्टिकोन

७) सौजन्यशीलता

८) संवेदनशीलता

९) वक्तशीरपणा

१०) नीटनेटकेपणा

वरील राष्ट्रीय मूल्यांचे संस्कार करताना 'महाभारत' हा ग्रंथ कोणत्या प्रकारे मदत करू शकेल हे आपण दाखविणार आहोत. मात्र सर्वधर्मसहिष्णुता या मूल्यातील 'धर्म' हा शब्द हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि जे विविध धर्म (Religion) सध्या प्रचलित आहेत. त्या अर्थी महाभारतकालात रूढ नव्हता. त्याकाळी चार वर्ण प्रचलित होते. तेव्हा वर्णसमानतेबद्दल महाभारतात काय म्हटले आहे, हे आपणास पाहता येईल. स्त्री–पुरुष समानता सध्याच्या – आधुनिक कालाच्या दृष्टीने आस्तित्वात नसली तरी स्त्रियांमध्ये कुंती, गांधारी, द्रौपदी या स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटलेली दिसतात. वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य मात्र पूर्णपणे आधुनिक काळातील असल्याने महाभारतात यासंबंधी उल्लेख आढळणार नाही. त्यामुळे महाभारताचा या दृष्टीने विचार करता येणार नाही. ही मर्यादा याठिकाणी लक्षात घ्यावी लागेल. राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता ही सामाजिक मूल्ये आहेत. तर संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा ही वैयक्तिक मूल्ये आहेत.

१) राष्ट्रभक्ती –

महाभारतातील विविध कथांच्या द्वारा या मूल्यांचा विचार करता येईल.

प्राचीन शिक्षणपद्धतीत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर समावर्तन विधी असे. गुरू शिष्याला उपदेश करे, 'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्य देवो भव।' मातृभक्ती, पितृभक्ती, गुरूभक्ती ही तुझ्या ठायी सतत

असो. जशी मातृपितृभक्ती, गुरूभक्ती तशीच राष्ट्रभक्ती होय. आधुनिक कालात 'राष्ट्रदेवो भव।' असे म्हणता येईल. यासाठी सत्यवृत्ती, निष्ठा व प्रामाणिकपणा हे सद्गुण अंगी असणे अतिशय आवश्यक आहे.

आदिपर्वात आलेल्या आरूणि, उपमन्यु व वेद या शिष्यांच्या गुरूभक्तीच्या कथांच्या द्वारा 'राष्ट्रभक्ती' या राष्ट्रीय मूल्यांचा संस्कार होण्यासाठी आवश्यक अशा सत्यनिष्ठेचा संस्कार करता येईल.

१) आरूणीची कथा [१]

अयोदाचा पुत्र असलेल्या धौम्य ऋषींचे तीन शिष्य होते. आरूणी, उपमन्यु व वेद. हे तीनही शिष्य सदैव गुरूच्या आज्ञेत राहात असत.

एकदा आरूणीच्या गुरूभक्तीची परीक्षा पहावी असे धौम्य ऋषींच्या मनात आले. तेव्हा धौम्य ऋषींनी त्याला आज्ञा केली, 'अरे आरूणि, शेताला बांध घालून पाणी अडव.' आरूणि म्हणाला, 'बरे आहे.' असे म्हणून आज्ञेप्रमाणे तो शेतात गेला. परंतु पाण्याचा जोर फारच होता. त्यामुळे तो बांध घालू शकला नाही. तो अतिशय खिन्न व हताश झाला. 'आता काय करावे बरे ?' असा त्याला विचार पडला. इतक्यात त्याला एक युक्ती सुचली. आपण आपल्याच शरीराचा बांध शेतात घातला तर पाणी नक्की अडेल, असा विचार करून तो पाण्याच्या प्रवाहात निजून राहिला. बराच वेळ झाला, तरी आरूणी कोठे दिसेना. तेव्हा धौम्य ऋषींनी शिष्यांना विचारले, 'पांचाल्य आरूणी कोठे आहे ? बराच वेळ झाला तो दिसला नाही.' तेव्हा शिष्य म्हणाले, 'आपणच त्याला शेतात बांध घालण्यासाठी पाठविले आहे.' तेव्हा धौम्य ऋषी म्हणाले, 'चला, आपण सर्वच तेथे जाऊ.'

सर्व शिष्य व धौम्य ऋषी शेतात गेले. तेथे गेल्यावर धौम्य ऋषींनी आरूणीला हाक मारली. 'अरे आरूणि, तू कोठे आहेस ?' तेव्हा आरुणि बांधाच्या जोगवरून उठून गुरूंच्याजवळ आला. तो त्यांना म्हणाला, 'शेतात येणारे पाणी अडविण्यासाठी मी स्वत:च्या शरीराचा बांध घालून शेतात आडवा पडलो होतो. आपली हाक ऐकून उठलो.' तेव्हा धौम्य ऋषींनी योगबलाने शेतात येणारे पाणी अडविले. ते आरूणीला म्हणाले, 'आरूणि, मी तुझी परीक्षा पाहिली. तुझ्या गुरूभक्तीने मी संतुष्ट झालो आहे. शेताचा बांध सोडून तू उठलास, म्हणून तू उद्दालक या नावाने प्रसिद्ध होशील. गुरूजी पुढे म्हणाले, 'यस्मात् त्वया मद्वच: अनुष्ठितं तस्मात् श्रेय: अवाप्स्यसीति। सर्वेच ते वेदा: प्रतिभास्यन्ति। सर्वाणि च धर्मशास्त्राणि इति।[२]

---

१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अध्याय ३, श्लोक १९ ते ३१).

२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (३.२९, ३०).

(अर्थ – तू माझी आज्ञा निष्ठेने, प्रामाणिकपणे पाळलीस, म्हणून तुझे कल्याण होईल. सर्व वेद–वेदाङ्गे व धर्मशास्त्रे यांचे सखोल असे ज्ञान तुला होईल. ऐहिक व पारलौकिक अशा सर्व सुखांचा लाभ तुला होईल.)

अविचल अशा गुरुभक्तीने आरुणीचे कल्याण झाले. त्याला विद्येत प्रावीण्य मिळून त्याची प्रगती झाली. अविचल निष्ठेचा, भक्तीचा तो आदर्श ठरला. सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा यांचे दर्शन त्याच्या आचरणातून दिसते. राष्ट्राबद्दलही आपण अशीच अविचल निष्ठा, भक्ती ठेवली पाहिजे.

२) उपमन्यूची कथा [३]

अशीच दुसरी गुरुभक्तीची कथा अयोद धौम्य ऋषी यांचा आणखी एक शिष्य उपमन्यु याची आहे. त्याला गुरूंनी आज्ञा केली, 'अरे उपमन्यु, गाईंचे रक्षण कर.' 'ठीक आहे.' असे म्हणून तो वनात गाईंना चरण्यासाठी घेऊन गेला. तो दिवसभर गाई राखत असे. नंतर सूर्य मावळल्यावर परत येत असे. असे काही दिवस गेल्यावर गुरूंना उपमन्यू धष्टपुष्ट झालेला दिसला. त्यांनी विचारले, 'तू कशावर उपजीविका करतोस ?' उपमन्यू म्हणाला, 'मी मधुकरी मागून उपजीविका करतो ?' गुरु म्हणाले, 'मला न देता (नैवेद्य न देता) तू खाणे योग्य नाही. तुझी मधुकरी तू मला अर्पण करत जा.' उपमन्यू 'ठीक आहे.' असे म्हणाला.

असेच आणखी काही दिवस गेले. उपमन्यू पहिल्यासारखाच धष्टपुष्ट आहे असे गुरूंना आढळले. त्यावर त्यांनी विचारले, 'तू मधुकरी तर मला देतोस. मग तू धष्टपुष्ट कसा ?' यावर उपमन्यू म्हणाला, 'पहिल्यांदा मागितलेली मधुकरी मी तुम्हाला देतो. नंतर पुन्हा मधुकरी मागतो. नंतर ती खाऊन उपजीविका करतो.' तेव्हा गुरु म्हणाले, 'तुझे हे वर्तन सर्वथा अयोग्य असेच आहे. इतर मधुकरी मागणाऱ्यांवर हा अन्याय आहे. गुरूंशी तू कपट करतोस. हे अयोग्य आहे. हे तू बंद कर.'' उपमन्यू 'ठीक आहे.' असे म्हणाला व पूर्वीप्रमाणेच दिवसभर गाईंची राखण करू लागला.

नंतर तो काही दिवसांनी परत आला. तेव्हा गुरूंना तो पूर्वीप्रमाणेच धष्टपुष्ट असा दिसला. तेव्हा गुरूंनी त्याला कारण विचारले. तेव्हा उपमन्यू म्हणाला, 'मी गाईचे दूध पिऊन उपजीविका करतो.' गुरु म्हणाले, 'माझी आज्ञा न घेता तू गाईचे दूध पितोस. हे योग्य नाही.' उपमन्यू 'बरे आहे' असे म्हणाला. यानंतर गाईंना चरायला नेल्यावर परत आलेला उपमन्यू गुरूंना पूर्वीप्रमाणेच धष्टपुष्ट असा दिसला.

---

३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (३.३२ ते ७८)

गुरूंनी त्याला कारण विचारले. तो म्हणाला, ‘वासरांनी गाईचे दूध प्यायल्यावर जो फेस निर्माण होतो तो पिऊन मी उपजीविका करतो.’ गुरू म्हणाले, ‘तुझ्याबद्दल (दया येऊन) कींव वाटून ही वासरे भरपूर फेस निर्माण करतात. त्यामुळे याप्रकारातही तू वासरांच्या पोट भरण्यात अडथळा निर्माण करतोस. तू फेस पिणेही योग्य नाही. तेव्हा उपमन्यू काहीच न खाता उपाशी राहूनच गाई चरावयास नेऊ लागला. भुकेने अत्यंत व्याकूळ झाल्यामुळेत याने रूईच्या झाडाची पाने खाल्ली. खारट-तिखट व उष्ण अशी ती रूईच्या झाडाची पाने खाल्ल्यामुळे डोळ्यांवर परिणाम होऊन तो अंध झाला. अंध होऊन इतस्तत: फिरत असता तो विहीरीत पडला. बरेच दिवस तो परत न आल्याने गुरूंना काळजी वाटली.

ते म्हणाले, ‘मया उपमन्यु: सर्वत: प्रतिषिद्ध: । स: नियतं कुपित: । ततो नागच्छति । चिरगतश्चेति ।[४]

(अर्थ -मी सर्व बाजूंनी उपमन्यूची कोंडी केली. त्यामुळे तो फारच रागावलेला दिसतो. म्हणून तो येत नाही. बराच काळ झाला तो गेला आहे.)

त्याला शोधण्यासाठी गुरूजी वनात गेले. त्यांनी उपमन्यूला हाक मारली, ‘बाळ उपमन्यु, तु कोठे आहेस ?’ तेव्हा उपमन्यूने उत्तर दिले, ‘रूईच्या झाडाची पाने खाल्ल्यामुळे मी अंध होऊन विहीरीत पडलो आहे.’ गुरू धौम्यऋषींनी त्याला अश्विनीकुमारांची स्तुती करण्यास सांगितले. त्याने त्याप्रमाणे अश्विनीकुमारांची स्तुती केली.

अश्विनीकुमार प्रसन्न होऊन प्रकट झाले. त्यांनी त्याला अपूप खाण्यास दिला. परंतु गुरूंना न देता अपूप खाण्यास उपमन्यूने नकार दिला. अश्विनीकुमारांनी त्याला खूप आग्रह केला. अश्विनीकुमारांनी त्याला त्याच्या गुरूंचेच उदाहरण दिले, ज्यांनी स्वत:च्या गुरूंना न देताच पूर्वी अपूप खाल्ला होता. परंतु कोणत्याही मोहाला बळी न पडता उपमन्यूने अपूप खाण्यास नकार दिला. त्याच्या सत्यनिष्ठ गुरूभक्तीने अश्विनीकुमार प्रसन्न झाले. त्याचे डोळे त्याला परत मिळाले. जेव्हा तो परत गुरूंकडे आला, तेव्हा गुरू त्याच्यावर प्रसन्न झाले. धौम्य ऋषी म्हणाले, ‘यथा अश्विनौ आहतु: तथा त्वं श्रेयो अवाप्स्यसि । सर्वेच ते वेदा: प्रतिभास्यन्ति इति ।’

अर्थ - तुझे कल्याण होईल. ही तुझी परीक्षा होती. सर्व वेदांमध्ये तू पारंगत होशील.’

३) वेद -

तसेच धौम्य ऋषींचा वेद नावाचा तिसरा शिष्य होता. गुरूंनी आपली सेवा करण्याची आज्ञा त्याला दिली. थंडी, वारा, ऊन-पाऊस, तहान-भूक या कशाचीच पर्वा न करता गुरूंवर पूर्ण निष्ठा ठेवून

प्रामाणिकपणे त्याने दीर्घकाल गुरूंची सेवा केली. त्यामुळे संतुष्ट झालेल्या गुरूंनी त्याचे कल्याण केले व तो सर्वज्ञ झाला.[५]

अशा संशयरहित दृढ गुरूभक्तीप्रमाणे राष्ट्रभक्ती असली पाहिजे. ज्याप्रमाणे गुरूंच्या शब्दाखातर स्वत:ची पर्वा न करता सर्व सोसण्याची तयारी या शिष्यांनी दाखविली. सर्व सहन केले. तसेच आपल्या राष्ट्रासाठी, देशासाठी, दृढ भक्तीने, निष्ठेने कोणताही स्वार्थत्याग करण्याची आपली तयारी असली पाहिजे.

४) एकलव्याची दृढ गुरूभक्ती [६]

आचार्य द्रोण कौरव, पांडव व इतरही शिष्यांना शस्त्रास्त्रविद्या शिकवत असत. एकदा व्याधांचा राजा हिरण्यधनुस् याचा पुत्र एकलव्य त्यांच्याकडे आला. 'धनुर्वेदाचे संपूर्ण शिक्षण घेण्याची मला इच्छा आहे. तरी आपण माझा शिष्य म्हणून स्वीकार करावा. अशी त्याने आचार्य द्रोणांना विनंती केली. परंतु तो व्याध म्हणून आचार्यांनी त्याचा शिष्य म्हणून स्वीकार करण्याचे नाकारले. परंतु एकलव्य निराश झाला नाही. 'ठीक आहे' असे म्हणून द्रोणांच्या पायावर मस्तक ठेवून तो अरण्यात परत गेला.

तेथे गेल्यावर त्याने आचार्य द्रोणांचा मातीचा पुतळा तयार केला. त्या मूर्तीच्या ठिकाणी 'हे माझे गुरू!' अशी भावना त्याने ठेवली. रोज त्या मूर्तीचे पूजन करून व मूर्तीला दृढ भावाने वंदन करून तो धनुर्वेदाचा सराव करू लागला. अशा तऱ्हेने एकनिष्ठेने व नियमितपणे रोज सराव करीत असल्याने लवकरच तो धनुर्विद्येत अतिशय प्रवीण झाला.

एकदा कौरव–पांडव मृगयेसाठी अरण्यात गेले. मृगयेचे सर्व साहित्य व एक कुत्रा यांना बरोबर घेऊन ते वनात गेले. त्यांचा कुत्रा भटकत भटकत एकलव्य जेथे होता तेथे गेला. मलिन,जटा वाढलेल्या एकलव्याला पाहून कुत्रा जोरजोरात भुंकू लागला. तेव्हा त्याला इजा होणार नाही, परंतु त्याचे भुंकणे बंद होईल, अशा कौशल्याने एकलव्याने सात बाण त्याच्या तोंडात मारले. तेव्हा कुत्रा पुन्हा पळत पांडवांकडे गेला. त्या कुत्र्याला पाहून कौरव पांडव हे सर्व राजकुमार चकित झाले. शोध घेत ते सर्व एकलव्य जेथे होता तेथे येऊन पोहोचले. तेथे त्यांना आचार्य द्रोणांचा मातीचा पुतळा दिसला.

केवळ पुतळ्याच्या ठिकाणी गुरूला पाहून एकलव्याने धनुर्विद्येत प्रावीण्य प्राप्त करून घेतले होते. ही गोष्ट फारच अलौकिक आहे असे वाटून ते स्तिमित झाले.

धन्य एकलव्याची गुरूभक्ती व गुरूच्या ठिकाणची त्याची अपार निष्ठा !

---

५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.३.८१,८२)

६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१२३.१० ते २४)

राष्ट्राच्या ठिकाणीही अशीच निस्सीम भक्ती व निष्ठा प्रत्येकाच्या मनात असावयास हवी.

५) असत्याचरणाचे व प्रतारणेचे फळ – कर्णाची कथा [७]

सूतपुत्र कर्णाने आचार्य द्रोणांकडे धनुर्विद्येचे सर्व शिक्षण घेतले. तो अर्जुनाच्या तोडीचा वीर झाला. परंतु त्याला सर्व अस्त्रात श्रेष्ठ असे ब्रह्मास्त्र शिकण्याची इच्छा होती. या अस्त्राचे शिक्षण द्रोणाचार्यांनी अर्जुनाला व अश्वत्थाम्याला दिले होते. कर्णाने गुरू द्रोणाचार्यांना आपल्याला ब्रह्मास्त्र शिकवावे अशी विनंती केली. परंतु केवळ ब्रह्मचर्यादि व्रताचरण करणारा ब्राह्मण अथवा तपश्चर्या करणाऱ्या क्षत्रियासच ब्रह्मास्त्र शिकण्याचा अधिकार आहे असे गुरू द्रोणाचार्य कर्णाला म्हणाले. त्यांनी त्याला ब्रह्मास्त्र शिकविण्याचे नाकारले.

तेंव्हा निराश न होता कर्ण महेंद्र पर्वतावर राहणाऱ्या भगवान् परशुराम मुनींकडे गेला. 'आपणाला ब्रह्मास्त्र शिकवावे' अशी त्याने परशुरामांना विनंती केली. त्यासाठी आपण भार्गव कुळातील ब्राह्मण आहोत असे त्याने खोटेच परशुरामांना सांगितले. त्यावेळी परशुरामांनी त्याचा शिष्य म्हणून आनंदाने स्वीकार केला. तेथे राहून तो यथाविधी ब्रह्मास्त्राचे अध्ययन करू लागला.

एकदा आश्रमाच्या जवळच तो धनुष्यबाण घेऊन हिंडत होता. नकळतच त्याच्या हातून एका गाईच्या वासराचा वध झाला. त्यावेळी ब्राह्मणाने त्याला शाप दिला, 'ऐन युद्धाच्या वेळी तुझ्या रथाचे चाक भूमी गिळेल.' कर्ण अतिशय खिन्न होऊन आश्रमात परत आला.

पुढे एकदा परशुराम मुनी व कर्ण आश्रमाजवळ फिरत होते. त्यावेळी परशुराम मुनींना थकवा आला. कर्णाच्या मांडीवर डोके ठेवून परशुराम झोपी गेले. त्यावेळी अलर्क नावाचा एक किडा कर्णाची मांडी पोखरून त्यातील रक्त पिऊ लागला. गुरूंची झोप मोडेल या भीतीने वेदना सहन करीत कर्ण गप्प बसून राहिला. रक्ताच्या ओल्या थंडगार स्पर्शाने परशुराम जागे झाले. ते कर्णाला म्हणाले, ''एवढ्या वेदना ब्राह्मण कधीच सहन करू शकणार नाही. तू खरा कोण आहेत ते सांग.''

कर्ण लज्जित होऊन म्हणाला, 'मी अधिरथ सूताचा पुत्र कर्ण आहे. आपण वेदविद्या देणारे सामर्थ्यसंपन्न असे गुरू आहात. असा गुरू हा नि:संशय पिताच असतो. म्हणूनच मी आपल्याला माझे गोत्र भार्गव आहे असे सांगितले. केवळ ब्रह्मास्त्राची प्राप्ती व्हावी या लोभाने मी असत्य बोललो. आपण माझ्यावर अनुग्रह करावा.' असे म्हणून त्याने परशुरामांसमोर लोटांगण घातले.

---

७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अध्याय २ व ३).

कर्णाचे हे बोलणे ऐकून परशुराम क्रोधाविष्ट झाले. ते कर्णाला म्हणाले, 'तू असत्य बोलून कपटाने ब्रह्मास्त्राची प्राप्ती करून घेतलीस. ब्रह्मास्त्राचे ज्ञान तुला कपटाचरणाने प्राप्त झाले. तू गुरूशी द्रोह केलास. तेव्हा ऐनवेळी या विद्येचे तुला विस्मरण होईल असा मी तुला शाप देतो.'' परशुरामांचे हे बोलणे कर्ण दु:खी अंत:करणाने हस्तिनापुरास परत गेला.' [८]

कर्णाने गुरुंशी असत्याचरण, कपट केले. त्याची गुरुभक्ती ही सत्यनिष्ठ नव्हती.

देशभक्तीच्या बाबतीतही हीच गोष्ट सत्य आहे. देशाशी वा राष्ट्राशी प्रतारणा, द्रोह करण्याने राष्ट्राचे नुकसान तर होतेच पण व्यक्तीचा वा समाजाचाही नाश होतो. म्हणूनच देशभक्ती या मूल्याच्या बाबतीत एकनिष्ठा, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा हे सद्‌गुण अत्यंत महत्त्वाचे असेच आहेत.

२) राष्ट्रीय एकात्मता –

महाभारतातील वनपर्वामध्ये युधिष्ठिराने एकीचे–एकजुटीचे महत्त्व प्रतिपादन केले आहे.

वनपर्वात अध्याय २२५ ते अध्याय २४३ अशा एकंदर एकोणीस अध्यायांमध्ये विस्तृत असे घोषयात्रापर्व हे प्रकरण आले आहे.

६) कौरवांशी द्यूत खेळत असताना त्यात युधिष्ठिराचा पराभव झाला. तेव्हा ठरलेल्या अटीनुसार पांडव बारा वर्षेवनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगण्यासाठी वनात गेले. त्यावेळी त्यांनी काम्यकवनामध्ये वास्तव्य केले.

या काळात त्यांना भेटण्यासाठी अनेक ऋषीमुनी व अनेक ब्राह्मण येत असत. त्यापैकी एका ब्राह्मणाने धृतराष्ट्राकडे येऊन पांडवांच्या गरीब स्थितीचे वर्णन केले. ते ऐकून धृतराष्ट्राला खूप वाईट वाटले. परंतु शकुनी, कर्ण यांनी दुर्योधनाला सांगितले. 'पांडव अतिशय गरीब अवस्थेत राहातआहेत. आपण काम्यकवनातील आपल्या गाईंच्या गोठ्यांची (घोषांची) पाहणी करण्याच्या निमित्ताने तेथे जाऊ. मोठा लवाजमा घेऊन आपले, कौरवांचे वैभव त्यांना दाखवून त्यांना खिजवू.' [९]

दुर्योधनास हा बेत पसंत पडला. आपले रथ, हत्ती, अश्व यांनी युक्त असे सैन्य, दागदागिने व उंची वस्त्रे यांनी अलंकृत अशा स्त्रिया, दासदासी असा मोठा लवाजमा घेऊन दुर्योधन काम्यकवनात गेला.

---

८) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अध्याय २ व ३).

९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व – घोषयात्रा पर्व – (अध्याय २२६ ते अध्याय २२८).

तेथे गोशाळेत गाई व वासरांच्या खिल्लारांची पाहणी, तसेच तपासणी करून ते द्वैतवनसरोवरात विहार करण्यासाठी गेले.

त्यावेळी त्यापूर्वीच तेथे आलेला चित्ररथ गंधर्व त्या सरोवरात आपल्या स्त्रियांसह जलक्रीडा करत होता. दुर्योधन तेथे जाताच गंधर्वांनी त्याला अडविले. परंतु दुर्योधन बळजबरीने तेथे प्रवेश करू लागताच गंधर्वसैन्याचे दुर्योधनसेनेशी युद्ध सुरू झाले. गंधर्व सैन्याने दुर्योधनसैन्याला हतबल करून सोडले. कर्णाचा पराभव झाला. कर्ण व सर्व सैन्य पळू लागले. त्यावेळी चित्ररथ गंधर्वाने दुर्योधनाला कैद करून तो त्याला घेऊन जाऊ लागला. [१०]

याचे वर्णन महाभारतकारांनी खालील श्लोकात समर्पक केले आहे.

'गन्धर्वैस्तु महाराज भग्ने कर्णेमहारथे ।

सम्प्राद्रवत् चमू: सर्वा: धार्तराष्ट्रस्य पश्यत: ।।

(अर्थ – महारथी कर्णाचा गंधर्वसैन्याने पराभव केल्यानंतर दुर्योधन बघत असताना (त्याचा अनादर करून) सर्व सैन्य इतस्तत: पळू लागले) [११]

अशावेळी दुर्योधनाचे अमात्य आक्रोश करत 'आर्त' आणि 'दीनस्वर' [१२] असे ते युधिष्ठिराकडे मदतीसाठी गेले. युधिष्ठिर हा त्यावेळी तात्कालिका असा यज्ञ करत होता. भीमाने हे पाहिले तेव्हा तो म्हणाला, 'बरे झाले, जे आम्ही करायला पाहिजे, तेच गंधर्वांनी केले आहे. दुष्ट अशा कौरव–दुर्योधनाप्रमाणे जे अधर्माने वागतात, त्यांचा अशाच प्रकारे पराभव होतो.'

त्यावेळी युधिष्ठिराने भीमाला व सर्वच पांडवांना केलेला उपदेश त्याची विवेकबुद्धी व शहाणपण यांची साक्ष देतो. युधिष्ठिराने सांगितले आहे, 'ही वेळ कठोरपणे वागण्याची नाही. भीतीने गाळण उडालेल्या व आमच्या आश्रयाची इच्छा करणाऱ्यांना असे बोलणे योग्य नाही.'

१) भवन्ति भेदा: ज्ञातीनां कलहाश्च वृकोदर ।

प्रसक्तानि च वैराणि कुलधर्मोन नश्यति ।।

२) यदा तु कश्चित् ज्ञातीनां बाह्य: प्रार्थयते कुलम् ।

न मर्षयन्ति तत्सन्त: बाह्येनाभिप्रधर्षणम् ।। [१३]

---

१०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व – घोषयात्रा पर्व – (अध्याय २२९ ते अध्याय २३५).

११) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रा पर्व (अध्याय २३१ श्लोक १ला).

१२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रा पर्व (अध्याय २३१. १३, १५, १९, २१).

१३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रा पर्व (अध्याय २३२.२, ३).

(अर्थ – १) हे भीमा नातेसंबंधात आपापसात फाटाफूट होते, भांडणे होतात. वैरही करण्याचा प्रसंग येतो. (वैरही निर्माण होते). परंतु आपल्या कुलाच्या बाबतीतील योग्य ते आचरण, किंवा विहित असे कर्तव्य त्याचा नाश होत नाही.

२) म्हणून जर एखादा परकीय, कुलाच्या बाहेरील मनुष्य आपल्या कुलातील लोकसमुदायावर आक्रमण करेल, तर परक्याने केलेला हा अपमान सज्जन लोक कधीही सहन करत नाहीत.)

'तेव्हा साम, दाम, दंड या सर्वांचा उपयोग करून तू, अर्जुन व नकुल सहदेव एकजूट करून दुर्योधनाला सोडवून आणा.'

या उपदेशाप्रमाणे चारही पांडवांनी चित्ररथ गंधर्वाशी युद्ध करून मोठ्या पराक्रमाने दुर्योधनाची मुक्तता केली. [१४]

दुर्योधनाची मुक्तता केल्यानंतर युधिष्ठिराने त्याला केलेला उपदेशही विचार करण्यासारखा–लक्षणीय असाच आहे.

युधिष्ठिराने दुर्योधनाला सांगितले,

'मा स्म तात पुन: कार्षीरीदृशं साहसं क्वचित्।

न हि साहसकर्तार: सुखमेधन्ति भारत ।।

(अर्थ – हे भरतकुलोत्पन्न सुयोधना, हे अशा प्रकारचे साहस पुन्हा करू नकोस. नको ते साहस करणाऱ्याला कधीही सुख लाभत नाही.) [१५]

याबाबत परंपरेने आलेला आणखी एक श्लोक हीच शिकवण देतो.

'अस्मासु कलहे प्राप्ते वयं पञ्च शतं च ते ।

अन्यैस्तु कलहे प्राप्ते वयं पञ्चाधिकं शतम् ।। [१६]

(अर्थ – आमच्यामध्ये भांडणे झाल्यास आम्ही पाच व ते शंभर परंतु परक्यांबरोबर कलहाची वेळ आल्यास आम्ही एकशेपाच आहोत.)

BORI च्या वनपर्वाच्या प्रमाणित प्रतीत तळटीपेत आणखी एक श्लोक आला आहे, तो खालीलप्रमाणे

'परै: परिभवे प्राप्ते वयं पञ्चोत्तरं शतम्।

परस्परविरोधे तु वयं पञ्च शतं तु ते ।।

---

१४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अध्याय २३३ ते २३५).

१५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अध्याय २३५.२१).

१६) संस्कृत मराठी सुभाषित कोश – ल.गो. विंझे – (प्रकरण ५० श्लोक १९३).

(अर्थ – परक्यांकडून निंदा अथवा पराभवाची वेळ आल्यास आम्ही शंभर अधिक पाच म्हणजेच एकशेपाच आहोत. परंतु आपापसात जर विरोध वा मतभेद असेल तर आम्ही पाच व ते (कौरव) शंभर होत.)

एका कुटुंबातील ऐक्याबद्दल युधिष्ठिराने जी गोष्ट अथवा जे तत्त्व सांगितले आहे तेच तत्त्व किंवा तीच गोष्ट राष्ट्राच्या संदर्भातही तितकीच खरी आहे. अभेद्य अशी एकी राष्ट्राला अजिंक्य बनविते. 'आपण सारे एक आहोत, बांधव आहोत ही भावना राष्ट्रामध्ये सामर्थ्य निर्माण करते.'

म्हणूनच 'वयं पञ्चाधिकं शतम्।' हे युधिष्ठिराचे उद्‌गार सामान्य माणसाच्या तोंडीदेखील एखाद्या म्हणीप्रमाणे अथवा वाक्प्रचाराप्रमाणे अजरामर झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश या कथेच्या द्वारा मनावर बिंबविता येईल.

तसेच ऐक्य न ठेवता आपापसात दुही असेल तर त्याचे परिणाम, एकमेकात भांडणे असतील तर त्याचा काय परिणाम होतो हे उद्योगपर्वात विदुराने खालील कथेच्या द्वारा दुर्योधनाला समजावून दिले आहे. [१७]

कथा ७) एकदा एक फासेपारधी जमिनीवर जाळे पसरून ठेवतो. लवकरच त्या जाळ्यात दोन पक्षी अडकतात. परंतु लवकरच ते दोन पक्षी जाळ्यासकट आकाशात उडू लागतात. तेव्हा पारधी अजिबात निराश न होता जमिनीवरून त्या पक्ष्यांच्या मार्गानेच धावू लागतो.

तो असा धावत असताना आपली नित्यकर्मेकरणारा एक मुनी त्याला पाहतो. उडणाऱ्या पक्ष्यांमागे जमिनीवरून धावणाऱ्या पारध्याला पाहून मुनी आश्चर्यचकित होतात. ते पारध्याला विचारतात, ''हे फासेपारध्या, मला तुझे हे वागणे फारच विचित्र व आश्चर्यकारक वाटते आहे, अरे, आकाशात उडणाऱ्या या दोन पक्षांमागे तू पायीच कसा काय धावतो आहेस ?''

तेव्हा फासेपारध्याने उत्तर दिले, 'हे एकजुटीने माझे जाळे घेऊन उडत आहेत. परंतु जेव्हा या दोन पक्ष्यांमध्ये वाद–विवाद सुरू होईल, तेव्हा नक्कीच ते माझ्या ताब्यात येतील.''

त्या फासेपारध्याच्या तर्कानुसार लवकरच ते दोघे पक्षी आपापसात वाद–विवाद करू लागले. वाद घालू लागले. जणू काही मृत्यूच त्यांच्या समीप आला होता. अशातऱ्हेने ज्यांना दुर्बुद्धी सुचली होती ते जाळ्यासकट जमिनीवर पडले. त्यांना काही कळण्याच्या आतच फासेपारध्याने त्यांना पकडले.

---

१७) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (अध्याय ६२.६ ते ६२.१४).

ही गोष्ट सांगून विदुराने तिचे तात्पर्य खालील दोन श्लोकात सांगितले आहे.

१) एवं ये ज्ञातय: अर्थेषु मिथ: गच्छन्ति विग्रहम्।

ते अमित्रवशमायाति शकुनाविव विग्रहात्।।

२) संभोजनं, संकथनं, संप्रश्नोऽथ समागम:।

एतानि ज्ञातिकार्याणि न विरोध: कदाचन।। [१८]

(अर्थ – १) या कथेतील पक्ष्यांप्रमाणेच संपत्तीच्या मोहाने जी आपापसात कलह करतात, ती कुले शत्रूच्या ताब्यात जातात, शत्रू त्यांच्यावर मात करतो.

२) एकत्र भोजन घेणे,एकत्र गप्पागोष्टी करणे, एकत्र आपापसात विचारविनिमय करणे, एकत्र राहणे ही कुलातील लोकांची एकमेकांशी वागण्याच्या बाबतीतील कर्तव्ये होत. कलह मात्र कधीही करू नये.)

राष्ट्रातील लोकांच्या बाबतीतही या सर्व गोष्टी सत्य आहेत. राष्ट्रातील लोकात मतभिन्नता असेल, परंतु दुफळी किंवा दुही असता कामा नये. कलह करता कामा नये. जेथे दुही असते व एकजूट नसते त्या राष्ट्रावर शत्रू सहज विजय मिळवितो. 'दोघात भांडण, तिसऱ्याचा लाभ' ही म्हण अशावेळी सार्थ ठरते.'

विदुराने एकजुटीचे आणखी एक उदाहरण कोलीताचे (जळके लाकूड) दिले आहे.

'धूमायन्ते व्यपेतानि ज्वलन्ति सहितानि च।

धृतराष्ट्रोल्मुकानीव ज्ञातयो भरतर्षभ।। [१९]

(अर्थ – हे भरतकुलातील श्रेष्ठ धृतराष्ट्रा, वेगवेगळ्या एकेकट्या लाकडाच्या कोलीतातून धूर येतो. परंतु अनेक कोलीते एकत्र बांधली जातात तेव्हा त्यांच्यामधून प्रखर अग्नी निर्माण होऊन ती जळू लागतात.')

दुही, दुफळी, अलगपणा यांचा परिणाम विनाश हा असतो. तर एकत्र राहण्याने सामर्थ्य निर्माण होते. ताकद वाढते. हाच विदुराच्या सांगण्याचा मतितार्थ आहे.

म्हणूनच एकात्मता – एकजूट – ऐक्य हे कुलातील असो, समाजातील असो वा राष्ट्रातील असो तिचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे.

---

१८) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (६२.१५, १६)

१९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (६२.१९)

उल्मुक – कोलीत, जळके लाकूड.

३)  सर्वधर्मसमभाव :–

सध्याच्या काळात 'धर्म' हा शब्द विशिष्ट आचारपद्धती या अर्थी प्रचलित आहे. तर महाभारताच्या काळात धर्म हा शब्द विहित कर्तव्य या अर्थी प्रचलित होता. तेव्हा सध्याच्या कालातील प्रचलित अर्थाने महाभारतकाली धर्म आस्तित्वात नव्हते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण प्रचारात होते. ते आपापली विहित कर्तव्ये पार पाडत असत. फक्त विहित कर्तव्यासाठी त्यांनी शिकावयाचे आवश्यक असे विषय वेगवेगळे होते.

ब्राह्मण वर्णाचे अध्ययन, अध्यापन, स्वत: यज्ञ करणे, इतरांना यज्ञात साहाय्य करणे, दान व प्रतिग्रह ही प्रमुख कर्तव्ये होती.

क्षत्रिय वर्णाच्या बाबतीत अध्ययन, शस्त्रे, अस्त्रे, धनुर्वेद इत्यादिंचे अध्ययन, प्रजेचे बाहेरील आक्रमणापासून रक्षण, शासनव्यवस्था पाहणे व दान, यज्ञ करणे ही विहित कर्तव्ये होती.

वैश्य वर्णाच्या बाबतीतही अध्ययन, यज्ञ करणे, दान, शेती करणे, पशुपालन व व्यापार ही प्रमुख कर्तव्ये मानली जात.

तर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीनही वर्णांची सेवा करणे हे शूद्राचे प्रमुख कर्तव्य होते.

पहिल्या तीनही वर्णांना वेदाध्ययनाचा अधिकार होता. मात्र शूद्रांना हा अधिकार नव्हता. संस्कार व सदाचरण यामुळे ब्राह्मण वर्ण श्रेष्ठ मानला जाई.

## आजगर पर्व :–

वनपर्वामध्ये अध्याय १७३ ते अध्याय १७८ यामध्ये आजगर पर्व सांगितले आहे.

१२ वर्षेवनवासापैकी ११ वर्षेपांडव गंधमादन पर्वतावरील वनात राहिले. त्यानंतर अज्ञातवासाचे वर्ष लांब कोठेतरी जाऊन काढावे म्हणून त्यांनी प्रवास सुरू केला. फिरता फिरता ते द्वैतवनात आले. त्याठिकाणी भीमसेन विहार करत असताना एका महाभयंकर अजगराने भीमसेनाच्या अंगाला विळखे घातले.[२०]

वास्तविक तो खरा अजगर नसून शापग्रस्त नहुष राजा होता. ऐश्वर्याने धुंद होऊन त्याने ब्रह्मर्षींना आपली पालखी वाहून नेण्यास सांगितले. त्यावेळी महर्षी अगस्तींना त्याचा पाय लागला. त्यावेळी या त्याच्या मदग्रस्त उद्धटपणाने अगस्तींनी त्याला शाप दिला, 'तू अजगर योनीत जन्म घेशील.'

---

२०)  BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आजगर पर्व ३. १७५. १६ ते २०)

तो हा अजगर होय. त्यानंतर अगस्तींनी त्याला उ:शाप दिला, की ‘खरा ब्राह्मण कोण ?’आणि ‘खरे ज्ञेय (जाणण्यास योग्य ) कोणते ’ या प्रश्नांची उत्तरे एखाद्याने तुला दिली की तुझा शाप नष्ट होईल.

भीमसेनाचा शोध घेणाऱ्या युधिष्ठिराला हा अजगर दिसला. भीमसेनाला त्याने आपल्या विळख्यात घट्ट पकडले होते. युधिष्ठिराने भीमसेनाला मुक्त करावे अशी अजगराला विनंती केली. त्यावेळी अजगराने त्याच्याकडे या दोन प्रश्नांची उत्तरे मागितली.

युधिष्ठिराने या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे दिली आहेत. ‘खरा ब्राह्मण कोण ? ’ या प्रश्नाचे उत्तर खालील श्लोकात आहे.

१) ‘सत्यं, दानं, क्षमा, शीलमानृशंस्यं दमो घृणा।
दृश्यन्ते यत्र नागेन्द्र, स ब्राह्मण: इति स्मृत: ।। [२१]

(अर्थ – हे नागेंद्रा (सर्पराज) सत्य, दानी वृत्ती, क्षमाशील वृत्ती, चारित्र्य, क्रूरपणाचा अभाव, संयम, दयाशील वृत्ती ही चिरंतन मूल्ये ज्याच्या ठिकाणी आढळतात तोच खरा ब्राह्मण होय.)

युधिष्ठिराने हाच मुद्दा आणखी खालील दोन श्लोकात अधिक स्पष्ट केला आहे.

२) ‘शूद्रे च एतत्लक्ष्यं द्विजे तच्चा न विद्यते।
न वो शूद्रो भवेत्शूद्र: ब्राह्मण: न च ब्राह्मण: ।।’

३) यत्र एतत् लक्ष्यते सर्प, वृत्तं स ब्राह्मण: स्मृत: ।
यत्र एतत् न भवेत सर्प तं शूद्रमिति निर्दिश्येत् ।।’ [२२]

(अर्थ – २) शूद्र व्यक्तीच्या अंगी ही मूल्ये, जी चिरंतन मूल्ये आहेत,तर तो शूद्र, शूद्र नव्हे (ब्राह्मणच होय.) जर एखाद्या ब्राह्मण व्यक्तीच्या ठिकाणी ही चिरंतन मूल्ये आढळली नाहीत. तर तो व्यक्ती ब्राह्मण नव्हे. (तिला शूद्रच म्हणावे.)

३) ज्याच्या ठिकाणी अशाप्रकारचे मूल्ययुक्त आचरण दिसते, तोच खरा ब्राह्मण होय. याउलट ज्याच्या ठिकाणी असे मूल्ययुक्त आचरण दिसत नाही त्याला शूद्रच म्हणावे.)

युधिष्ठिराने याठिकाणी मूल्ययुक्त असे आचरण, सदाचरण, यावर विशेष भर दिला आहे. व्यक्तीचा मूळचा वर्ण ब्राह्मण की शूद्र यावर त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून नाही. जन्मत: सगळेच शूद्र असतात. संस्काराने ते ब्राह्मण म्हणून गणले जातात. तेव्हा ज्याच्याठिकाणी हे सदाचाराचे किंवा मूल्यांचे संस्कार आढळतात,

---

२१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आजगर पर्व ३.१७७ . १६)

२२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आजगरपर्व ३.१७७.२०, २१)

ज्या व्यक्तीचे शील, चारित्र्य हे उच्च दर्जाचे आहे ती व्यक्ती ब्राह्मणच मानावी, मग भले ती व्यक्ती शूद्र वर्णाची का असेना, असे युधिष्ठिर सांगत आहे.

सर्वधर्मसमभाव या मूल्याचा संस्कार करताना युधिष्ठिराच्या या मुद्याप्रमाणे विवेचन करता येईल. जसे आचरण महत्त्वाचे, वर्ण महत्त्वाचा नाही. त्याचप्रमाणे व्यक्ती हिंदू की मुसलमान, ख्रिश्चन की जैन वा बौद्ध हा मुद्दा गौण आहे. तिच्या आचरणातील चिरंतन मूल्यांचे संस्कार हेच खरे महत्त्वाचे ! हिंदूचा धर्मग्रंथ गीता असो, ख्रिश्चनांचे बायबल किंवा मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण सर्वच धर्मग्रंथात सदाचाराला महत्त्व दिले आहे. यादृष्टीने वनपर्वातील आणखी एका श्लोकाचा उल्लेख करता येईल. ज्यामध्ये जाति अथवा कुल कोणते का असेना, चिरंतन मूल्यांचे पालन असेल तर त्या सर्वच व्यक्ती समान दर्जाच्या असतात असे म्हटले आहे. तो श्लोक खालीलप्रमाणे–

'सत्यं दमस्तपो योगमहिंसा दाननित्यता ।

साधकानि सदा पुंसा न जातिर्न कुलं नृप ।।

(अर्थ – हे राजा, सत्याचरण, इंद्रियनिग्रह, तप, अहिंसा, सततची दानी वृत्ती, विहित कर्तव्याचरणाच्या ठिकाणीच आसक्ती ही कोणत्याही पुरुषाच्या बाबतीत इष्टफलप्राप्तीची साधने आहेत. त्याची जाति अथवा कुल हे नव्हे.) [२३]

यादृष्टीने वनपर्वातील पतिव्रतेची कथा व धर्मव्याधाची कथा या दोन कथा सदाचरणाचा संस्कार ठसविण्यासाठी महत्त्वाच्या म्हणून सांगता येतील.

१) पतिव्रतेची कथा – [२४]

कौशिक नावाचा वेदांचे अध्ययन करणारा तपस्वी, धर्मशील असा श्रेष्ठ ब्राह्मण होता. त्याने उपनिषदे व वेद यांचे सांगोपांग अध्ययन केले होते.

एकदा एका झाडाखाली तो वेदपठण करीत बसला होता. त्यावेळी झाडावर बसलेल्या एका बगळीने त्याच्या अंगावर घाण केली. अतिशय रागाने कौशिक ब्राह्मणाने वर पाहिले असता ती तत्काळ मृत होऊन जमिनीवर पडली. मृत अशा बगळीला पाहून करूणेमुळे कौशिक ब्राह्मणाला पश्चाताप झाला.

नंतर एकदा भिक्षा मागण्यासाठी तो गावातील घरांमध्ये गेला. नेहमी ज्या घरी जात असे अशा एका घरातील गृहिणीने त्याला थोडे थांबण्यास सांगितले. नंतर ज्यातून भिक्षा घालावयाची ते पात्र ती स्वच्छ करू

---

२३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१७८.४३)

२४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७. १ ते ४४)

लागली.

इतक्यात तिचा पती बाहेरून दमूनभागून आला. तेव्हा त्या स्त्रीने प्रथम त्याला पाय धुवायला पाणी दिले. बसण्यास आसन दिले. नंतर त्याला जेवावयास वाढले. पतीचे भोजन झाल्यानंतर ती कौशिक ब्राह्मणासाठी भिक्षा घेऊन आली. तिष्ठत उभे रहावे लागल्याने कौशिक ब्राह्मण खूप संतापला. तो पतिव्रता स्त्रीला म्हणाला, 'अतिथी म्हणून आलेल्या ब्राह्मणाला तिष्ठत ठेवणे योग्य नाही,हे तू जाणत नाहीस का ?''

यावर त्या स्त्रीने कौशिक ब्राह्मणाची क्षमा मागितली. ती म्हणाली, 'पती हे माझे दैवत आहे. तेव्हा थकून भागून आलेल्या पतीची सेवा करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. मी पतिधर्माचे पालन केले आहे. ब्राह्मणाचा अपमान करणे हा त्यात हेतू नाही. आपण क्रोधित झाला आहात. परंतु त्या बगळीप्रमाणे मी आपल्या क्रोधाने मृत होणार नाही.''

बगळीसंबंधीची हकीगत या स्त्रीला कशी कळली या विचाराने ब्राह्मण चकित झाला.

ती स्त्री कौशिक ब्राह्मणाला पुढे म्हणाली, 'आपण वेदांचे अध्ययन करण्यात सदैव गर्क असता. परंतु धर्माचे खरे स्वरूप आपणास कळले नाही. (२५)

'मिथिला नगरीत एक व्याध राहतो. तो आपणास खरा धर्म कोणता ते समजावून सांगेल.' तेव्हा पतिव्रता स्त्रीला कौशिक ब्राह्मण म्हणाला, ''माझा राग नाहीसा झाला आहे. मी प्रसन्न झालो आहे. तू मला जे सांगितलेस ते माझ्या कल्याणाचेच होते.'' (२६)

असे म्हणून कौशिक ब्राह्मण मिथिला नगरीत जाण्यास निघाला.

२) धर्मव्याधाची कथा ( BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व अध्याय १९८ ते २०६)

पतिव्रता स्त्रीने धर्मव्याधाचे वर्णन खालील शब्दात केले आहे.

'मातृपितृभ्यां शुश्रूषुः सत्यवादी जितेन्द्रियः ।

मिथिलाभ्यां वसन् स ते धर्मान् प्रवक्ष्यति ।। (२७)

(अर्थ - मिथिला नगरीत राहणारा, आई-वडिलांची सेवा-शुश्रूषा करणारा, सत्यनिष्ठ आणि इंद्रियांवर पूर्ण विजय मिळविलेला असा व्याध तुला धर्माचे खरे स्वरूप समजावून सांगेल.)

वनपर्वातील धर्मव्याधाची ही कथा एकंदर नऊ अध्यायात आलेली आहे. या अध्यायांमधून धर्मव्याधाने कौशिक ब्राह्मणाला धर्माचे ज्ञान अतिशय सविस्तरपणे समजावून सांगितले आहे.

---

२५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७.४०)

२६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९७.४३)

२७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८. १९, २०)

पतिव्रता स्त्रीने सांगितल्याप्रमाणे नंतर कौशिक ब्राह्मण मिथिला नगरीत धर्मव्याधाकडे गेला. जेथे प्राण्यांचा वध करत होते. त्याठिकाणी तो धर्मव्याध हरिणे व रेडे (मृग आणि महिष) यांचे मांस विकत असताना त्याला दिसला.

कौशिक ब्राह्मणाने धर्मव्याधाची चौकशी केली. तेव्हा धर्मव्याधाने येऊन त्याचे स्वागत केले. धर्मव्याध म्हणाला, 'आपल्याला पतिव्रता स्त्रीने येथे येण्यास सांगितले हे सर्व मी जाणतो. मी आपले काय प्रिय करू ? हे स्थान आपणासारख्यांसाठी अयोग्य आहे. जर आपली संमती असेल तर आपण माझ्यासाठी घरी जाऊ.' पतिव्रता स्त्रीची हकीगत व्याधाला कशी कळली ? हे मला दिसलेले दुसरे आश्चर्य ?' असे कौशिक ब्राह्मणाच्या मनात आले.

नंतर ते दोघे धर्मव्याधाच्या घरी गेले. तेथे व्याधाने कौशिक ब्राह्मणाचा यथायोग्य आदरसत्कार केला. त्यानंतर धर्मव्याधाने कौशिक ब्राह्मणाला धर्माचे सूक्ष्म ज्ञान सांगण्यास सुरुवात केली. कौशिक ब्राह्मणाने व्याधाला शंका विचारली, 'मांस विक्रयाचे तुझे कर्म मला योग्य वाटत नाही. तुला हा हिंसाचार योग्य आहे. असे वाटते का ?'

अध्याय १९८ मध्ये धर्मव्याधाने ब्राह्मणाच्या शंकेचे निरसन केले आहे. धर्मव्याध म्हणाला, 'वाडवडिलांपासून चालत आलेला हा माझा उपजीविकेचा व्यवसाय आहे. विधात्याने माझ्यासाठी निश्चित केलेले हे माझे विहित कर्तव्य आहे. ते मी निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करतो.

मी मांसविक्रय करीत असलो तरी मी सदाचारी आहे मी नेहमी सत्य बोलतो. यथाशक्ती दान देतो. देवता, अतिथी, सेवक यांना तृप्त करून मगच भोजन करतो. कोणाचाही मत्सर अथवा निंदा मी करत नाही. वृद्ध मातापित्यांची मी शुश्रूषा करतो. [२८]

यानंतर अध्याय १९८ मध्ये धर्मव्याधाने सदाचरणाचा उपदेश केला आहे. तो पुढीलप्रमाणे –

'शक्त्या अन्नदानं सततं तितिक्षा धर्मनित्यता ।

यथार्ह प्रतिपूजा च सर्वभूतेषु वै दया ।।

त्यागात् न अन्यत्र मर्त्यांना गुणास्तिष्ठन्ति पुरुषे ।

मृषावादं परिहरेत् कुर्यात् प्रियमयाचित: ।।

न च कामात् न संरम्भात् द्वेषात् धर्म उत्सृजेत् ।

(अर्थ – सतत यथाशक्ती अन्नदान करणे, सहनशीलता, निरंतर कर्तव्याचरणाची ओढ, पूजनीय

२८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३. १९८. २१, २२)

व्यक्तींचा त्यांच्या योग्यतेप्रमाणे मान राखणे या गोष्टी त्यागाशिवाय कोणत्याही मनुष्याच्या अंगी असणार नाहीत. म्हणून असत्य बोलणे सोडून द्यावे. कोणी याचना केल्याशिवायच त्याला प्रिय असे वागावे. (त्याचे प्रिय करावे.) लालसेमुळे (कामात्–लोभामुळे), गोंधळल्यामुळे किंवा मत्सरामुळे (कर्तव्याचरणाचा) धर्माचा त्याग करू नये.) [२९]

धर्मव्याधाने पुढे असेही सांगितले आहे की वेदांचे रहस्य सत्य हे आहे. सत्याचे रहस्य संयम हे आहे. इंद्रियनिग्रहाचे रहस्य त्याग हे आहे. [३०]

यानंतर याच अध्यायात श्लोक ५७ ते श्लोक बासष्ट या सहा श्लोकात शिष्टाचारात अंतर्भूत असणारे गुण धर्मव्याधाने स्पष्ट केले आहेत. तप, दान, यज्ञ, त्याग, सत्य व वेदाध्ययन या पाच गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असे धर्मव्याधाने सांगितले आहेत. षड्रिपुंवर विजय, गुरुजनांची सेवा इत्यादि सर्व सदाचार शिष्टाचारात अंतर्भूत असतात. याखेरीज सदाचारातील बारीकसारीक तपशील धर्मव्याधाने सांगितले आहेत. हा सर्वच उपदेश अत्यंत विस्तृत असा आहे.

अध्याय १९९ या अध्यायात धर्मव्याधाने हिंसेचे स्वरूप सांगून अहिंसेचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. अहिंसेबद्दल बोलताना धर्मव्याधाने सांगितले आहे.

अहिंसा सत्यवचनं सर्वभूतहितं परम्।

अहिंसा परमोधर्मः स च सत्ये प्रतिष्ठितः ।। [३१]

(अर्थ – अहिंसा हेच खरे वचन व सर्व प्राणिमात्रांचे सर्वश्रेष्ठ असे हित आहे. अहिंसाचरण हाच सर्वश्रेष्ठ असा धर्म आहे. तो सत्यावर आधारित आहे.)

यानंतर अध्याय १९९ मध्ये धर्मव्याधाने हिंसेचे स्वरूप सांगून हिंसा कोठे कोठे आढळते याचे विवेचन केले आहे.

'मी करत असलेले कर्म भयंकर हे खरेच आहे. परंतु पूर्वापार चालत आलेले हे माझे विहित असे उपजीविकेचे साधन असे कर्म असल्याने मला त्याचा दोष नाही. वृक्ष व औषधी तोडताना, शेतीत शेत नांगरताना अनेक जीवजंतूची हत्या होते. वनस्पतींचे भक्षण करताना हत्या होते. 'जीवो जीवस्य जीवनम्।' या नात्याने अनेक प्राणी इतर प्राण्यांवर उपजीविका करतात. मोठे मासे लहान माशांवर उपजीविका करतात. ही सर्व हिंसाच आहे. म्हणून शंभर टक्के अहिंसा अशक्यच आहे, हे तू जाणतोसच. तेव्हा दुष्ट बुद्धीने, क्रूरपणे

---

२९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८. ३९, ४०)

३०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व(३.१९८.६२)

३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९८.६९).

अहेतुक एखाद्याची हत्या करू नये. अहिंसा ही शारीरिक तशीच मानसिकही असावी. कठोर वाक्ताडन ही हिंसाच ! तेव्हा अशा हिंसा टाळाव्यात. धर्म–अधर्म, सत्य–असत्य, हिंसा–अहिंसा याबाबत विवेक व तारतम्य आवश्यक आहे. पण विहित कर्म करण्यात जो मग्न असतो त्यालाच यशप्राप्ती होते. (३२)

अध्याय दोनशे मध्ये कर्मफल व पुनर्जन्म याविषयी विवेचन आले आहे. सत्य–असत्य याचा विचार व पालन तारतम्याने करावे असे धर्मव्याधाने सांगितले आहे.

'प्राणात्यये विवाहे च वक्तव्यम् अनृतं भवेत् ।

अनृतं च भवेत् सत्यं, सत्यं चैवानृतं भवेत् ।।

यद् भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा ।

विपर्ययकृतोऽधर्मः पश्य धर्मस्य सूक्ष्मताम् ।।'

(अर्थ – एखाद्याच्या प्राणावर बेतले असेल, व विवाह जमत असेल तर अशावेळी असत्य भाषण करणे भाग असते. अशा वेळी असत्य भाषणानेच सत्य भाषणाचे फळ मिळते. सत्य हे अशा वेळी असत्य ठरते.

परंतु प्राणीमात्रासाठी अत्यंत हितकारक असे जे तेच सत्य अशी धारणा आहे. अशावेळी विपरीत आचरण हा मोठाच अधर्म होय. ) (३३)

यानंतर मनुष्यजन्माचे कारण व पापपुण्यगतींचा विचार धर्मव्याधाने समजावून सांगितला आहे.

अध्याय २०१ मध्ये पञ्चेन्द्रिये, त्यांच्या उपभोगाचे विषय सांगून काम, क्रोध या विकारांमुळे पापाचरण घडते असे धर्मव्याधाने सागितले आहे. तसेच ब्रह्मविद्येचे स्पष्टीकरणही केले आहे. यावर कौशिक ब्राह्मणाचे उद्गार महत्त्वाचे आहेत. तो म्हणतो,

'ब्रवीषि सूनृतं धर्मं यस्य वक्ता न विद्यते ।

दिव्यप्रभावः सुमहान् ऋषिरेव मतोऽसि मे ।।'

(अर्थ – अत्यंत सत्य अशा धर्माचे प्रतिपादन तू केले आहेस. जे सांगणारा कोणीच भेटत नाही. तुझे सामर्थ्य फार मोठे आहेस. तू खरोखरी ऋषीच आहेस असे मला वाटते.) (३४)

याठिकाणी धर्मव्याधाच्या शूद्र वर्णाला महत्त्व न देता त्याच्या ज्ञानसंपन्नतेने कौशिक ब्राहमणाने

---

३२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१९९. १ ते ३४).

३३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२००. ३, ४)

३४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०१. १२)

त्याला ऋषीच मानले आहे. हे पाहण्यासारखे आहे.

अध्याय २०२ मध्ये पञ्चमहाभूतांचे गुण सांगून इंद्रिय निग्रहाचे महत्त्व वर्णन केले आहे. यामध्ये रथाचे रूपक वर्णन केले आहे.

'मनुष्याचे शरीर रथ, आत्मा सारथी, पञ्चेंद्रिये हे घोडे, या घोड्यांना निग्रहाने ताब्यात ठेवणाराच सुखी होतो. ' (३५)

याउलट स्वैर इंद्रियांना ज्याचे मन ताब्यात ठेवत नाही. त्याची बुद्धी ही पाण्यातील नौका ज्याप्रमाणे वाऱ्याने भरकटते, तशी भरकटत जाते.' असे सांगितले आहे. (३६)

अध्याय २०३ मध्ये सत्व, रज, तम या द्रव्याच्या गुणांचे वर्णन केले असून मोक्षप्राप्तीसंबंधी कौशिक ब्राह्मणाने प्रश्न केला आहे. त्याचे सविस्तर विवेचन धर्मव्याधाने केले आहे. या अध्यायात अध्यात्माचे पूर्ण विवेचन आहे.

यानंतर अध्याय २०४ ध्ये धर्मव्याध कौशिक ब्राह्मणाला आपल्या मातापित्याचे दर्शन घडवितो. मातापित्यांकडे नेतो. आपल्याला प्रत्यक्ष ज्यामुळे ज्ञानसिद्धी प्राप्त झाली त्या खऱ्या धर्माचा उपदेश तो कौशिक ब्राह्मणाला करतो.

पिता माता च भगवन् एतौ मे दैवते परम् ।
यत् देवतेभ्य: कर्तव्यं तदेताभ्यां करोम्यहम् ।। (३७)

(अर्थ – हे ब्राह्मणश्रेष्ठा, वडील आणि आई हीच माझी सर्वश्रेष्ठ अशी दैवते आहेत. देवतांसाठी जे जे म्हणून करावयाचे ते ते मी यांच्यासाठी करतो.)

धर्मव्याधाने सांगितले आहे, 'मी स्वत: आईवडिलांची सर्वप्रकारे काळजी घेतो. लोक देवतांची पूजा करून त्यांना संतुष्ट ठेवतात. त्याप्रमाणे मी मातापितरांना फुले, फळे व रत्ने देऊन संतुष्ट ठेवतो. मी स्वत: त्यांना भोजन देतो. स्वत: त्यांना स्नान घालतो. माझी पत्नी, मुले व सेवक या सर्वांसह मी त्यांची सेवा करतो.(३८)

धर्मव्याधाने अध्याय २०५ मध्ये कौशिक ब्राहमणाला त्याच्या पूर्वकाळातील वृत्ताची आठवण करून दिली. आपल्या मातापित्यांची अनुज्ञा न घेताच तपश्चर्येसाठी कौशिक ब्राह्मण बाहेर पडला होता.

---

३५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०२. २१)

३६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व(२०२.२४)

३७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०४ . १७)

३८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०४. १८ ते २२)

धर्मव्याध म्हणाला, 'तू तुझ्या मातापित्यांचा अपमान केला आहेस. ते एकाकी पडले आहेत.तुझ्यासाठी दु:ख करून ते अंध झाले आहेत. हे योग्य नाही. सर्व धर्मनिष्ठता, वेदाध्ययन हे मातापित्यांच्या सेवेवाचून निष्फळ आहे.' (३९)

हे ऐकून कौशिक ब्राह्मणाचे डोळे खाड्कन उघडले. त्याला आपली चूक कळून आली. उपरती झाली. तो धर्मव्याधाला म्हणाला,

'ब्राह्मण: पतनीयेषु वर्तमानौ विकर्मसु ।

दाम्भिको दुष्कृतप्राय: शूद्रेण सदृशो भवेत् ।।१ ।।

यस्तु शूद्रे दमे सत्ये धर्मेच सततोत्थित: ।

तं ब्राह्मणमहं मन्ये वृत्तेन हि भवेत् द्विज: ।।२ ।।

(अर्थ – १) जर ब्राह्मण दाम्भिक (ढोंगी) व पापाचरण करणारा असून स्वत:चे पतन (अध:पात) यास कारणीभूत होणारी कर्मेकरू लागल्यास तो शूद्रच असतो.

२) परंतु जर एखादा शूद्र इंद्रियनिग्रह, सत्य आणि धर्माचरण (निष्ठेने कर्तव्याचे पालन) सतत करत असेल तर त्याला मी ब्राह्मणच मानतो. कारण आचरणाने – वर्तणुकीनेच कोणीही ब्राह्मण होतो.)(४०)

कौशिक ब्राह्मणाच्या या उद्गारावरून ही गोष्ट स्पष्ट होते.की महाभारतकाली सदाचरणाला अत्यंत महत्त्व होते. वर्णाने ब्राह्मण की शूद्र हा मुद्दा गौण मानला जाई. तेव्हा याचप्रमाणे मनुष्याचा जन्मानुसार धर्म कोणता हे महत्त्वाचे नाही. सर्व धर्म आचरणाबाबत समान अशीच शिकवण देतात. यादृष्टीने मनुष्यधर्म – मानवताधर्म यावर भर दिला पाहिजे. हेच सर्वधर्मसमभावाचे तत्त्व आहे.

४) संवेदनशीलता :–

सहसंवेदना (संवेदनशीलता)– मनुष्याला पञ्च ज्ञानेंद्रिये व पञ्च कर्मेन्द्रिये ही विधात्याने दिली आहेत. रूप, रस, गंध, स्पर्श, शब्द, या पाच गोष्टींचा अनुभव अनुक्रमे नेत्र, जिव्हा, घ्राण, त्वचा व श्रोत्र या ज्ञानेंद्रियांनी तो घेतो. याखेरीज त्याच्याजवळ परमेश्वराने दिलेली अलौकिक देणगी म्हणजे भावना, अंत:करण व मन ! याद्वारा विविध सुखदु:खांचा अनुभव तो घेतो. आपल्या सुखदु:खांचा विचार जसा मनुष्य करतो, तीच सुखदु:खे इतरांच्या बाबतीतही तशीच व तितकीच सत्य असतात याची जाणीव म्हणजेच सहसंवेदना होय.

---

३९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०५. ७ ते १०)

४०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२०६.११, १२)

दया, क्षमा, दान, त्याग, अमात्सर्य या चिरंतन मूल्यांचा उगम या सहसंवेदनेतूनच होतो. म्हणूच सहसंवेदना या मूल्यांचा संस्कार होण्यासाठी दयाबुद्धी, त्याग, क्षमावृत्ती, दान ही मूल्ये ज्यामधून प्रकट होतात अशा महाभारतातील काही कथा पाहण्यासारख्या आहेत. अर्थात् या सर्व मूल्यांचा अंतिम परिणाम अहिंसा या मूल्याच्या संस्कारात होतो. त्यामुळे दया, दान, त्याग, क्षमा ही सर्व मूल्ये अहिंसा या मूल्याच्या पोटातच समाविष्ट आहेत.

१) मनूमत्स्यकथा –[४१]

वैवस्वत मनूची ही कथा वनपर्वात आलेली आहे. विवस्वत मुनींचा पुत्र मनु हा अतिशय पराक्रमी व प्रजापतीप्रमाणे कान्ती असणारा असा होता. ओज, सामर्थ्य व तेज यांनी युक्त असणारा तो अत्यंत पराक्रमी होता. लक्ष्मी व तपश्चर्या यांच्या योगाने त्याने आपले वडील व आजोबा यांनाही मागे टाकले होते.

एका विशाल अशा बदरी वृक्षाखाली एका पायावर उभा राहून तो तपश्चर्या करीत होता. तो जटाधारी असून त्याने ओली वस्त्रे परिधान केली होती. चीरिणी नदीच्या तीरावर अशाप्रकारे तो उभा असताना एका छोट्या माशाने त्याच्याजवळ येऊन प्रार्थना केली.

'भगवन्क्षुद्रमत्स्योऽस्मि बलवद्भ्य: भयं मम ।

मत्स्येभ्यो हि ततो मां त्रातुमर्हसि सुव्रत ।। [४२]

(अर्थ – हे उत्तम व्रत आचरणाऱ्या मुनिश्रेष्ठा, मी एक दुबळा, लहान मासा आहे. सामर्थ्यवान अशा मोठ्या माशांपासून मला भय आहे. तेव्हा तू माझे रक्षण कर.)

'कृपया अभिपरिप्लुत' (अत्यंत दयाळू ) अशा वैवस्तव मनूने त्याला तळहातावर घेतले. नंतर चंद्रकिरणांप्रमाणे शुभ्र अशा रांजणात ठेवून त्याचा प्रतिपाळ केला.

दिसामासांनी तो मासा हळूहळू वाढू लागला. तेव्हा त्या माशाच्या आकारमानाप्रमाणे मनूने त्याला प्रथम दोन योजने लांब व एक योजने रुंद अशा मोठ्या विहिरीत सोडले. नंतर समुद्रमहिषी अशा गंगानदीत सोडले. तेथेही तो मावेनासा झाल्यावर मनूने त्याला शेवटी समुद्रात सोडले.

त्यावर मासा त्याला म्हणाला,

'भगवन्कृक हि मे रक्षा त्वया सर्वा विशेषत: ।

प्राप्तकालं तु यत्कार्यं त्वया तत् श्रूयतां मम ।। [४३]

---

४१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१८५.१ ते ५४)

४२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१८५.७)

४३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१८५.२५)

(अर्थ – हे भगवान आपण विशेषप्रकारे सर्व तऱ्हेने माझे रक्षण केलेत. तेव्हा योग्य वेळी काय करावे हे मी तुम्हाला सांगतो, ते ऐकावे.)

माशाने सांगितले, 'थोड्याच काळात जलप्रलय होईल. त्यावेळी आपण एका मोठ्या नौकेत सप्तर्षी व सर्व प्रकारची धान्ये यासह बसावे. एक मोठा दोर जवळ ठेवावा.'

नंतर जलप्रलयाच्या वेळी शिंग असलेल्या त्या माशाने त्या दोराचा फास आपल्या शिंगाला घट्ट बांधला. नंतर ती नौका ओढून नेऊन हिमालयाच्या सर्वात उंच शिखराला घट्ट बांधली. अद्यापही ते शिखर 'नौबंधन' या नावाने प्रसिद्ध आहे. यानंतर अनेक वर्षे ती नाव समुद्रात हेलकावे खात होती.

पाणी ओसरल्यानंतर वैवस्वत मनूने पुन्हा सर्व सृष्टी निर्माण केली अशी कथा आहे.

माशाच्या भीतीमुळे मनूच्या मनात जी दया निर्माण झाली ती सहसंवेदना या मूल्यामुळेच होय. माशाच्या भीतीच्या संवेदनेची जाणीव मनूला झाली. म्हणूनच त्याने काळजीपूर्वक माशाचे रक्षण केली. याचप्रमाणे माशाची मनूने केलेल्या संकटकालीन मदतीची जाणीव व त्यासंबंधीची कृतज्ञता या कथेतून स्पष्ट होते.

सहसंवेदना या मूल्याचा संस्कार या कथेद्वारे फार चांगल्या प्रकारे होऊ शकतो.

२) अशीच सहसंवेदनेचा उत्कृष्ट संस्कार घडविणारी आणखी एक कथा आदिपर्वात आली आहे. ती कथा बकासुरवधाची कथा होय.

२) बकासुरवधाची कथा – (४४)

बकासुरवधाची कथा आदिपर्वात एकंदर आठ अध्यायांमध्ये सांगितलेली आहे.

दुर्योधनाने वारणावत नगरीत पांडवांना पाठविले. तसेच लाक्षागृहात त्यांना जाळून मारण्याचा कटही रचला. परंतु पांडव भुयारमार्गाने लाक्षागृहाला लागलेल्या आगीतून निसटून सुखरूप बाहेर पडले. अनेक नद्या पार करून,अनेक अरण्यांमधून प्रवास करीत असता व्यासमुनी यांना भेटण्यास आले. व्यासमुनींनी त्यांना जवळच असणाऱ्या एकचक्रा नावाच्या नगरीत एका ब्राह्मणाच्या घरी राहण्यास सांगितले.

याप्रमाणे ते एकचक्रा नगरीत ब्राह्मणाच्या घरी राहात होते. ते भिक्षा मागून उपजीविका करीत. याप्रमाणे ते राहात असता एक दिवस त्यांना घरातून मोठमोठ्याने रडण्याचा आवाज आला. त्या दिवशी भीमसेन घरी थांबला होता.तेव्हा भीमसेनाने कुंतीला घरात जाऊन 'काय प्रकार आहे' ते पाहून येण्यास सांगितले.

---

४४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१४४.१ ते १५२.१९).

त्याप्रमाणे कुंती गेली असता ब्राह्मण, त्याची पत्नी, मुलगी व मुलगा सर्वच आक्रोश करताना तिला दिसले. ब्राह्मण, त्याची पत्नी, मुलगी व लहान मुलगा यांच्यात 'कोणी मरण पत्करावे' यासंबंधी वाद चाललेला आहे असे कुंतीने पाहिले. ब्राह्मण म्हणत होता, 'कुलाचे रक्षण हे माझे कर्तव्य आहे. म्हणून पत्नी, मुलगी व मुलगा यांच्यापेक्षा मी मरणाचा स्वीकार करणेच योग्य ! यावर ब्राह्मणपत्नी म्हणाली,

'न चाप्यधर्मः कल्याण, बहुपत्नीकता नृणाम्।

स्त्रीणामधर्मः सुमहान् भर्तुः पूर्वस्य लङ्घने ।।३४।।

एतत् सर्वं समीक्ष्य त्वं आत्मत्यागं च गर्हितम्।

आत्मानं तारय मया कुलं चेमौ च द्वारकौ ।।३५।। (४५)

(अर्थ – हे हितकारक पुरुषा, माणसाने अनेक भार्या करणे यात कोणताही अधर्म नाही. परंतु पत्नीधर्माचे उल्लंघन हा स्त्रियांच्या बाबतीत मोठाच अधर्म आहे. या सर्वांचा विचार करून आत्मघात हा निंदनीय असा विचार करून, माझा त्याग करून आपण आपले, कुलाचे व या दोन अपत्यांचे रक्षण करावे.)

लगेच ब्राह्मणाची मुलगी हे ऐकून म्हणाली, 'धर्मदृष्ट्या पाहिले तर केव्हातरी तुम्ही माझा त्याग करणारच आहात. तेव्हा अशा माझा त्याग करून, माझ्या एकटीमुळे आपणा सर्वांचे रक्षण होईल.

यावर छोटा मुलगा म्हणाला, ''माझ्या हातातील या गवताच्या काडीने त्या नरभक्षक राक्षसाला मी ठार करेन.''

त्या चौघांचा हा वाद ऐकून कुंतीने ब्राह्मणाला शोकाचे कारण विचारले. तेंव्हा ब्राह्मणाने बकासुराची सर्व हकीगत तिला सांगितली. ब्राह्मण म्हणाला, 'सामर्थ्यवान असा बक राक्षस या नगराचा अधिपती आहे. त्याला रोज तीस मण तांदुळाचा भात, दोन रेडे व एक मनुष्य असे भोजन द्यावे लागते. तेव्हा आज ती वेळ आमच्यावर आली आहे, म्हणून आम्ही शोकमग्न आहोत.

तेव्हा कुंतीने सागितले, माझे पाच पुत्र आहेत. ब्राह्मणांचे रक्षण करावे असे मला वाटते. माझा हा पुत्र (भीमसेन) अत्यंत बलाढ्य असून तो त्या राक्षसाला निश्चितच ठार मारेल. त्याला मन्त्रसिद्धीही आहे.' भीमसेनानेही ही गोष्ट मान्य केली. कुंतीने युधिष्ठिराला सांगितले. 'मी केवळ लोभामुळे, अज्ञानामुळे किंवा बुद्धिभ्रंशामुळेही गोष्ट ठरविली नाही. तर जाणीवपूर्वक –ब्राह्मणाच्या उपकाराची फेड व धर्माचरण यासाठी ठरविले आहे.' (४६)

---

४५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१४५.३४, ३५).

४६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१५०.१९).

यावर युधिष्ठिराने म्हटले, 'त्वया इदं अनुक्रोशात् कृतम्।' (४७)

त्यानंतर भीमसेनाने सर्व सामुग्रीनिशी बकासुराकडे जाऊन त्याच्याशी तुंबळ युद्ध करून त्याला ठार मारले.

एकचक्रानगरीतील सर्व प्रजा भयमुक्त झाली.

बकासुरवधाच्या या कथेतून ब्राह्मण कुटुंबातील व्यक्तींची परस्परांसाठी प्रत्यक्ष प्राणत्यागाची तयारी,कुंती व भीमसेन यांची दयाबुद्धी या संवेदनशीलतेमधून निर्माण होणाया मूल्यांचा उत्तम परिचय होतो. यात शंका नाही. तेव्हा संवेदनशीलता–सहसंवेदना या मूल्यांचा संस्कार या कथेद्वारा निश्चित करता येईल. जुलमी व दुराचरणी माणसांपासून निर्बलांचे रक्षण हे संवेदनशीलतेमुळेच होते. भीमाचे हे कृत्य 'लोकहिताचे' होते असेच व्यासमुनींनी म्हटले आहे.

'स तदन्नमुदाय गतो बकवनं प्रति।

तेन नूनं भवेत् एतत् कर्म लोकहितं कृतम्।। (४८)

२) आता क्षमावृत्तीची काही उदाहरणे ज्यात आहेत अशा कथा पाहू.

युधिष्ठिर हा अतिशय क्षमाशील वृत्तीचा होता. त्याची क्षमाशील वृत्ती दोन प्रसंगात स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहे.

पहिला प्रसंग घोषयात्रेचा आहे. ती कथा एकात्मता या प्रकरणात सविस्तर आलीच आहे. चित्ररथ गंधर्वाने दुर्योधनाला पकडले. तो त्याला घेऊन जात असताना ही वार्ता भीम व अर्जुनाला कळताच त्यांना बरेच वाटले. 'जे आम्ही करावयास हवे होते तेच गंधर्वांनी केले आहे.' असे ते दोघे म्हणाले. परंतु युधिष्ठिराने मात्र त्याने पूर्वी केलेले सर्व अपराध,त्याची दुष्ट वृत्ती विसरून जाऊन भीम, अर्जुन यांना दुर्योधनास सोडवून आणण्याची आज्ञा केली. (४९)

दुसरा प्रसंग जयद्रथाने ज्यावेळी द्रौपदीचे हरण केले त्यावेळचा आहे. जयद्रथाने द्रौपदीला बळजबरीने आपल्या रथात घेतले. तसेच हे करताना तिचे हरएकप्रकारे मन वळविण्याचा प्रयत्न केला. भीमसेन जयद्रथाला ठारच मारणार होता. परंतु युधिष्ठिराने भीमाला आठवण करून दिली. जयद्रथ हा पांडवांची चुलतबहीण दुःशला हिचा पती होता. त्यामुळे तिचा विचार करणे महत्त्वाचे होते. तसेच गांधारीचा विचार करावयास हवा, असे युधिष्ठिर म्हणाला. (५०)

---

४७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१५०.२६).

४८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१५२.१७)

४९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व – घोषयात्रापर्व (३.२३३ ते २३५).

५०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२५५.४२, ४३)

जयद्रथ हा कुरुकुलाचा जावई होता. म्हणून युधिष्ठिराने क्षमाशील वृत्तीने त्याच्या अपराधाबद्दल क्षमा केली. केवळ त्याच्या मस्तकावरील पाच पाट काढण्याची शिक्षा करून त्याला सोडून दिले.

१) भीम – न हि मे मोक्ष्यते जीवन्मूढ: सैन्धवको नृप।
पातालतलसंस्थोऽपि यदि शक्रोऽस्य सारथि: ।।

२) युधिष्ठिर – न हन्तव्यो महाबाहो दुरात्मापि स सैन्धव:।
दु:शलाम् अभिसंस्मृत्य गान्धारी च यशस्विनाम् ।।

महाभारतात शापाच्या अनेक कथा आल्या आहेत. ज्यामध्ये एखाद्या अपराधाबद्दल थोर ऋषी शाप देत. परंतु अंत:करणपूर्वक चुकीची कबूली दिली की क्षमाबुद्धीने ते उ:शापही देत.

१) आदिपर्वामध्ये पुलोमेची कथा आली आहे. पुलोमा राक्षसास भृगु ऋषी व पुलोमा यांच्या विवाहाचे वृत्त अग्नीने सांगितले. पुलोमेच्या लहानपणी ती रडत असताना तिच्या वडिलांनी सांगितलेले असते की, तुला राक्षसाला देऊन टाकीन हे राक्षसाने ऐकले व तो तिला आपली पत्नी समजून घेऊन चालला. भृगु ऋषींना हे वृत्त कळताच त्यांनी अग्नीला शाप दिला. 'तू सर्वभक्षक होशील ! ' मात्र अग्नीने ब्रह्मदेवास खरी हकीगत सांगताच ब्रह्मदेवाने अग्नीला उ:शाप दिला. 'तुझ्या फक्त वरच्या ज्वाला सर्वक्षमक होतील. बाकीचे शरीर तसेच राहील.' (५१)

२) अशीच आणखी एक कथा ययातीची आहे. देवयानीशी ययाती विवाह करतो. ती शुक्राचार्यांची कन्या असते. त्यानंतर तिची दासी असलेल्या वृषपर्वा राजाची कन्या शर्मिष्ठा हिच्याशीही तो गुप्तपणे दुसरा विवाह करतो. तेव्हा शुक्राचार्य मुनी त्याला 'तू जराग्रस्त – वृद्ध होशील.' असा शाप देतात. परंतु त्याने क्षमायाचना केल्यावर त्याला क्षमाबुद्धीने उ:शापही देतात. 'जर तुझे वृद्धत्व कोणी स्वत:कडे घेईल तर तू पुन्हा तरूण होशील.' (५२)

३) तिसरी कथा अजगर पर्वात आली आहे. भीमाला विळखे घालणारा अजगर हा दुसरा तिसरा कोणी नसून पूर्वाश्रमीचा नहुष राजा होता. आपले सामर्थ्य, संपत्ती यांच्यामुळे तो अहंकारी व उन्मत्त झाला. शंभर ब्राह्मणांना तो आपली पालखी वाहून नेण्यास सांगत असे. अशातऱ्हेने तो जात असता त्याचा पाय अगस्ती ऋषींना लागला. तेव्हा क्रोधाने त्यांनी नहुषाला शाप दिला, 'तू अजगर योनीत जन्म घेशील.' यावर पश्चातापदग्ध होऊन त्याने ऋषींकडे क्षमायाचना केल्यावर त्यांनी उ:शाप दिला. ''खरा ब्राह्मण कोण? व खरे

---

५१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१, ५, ६,१३) (१.७.२० ते २२).

५२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.७८.३० व ३८).

ज्ञेय (जाणण्यास योग्य असे ज्ञान) कोणते ? या प्रश्नांची उत्तरे तू शोधलीस, ती तुला मिळाली की तुझी शापातून मुक्तता होईल.'' (५३)

या कथांवरून संवेदनशीलता हा ऋषींचा ठिकाणचा गुण निश्चित प्रकट होतो.

३) संवेदनशीलता ज्यामधून प्रभावीपणे प्रकट होते असे आणखी एक महत्त्वाचे मूल्य म्हणजे दानी वृत्ती (दान) होय.

१) पहिली कथा दधीची ऋषींची आहे.

वृत्रासुर नावाचा एक असुर अत्यंत उन्मत्त झाला होता. कालेय नावाच्या राक्षस गणांच्या साहाय्याने तो देवांना अनेक प्रकारे त्रास देत असे. देवांना त्याने अगदी 'त्राहि भगवान्' असे करून सोडले होते. इंद्रालाही तो वरचढ ठरला होता.

तेव्हा सर्व देव मिळून ब्रह्मदेवाला शरण गेले. 'वृत्राचा नाश करण्याचा काहीतरी उपाय आम्हाला सांगा.' अशी त्यांनी ब्रह्मदेवाकडे याचना केली. ब्रह्मदेव म्हणाले, 'तुम्ही दधीची ऋषींकडे जा. त्यांची हाडे मागून घ्या. त्यापासून वज्र हे शस्त्र निर्माण करा. या वज्राने इंद्र वृत्रासुराचा वध करेल.'

तेव्हा सर्व देव दधीची ऋषींकडे गेले. त्यांनी दधीची मुनींना वृत्रासुत्राचे अत्याचार कथन केले. तसेच ब्रह्मदेवाने वज्र अस्त्र बनविण्यासाठी दधीचींच्या हाडांची आवश्यकता असल्याचेही सांगितले. त्यावर दधीची ऋषी काय म्हणाले, हे पुढील श्लोकात सांगितले आहे.

ततो दधीच: परमप्रतीत: । सुरोत्तमान् तान् इदमभ्युवाच ।

करोमि यद्वो हितमद्य देवा: । स्वं चापि देहं त्वहमुत्सृजामि ।। (५४)

स एवमुक्त्वा द्विपदा वरिष्ठ: । प्राणान्वशी स्वान्सहसोत्ससर्ज ।।

(अर्थ – तेव्हा अत्यंत प्रसन्न असे दधीची ऋषी त्या श्रेष्ठतम अशा देवांना म्हणाले, 'हे देवांनो, जे तुम्हाला हितकारक आहे असेच मी करीन. त्यासाठी मी माझ्या देहाचाही त्याग करीन! असे म्हणून सर्व मनुष्यप्राण्यात श्रेष्ठ, जितेंद्रिय अशा त्या मुनींनी योगबलाने स्वत:च्या प्राणांचा त्याग केला.)

नंतर देवांनी दधीची ऋषींची हाडे घेतली. नंतर देवांचा कारागीर जो विश्वकर्मा (त्वष्टा) त्याच्याकडे ती नेऊन दिली. त्या हाडांपासून विश्वकर्म्याने वज्र नावाचे शस्त्र बनविले. वृत्रासुर राक्षस व इंद्र यांच्यात घनघोर असे युद्ध झाले. वज्र या शस्त्राच्या मदतीने इंद्राने वृत्रासुराचा वध केला. सर्व प्रजा राक्षसांचे जुलूम व अत्याचार यापासून मुक्त झाली.

---

५३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१७३ ते १७८ ).

५४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.९८.२०, २१)

भीतीमुळे कालेय हा दैत्यगण समुद्रात जाऊन लपून राहिला. [५५]

संवेदनशीलता – असुरांमुळे होणाऱ्या त्रासाची जाणीव दधीची ऋषींना झाल्यामुळे लोकहितासाठी त्यांनी स्वत:च्या प्राणांचे दान दिले. हा त्याग, हे दान ही त्यागाची व दानाची परिसीमा होय. खलनिर्दालन हा त्यात प्रमुख हेतु होता. त्यामुळे या कथेद्वारे संवेदनशीलतेचा संस्कार हा करता येईल.

यानंतर समुद्रात लपलेल्या कालेय दैत्यांचा नाश करण्यासाठी अगस्ती मुनींनी समुद्रप्राशन केले. त्या दैत्यांचा नाश करून जगाला दैत्यांच्या भीतीपासून मुक्त केले. [५६]

२) शिबी राजाची असामान्य दानी वृत्ती [५७]

दुसरी कथा शिबी राजाची आहे. यमुना नदीच्या जवळ जला व उपजला या दोन नद्या होत्या. त्यांच्या तीरावर शिबी हा सामर्थ्यसंपन्न व सत्त्वशील राजा राहात होता. त्याच्या दानशूरतेची कीर्ती त्रैलोक्यात पसरली होती.

त्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याची इच्छा इंद्राला झाली. तेव्हा इंद्राने ससाण्याचे रूप घेतले. तर अग्नीने कपोताचे –कबूतराचे रूप घेतले. ससाणा कबूतरामागे त्याला पकडण्यासाठी जाऊ लागला. भयभीत झालेले कबूतर वेगाने शिबी राजाच्या जवळ आले. ते भीतीने थरथरत शिबी राजाच्या मांडीवर बसले. त्याने आपले प्राण वाचविण्याची याचना शिबी राजाकडे केली. शिबी राजाने त्याला अभयदान दिले.

एवढ्यात ससाणा तेथे उडत उडत आला. आपले भक्ष्य असणारा कपोत पक्षी आपल्याला परत देण्याची मागणी त्याने राजाकडे केली. शिबी राजा म्हणाला, ‘शरणागताला अभय देणे हे माझे व्रत आहे. हे कबूतर सोडून तू दुसरे काहीही माग. या कबूतराच्या वजनाइतके अन्य कोणत्याही प्राण्याचे व पक्ष्याचे मांस मी तुला देतो.’’ परंतु ससाण्याने ही गोष्ट नाकारली.

ससाणा म्हणाला, ‘हे कबूतर हे माझे स्वकष्टार्जित भक्ष्य आहे. मला दुसरे काहीही नको.’ राजाने अनेक पर्याय सुचवूनही ससाण्याने ते सर्व नाकारले. शेवटी राजा स्वत:चे मांस देण्यास तयार झाला.

तराजूच्या एका पारड्यात कबूतर ठेवून दुसऱ्या पारड्यात राजा स्वत:चे मांस कापून टाकू लागला. परंतु दोन्ही पारडी समसमान होईनात. कबूतराचे पारडे जडच राहिले. शेवटी राजाचा अंत होण्याची वेळी आली.

---

५५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.९८. १ ते २४)

५६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१०० ते १०१)

५७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.१३०.१७ ते ३.१३१.३०)

राजाची ही तत्त्वनिष्ठा व दानी वृत्ती पाहून इंद्र प्रसन्न झाला. इंद्र व अग्नी यांनी स्वत:ची रूपे धारण केली. इंद्र शिबी राजाला म्हणाला,

इन्द्रोऽस्मि धर्मज्ञ कपोतो हव्यवाडयम्।

जिज्ञासमानो धर्मेत्वां यज्ञवाटमुपागतौ ।।

यत्ते मांसानि गात्रेभ्य: उत्कृतानि विशां पते।

एषा ते भास्वरी कीर्ति: लोकानभिभविष्यति ।।

यावल्लोके मनुष्यास्त्वां कथयिष्यन्ति पार्थिव।

तावत्कीर्तिश्च लोकाश्च स्थास्यन्ति तव शाश्वता: ।। (५८)

(अर्थ – हे धर्मज्ञ राजा, मी इंद्र आहे व हे कबूतर म्हणजे अग्नी होय. तुझी कर्तव्यनिष्ठा जाणण्याच्या इच्छेने आम्ही येथे आलो. या जगतामध्ये तुझी तेजस्वी कीर्ती सर्वत्र राहील हे राजा, जोवर या जगात लोक तुझ्याबद्दल बोलत राहतील तोपर्यंत तुझी कीर्ती व राज्य हे शाश्वतच राहतील.)

दधीची मुनींप्रमाणेच शिबी राजाने कबूतराची कींव येऊन स्वत:चे मांस कापून देण्याचे कठीण कर्म स्वेच्छेने केले. संवेदनशीलता हाच गुण त्याच्या या कृतीतून दिसतो. त्यागाचे हे अंतिम टोक होय.

३) कर्णाची दानशूरता (कुण्डलाहरणपर्व) (५९)

दधीची ऋषी व राजा शिबीप्रमाणेच कर्ण हा त्याच्या पराकोटीच्या दानशूरतेबद्दल विख्यात आहे. वनपर्वातच अध्याय २८४ ते अध्याय २९४ अशा दहा अध्यायात ‘कुण्डलाहरणपर्व’ या नावाने ही कथा प्रसिद्ध आहे.

कर्णाने अर्जुनवधाची प्रतिज्ञा केली होती. कर्ण हा सूर्यपुत्र तर अर्जुन हा इंद्रपुत्र होता. कवचकुण्डले ही कर्णाची संरक्षक अशी होती. इंद्राने बेत केला की कर्ण हा दानशूर असल्याने आपण त्याचे दान मागितल्यास तो आपल्याला विन्मुख पाठवणार नाही. अशा तऱ्हेने आपल्याला अर्जुनाचे प्राण वाचविता येतील.

सूर्य हा कर्णाचा पिता होता. त्याला इंद्राचा बेत समजला. कर्णाकडे जोवर त्याची संरक्षक अशी कवचकुण्डले आहेत, तोवर कर्ण अजिंक्य आहे. त्याला मृत्यूपासून कोणतेही भय नाही हे सूर्याला माहीत होते. त्याने कर्णाला सावध करण्याचे ठरविले. सूर्य भगवी वस्त्रे धारण केलेल्या संन्यासी अशा व्यक्तीच्या रूपात कर्णाच्या स्वप्नात गेला.

---

५८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (अध्याय ३.१३१.२८ ते ३०)

५९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व – कुण्डलाहरणपर्व (अध्याय २८४ ते अध्याय २९४)

सूर्य कर्णाला म्हणाला, ‘हे कर्णा, मी तुला सावध करण्यासाठी आलो आहे. उद्या तू सूर्योपासना करत असताना तुझ्याकडे एक ब्राह्मण याचना करण्यासाठी येईल. तो तुझ्याकडे तुझ्या कवचकुण्डलाचे दान मागेल. तो प्रत्यक्ष इंद्र आहे. हे दान तू त्याला देऊ नकोस ? त्यावर कर्णाने त्याला पुढीलप्रमाणे उत्तर दिले.

१) इदं तु अनुजानीहि सुरश्रेष्ठ व्रतं मम ।
भिक्षते व्रजिणे दद्याम् अपि जीवितमात्मन: ।। (६०)

२) व्रतं वै मम लोकोऽयं वेत्ति कृत्स्नो विभावसो ।
यथाहं द्विजमुख्यभ्यो दद्यां प्राणानपि ध्रुवम् ।। (६१)

(अर्थ – हे देवश्रेष्ठा, हे माझे व्रत आहे हे तू जाणून घे. याचना करणाऱ्या इंद्राला मी स्वत:चे प्राणसुद्धा देईन.

हे सूर्यदेवा, ब्राह्मणश्रेष्ठांना मी नक्कीच माझे प्राणसुद्धा देईन. हे माझे व्रत संपूर्ण जग जाणते.

यावर सूर्यदेवाने कर्णाची पुष्कळ समजूत घातली. त्याची मनधरणीही केली. परंतु कर्ण आपल्या शब्दापासून तसेच आपल्या निश्चयापासून तसूभरही ढळला नाही.

यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयाचे वेळी कर्ण सूर्याला अर्घ्य देत असताना इंद्र ब्राह्मणरूपाने तेथे आला. त्यावेळी कर्णाने त्याला कोणती भिक्षा हवी असे विचारले. इंद्र म्हणाला, ‘‘मी जी भिक्षा, जे दान मागेन ते ऐकून तू आपल्या शब्दापासून मागे तर फिरणार नाहीस ना ?’’

यावर कर्णाने त्याला इच्छित दान देण्याचे वचन दिले. इंद्राने त्याची कवचकुंडले दान म्हणून मागितली. हे दान म्हणजे प्रत्यक्ष प्राणदानच होते. पण कर्ण पराङ्मुख झाला नाही. उलट तो इंद्राला म्हणाला.

‘उत्कृत्य तु प्रदास्यमि कुण्डले कवचं च ते ।
निकृत्येषु च गात्रेषु न मे बीभत्सता भवेत् ।। (६२)

(अर्थ – माझी दोन्ही कुण्डले व कवच मी तुला कापून काढून देईन. अशा तऱ्हेने अवयव सोलले जात असताना मला यत्किंचितही भीती वाटणार नाही.)

---

६०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२८६.९)

६१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२८४.२५)

६२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९४.३०)

कर्णाची ही पराकोटीची दानी वृत्ती, सत्यव्रतनिष्ठा पाहून इंद्र कमालीचा प्रसन्न झाला. त्याने कर्णाला अव्यंग तर केलेच. पण कोणत्याही बलाढ्य शत्रूविरुद्ध एकदाच उपयोग करता येईल अशी अमोघ शक्ती त्याला दिली.

'कर्णासारखा दानशूर' अशा उपमानरूपाने कर्ण अमर झाला. दधीची ऋषी, शिबी राजा, कर्ण अशी दानाच्या, त्यागाच्या व दयेच्या बाबतीतील ज्वलंत उदाहरणे ज्यांचे आदर्श होते, असे समाजसेवक, देशभक्त त्यानंतरच्या काळात निर्माण जाले. संवेदनशीलता या व्यक्तींच्या अंगी जशी होती, तशी इतरांच्यातही निर्माण करण्याचे सामर्थ्य या उदाहरणांमध्ये निश्चितच आहे.

५) श्रमप्रतिष्ठा –

कोणतेही शारीरिक कष्टाचे काम हलके किंवा कमी महत्त्वाचे न मानणे. असे काम हौसेने व मनापासून करणे म्हणजे श्रमप्रतिष्ठा होय. शारीरिक श्रमाचा संस्कारही याद्वारा केला जाई.

महाभारतकालात गुरुगृही शिक्षणासाठी राहणारे जे शिष्य होते, त्यांना सर्वप्रकारची कष्टाची कामे करावी लागत. आदिपर्वामधील धौम्यशिष्य आरूणी व उपमन्यु यांच्या कथांमधून ही गोष्ट स्पष्ट होते. आरुणी गुरुंच्या आज्ञेवरून शेतामध्ये बांध घालण्यासाठी गेला होता. तर उपमन्यु गाई राखण्याचे गुराख्याचे काम करीत असे. (६३)

कृष्ण व सुदामा हे सांदीपनी मुनींच्या आश्रमात होते. कृष्ण हा नंदाचा–ग्रामप्रमुखाचा पुत्र तर सुदामा गरीब ब्राह्मणाचा पुत्र होता. परंतु गुरूगृही पाणी भरणे, लाकडे तोडून आणणे यासारखी कष्टाची कामे सर्वांनाच करावी लागत. हा राजपुत्र–श्रीमंताचा पुत्र, हा गरीब असा भेदभाव नसे. यातूनच श्रमसंस्कार हा त्यांच्यावर होत असे.

दुसरे उदाहरण पांडवांचे देता येईल. पांडवांना दोन वेळा वनवास भोगावा लागला. एकदा लाक्षागृहाला लागलेल्या अग्नीतून जीव वाचवून भुयारद्वाराने दूरच्या वनात गेले. (६४) तसेच दुसऱ्यांदा सभापर्वामध्ये युधिष्ठिर द्यूतामध्ये हरल्यामुळे त्यांना बारा वर्षेवनवास व एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षा होती. त्यावेळी ते वनात गेले. (६५)

या दोन्ही वेळच्या वनवासाच्या काळात वनातील निवासाला योग्य अशी वल्कले त्यांनी परिधान

---

६३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अध्याय ३.२९.३० व ३२ ते ७८).

६४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अध्याय १३८– जतुगृहदाह पर्व १ ते ३१).

६५) BORI प्रमाणित प्रत म.भा. सभापर्व (अध्याय ६७ व ६८)

केली होती. त्यांच्याबरोबर सेवकवर्ग नव्हता. वनातील निवासात सर्व प्रकारची शारीरिक कष्टाची कामे स्वत:च्या निर्वाहासाठी त्यांना करावी लागत. यावरून त्याकाळी त्यांच्यावर श्रमप्रतिष्ठेचा संस्कार कसा झाला होता हे कळून येते.

तिसरे उदाहरण भगवान कृष्णाचे देता येईल. युधिष्ठिराने राजसूय यज्ञ केला. त्यावेळी वेगवेगळ्या लोकांकडे वेगवेगळी कामे वाटून दिली होती. त्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी भोजनाच्या पंक्ती उठल्यानंतर उष्टी ताटे उचलण्याचे काम केले. असे परंपरेने ख्यात आहे. मात्र भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळाच्या प्रमाणित सभापर्वाच्या प्रतीत म्हटले आहे.

'चरणक्षालने कृष्णो ब्राह्मणानां स्वयं ह्यभूत ।'

(सर्व लोकांनी परिवेष्टित व उत्तम फलाची आकांक्षा करणाऱ्या श्रीकृष्णाने स्वत: ब्राह्मणांचे पाय धुण्याचे काम (पादप्रक्षालन) केले. ) [६६]

तसेच भारतीय युद्धात कृष्णाने अर्जुनाचे सारथ्य केले. तो अर्जुनाच्या घोड्यांना खरारा करत असे. मद्रराज शल्य कर्णाचा सारथी झाला होता. हे प्रसंगही त्याकाळी श्रमप्रतिष्ठा कशी मानली जात असे, अथवा श्रमप्रतिष्ठेचा संस्कार कसा होता याची उत्तम उदाहरणे आहेत.

६) सौजन्यशीलता –

आपल्या आचारविचारातून, बोलण्यातून दुसऱ्याबद्दल आदरभाव व्यक्त करणे, तसेच दुसऱ्याची मते, व्यक्तिमत्त्व याबद्दल आदर बाळगणे हे सौजन्यशील वर्तणुकीत अपेक्षित असते. तसेच शक्यतो इतरांना न दुखविण्याची काळजी सौजन्यशील व्यक्ती घेते.

महाभारतात युधिष्ठिर हे सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाचे आदर्श उदाहरण आहे. 'दुर्योधनाचा उल्लेख युधिष्ठिर नेहमीच सुयोधन असा करीत असे हे पाहण्यासारखे आहे. घोषयात्रापर्वामध्ये दुर्योधनाला गंधर्वांनी पकडल्यानंतर आपल्या भीमार्जुनादि भावडांना दुर्योधनाला सोडविण्यास युधिष्ठिर सांगतो. तो त्यावेळी म्हणतो,

'सुयोधनस्य मोक्षाय प्रयतध्वम् अतन्द्रिता: ।' [६७]

(कोणताही आळस न करता सुयोधनाच्या सुटकेचा प्रयत्न करा.)

---

६६) BORI प्रमाणित प्रत म.भा. सभापर्व (अध्याय ३२, पृ. क्र. १६६, ३४७ तळटीप)

६७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२३२.९ चरण २रा)

तसेच सोडवून आणलेल्या दुर्योधनाशीही तो अत्यंत सौजन्यपूर्ण अशाच शब्दात बोलला. युधिष्ठिर सांगतो,

'मा स्म तात पुन: काषीरीदृशं साहसं क्वचित्।

न हि साहसकर्तार: सुखमेधन्ति भारत ।। (६८)

(बाळा दुर्योधना, हे अशाप्रकारचे साहस तू पुन्हा करू नकोस. कारण अशाप्रकारे साहस करणाऱ्याला कधीच सुख मिळत नाही.)

वारंवार संतापणारा भीम, मानिनी द्रौपदी या सर्वांची समजूत युधिष्ठिर अत्यंत सौजन्यपूर्ण शब्दात घालतो. एवढेच नाही तर द्रौपदी अपहरणाचे निंद्य कृत्य करणाऱ्या जयद्रथाला तो सौम्य अशीच शिक्षा देतो. ती बहीण दु:शला व माता गांधारी यासंबंधीच्या सौजन्ययुक्त अशा भावनेतूनच.

गुरू, वडील बंधु, माता–पिता अथवा कुटुंबातील वडीलधारी मंडळी यांच्याशी वर्तन करताना कायमच नम्रता व सौजन्ययुक्त आचरण करण्याची पद्धतच महाभारतात सर्वत्र दिसून येते. सौजन्यशीलता या राष्ट्रीय मूल्यांचा संस्कार करताना या प्रसंगांचा व युधिष्ठिराच्या उदाहरणाचा निश्चितच उपयोग होईल.

७) नीटनेटकेपणा –

समाजात वावरताना आपला पोषाख, राहणी तसेच परिसर याबाबतीत सौंदर्यदृष्टी बाळगणे म्हणजे नीटनेटकेपणा होय.

या मूल्याचा प्रत्यक्ष उल्लेख महाभारतात दाखविता येत नाही. परंतु व्यक्तींची चित्रे व वर्णने यावरून त्यांच्या राहणीची कल्पना येते. राजघराण्यातील व्यक्ती, ऋषी–मुनी, शिष्यवर्ग, स्त्रिया या सर्वांचे पोषाख व राहणी व्यवस्थित व नीटनेटकी अशीच आढळते.

राजघराण्यातील व्यक्ती उंची वस्त्रे परिधान करत. मात्र वनवासी झालयावर त्या वल्कलेही धारण करत. पोषाखाच्या बाबतीतील हे तारतम्य पाहण्याजोगे आहे.

पांडवांचे, कौरवांचे राजवाडे, मयसभा यांच्या वर्णनातूनही सौंदर्यदृष्टी त्या काळात कशी होती याचे प्रत्यंतर येते. अर्थात् हा भाग थोडा दूरान्वयाने विचारात घ्यावा लागतो.

---

६८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (२३५.२१)

८) वक्तशीरपणा –

वक्तशीरपणा हे मूल्य वैयक्तिक अशा स्वरूपाचे आहे. कोणतेही काम वेळेवर सुरू करणे व वेळेत संपविणे असा या मूल्याचा अर्थ आहे.

महाभारतातील वातावरण वैयक्तिक धार्मिक स्वरूपाचे आहे. त्यादृष्टीने धार्मिक कृत्ये ही त्या त्या कृत्यांची वेळ पाळूनच केली जात असावीत असा अंदाज बांधता येतो. उदा. कर्ण सूर्योदयाचे वेळीच सूर्याला अर्घ्य देत असे. आपापली ठरलेली कामे ठरल्यावेळीच लोक करत असत.

यादृष्टीने महाभारत युद्धाच्या वेळेचे उदाहरण देता येईल. युद्ध सूर्योदयाच्या वेळी सुरु होत असे. तसेच सूर्यास्ताच्या वेळी ते समाप्त होत असे. हा नियम त्यावेळी कटाक्षाने पाळला जात असे.

अर्थात् नीटनेटकेपणा व वक्तशीरपणा यांचे स्पष्ट उल्लेख या शब्दातच महाभारतात आढळत नाहीत. यादृष्टीने एका परीने ही आधुनिक काळात, अलीकडच्या काळात आलेली अशी मूल्ये आहेत असे म्हणावे लागेल.

९) स्त्री–पुरुष समानता–

स्त्री–पुरुषांची समानता हा आधुनिक काळातील दृष्टिकोन आहे. परंतु महाभारतात आलेल्या स्त्री पात्रांचा विचार केला तर एकंदरीने स्त्रियांना मानाचे स्थान होते. असे कुंती, सावित्री, विदुला अशा उदाहरणात काही प्रमाणात आढळते. गृहिणी म्हणून घरात त्यांचे महत्त्व निर्विवाद होते असे म्हणता येते. परंतु सध्याच्या काळातील अर्थाने त्या काळात स्त्री–पुरुष समानता हे मूल्य प्रत्यक्षात होते असे म्हणता येत नाही.

१०) वैज्ञानिक दृष्टिकोन –

हे मूल्य मात्र पूर्णपणे आधुनिक काळातील असल्याने महाभारताच्या संदर्भात या मूल्याचा विचार करता येणार नाही.

विदुरनीतीत आढळणारी राष्ट्रीय मूल्ये –

अभिमन्यु व उत्तरा यांचा विवाह होऊन विराटपर्व संपते. त्याबरोबरच द्यूतात सर्वस्व हरण झालेल्या पांडवांचा १२ वर्षेवनवास व एक वर्षाचा अज्ञातवासाचा काळही संपतो. युद्धाची सूचना देणाऱ्या उद्योगपर्वाचा प्रारंभ होतो. यातील प्रजागरपर्व हे व्यवहारकुशल विदुराने केलेला उपदेश आहे. नीतिशास्त्राच्या दृष्टीने हे पर्व

महाभारतातील सर्वोत्कृष्ट पर्व आहे. धृतराष्ट्र हा निद्रानाशाच्या विकाराने पीडित असतो. त्यावेळी विदुराने धृतराष्ट्राला केलेला उपदेश 'विदुरनीती' या नावाने प्रसिद्ध आहे. 'शुक्रनीती' अथवा भर्तृहरीचे 'नीतीशतक' यापेक्षाही विदुरनीतीला वरचे स्थान दिले गेले आहे. काही राष्ट्रीय मूल्यांच्या संदर्भात विदुरनीतीतील शिकवण नक्कीच महत्त्वाची ठरेल, हे पुढील श्लोकांवरून दिसून येईल. उद्योगपर्वातील अध्याय ३३ ते अध्याय ४१ इतके विस्तृत प्रजागरपर्व किंवा विदुरनीती ही आहे.

१) अ) संवेदनशीलता –

एक : सम्पन्नमश्नाति वस्ते वासश्च शोभनम् ।

योऽसंविभज्य भृत्येभ्य: को नृशंसत्तरस्तत: ।। [६९]

(अर्थ – आपल्या सेवकांना न देता जो मिष्टान्न खातो, तसेच उंची वस्त्रे परिधान करतो त्याच्यापेक्षा अधिक निर्दय कोण ?) यामधून विदुराला हेच सुचवायचे आहे की आपल्या सेवकांबद्दल जाणीव व उदारबुद्धी असली पाहिजे. म्हणजेच संवेदनशीलता जागृत पाहिजे.

२) अध्याय ३३ मधील पंचेचाळीसाव्या श्लोकात विदुराने म्हटले आहे 'एक: स्वादु न भुञ्जीत, नैकश्चार्थान् विचिन्तयेत् । [७०]

(अर्थ – गोड पदार्थ पक्वान्न एकट्याने कधी खाऊ नये. तसेच धनाचा विचारही (स्वार्थबुद्धीने) स्वत:पुरताच करू नये.)

तर संवेदनशीलतेसाठी आणखी एक उपयुक्त श्लोक खालीलप्रमाणे आहे.

३) एको धर्म: परं श्रेय: क्षमैका शान्तिरुत्तमा ।

विद्यैका परमा तृप्तिरहिंसैका सुखावहा ।। [७१]

(अर्थ– दुसऱ्याचे कल्याण हीच एकमेव कर्तव्यनिष्ठता, तर क्षमाशील वृत्ती ही एकमेव शांततेचे कारण होय. विद्या हेच सर्वश्रेष्ठ समाधान, तर अहिंसा हेच सर्वश्रेष्ठ सुख होय.) संवेदनशीलता या मूल्याशिवाय वरील चिरंतन मूल्ये प्रत्यक्षात येऊ शकणार नाहीत.

---

६९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व –प्रजागरपर्व (३३.४०)

७०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३३.४५ प्रथमचरण)

७१) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३३.४८)

ब) सर्वधर्मसहिष्णुता –

या मूल्याच्या संस्कारासाठी खालील सुभाषित सांगता येईल.

४) न कुलं वृत्तहीनस्य प्रमाणमिति मे मति: ।

अन्तेष्वपि जातानां वृत्तमेव विशिष्यते ।। [७२]

(अर्थ – आचारहीन अशा व्यक्तीचे कुल महत्त्वाचे नाही असे माझे मत आहे. हीन कुलात जन्म घेतलेल्यांच्या बाबतीत त्यांचे वर्तन हेच महत्त्वाचे ठरते.)

क) सौजन्यशीलता –

वाणी अथवा आर्जवी वृत्ती या गोष्टींना सौजन्यशीलता या मूल्याच्या संस्कारामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. यासंबंधी विदुराने काय म्हटले आहे ते पाहणे मनोरंजक ठरेल.

५) अभ्यावहति कल्याणं विविधं वाक् सुभाषिता ।

सैव दुर्भाषिता राजन् अनर्थायोपपद्यते ।। [७३]

(अर्थ – हे राजा, उत्तम किंवा गोड अशी वाणी विविध प्रकारचे हित प्राप्त करून देते. पण तीच जर दुखावणारी, कटु अशी असेल तर पार मोठे अनर्थ घडवून आणते.)

६) रोहते सायकैर्विद्धं वनं परशुना हतम् ।

वाचा दुरुक्तं बीभत्सं न संरोहति वाक्क्षतम् ।। [७३]

(अर्थ – परशुने तोडलेले वन पुन्हा वाढते किंवा बाणांनी झालेली जखम भरून येते, परंतु कटु, दुखावणाऱ्या वाणीने झालेली शब्दरूपी जखम, व्रण कधीच भरून येत नाही.)

७) कर्णनालीकनाराचान् निर्हरन्ति शरीरत: ।

वाक्शल्यस्तु न निर्हन्तुं शक्ये हृदिशयो हि स: ।। [७३]

(अर्थ – कर्ण नालीक, नाराच ही शस्त्रे, हे बाण शरीरातून उपसून काढता येतात, परंतु वाणीने केलेले शल्य उपटता येत नाही. ते कायमचे हृदयात रुतून बसते.)

८) सर्वतीर्थेषु वा स्नानं सर्वभूतेषु चार्जवम् ।

उभे त्वेते समे स्याताम् आर्जवं वा विशिष्यते ।। [७३]

---

७२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३४.३९)

७३) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३४. ७४, ७५, ७६) (३५.२)

(सर्व पवित्र तीर्थक्षेत्रांमध्ये केलेले स्नान, अथवा सर्व प्राणीमात्रांच्या बाबतीतील आर्जवी वृत्ती हे दोन्ही सारखेच मानले जातील. मात्र त्यातही आर्जवी वृत्ती अधिक वैशिष्ट्यपूर्ण किंवा श्रेष्ठ ठरेल.)

ड) ऐक्याचे एकजुटीचे महत्त्व –

महानप्येकजो वृक्षो बलवान् सुप्रतिष्ठित: ।

प्रसह्य एव वातेन सस्कन्धो मर्दितुं क्षणात् ।।१ ।।

अथ ये सहिता: वृक्षा: संघश: सुप्रतिष्ठिता: ।

ते हि शीघ्रतमान् वातान् सहन्ते अन्यसंश्रयात् ।।२ ।।

(अर्थ – १) अत्यंत मोठा, सामर्थ्याने युक्त व दृढमूळ असलेला वृक्ष जर एकटा असेल तर झंझावात अशा वाऱ्याने एका क्षणात मूळापासून उखडला जातो.

२) पण जे मोठे वृक्ष एकजुटीने एकत्र अशा पद्धतीने स्थिरावलेले असतात ते एकमेकांच्या आधारामुळे महाभयंकर अशा सोसाट्याच्या वाऱ्यांनाही तोंड देऊ शकतात.[७४]

यक्षप्रश्न (आरण्येयपर्व २९६.२९७.२९८)[७५]

जयद्रथाने द्रौपदीचे हरण केले असता भीमार्जुनांनी अत्यंत पराक्रमाने तिची सुटका केली. त्यानंतर काम्यकवनाचा त्याग करून पांडव पुन्हा द्वैतवनात आले. तेथे त्यांनी वास्तव्य केले.

एकदा एका तपस्वी ब्राह्मणाची यज्ञाची साधने असणारी दोन साधने अरणि व मंथा घेऊन एक हरिण वाऱ्याच्या वेगाने धावत आश्रमापासून दूर निघून गेले. तेंव्हा त्या ब्राह्मणाने आपली साधने परत आणून देण्याची पांडवांना विनंती केली. पाचही पांडव ताबडतोब त्या हरिणाच्या मागे त्याचा पाठलाग करू लागले. अचानक हरीण दिसेनासे झाले.

सर्व पांडव तहानेने व्याकुळ झाले. पाण्याच्या शोधात क्रमाक्रमाने नकुल, सहदेव, भीम व अर्जुन गेले. एका जलाशयाशी ते पोचले. परंतु 'आपल्या प्रश्नांची उत्तरे दिल्याखेरीज पाणी प्यावयाचे नाही' असे एका यक्षाने त्यांना बजावले. परंतु त्याचे न ऐकता त्या सर्वांनी पाणी पिण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ते चौघेही तत्काळ मरण पावले. बराच वेळ झाला तरी त्या चौघांपैकी कोणीच परत न आल्याने स्वत: युधिष्ठिर त्या जलाशयाकडे गेला. तेव्हा आपले चारही भाऊ मृत झाले आहेत हे त्याने पाहिले. तो पाण्याजवळ जातात यक्षाने त्यालाही

७४) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (३६.६०, ६१)

७५) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९६.२९७.२९८)

आपली अट सांगितली. तेव्हा युधिष्ठिराने यक्षाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचे मान्य केले.

यक्षाने युधिष्ठिराला शंभराच्या वर प्रश्न विचारले. या सर्व प्रश्नांची यथायोग्य व मार्मिक उत्तरे युधिष्ठिराने दिली. युधिष्ठिराच्या या उत्तरांवरून त्याची बुद्धिमत्ता जशी दिसून येते. तशीच त्याची धर्मनिष्ठा व सत्प्रवृत्ती यांचाही प्रत्यय येतो.

यातील बरीचशी प्रश्नोत्तरे वैयक्तिक – व्यक्तीच्या बाबतीत संस्कारांच्या दृष्टीने उपयुक्त आहेत त्यांची माहिती संकीर्ण कथा व सुभाषिते यात आपण घेऊ.

सर्व वर्णांच्या श्रेष्ठत्वाबाबत 'आचार–वर्तणूक' हीच सर्वश्रेष्ठ असे युधिष्ठिर म्हणतो. ती प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे आहेत.

प्रश्न – राजन् कुलेन, वृत्तेन, स्वाध्यायेन श्रुतेन वा।

ब्राह्मण्यं केन भवति प्रब्रह्येत सुनिश्चितम्।।

उत्तर– श्रुणु यक्ष कुलं तात, स्वाध्यायो न च श्रुतम्।

कारणं हि द्विजत्वे वृत्तमेव न संशय: ।।

(अर्थ – यक्ष प्रश्न विचारतो, 'हे राजा, कुळामुळे (वर्णाने) आचरणाने, अध्ययनाने किंवा विद्वत्तेमुळे यापैकी कोणत्या गोष्टीमुळे ब्राह्मणत्व हे सिद्ध होते ?'

उत्तर – हे यक्षा, ऐक. कुळामुळे, अध्ययनाने किंवा विद्वत्तेने यापैकी कोणत्याही गोष्टीने ब्राह्मणत्व सिद्ध होत नाही. तर ब्राह्मणत्वाचे खरे कारण सदाचरण हेच आहे. यात संशय नाही.) (७६)

पुढे युधिष्ठिर असेही सांगतो,

श्लोक – चतुर्वेदोऽपि दुर्वृत: स शूद्रादतिरिच्यते।

योऽग्निहोत्रपरो दान्त: स ब्राह्मण: इति स्मृत: ।। (७७)

(अर्थ – चारही वेदांचे अध्ययन केलेला असूनही ज्याचे आचरण अतिशय वाईट आहे,जो दुराचारी आहे तो शूद्रापेक्षाही वाईटपणात वरचढ ! परंतु संयमशील आणि अग्निहोत्रात दक्ष तोच खरा ब्राह्मण होय.)

थोडक्यात युधिष्ठिराने जन्माधिष्ठित अथवा कर्माधिष्ठित वर्णापेक्षाही सदाचरणाला सर्वोच्च असे स्थान दिले आहे.

सर्व उत्तरांमधून दिसून येणारी युधिष्ठिराची धर्मनिष्ठा व सत्प्रवृत्ती, दोन्ही पाहून यक्ष अतिशय संतुष्ट

---

७६) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व – Appendix I P.No. 1088 - 45.

७७) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व – Appendix I P.No. 1088 - 50.

झाला. यानंतर त्यांच्यात पुढीलप्रमाणे संवाद झाला.

यक्ष – व्याख्यात: पुरुषौ राजन् यश्च सर्वधनी नर: ।

तस्मात्त्वमेकं भातृणां यमिच्छसि स जीवतु ।।

युधिष्ठिर– श्यामो य एव रक्ताक्षो बृहत्साल इवोत्थित: ।

व्यूढोरस्को महाबाहुर्नकुलो यक्ष जीवतु ।।

धर्म एव हतो हन्ति धर्मोरक्षति रक्षित: ।

तस्माद्धर्मं न त्यजामि मानो धर्मोहतोऽवधीत् ।।

आनृशंस्यं परो धर्म: परमार्थाश्च मे मतम् ।

आनृशंस्यं चिकीर्षामि नकुलो यक्ष जीवतु ।।

कुन्ती चैव च माद्री च द्वे भार्येतु पितुर्मम ।

उभे सपुत्रे स्यातां वै इति मे धीयते मति: ।।

यक्ष उवाच – यस्य तेऽर्थाच्च कामाश्च आनृशंस्य परं मतम् ।

तस्मात्ते भ्रातर: सर्वेजीवन्तु भरतर्षभ ।। (७८)

(अर्थ – यक्ष म्हणतो, 'हे राजा, सर्वसंपत्तीमान अशा माणसाचे वर्णन तू केले आहेस, तेव्हा सर्व भावांमध्ये तुला जो भाऊ हवा असेल तो जीवंत होवो.

युधिष्ठिर म्हणतो,'हे यक्षा, सावळ्या वर्णाचा, लालसर नेत्र असलेला, साल वृक्षाप्रमाणे उंच, भरदार, विशाल छाती असणारा, अत्यंत पराक्रमी असा नकुल जिवंत होवो.

धर्माचा नाश हा नाश करतो, तर रक्षण केले आहे असा धर्म (सर्व जगताचे) रक्षण करतो. म्हणून मी धर्माचा त्याग करणार नाही. धर्म नष्ट झाल्यास तो नष्ट असा धर्म, मान हा ठार करतो. दया हा सर्वश्रेष्ठ धर्म परमार्थाहूनही श्रेष्ठ आहे असे मला वाटते. मी दयाबुद्धीचीच इच्छा करतो. म्हणून हे यक्षा, नकुलच जिवंत होवो.

तसेच माझ्या पित्याच्या कुंती व माद्री अशा दोन भार्या होत्या. त्या दोघीही पुत्रवती असाव्यात अशी माझी बुद्धी इच्छा करते.

यावर यक्ष म्हणतो – ज्याअर्थी तुझ्या बुद्धीला अर्थ (संपत्ती,धन) व काम(भोगेच्छा) यापेक्षाही दयाही सर्वश्रेष्ठ वाटते. त्याअर्थी हे भरतश्रेष्ठा, तुझे सर्व चारही बंधु सजीव होवोत.

---

७८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७ श्लोक ६५ ते ७४)

अशाप्रकारे युधिष्ठिराची धर्मनिष्ठ व सत् अशी बुद्धी त्याच्या उत्तम चारित्र्याचे दर्शन घडविते. नि:पक्षपाती व न्यायी अशी त्याची बुद्धी या कथेवरून प्रकट होते.

भीम व अर्जुन या आपल्या धाकट्या सख्ख्या भावांचे जीवनदान मागण्याऐवजी सावत्र अशा नकुलाचे जीवन प्राण त्याने यक्षाकडे मागितले.

महाभारतातील आदर्शभूत व्यक्तिरेखा :–

महाभारतातील कथा, विदुरनीतीतील श्लोक, यक्षप्रश्नांची कथा यांचा राष्ट्रीय मूल्यांचा संस्कार करताना उपयोग होतो. तसेच महाभारतातील काही व्यक्तिचित्रे अतिशय श्रेष्ठ व उदात्त, चिरंतन अशा मूल्यांचे दर्शन घडवितात. त्यांची चरित्रे अशा मूल्यांचा संस्कार घडवितात. अशा काही व्यक्तिचित्रांचा परिचय आता पाहू. यातील सर्वप्रथम व सर्वश्रेष्ठ व्यक्तिरेखा पितामह भीष्मांची आहे.

१) पितामह भीष्म –

राजा शंतनू व गंगा यांचा आठवा पुत्र म्हणजे देवव्रत भीष्म होय. अष्टवसूंनी आपापले अंश देऊन निर्माण झालेला व गंगेच्या पोटी जन्माला आलेला देवव्रत, हा कुरुकुलातील अत्यंत थोर, पराक्रमी व तत्त्वज्ञानी अशी व्यक्ती होय.

जन्मताच गंगा त्याला घेऊन स्वर्गलोकी निघून गेली. तेथे वसिष्ठ मुनी, शुक्राचार्य, परशुराम मुनी अशा थोर गुरुंकडे त्याचे शिक्षण पूर्ण झाले. तेव्हा कुमारवयाच्या देवव्रताला घेऊन गंगेने त्याला राजा शंतनूच्या स्वाधीन केले. शंतनुने त्याला यौवराज्याभिषेक केला.

यानंतर काही दिवसांनी नदीकाठी शंतनूला सत्यवती ही कोळ्याची मुलगी दिसली. तिच्याशी विवाह करावा असे त्याच्या मनाने घेतले. परंतु तिच्या होणाऱ्या पुत्राला राज्य मिळाले पाहिजे ही अट ऐकताच उदास मनाने तो नगरात परत आला. युवराज देवव्रताला हे वृत्त समजताच त्याने कोळ्याकडे जाऊन पित्यासाठी सत्यवतीला मागणी घातली. परंतु कोळ्याने पुन्हा सत्यवतीच्या मुलाला राज्य मिळणार असेल तरच तो ह्या विवाहाला संमती देईल असे सांगितले. तत्क्षणी देवव्रताने राज्यावरील आपला हक्क स्वखुशीने सोडला. परंतु कोळी म्हणाला की, पुढे देवव्रताने विवाह केला तर वारसांमध्ये राज्यासाठी भांडणे होतील. हे ऐकताच युवराज देवव्रताने तत्क्षणी आजन्म ब्रह्मचर्यपालनाची शपथ घेतली. ही घोर प्रतिज्ञा ऐकताच 'भीष्म: अयम्' असे उद्गार देव, गंधर्व यांनी काढले व देवव्रतावर पुष्पवृष्टी केली. तेंव्हापासून 'देवव्रत' हे नाव मागे पडून 'भीष्माचार्य' या नावाने ते प्रसिद्धीस आले. [७९]

७९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (संभवपर्व अध्याय ९४).

राजर्षि भीष्माचार्यांनी ही जी प्रतिज्ञा केली ती ज्या धर्मशास्त्राच्या व जीवनमूल्यांच्या सागराचे ते प्रतिनिधी होते त्यांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ अशी होती. भारतीय संस्कृतीत पित्याने दिलेल्या वचनासाठी त्याग केल्याची अनेक उदाहरणे आढळतील. भगवान रामचंद्रांनी पित्यासाठी राज्याचा त्याग केला तर देवव्रत भीष्मांनी राज्य व गृहस्थाश्रम या दोन्हीचा पित्यासाठीच त्याग केला. मात्र त्यातून पूर्ण मुक्त न होता राजनिष्ठ प्रजाजनाप्रमाणे ते कौरवांच्या राजसभेत सामंत व मंत्री म्हणून राहिले. [८०]

आदिपर्वात अध्याय ९७ मध्ये विचित्रवीर्य व चित्रांगद यांचा मृत्यू झाल्यावर सत्यवतीने भीष्मांना नियोगपद्धतीने पुत्रोत्पत्ती करून राज्याला वारस देण्याची विनंती केली असता भीष्मांनी दिलेले उत्तर त्यांची आपल्या प्रतिज्ञेबाबतची कठोर निष्ठा व निग्रह दर्शविते. भीष्म म्हणाले,

'परित्यजेयं त्रैलोक्यं राज्यं देवेषु वा पुन: ।
यद्वाप्यधिकमेताभ्यां न तु सत्यं कथंचन ।।
त्यजेच्च पृथिवी गन्धमापश्च रसमात्मन: ।
ज्योतिस्तथा त्यजेद्रूपं वायु: स्पर्शगुणं त्यजेत् ।।
प्रभां समुत्यजेदर्कोधूमकेतुस्तथोष्णताम् ।
त्यजेच्छब्दं तथाकाश: सोम: शीतांशुना त्यजेत् ।।
विक्रमं वृत्रहा जह्यात् धर्मं च जह्याश्च धर्मराट् ।
न तु अहं सत्यमुत्स्त्रष्टुं व्यवसेयं कथंचन ।। [८१]

(अर्थ – मी त्रैलोक्याचा किंवा देवाचे राज्य किंवा याहीपेक्षा अधिक काही असेल त्याचा त्याग करेन, परंतु सत्याचा त्याग कदापिही करणार नाही. एकवेळ पृथ्वी गंधाचा, जल आपल्या रसाचा त्याग करेल. तेज आपल्या रूपाचा, वायु स्पर्शगुणाचा त्याग करेल, सूर्य तेजाचा त्याग करेल, धूमकेतु उष्णता सोडेल, आकाश शब्दगुणाचा त्याग करेल, चंद्र शीतलतेचा त्याग करेल. वृत्राचा वध करणारा (इंद्र) पराक्रम सोडेल, धर्म (यमराज) धर्माचा त्याग करेल. पण मी मात्र सत्याचा त्याग करण्याचा (सत्याशी प्रतारणा करण्याचा) कधीही प्रयत्न करणार नाही.)

भीष्म पुढे म्हणतात 'सत्यापासून विचलित होणे याची क्षत्रियाच्या बाबतीत कधीही प्रशंसा केली जात नाही.

---

८०) हरदास बाळशास्त्री – महाभारतावरील व्याख्याने प्र. १६ पृ.क्र. ३८२.

८१) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (अध्याय ९७, श्लोक १४ ते १७)

एकदा ध्येय ठरविल्यानंतर त्याच्याशी किती कठोर निष्ठेने राहिले पाहिजे हे भीष्माचार्यांनी आपल्या चारित्र्याने दाखवून दिले आहे. त्यामुळे साऱ्या भारतवर्षाचे ते पितामह झाले. संसारात एखाद्या कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहूनही कुरुंच्या चार पिढ्यांचा संसार त्यांनी सांभाळला. त्यामुळे कुरुकुलातील एक थोर, पराक्रमी व तत्त्वज्ञानी असे ते पुरुषश्रेष्ठ ठरले.

उद्योगपर्वातल अध्याय १५४ मध्ये भीष्माचार्यांची गुणवत्ता खालीलप्रमाणे वर्णन केली आहे.

१) आपगेयं महात्मानं भीष्मं शस्त्रभृतां वरम्।
पितामहं भारतानां ध्वजं सर्व महीक्षिताम्।।

२) बृहस्पतिसमं बुद्धया क्षमया पृथिवीसमम्।
समुद्रमिव गाम्भीर्येहिमवन्तमिव स्थिरम्।।

३) प्रजापतिमिव औदार्येतेजसा भास्करोपमम्।
महेन्द्रमिव शत्रूणां ध्वंसनं शरवृष्टिभि: ।।[८२]

(अर्थ – धनुर्धरांचा अग्रणी, भारतांचा पितामह, सर्व राजे लोकांचा, क्षत्रियांचा नायक, बुद्धीच्या बाबतीत बृहस्पतीशीही स्पर्धा करणारा, पृथ्वीप्रमाणे सहनशील, सागराप्रमाणे गंभीर, हिमालयाप्रमाणे, स्थिर, औदार्याच्या बाबतीत प्रजापतीप्रमाणे असणारा, सूर्यासारखा तेजस्वी, इंद्राप्रमाणे बाणांचा पाऊस पाडून शत्रूंचा नाश करणारा असा हा सर्वगुणसंपन्न महापुरुष आहे.)

अत्यंत गुणवान्, पराक्रमी, पराकाष्ठेचा त्याग करणारे भीष्म पितामह तेवढेच ज्ञानसंपन्नही होते. युधिष्ठिराला त्यांनी शांतीपर्वात उपदेश केलेला राजधर्म, आपद्धर्म व मोक्षधर्म ही पर्वेज्ञानसागराची खाणच आहेत. श्रीकृष्णांनी यासंदर्भात अर्जुनाला सागितले आहे.

'तस्मिन् अस्तमिते भीष्मे कौरवाणां धुरंधरे।
ज्ञानानि अस्तं गमिष्यन्ति तस्मात्त्वां चोदयाम्यहम्।।[८३]

(अर्थ – कौरवांतील सर्वश्रेष्ठ वीर भीष्म पितामह हे अस्तंगत झाल्यावर (मृत्यू पावल्यावर) सर्व क्षेत्रातील ज्ञान लुप्त होईल. म्हणून मी तुला प्रवृत्त करत आहे.) प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनी भीष्माचार्यांचे ज्ञानक्षेत्रातील प्रभुत्व मान्य केले आहे.

भीष्माचार्यांनी अखेरच्या क्षणी जे शब्द उच्चारले त्यावरून त्यांचे उदात्त चारित्र्य, स्वभाव व व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन होते. त्यांच्या उदात्त जीवनाला साजेसे असेच ते शब्द आहेत.

---

८२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (अध्याय १५४, श्लोक १ ते ३).

८३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (अध्याय ४६.२३)

'सत्येषु यतितव्यं व: सत्यं हि परमं बलम्।

आनृशंस्यपरै: भाव्यं सदैव नियतात्मभि: ।। (८४)

(अर्थ – तुम्ही नेहमी सत्याचरणाविषयीच प्रयत्न करावा. कारण सत्य हे सर्वश्रेष्ठ सामर्थ्य आहे. आत्मसंयमन करणारांनी नेहमीच दयाबुद्धी ठेवून वर्तन करावे.)

जणू काही सर्व जगालाच पितामह भीष्मांनी हा संदेश दिला आहे. ज्याचा पुरस्कार पुढील काळात बुद्ध, महावीर, महात्मा गांधी, मार्टिन ल्यूथर किंग या थोर विचारवंतांनी केलेला दिसतो.

२) विदुर –

महाभारतातील दुसरी आदर्शरुप व शहाणपण असणारी व्यक्ती म्हणजे विदुर होय. धृतराष्ट्र व पांडु यांचा विदुर हा धाकटा भाऊ होता. विचित्रवीर्य राजाची पत्नी अंबिका हिच्या दासीच्या पोटी नियोगपद्धतीने व्यासमुनींपासून विदुराचा जन्म झाला. त्याच्या जन्माची हकीगत खालीलप्रमाणे आहे.

अणीमाण्डव्य ऋषी व यमधर्म यांच्यात वाद झाला. तेव्हा अणीमाण्डव्य ऋषींनी यमधर्माला 'तू शूद्र योनीत जन्म घेशील.' असा शाप दिला. तेव्हा व्यास व अंबिकेची दासी यांचा पुत्र (ब्राह्मण पिता व शूद्रवर्णाची माता) हा जन्म यमधर्माने घेतला. तोच विदुर होय. व्यासांनी त्या दासीला सांगितले.

अयं ते शुभे गर्भ: श्रीमानुदरमागत: ।

धर्मात्मा भविता लोके सर्वबुद्धिमतां वर: ।।

स जज्ञे विदुरो नाम कृष्णद्वैपायनात्मज: ।

धृतराष्ट्रस्य च भ्राता पाण्डोश्चामित्बुद्धिमान् ।। (८५)

विदुर हा अत्यंत तेजस्वी असा होता. तसाच तो प्रचंड बुद्धिमान असाही होता.

आदिपर्वात त्याचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

'त्रिषु लोकेषु न त्वासीत् कश्चित् विदुरसंमित: ।

धर्मेनित्यं तथा राजन् धर्मेच परमं मत: ।। (८६)

धर्मेचार्थेच कुशल: लोभक्रोधविवर्जित: ।

दीर्घदर्शी शमपर: कुरूणां च हिते रत: ।। (८७)

---

८४) BORI प्रमाणित प्रत म.भा. अनुशासनपर्व (१५४.४७.२, ४८.१)

८५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१००.२६,२७)

८६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०२.२०)

८७) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०१.२८)

(अर्थ १) हे राजा, धर्मबुद्धीमध्ये सदा रत असणारा, तसेच धर्माचरणात श्रेष्ठतेप्रत गेलेला असा त्रिभुवनात विदुरांच्या तोडीचा दुसरा कोणीच नाही.

२) धर्मशास्त्र (कर्तव्याकर्तव्याचा विवेक) तसेच राजनीती ह्या दोन्हीमध्ये पारंगत, लोभ, क्रोध या महारिपुंचा लेशही ज्याच्या ठायी नाही, दूरदृष्टी असणारा, शांत, संयमी वृत्ती असणारा व कुरूकुलाचे सदैव हित पाहणारा असाच हा विदुर आहे.)

विदुर हा अतिशय चारित्र्यवान व सत्याशी निष्ठा ठेवून वागणारा होता. तो जसा राजनीतीत कुशल होता तसाच पराकाष्ठेचा सज्जन, सरळ व साधुवृत्तीचा होता. तो श्रेष्ठ असा मुत्सद्दीही होता. लाक्षागृहाच्या संकटाची जाणीव वारणावताला जाण्यापूर्वीच त्याने म्लेंच्छाची भाषा वापरून सांकेतिक भाषेत युधिष्ठिराला करून दिली होती. पांडवांबद्दल त्याला पराकाष्ठेचे प्रेम होते. संकटकाळी पांडवांना साहाय्य करण्यात तो अतिशय तत्पर होता.

अतिशय विचक्षणबुद्धीचा व विवेकी असणाऱ्या विदुराबद्दल कुरुकुलातील वृद्ध व कर्त्या पुरुषांनाही खात्री होती. त्यामुळे महत्त्वाच्या कौटुंबिक व राजकीय बाबतीत भीष्म पितामहही विदुराचा सल्ला घेत. विदुर अतिशय न्यायीबुद्धीचा जसा होता तसाच तो कर्तव्यतत्परही होता. त्यामुळे युधिष्ठिर, धृतराष्ट्र, दुर्योधन यांना ते वेळोवेळी योग्य तो सल्ला देत असे.

विदुराचा महत्त्वाचा गुण म्हणजे त्याचा स्पष्टवक्तेपणा व परखडपणा होय. कौरव व पांडव यांच्यात सख्य नांदावे, उभयतांनी कुरुकुलाचा उत्कर्ष करावा हाच विदुराचा दृढ असा विचार सतत असे. त्यासाठी प्रसंगी कठोर, पण सत्य, परखड परंतु योग्य असा सल्ला तो वेळोवेळी धृतराष्ट्र, दुर्योधन यांना देत असे.

द्यूत अनर्थकारक, ते टाळावे असा परखड सल्ला विदुराने धृतराष्ट्राला दिला होता. तसेच दुर्योधनाची दुष्ट प्रवृत्ती कुरुकुलाचा सर्वनाश घडवून आणेल असा स्पष्ट इशारा विदुराने धृतराष्ट्राला दिला होता. रजस्वला द्रौपदीला भर सभेत आणण्यास दुर्योधनाने प्रथम विदुरालाच सांगितले होते, त्याप्रसंगीही त्याने दुर्योधनाची स्पष्ट शब्दात कानउघाडणी केली होती. तसेच कुलविनाशकारी युद्ध टाळावे यासाठी दुर्योधनाची स्पष्ट शब्दात कानउघाडणीही त्याने केली होती.

उद्योगपर्वातील प्रजागरपर्व अथवा ज्याला विदुरनीती असे म्हटले जाते ते म्हणजे विदुराच्या शहाणपणाचे व त्याच्या विवेकी बुद्धिमत्तेचे मूर्तिमंत सारच होय. पांडव वनवासात गेल्यानंतर त्यांना भेटून एक ब्राह्मण आला. त्याने धृतराष्ट्राला त्यांच्या स्थितीचे व हालाचे वर्णन करून सांगितले. म्हणून त्याने विदुराला बोलावून घेतले. त्यावेळी विदुराने आचरणातील सुयोग्य अशा तत्त्वज्ञानाचा जो उपदेश धृतराष्ट्राला केला तो म्हणजेच प्रजागरपर्व अथवा विदुरनीती होय. उद्योगपर्वामध्ये अध्याय ३३ ते ४० इतके विस्तृत हे तत्त्वज्ञान

आहे. संपूर्ण आयुष्याला मार्गदर्शक असे तत्त्वज्ञान विदुरांनी एका श्लोकात कसे सांगितले आहे ते पाहण्यासारखे आहे.

श्लोक किं नु मे स्यादिदं कृत्वा किं नु मे स्याद्कुर्वत: ।
इति कर्माणि सञ्चिन्त्य कुर्याद्वा पुरुषो न वा ।। (८८)

(अर्थ – हे कर्म करून काय परिणाम होईल अथवा न केल्याने काय परिणाम होईल असा विचार करूनच माणसाने एखादे कर्म करावे अथवा न करावे.)

अशा प्रकारची वैयक्तिक जीवनामध्ये मार्गदर्शन करणारी अनेक सुभाषिते विदुरनीतीमध्ये आहेत. संकीर्ण कथा व सुभाषिते या भागात त्यांचा परिचय आपण करून घेणार आहोत.

३) युधिष्ठिर –

युधिष्ठिर हा पांडवांमधील सर्वात ज्येष्ठ होय. प्रत्यक्ष यमधर्माचाच तो पुत्र होता.

धर्म आणि सत्य यांची युधिष्ठिर म्हणजे प्रत्यक्ष मूर्तीच होते. उद्योगपर्वामध्ये कुंतीने खालील शब्दात युधिष्ठिराची प्रशंसा केली आहे.

'हीमान् सत्यधृतिर्दान्तो भूतानामनुकम्पिता ।
कामद्वेषौ वशे कृत्वा सतां वर्त्मानुवर्तते ।।
शीलवृत्तोपसम्पन्नो धर्मज्ञ: सत्यसङ्गर: ।
राजा सर्वगुणोपेत: त्रैलोकस्यापि यो भवेत ।।
अजातशत्रु: धर्मात्मा शुद्धजाम्बूत्नदप्रभ: ।
श्रेष्ठ: कुरुषु सर्वेषु धर्मत: श्रुतवृत्तत: ।। (८९)
प्रियदर्शनो दीर्घभुज:....... ।

ज्यावेळी उद्योगपर्वात कृष्ण कुंतीला भेटतो तेव्हा आपल्या पुत्रांची वनवासातील स्थिती सांगताना तिने धर्मराजाचे वर्णन केले आहे.

(अर्थ – अतिशय विनयशील, सत्य, धैर्य व संयम हे गुण धारण करणारा, प्राणीमात्रांबद्दल करूणा बाळगणारा, इच्छा व द्वेष (रागलोभ) ज्याच्या स्वाधीन आहेत, सज्ञनांच्या मार्गाने जाणारा, चारित्र्यवान् अशा आचरणाने युक्त, धर्म जाणणारा, सत्यसंपन्न, राजाला आवश्यक अशा सर्व गुणांनी युक्त, जो त्रैलोक्याचाही

---

८८) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (अध्याय ३४.१९)

८९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.८८.१८ ते २२)

राजा होण्यास पात्र, शुद्ध जाम्बूनदाप्रमाणे तेजस्वी, अजातशत्रू (ज्याला कोणीही शत्रू नाहीत.) धर्म हाच ज्याचा आत्मा आहे असाहा सदाचरणी, प्रियदर्शन युधिष्ठिर आहे.)

तर विदुराने युधिष्ठिराचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

'यस्मिन् धृति: अनुक्रोश: क्षमा, सत्यं पराक्रम: ।

नित्यानि पाण्डवे ज्येष्ठे, स जीयेत रणे कथम् ।। (९०)

(अर्थ – ज्या ज्येष्ठ अशा पाण्डवामध्ये (युधिष्ठिरात) धैर्य, दया, क्षमा, सत्यवृत्ति व शौर्य हे गुण सतत वास करतात तो रणांगणात, युद्धात कसा जिंकला जाईल.)

तर श्रीकृष्णांनी धर्मराजाच्या धर्मनिष्ठ बुद्धिबद्दल खालील शब्दात ग्वाही दिली आहे.

श्लोक– अधर्मयुक्तं न च कामयेत् राज्यं सुराणामपि धर्मराज: ।

धर्मार्थयुक्तं तु महीपतित्वं ग्रामेऽपि कस्मिंश्चिदयं बुभूषेत् ।। (९१)

(अर्थ – अधर्माने प्राप्त झालेले राज्य, मग ते प्रत्यक्ष देवांचे जरी असले तरी युधिष्ठिर त्याची अभिलाषा बाळगणार नाही. याउलट धर्मानुसार मिळालेले राजेपद मग ते एखाद्या गावाचे का असेना ते तो भूषवेल.)

युधिष्ठिराच्या धर्मबुद्धीचा,धर्मावरील अढळ श्रद्धेचा अनुभव दोन, तीन प्रसंगात स्पष्टपणे दिसतो.

१) यक्षप्रश्नाच्या वेळी वनपर्वात यक्षाने एका भावाला जीवदान देऊ केले. त्यावेळी युधिष्ठिरांनी नकुलाचे प्राण मागितले. यामागे आपल्या दोन्ही माता पुत्रवती असाव्यात ही धर्मबुद्धी होती.

२) कौरवांवर स्वारी करून, त्यांना जिंकून आपले राज्य परत मिळविणे शक्य होते. परंतु अज्ञातवासाचे वर्ष संपताच त्यांनी अर्धेराज्य, ते नसेल द्यायचे तर केवळ पाच गावांचे राजेपद–युद्ध टाळण्यासाठी मागितले.

३) महाप्रस्थानपर्वात शेवटी फक्त युधिष्ठिर स्वर्गाच्या दाराशी पोहोचले. इंद्र न्यायला आलेला असताही बरोबर शेवटपर्यंत साथ करणाऱ्या कुत्र्याला स्वर्गात प्रवेश नसेल तर मी एकटा स्वर्गात प्रवेश करणार नाही असे त्यांनी इंद्राला निक्षून सांगितले.

वनपर्वात द्रौपदीने युधिष्ठिराला त्याच्या वागणुकीचे स्पष्टीकरण विचारले. त्यावेळी युधिष्ठिराने ते खालील शब्दात सांगितले आहे.

---

९०) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१९२.१९)

९१) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.१.१४)

'नाहं कर्मफलान्वेषी राजपुत्रि, चराम्युत।

ददामि देयमित्येव यजे यष्टव्यमित्युत।।

अस्तु अत्र फलं मा वा कर्तव्यं पुरुषेण यत्।

गृहे, वा वसता कृष्णे यथाशक्ति करोमि तत्।। [९२]

(अर्थ – हे राजकन्ये द्रौपदी, मी कर्मफलाचा विचार करत फिरत नाही. दान द्यायचे म्हणून मी ते देतो. तसेच यज्ञ करायचा म्हणून मी तो करतो. पुरुषाने जे कर्म करणे आवश्यक आहे तेथे फल असो वा नसो, घरात अथवा इतरत्रही रहात असताना मी माझ्या शक्तीनुसार ते करतो.)

तसेच घोषयात्राप्रसंगात दुर्योधन वास्तविक आपले ऐश्वर्य पांडवांना दाखवून त्यांना खिजवण्यासाठी गेला होता. परंतु चित्ररथ गंधर्व त्याला पकडून नेत होता. त्यावेळी दुर्योधनाचे अमात्य युधिष्ठिराचे साहाय्य मागण्यास आले असता भीमार्जुनांचा त्याला विरोध होता. परंतु युधिष्ठिराने अत्यंत मोठ्या मनाने 'वयं पञ्चाधिकं शतम्।' अशी समजूत घालून त्यांच्याकरवी दुर्योधनाची मुक्तता केली. या प्रसंगी जसे त्याचे मनाचे मोठेपण, तसेच विवेक व शहाणपण यांचेही दर्शन होते. [९३]

धर्म व सत्य यांची प्रत्यक्ष मूर्ती अशा युधिष्ठिरावर प्रजाजनांचे निरतिशय प्रेम होते. युधिष्ठिर प्रजेचे अतिशय लाडके होते. जेंव्हा पांडव वारणावतास गेले, किंवा द्यूतात हरल्यावर १२ वर्षेवनवासासाठी गेले तेंव्हा प्रजाजनही त्यांच्या मागोमाग गेले असता मोठ्या कष्टाने त्यांची समजूत घालून युधिष्ठिरांनी प्रजाजनांना परत पाठविले होते असा आदिपर्व व वनपर्वात उल्लेखच नाही तर सविस्तर वर्णनही आहे.

युधिष्ठिराच्या धर्मबुद्धीबद्दल कृष्ण, कर्ण, शकुनी या सर्वांनाच खात्री होती.

युधिष्ठिरांच्या या गुणवत्तेमुळेच त्यांना एक आदर्श राजा अशी मान्यता मिळाली.'पुण्यश्लोको युधिष्ठिर:' अशी प्रात:स्मरणामधील श्लोकात त्यांची गणना झाली ती यामुळेच.

### ४) भीम, अर्जुन, नकुल व सहदेव –

हे चारही कनिष्ठ पांडव सत्यनिष्ठ व धर्मपर असेच होते. आपला वडील बंधू याच्या आज्ञेत ते सदैव असत. आदिपर्वात याप्रमाणे सर्व पांडवांचे वर्णन आले आहे. [९४]

---

९२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.३२.२,३)

९३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रापर्व ( अध्याय २३३ ते २३५)

९४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (२००.६,७).

भीमसेन–

भीमसेन अत्यंत बलवान् व सामर्थ्यसंपन्न होता. उद्योगपर्वात धृतराष्ट्राने त्याचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

१) अस्त्रे द्रोणार्जुनसमं, वायुवेगसमं जवे।
महेश्वरसमं क्रोधे को हन्याद् भीममाहवे ।।

२) जवेन वाजिनोऽत्येति बलेनात्येति कुञ्जरान्।
अव्यक्तजल्पी मध्वक्षो मध्यम: पाण्डवो बली ।। (९५)

(अर्थ – १) अस्त्रविद्येत द्रोण व अर्जुन यांच्याशी तुल्यबळ, वेगामध्ये वाऱ्याशीही स्पर्धा करणारा, भगवान शंकराप्रमाणे रागीट अशा भीमाला युद्धात कोण ठार मारू शकेल ?

२) वेगामध्ये तो अश्वांनाही मागे टाकणारा, आणि सामर्थ्यामध्ये हत्तींवरही मात करणारा मितभाषी असा हा मध्यम पाण्डव आहे.)

वारणावतात लाक्षागृहातील आगीतून निसटल्यानंतर भीमच सर्वांना आपल्या खांद्यावर बसवून वेगाने त्या ठिकाणाहून दूर गेला, असे वर्णन आहे.

भीम गदायुद्धात अत्यंत प्रवीण होता. जरासंधाशी त्याचे झालेले युद्ध प्रसिद्ध आहे तसेच भीम–बकासुर कथेत भीमाने आपल्या सामर्थ्याने बकासुराला ठार मारले. त्याने केलेला हिडिंब राक्षसाचा वधही विख्यात आहे. सामान्य प्रजेला असुरांच्या व जुलमी राजाच्या जुलमांपासून सोडविण्याचे मोठेच काम भीमाने केले. या त्याच्या सामर्थ्याची जाणीव युधिष्ठिराला असल्याने तो त्याचा अतिशय प्रिय बंधु होता.

वनपर्वामध्ये यक्षाने भीमाचा खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

‘तथैनं मनुजा: प्राहु: भीमसेनं प्रियं तव। (९६)

अर्जुन –

अर्जुन हा सर्वश्रेष्ठ धनुर्धर व द्रोणांचा सर्वात प्रिय असा शिष्य होता. अत्यंत पराक्रमाने त्याने चित्ररथ गंधर्वाच्या तावडीतून दुर्योधनाची मुक्तता केली. (९७) तसेच जयद्रथाचा पराभव करून द्रौपदीची मुक्तता केली. (९८) तो अत्यंत सत्यनिष्ठही होता.आदिपर्वातील त्याचे उद्गार याची साक्ष देतात.

---

९५) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.५०.१४,२०).

९६) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (३.२९७.६९.१).

९७) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रापर्व (३.२३३.२३४)

९८) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व घोषयात्रापर्व (३.२५५.२५६)

‘न व्याजेन चरेद्धर्मामिति मे भवत: श्रुतम् ।

न सत्यात् विचलिष्यामि सत्येनायुधमालभे ।। (९९)

(अर्थ – महाराज, कपटाने धर्माचरण करू नये. असे मी आपल्याकडून ऐकले आहे. सत्यापासून मी तिळमात्र विचलित होणार नाही. सत्याचरणानेच मी शस्त्र प्राप्त करीन.)

कमालीचा चारित्र्यसंपन्न व विवेकी असाच अर्जुन होता. विराटपर्वात अर्जुनाने कौरवांवर विजय मिळविल्यानंतर विराटाने आपली कन्या उत्तरा हिच्याशी अर्जुनाने विवाह करावा अशी इच्छा प्रकट केली. परंतु अर्जुन म्हणाला, ‘ती माझी नृत्यातील शिष्या असल्याने मला कन्येप्रमाणे आहे. तेव्हा पत्नी म्हणून तिचा स्वीकार न करता सून म्हणून मी तिचा स्वीकार करतो.’ हे त्याचे उद्गार त्याचे उच्च कोटीचे चारित्र्य, शील याचे निदर्शक आहेत. (१००)

तसेच भगवान कृष्णांचा अर्जुन हा जसा सुभद्रापती म्हणून मेव्हणा तसाच अत्यंत जवळचा सखा–मित्र होता. दोघांतील हे नाते अतिशय हृद्य असेच होते.

नकुल–सहदेव –

त्याचप्रमाणे नकुल व सहदेव हे दोघे भाऊही सदैव युधिष्ठिराच्या आज्ञेत राहणारे, सत्यनिष्ठ व धर्मनिष्ठ असेच होते.

६) महाभारतातील गान्धारी, कुंती, द्रौपदी या स्त्रियांच्या व्यक्तिरेखाही त्यांच्यातील गुणवत्तेमुळे आदर्श अशाच ठरल्या आहेत.

१) गांधारी –

गांधार देशाची राजकन्या, सुबल राजाची कन्या व शकुनीसारख्या कुटील मनुष्याची बहीण गांधारी. ही धृतराष्ट्राची पत्नी, महापतिव्रता होती. बाळशास्त्री हरदास तिचा उल्लेख ‘महासती गांधारी’ असा करतात. (१०१)

धृतराष्ट्र अंध आहे हे कळताच त्याला जे दृष्टिसुख नाही ते आपणही उपभोगावयाचे नाही असा दृढनिश्चय तिने केला. महाभारतकार असे वर्णन करतात

---

९९) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व ( १.२०५.२९)

१००) BORI प्रमाणित प्रत म.भा. विराटपर्व (४.६७.१ ते ९).

१०१) हरदास बाळशास्त्री ‘महाभारतावरील व्याख्याने प्रकरण २० पृ.क्र. ४८६.

१) गान्धारी तु अथ शुश्राव धृतराष्ट्रमचक्षुषम्।

आत्मानं दित्सितं चास्मै पित्रा मात्राच भारत।।

२) तत: सा पटमादाय कृत्वा बहुगुणं तदा।

बबन्ध नेत्रे स्वे राजन् पतिव्रतपरायणा।। (१०२)

(अर्थ – १) धृतराष्ट्र अंध आहे व आईवडिलांनी त्याच्याशीच आपला विवाह ठरविला आहे हे गांधारीने ऐकले.

२) त्यावेळी पतिधर्मपरायण अशा तिने एक कापड आणले. त्याच्या अनेक घड्या करून तिने आपले डोळे घट्ट बांधले.)

हा आपला दृढनिश्चय तिने आजन्म पाळला.

जरी ती महापतिव्रता होती तरी अत्यंत न्यायनिष्ठुरही होती. धृतराष्ट्र व दुर्योधन या दोघांनाही तिने बजाविले होते की धर्म व न्याय या दोन्ही दृष्टींनी राज्यावर पांडवांचाच हक्क आहे. असा उल्लेख उद्योगपर्वात आला आहे. (१०३)

धृतराष्ट्र पुत्रमोहाने व राज्यलोभाने ग्रस्त होता. परंतु गांधारी ही सत्यनिष्ठ आहे.

धृतराष्ट्रानेही गांधारीचा उल्लेख 'महाप्राज्ञा' व 'दीर्घदर्शिनी' असा केला आहे. (१०४)

२) कुन्ती –

कुन्ती ही कुंतीभोज राजाची कन्या व पाण्डु राजाची पत्नी होय. तिचे वर्णन आदिपर्वामध्ये खालीलप्रमाणे केले आहे.

'सत्त्वरूपगुणोपेता धर्मारामा महाव्रता।

दुहिता कुन्तीभोजस्य पृथा पृथुललोचना।। (१०५)

(अर्थ – सर्व सद्‌गुणांनी युक्त, व्रतपरायण व अंत:करण धर्मामध्येच रमविणारी, विशाल नेत्र असणारी पृथा ही कुन्तीभोज राजाची कन्या होय.).

पाण्डुचा वनात मृत्यु झाल्यावर व त्याची द्वितीय पत्नी माद्री सती गेल्यावर पाचही पांडवांना घेऊन कुन्ती परत हस्तिनापुरात आली. आपले यानंतरचे उभे आयुष्य तिने व्रतस्थ व आदर्श माता म्हणून घालविले.

१०२) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०३. १२,१३).

१०३) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.१४७.२७ ते ३५)

१०४) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.१२७.२)

१०५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०५.१)

पांडवांचा द्वेष करून त्यांच्या नाशाचे बेत आखणाऱ्या कौरवांच्या कुटिल कारस्थानापासून तिने सावधपणे आपल्या पुत्रांचे संरक्षण केले. लाक्षागृह प्रसंगातून सुटल्यानंतर आपल्या मुलांबरोबर तिला वनवासही सहन करावा लागला.

एकचक्रा नगरीत रहात असताना बकासुर वधासाठी तिने ब्राह्मण कुटुंबातील व्यक्तीऐवजी भीमसेनाला पाठविले. त्यावेळी याबाबत युधिष्ठिराची समजूत घालताना तिने काढलेले उद्गार पाहण्यासारखे आहेत.

१) 'तदहं प्रज्ञया ज्ञात्वा बलं भीमस्य पाण्डव ।
प्रतिकार्येच विप्रस्य ततः कृतवती मतिम् ।।१ ।।

२) नेदं लोभान्न चाज्ञानान्न च मोहाद् विनिश्चितम् ।
बुद्धिपूर्वं तु धर्मस्य व्यवसायः कृतो मया ।।

३) अथो द्वावपि निष्पन्तौ युधिष्ठिर भविष्यतः ।
प्रतिकारश्च वासस्य धर्मश्च चरितो महान् ।। [१०६]

(अर्थ – तेव्हा भीमाचे प्रचंड सामर्थ्य विचारात घेऊन, ब्राह्मणावरील संकट दूर करण्यासाठी मी हा विचार केला आहे. लोभामुळे, अज्ञानामुळे किंवा मोहामुळे ही गोष्ट करावयाची ठरविलेली नाही. तर बुद्धीच्या साहाय्याने पार पाडण्याचे धर्मकृत्य म्हणून मी ही गोष्ट ठरविली आहे. यामुळे आपल्याला आश्रय दिल्याच्या उपकाराची परतफेड व ब्राह्मणकुटुंबाचे प्राण वाचविण्याचे धर्मकृत्य अशा दोन्ही गोष्टी साध्य होतील.)

कुंतीच्या वरील वाक्यांवरून तिच्या अंतःकरणाची उदारता, पराकोटीची संवेदनशीलता, असामान्य धैर्य, कृतज्ञताबुद्धी या सर्व गोष्टी प्रकट होतात.

पांडवांच्या बारा वर्ष वनवासाचा व एक वर्षाचा अज्ञातवासाचा काळ अशी तेरा वर्षेकुंती विदुराच्या घरी दुःख सोसत राहिली. मात्र हा काळ संपल्यानंतर पांडवांनी स्वबळावर आपले राज्य जिंकून घ्यावे हा निरोप तिने आपल्या मुलांना श्रीकृष्णाबरोबर पाठविला. ती यासाठी युधिष्ठिराला 'बाहुबळावर, स्वपराक्रमाने राज्य मिळविणाऱ्या राजा मुचकुंदाची कथा सांगते. अत्यंत तेजसंपन्न व प्रेरणा व उत्साह देणारी विदुलेची वीरगाथाही सांगते. शेवटी असा निरोप देते –

युध्यस्व राजधर्मेण मा निमज्जीः पितामहान् ।
मा गमः क्षीणपुण्यस्त्वं सानुजः पापिकां गतिम् ।। [१०७]

---

१०६) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१०५.१८, १९, २०).

१०७) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व .

(अर्थ – राजधर्माप्रमाणे आचरण कर. युद्ध कर. आपल्या पितामहांना अधोगती प्राप्त करून देऊ नकोस. स्वत:ही धर्माप्रमाणे न वागता अधर्माचे आचरण करून पुण्य नष्ट करून आपल्या भावांसह नरकात जाऊ नकोस.)

कुंतीने सर्वात उदात्त आचरण म्हणजे शेवटी तिने केलेला पराकोटीचा त्याग होय. युद्धात जिंकून युधिष्ठिर सम्राट झालेला असताना राजमाता म्हणून अतिशय मानाने व ऐश्वर्यात ती राहू शकली असती. परंतु तसे न करता आपले उर्वरित आयुष्य अत्यंत दु:खी असलेल्या धृतराष्ट्र व गांधारी या आपल्या ज्येष्ठ दीर व जाऊ यांच्या सेवेत तिने घालविले असा आश्रमवासिक पर्वात उल्लेख आहे. (१०८)

अशाप्रकारे त्यागमय आयुष्य घालविणारी कुंती ही आदर्श वीरमाता या रूपात संस्मरणीय आहे.

३) द्रौपदी –

द्रुपद राजाची कन्या व पाच पांडवाच पत्नी द्रौपदी हिची गणना प्रात:स्मरणीय श्लोकांमध्ये पञ्च पतिव्रतांमध्ये केली आहे. तो श्लोक खालीलप्रमाणे

'अहल्या, द्रौपदी, सीता, तारा मन्दोदरीस्तथा।

पञ्चकं ना स्मरेत् नित्यम् महापातक नाशनम्।।

(अर्थ – अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, त्याचप्रमाणे मन्दोदरी या पाच पतिव्रतांच्या पंचकाचे जो नेहमी स्मरण करेल त्याची फार मोठ्या पातकांपासून मुक्तता होईल.)

हे स्थान द्रौपदीला लाभण्याचे कारण ती महापतिव्रता होती. सर्व सुखदु:खांच्या प्रसंगात तिने आपल्या पतींना मनोभावे साथ दिली. जसे इंद्रप्रस्थाच्या राज्ञीचे अत्यंत वैभवशाली असे पद तिने उपभोगिले, त्याचप्रमाणे बारा वर्षांच्या वनवासकाळात व अज्ञातवासाच्या काळात अपरिमित कष्ट व संकटेही तिने सहन केली. या सर्व काळात तनमनाने तिने आपल्या पतींना सहकार्य दिले.

ती एक उत्कृष्ट गृहिणी होती. वनवासात श्रीकृष्ण व सत्यभामा पांडवांना भेटावयास आले होते. त्यावेळी 'पाचही पती तुझ्याबाबत इतके संतुष्ट कसे ? याचे रहस्य कोणते ?' असा प्रश्न सत्यभामेने द्रौपदीला विचारला. त्यावर द्रौपदीने तिला जे उत्तर दिले त्यात उत्कृष्ट गृहिणीपदाच्या सर्व लक्षणांचे सविस्तर वर्णन आले आहे. अत्यंत दृढ अशी कर्तव्यनिष्ठा, आर्जवी व लाघवी आचरणाने सर्वांना संतुष्ट ठेवणे. घरातील सर्वांची काळजी घेणे, सर्व कुलाचार सासूबाईंच्या सांगण्याप्रमाणे पार पाडून त्यांना संतुष्ट ठेवणे या पतींना वश करून घेण्याच्या गोष्टी द्रौपदीने सत्यभामेला समजावून सागितल्या. थोडक्यात गृहिणीच्या वर्तनाने घरात

१०८) BORI प्रमाणित प्रत म.भा. आश्रमवासिक पर्व (१५.२२.१६).

नेहमी समाधान व प्रसन्नता राहील हा तिच्या सांगण्याचा मतितार्थ आहे. पतींना प्रेमाने वश करून घेता येते. तक्रारखोर व कलहप्रिय स्वभावाने नव्हे. असे ती म्हणते. (१०९)

तिचे आणखी महत्त्वाचे गुण म्हणजे ती अतिशय तेजस्वी व मानिनीही होती.

दु:शासनाने सभापर्वात भरसभेत द्रौपदीला खेचून आणले त्यावेळी भीष्म व द्रोणांसारख्या वयोवृद्धांना तिने निर्णय विचारला. तसेच धृतराष्ट्राने दोन वर देऊन पुन्हा तिसरा वर मागण्यास सांगितले. त्याहीवेळी तिने तेजस्वीपणे उत्तर दिले.

१) 'लोभो धर्मस्य नाशाय भगवान्नाहमुत्सहे ।
अनर्हा वरमादातुं तृतीयं राजसत्तम ।।

२) पापीयांस इमे भूत्वा संतीर्णा: पतयो मम ।
वेत्स्यन्ति चैव भद्राणि राजत्पुण्येन कर्मणा ।। (११०)

(अर्थ – १) लोभ धर्माचा नाश करतो म्हणून हे राजश्रेष्ठा माझी तिसरा वर मागण्याची इच्छा नाही.

२) वाईट अशा अवस्थेवर मात करून माझे पती स्वतंत्र झाले म्हणजे स्वत:च्या पराक्रमाने, बळाने ते आपले गेलेले वैभव नक्कीच परत मिळवतील.)

वनवासात असताना आपल्या पतींना तिने वारंवार आपल्यावर झालेल्या अन्यायाची जाणीव करून दिली आहे. या अन्यायाचा प्रतिकार करून आपले न्याय्य हक्क मिळावेत यासाठी तिने आपल्या पतींना प्रेरणा व उत्तेजनही दिले आहे. ती म्हणते

१) 'यो न दर्शयते तेज: क्षत्रिय: काल आगते ।
सर्वभूतानि तं पार्थ सदा परिभवन्त्युत ।।

२) तत्त्वया न क्षमाकार्या शत्रून्प्रति कथंचन ।
तेजसैव हि ते शक्या निहन्तुं नात्र संशय: ।। (१११)

(अर्थ – १) जो क्षत्रिय योग्य वेळ आली असता आपले तेज– (तेजस्वीपणा, पराक्रम) दाखवीत नाही, सर्व प्राणीमात्र त्याचा नेहमीच अपमान करतात.

---

१०९) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व. (३. अ.२२२ ते अ.२२५).

११०) BORI प्रमाणित प्रत म.भा. सभापर्व. (२.६३.३४, ३६)

१११) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व. (३.२८, ३५, ३६)

२) शत्रूंना तत्त्वत: कधीच क्षमा करू नये. पराक्रमानेच त्यांना ठार करणे योग्य होय.)

द्रौपदीच्या अशासारख्या तेजस्वी उद्गारांमधून पांडवांना न्याय्य हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा मिळाली. जीवनात दुरभिमान, अहंकार नसावा, पण आपला स्वाभिमान कसा जपावा याचाच द्रौपदी हा आदर्श आहे.

४) भगवान श्रीकृष्ण –

भगवान श्रीकृष्णांना परंपरा पूर्णपुरुषावतार मानते. महाभारतात श्रीकृष्णांचा उल्लेख तीन चार ठिकाणी विशेषत्वाने येतो. प्रथम द्रौपदी स्वयंवराच्या वेळी. त्यानंतर तेथे पांडव हे आतेभाऊ समजल्यानंतर ते वरचेवर पांडवांच्या भेटीस येतात. पांडवांचे ते खंदे पाठीराखे आहेत. कृष्ण–शिष्टाईच्या वेळी त्यांच्यातील मुत्सद्याचे दर्शन घडते.

यानंतर भीष्मपर्वात अर्जुनाला ते भगवद्‌गीता सांगतात. 'भारतरूपी कमळातील पराग म्हणजे भगवद्‌गीता होय.' अर्जुनाचा मोह दूर करून त्याला कार्यप्रवण करण्याचे महत्त्वाचे कार्य येथे होते.

गीतेत सांगितल्याप्रमाणे 'परित्राणाय साधूनां विनाशाय दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे। [११२]

हेच त्यांचे जीवितकार्य दिसते. जुलमी व क्रूर जरासंधाच्या वधासाठी ते भीमाला प्रेरणा देतात. तसेच उन्मत्त व अहंकारी शिशुपालाचा वध कृष्ण करतात.

कृष्णशिष्टाईच्या वेळी धृतराष्ट्र श्रीकृष्णांच्या स्वागताची भपकेबाज तयारी करतो. तर दुर्योधन कपटाने श्रीकृष्णांना पकडण्याचा बेत आखतो. परंतु यापैकी कशालाही बळी न पडता श्रीकृष्ण विदुराकडे जातात. येथे त्यांच्या चातुर्याचा प्रत्यय येतो. राजकीय चातुर्याच्या बाबतीत श्रीकृष्णांचा आदर्श घेण्यायोग्यच आहे.

*****

---

११२) BORI प्रमाणित प्रत म.भा. भीष्मपर्व भगवद्‌गता (अध्याय ४ श्लोक ८)

# संकीर्ण प्रकरण

# वैयक्तिक आचरणाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या महाभारतातील संकीर्ण कथा

१) अर्जुनाची लक्ष्यवेधातील एकाग्रता (आदिपर्व)

महाराजा पांडुच्या मृत्यूनंतर व माद्री सती गेल्यावर राजमाता कुंती पाचही पांडवांना घेऊन हस्तिनापुरात आली. पितामह भीष्मांनी कौरव पांडवांच्या शिक्षणाची जबाबदारी गुरू द्रोणाचार्य यांच्यावर सोपवली.

द्रोणाचार्यांनी कौरव –पांडवांना धनुर्वेद, गदायुद्ध व सर्वप्रकारच्या शस्त्रास्त्रविद्येची शिकवण दिली. अर्जुन हा द्रोणाचार्यांचा विशेष लाडका शिष्य होता. त्यांची या विद्यातील प्रगती पाहून द्रोणाचार्य अतिशय प्रसन्न होत.

एकदा त्यांच्या मनात कौरव–पांडवांची व इतरही राजपुत्रांची परीक्षा घ्यावी असे आले. महाभारतात व्यासमुनी सांगतात –

तांस्तु सर्वासमानीय सर्वविद्यासु निष्ठितान्।
द्रोण: प्रहरणज्ञाने जिज्ञासु: पुरुषर्षभ ।।४५ ।।
कृत्रिमं भासमारोप्य वृक्षाग्रे शिल्पिभि: कृतम्।
अविज्ञातं कुमाराणां लक्ष्यभूतमुपादिशत् ।।४६ ।।[११३]

(अर्थ – हे राजा, त्या सर्वांचे शस्त्रास्त्रज्ञान जाणण्याची इच्छा असणाऱ्या द्रोणाचार्यांनी त्या सर्वांना एकत्र गोळा केले. शिल्पकाराने तयार केलेली भास पक्ष्याची प्रतिकृती झाडाच्या शेंड्यावर ठेवून त्या कुमारांना माहीत नसणारा एकाग्रतेचा धडा त्यांनी त्यांना शिकविला.)

त्यानंतर द्रोणाचार्यांनी युधिष्ठिराला बोलाविले. त्याला धनुष्यबाण सज्ज करून उभे राहण्यास सांगितले. ते युधिष्ठिराला म्हणाले, ''युधिष्ठिरा, झाडाच्या फांदीवरील त्या भास पक्ष्याच्या डोळ्यात बाण मारावयाचा आहे. तुला काय काय दिसते आहे ?'' युधिष्ठिर म्हणाला, ''गुरुजी, तुम्ही दिसता आहात. ते झाड दिसते आहे. भास पक्षीही दिसत आहे.'' द्रोणाचार्य म्हणाले. ''युधिष्ठिरा, तू बाजूला उभा राहा.'' युधिष्ठिर बाजूला उभा राहिला.

---

११३) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१२३.४५, ४६)

यानंतर द्रोणाचार्यांनी क्रमाक्रमाने दुर्योधन, दु:शासनादि कौरव, भीम, नकुल, सहदेव हे पांडव यांना बोलावून युधिष्ठिराला विचारलेलाच प्रश्न सर्वांना विचारला. त्या सर्वांनी युधिष्ठिराप्रमाणेच उत्तरे दिली.

ततो धनञ्जयं द्रोण: स्मयमानोऽभ्यभाषत ।

तत्वेदानीं प्रहर्तव्यमेतल्लक्ष्यं निशम्यताम् ।। (११४)

(अर्थ– त्यानंतर द्रोणाचार्य अर्जुनाला किंचित् हसल्यासारखे करून म्हणाले, आता तुला या लक्ष्याचा वेध घ्यायचा आहे, तेव्हा ऐक धनुष्यबाण सज्ज करून उभा रहा.) यानंतरची घटना व्यासमहर्षींनी खालीलप्रमाणे वर्णन केली आहे.

'एवमुक्त: सव्यसाची मण्डलीकृत कार्मुक: ।

तस्थौ लक्ष्यं समुद्दिश्य गुरुवाक्यप्रचोदित: ।।१ ।।

मुहूर्तादिव तं द्रोणस्तथैव तमभाषत ।

पश्यस्येनं स्थितं भासं द्रुमं मामपि वेत्युत्य ।।२ ।।

पश्याम्येनं भासमिति द्रोणं पार्थोऽभ्यभाषत ।

न तु वृक्षं भवन्तं वा पश्यामीति च भारत ।।३ ।।

तत: पीतमना द्रोणो मुहूर्तादिव तं पुन: ।

प्रत्यभाषत दुर्धर्ष: पाण्डवानां रथर्षभम् ।।४ ।।

भासं पश्यसि यद्येनं तथा ब्रूहि पुनर्वच: ।

शिर: पश्यामि भासस्य न गात्रमिती सोऽब्रवीत् ।।५ ।।

अर्जुनेनैवमुक्तस्तु द्रोण हृष्टतनूरुह: ।

मुञ्चस्वेत्यब्रवीत्पार्थं स मुमोच विचारयन् ।।६ ।। (११५)

(अर्थ – असे द्रोणाचार्यांनी म्हटल्यानंतर ज्याने धनुष्यबाण सज्ज केले आहे असा, गुरुंच्या बोलण्याने ज्याला प्रेरणा मिळाली आहे असा सव्यसाची अर्जुन उभा राहिला. क्षणार्धात द्रोण त्याला तसेच म्हणाले, 'हा वृक्ष, त्यावरील हा भास पक्षी, आणि मी यांना तू पाहतोस का ? (हे तुला दिसतात का?)' पण अर्जुन म्हणाला. 'मला फक्त भास पक्षीस दिसतो. पण तुम्ही किंवा हे झाड मला दिसत नाही.' तेव्हा अत्यंत प्रसन्न झालेले अजिंक्य असे द्रोण, पांडवांमधील पराक्रमी अशा अर्जुनाला म्हणाले, ''जर ह्या भास पक्ष्याला पहात असशील तर पुन्हा एकदा सांग.'' तेव्हा अर्जुन म्हणाला, ''मी भासाचे फक्त शिरच पहात आहे, त्याचे

११४) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१२३.५८)

११५) BORI प्रमाणित प्रत म.भा. आदिपर्व (१.१२३.६० ते ८५)

शरीर नाही.'' असे अर्जुन ज्यांना म्हणाला आहे असे आनंदित द्रोण अर्जुनाला म्हणाले, ''सोड तर बाण !'' त्याने तत्काळ बाण मारून भासाचे शिर खाली पाडले.

अंगीकृत कार्यामध्ये किती एकाग्र चित्त ठेवावे याची शिकवणच अर्जुनाची ही कथा देते. तनमनाने त्या कार्यात एकचित्त होऊन कार्य केले की, ते सफल होते. अर्जुनाच्या उदाहरणाने द्रोणाचार्यांनी एकाग्रतेचे प्रत्यक्ष उदाहरण आपल्या शिष्यांपुढे उभे केले आहे.

कथा २ री – शङ्ख व लिखित यांची कथा – (११६)

एखाद्याची परवानगी न घेता त्याची वस्तु घेणे ही चोरीच होय.

बाहुदा नदीकाठी शङ्ख व लिखित या दोन भावांचे आश्रम होते. त्या ठिकाणी राहून ते दोघे तपश्चर्या करत असत. दोघांचेही आश्रम फळे व फुले यांनी लगडलेल्या वृक्षांनी अत्यंत संपन्न असेच होते.

एकदा लिखित काही कामानिमित्त शङ्खाच्या आश्रमात गेला होता. दैववशात् नेमका शङ्ख त्यावेळी आश्रमाच्या बाहेर गेला होता. झाडावर पिकलेली फळे पाहून लिखिताने ती फळे तोडली व कोणतीही शंका मनात न आणता ती खाल्ली.

शङ्ख आश्रमात परत आला. त्यावेळी त्याने लिखित फळे खात आहे, असे पाहिले. शङ्खाने विचारले, ''तुला ही फळे कोठून मिळाली ? ही तू का खात आहेस ?''

लिखिताने हसतच सांगितले, ''दादा, ही फळे मी येथूनच घेतली.''

यावर शङ्ख अतिशय रागावला व म्हणाला, ''मला न विचारता, माझी परवानगी न घेता तू ही फळे तोडलीस. तेव्हा ही चोरीच आहे. तू राजाकडे जा. आपला अपराध कबूल करून त्याची शिक्षा देण्यास तू राजाला सांग.''

तेव्हा लिखित सुद्युम्न राजाकडे गेला. राजाने त्याचे स्वागत करून त्याची इच्छा काय असे विचारले. लिखिताने सांगितले, ''माझ्या भावाच्या परवानगीशिवाय मी त्याच्या बागेतील फळे खाण्याचा अपराध केला आहे. त्याबद्दल तू मला शिक्षा करावीस असे माझे मागणे आहे.'' सुद्युम्न राजाने अनेक प्रकारे लिखिताची समजूत काढली. त्याला दुसरे काही मागण्यास सागितले. परंतु लिखिताची समजूत पटेना.

अखेर सुद्युम्न राजाने चोरीचा अपराध मानून त्याचे दोन्ही हात तोडण्याची शिक्षा दिली. दोन्ही हात तोडले गेल्यावर लिखित परत शङ्खाकडे आला. शङ्खाला म्हणाला, ''आपल्या सांगण्याप्रमाणे मला शिक्षा

---

११६) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२४.१ ते ३०)

झाली. माझ्या या दुर्बुद्धीबद्दल आपण मला क्षमा करा.''

यावर शङ्ख म्हणाला, ''मी तुझ्यावर रागावलो नाही. परंतु तू धर्माचे उल्लंघन केलेस. दंड देण्याचा अधिकार फक्त राजाला असतो. तो दंड तुला मिळाला. तेव्हा तू जाऊन बाहुदा नदीमध्ये देवता, ऋषी व पितर यांना तर्पण दे.'' लिखिताने तसे करताच त्याला त्याचे दोन्ही हात परत मिळाले.

अशाप्रकारे चोरीच्या अपराधाबद्दल शिक्षा भोगून लिखित पावन झाला. म्हणून चोरी करणे वाईटच! राजा सुद्युम्नालाही त्याने आपला दंड देण्याचा धर्म पाळल्याने उत्तम गती मिळाली.

तमब्रवीत्तदा शङ्खः तीव्रकोपसमन्वित: ।
स्तेयं त्वया कृतमिदं फलान्याददता स्वयम् ।।
गच्छ राजानमासाद्य स्वकर्म प्रथयस्व वै ।
अदत्तादानमेवेदं कृतं पार्थिवसत्तम ।।
स्तेनं मां त्वं विदित्वा च स्वधर्ममनुपालय ।
शीघ्रं धारय चौरस्य मम दण्डं नराधिप ।।
इत्युक्तस्तस्य वचनात्सुद्युम्नं वसुधाधिपम् ।
अभ्यगच्छन्महाबाहो लिखित: संशितव्रत: ।। (११७)

कथा ३ री – ऐश्वर्याचे प्रमुख कारण चारित्र्यसम्पन्नता –शील

प्रल्हादाची कथा – (११८)

राजसूय यज्ञाचे वेळी पांडवांचे अपार असे ऐश्वर्य पाहून दुर्योधनाला फार मत्सर वाटला. 'असे ऐश्वर्य मला कसे प्राप्त होईल ?' असा प्रश्न त्याने आपले वडील धृतराष्ट्र यांना विचारला. तेव्हा धृतराष्ट्राने खालील उपाय सांगितला.

शीलेन हि त्रयो लोका: शक्या जेतुं न संशय: ।
न हि किञ्चिदसाध्यं वैलोके शीलवतां भवेत् ।। (११९)

(अर्थ – चारित्र्यसंपन्नतेमुळे तीनही लोकांना जिंकणे सहज शक्य आहे. यात काहीच संशय नाही. जे लोक चारित्र्यसंपन्न असतात, त्यांना असाध्य अशी कोणतीच गोष्ट या जगात नाही.)

---

११७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.२४.९. १०,११)

११८) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व ( १२.१२४. १ ते ६९)

११९) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व ( १२.१२४.१५)

ही गोष्ट पटवून देण्यासाठी धृतराष्ट्राने दुर्योधनाला प्रल्हादाची गोष्ट सांगितली. नारदाने पूर्वी हा इतिहास सांगितला होता.

पूर्वी प्रल्हादाने आपल्या चारित्र्यसंपन्नतेने इंद्राचे राज्य जिंकले. तसेच त्रैलोक्य आपल्या स्वाधीन ठेवले. तेव्हा इंद्र बृहस्पतीला शरण गेला. त्याने अनुक्रमे बृहस्पती व भार्गव यांच्याकडून ज्ञानप्राप्ती करून घेतली. परंतु यापेक्षाही श्रेष्ठ ज्ञान प्रल्हादाकडे आहे असे भार्गवाने इंद्राला सांगितले. तेव्हा इंद्र ब्राह्मणवेष धारण करून प्रल्हादाकडे गेला. त्याने प्रल्हादाच्या सहवासात राहून त्याचे शिष्यत्व स्वीकारले. त्याची श्रेष्ठ गुरुभक्ती व सेवापर भाव पाहून प्रल्हाद संतुष्ट झाला.

प्रल्हादाला इंद्राने विचारले,'त्रैलोक्याचे राज्य आपल्याला कसे प्राप्त झाले, हे जाणून घेण्याची मला इच्छा आहे.' त्यावर प्रल्हादाने उत्तर दिले, 'मी कायम नीतीपर राहतो. कुणाला दुखवत नाही. धर्मपालन, मन व इंद्रिय यांचा संयम राखतो व सदाचाराने वागतो,हेच त्रैलोक्याचे राज्य मिळण्याचे कारण आहे.' यानंतरही इंद्राने सेवावृत्तीने राहणे सुरूच ठेवले. तेव्हा प्रल्हादाने संतुष्ट होऊन म्हटले, 'हे ब्राह्मणा, तुझ्या गुरूसेवेने मी प्रसन्न आहे. तुला हवा तो वर माग.'

तेव्हा इंद्राने वर मागितला, 'जर आपण प्रसन्न असाल तर मला आपले शील द्या.' प्रल्हाद मनातून अस्वस्थ झाला. परंतु आपल्या दिलेल्या शब्दानुसार त्याने आपले शील इंद्राला दिले. तो वर घेऊन इंद्र निघून गेला.

त्याचवेळी प्रल्हादाच्या शरीरातून एक कान्तिमान असा छायारूपी शरीरधारी पुरुष बाहेर पडला. प्रल्हादाने त्याला विचारले, 'तू कोण आहेस ? कोठे जात आहेस ?' तेव्हा त्या पुरुषाने उत्तर दिले, 'मी शील आहे. तू माझा त्याग केल्यामुळे मी त्या ब्राह्मणश्रेष्ठाकडे जात आहे. ' असे म्हणून शील अदृश्य झाले.

शीलाच्या पाठोपाठ क्रमाक्रमाने प्रल्हादाच्या शरीरातून धर्म, वृत्त व बल असे शरीरधारी पुरुष निघून इंद्राकडे गेले. त्यानंतर प्रल्हादाच्या शरीरातून एक तेजोमय देवी बाहेर पडली. 'तू कोण ?' असे प्रल्हादाने विचारताच 'मी लक्ष्मी आहे.' असे तिने उत्तर दिली. तिने प्रल्हादाला सांगितले, 'तुझ्याकडे शिक्षण घेणारा ब्राह्मण म्हणजे प्रत्यक्ष इंद्रच होता. शीलाच्या बळावर तू त्रैलोक्याची सत्ता मिळविली होतीस ते शीलच त्याने हरण केले. हे ज्ञानी प्रल्हादा, धर्म, सत्य, वृत्त, बल आणि लक्ष्मी या सर्वांचे मूळ शीलच आहे.'

धृतराष्ट्राकडून ही कथा ऐकल्यानंतर 'शीलप्राप्ती करून घेण्याचा उपाय कोणता ?' असे दुर्योधनाने विचारले. यावर धृतराष्ट्राने खालीलप्रमाणे उत्तर दिले.

अद्रोह: सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा।

अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ।।१ ।।

यदन्येषां हितं न स्यादात्मन: कर्म पौरुषम्।

अपत्रपेत वा येन न तत्कुर्यात्कथंचन ।।२ ।।

ततु कर्म तथा कुर्याद्येन श्लाघेत संसदि।

एतत्छीलं समासेन कथितं कुरूसत्तम ।।३ ।। (१२०)

(अर्थ – मन, वाणी व कर्म याद्वारा कोणत्याही प्राण्याशी द्रोह न करणे, प्राणीमात्रावर दया करणे, दान देणे हे प्रशंसनीय असे शील होय. ज्या कर्मामुळे दुसऱ्याचे अहित होईल, अथवा ज्या कर्मामुळे लज्जा उत्पन्न होईल असे कर्म करू नये. ज्या कर्मामुळे जनात प्रशंसा होईल असेच कर्म करावे. हे कुरुश्रेष्ठा, हेच सारांशाने शील असे म्हणता येईल.)

धृतराष्ट्र पुढे असेही सांगतो की चारित्र्यसंपन्नतेशिवाय, शीलाशिवाय मिळणारी संपत्ती उपभोगायला तर मिळत नाहीच. उलट अशा संपत्तीचा नाश होतो. एवढे जीवनात शीलाचे महत्त्व आहे.

४) दीर्घसूत्री विनश्यति (१२१)

फार खोल नसणाऱ्या पण बरेच पाणी असणारे एक तळे होते. त्या तळ्यात अनागतविधाता, प्रत्युपन्नमति व दीर्घसूत्री असे परस्परांचे मित्र असणारे तीन मासे रहात होते. अनागतविधाता मासा संकट येण्यापूर्वीच त्यातून सुटका कशी करावी याचा विचार करत असे. प्रत्युत्पन्नमति ह्या माशाची बुद्धी समयसूचक होती. तर दीर्घसूत्री हा आळशी होता. खूप वेळ विचार करत बसे.

एकदा त्या तळ्याकाठी मासे पकडणाऱ्या कोळ्यांनी येऊन तळ्याला चारी बाजूंनी बिळे पाडून पाणी वाहून खालच्या पातळीत पाठवण्याची सुरुवात केली. तेव्हा तलावातील पाणी कमी होत आहेअसे पाहून अनागतविधाता आपल्या मित्रांना म्हणाला, 'येथे पाण्यात राहणाऱ्या आपणा सर्वांवर हे संकट आले आहे. तेव्हा काही अनर्थ ओढविण्यापूर्वीच आपण येथून दुसरीकडे सुरक्षित ठिकाणी जाऊ.'' त्यावर दीर्घसूत्री मासा म्हणाला, 'अजून इतकी घाई करण्याइतके संकट आले आहे असे मला वाटत नाही.' तर प्रत्युत्पन्नमती मासा म्हणाला, ''योग्य वेळ आली की, मला काहीतरी उपाय सुचेलच!''

''ठीक आहे.'' असे म्हणून अनागतविधाता मासा त्या वाहून जाणाऱ्या जलप्रवाहाच्या मार्गाने

---

१२०) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१२४.६४, ६५, ६६)

१२१) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१३५.१ ते १७)

दुसऱ्या खोल अशा जलाशयात निघून गेला. नंतर त्या तळ्यातील पाणी बरेच कमी झाल्यावर मासे पकडणाऱ्या कोळ्यांनी तळ्यात जाळी टाकून माशांना पकडण्यास सुरुवात केली. दीर्घसूत्री मासा जाळ्यात अडकला. परंतु प्रत्युत्पन्नमती माशाने इतर माशांच्या मध्ये शिरून फक्त दोर पकडला. सर्व मासे जाळ्यात अडकले आहेत असे पाहून कोळी लोकांनी जाळी दुसऱ्या तळ्यात बुडवून मासे धुण्यास सुरुवात केली. त्यावेळी प्रत्युत्पन्नमती माशाने आपल्या तोंडात पकडलेला दोर सोडून पटकन जलाशयात निघून गेला. त्यामुळे त्याचे प्राण वाचले. परंतु मंदबुद्धी, विचार करू न शकणारा व आळशी दीर्घसूत्री मासा मात्र मरण पावला.

म्हणून दूरदृष्टीने विचार करून संकट येण्यापूर्वी संकटमुक्तीचा मार्ग शोधणाऱ्याचीच संकटातून मुक्तता होते. समयसूचक, प्रत्युत्पन्नमती व्यक्ती संकटातून सुटेलच अशी खात्री देता येत नाही. दीर्घसूत्री अशा व्यक्तीची संकटातून मुक्तता न होता तिचा नाश होतो. म्हणून भीष्माचार्य सांगतात,

एवं प्राप्ततमं कालं यो मोहान्नावबुध्यते ।

स विनश्यति वै क्षिप्रं दीर्घसूत्रो यथा झष: ।। (१२२)

(अर्थ – अशाप्रकारे मोहग्रस्त झाल्याने संकट जवळ येऊन ठेपले असताही ज्याला ते जाणवत नाही– जो ते जाणत नाही– ज्याला ते उमगत नाही त्याचा दीर्घसूत्री माशाप्रमाणे तत्काळ नाश होतो.)

### ५) काळानुरूप वागणे श्रेयस्कर (१२३)

एकदा दैत्यांचे निवासस्थान व नदीपती असणाऱ्या समुद्राने नद्यांना प्रश्न केला, ‘हे नद्यांनो, मला एक शंका आहे. जेव्हा मोठा पूर येतो तेव्हा तुम्ही मोठमोठ्या वृक्षांना त्यांच्या फांद्या, खोड, मूळ या सर्वांसह उखडून आपल्याबरोबर वाहून घेऊन येता. पण त्यामध्ये वेताचे झाड, लव्हाळे कुठेच दिसत नाही. वेत आकाराने लहान व कमी शक्ती असणारा असतो,म्हणून त्याला तुम्ही तुच्छ मानता का ? की त्याने तुमचे काही काम केले आहे ?’’

यावर गंगा नदीने सर्व नद्यांच्या वतीने अतिशय अर्थगर्भ, तर्कानुकूल व अत्यंत गोड शब्दात उत्तर दिले. ती म्हणाली, ‘हे नदीपती, समुद्रा, जेव्हा महापूर येऊन प्रवाह अतिशय जोरात असतो तेव्हा हे वृक्ष खाली वाकत नाहीत. या प्रतिकूल आचरणामुळे त्यांना आपले स्थान सोडावे लागते. ते उखडले जातात. पण वेत असा नाही नदीचा मोठा वेग पाहून तो त्याच्यापुढे वाकतो. वेग कमी झाल्यावर पुन्हा ताठ होतो.

---

१२२) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.१३५.१७)

१२३) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११४. १ ते १४)

वेत काळवेळ जाणतो व आम्हाला अनुकूल असे वागतो. पण इतर वृक्ष मात्र असे वागत नाहीत. वेत कधीही गर्विष्ठ नसतो. अशाप्रकारे जी झुडपे, वेली, वारा, पाणी यांच्या वेगापुढे नम्र होतात, वाकतात, वेग कमी झाल्यावर ताठ होतात त्यांचा कधीच पराजय अथवा नाश होत नाही. या वेताचे उदाहरण घेऊन भीष्माचार्य युधिष्ठिराला उपदेश करतात.

सारासारं बलं वीर्यमात्मनो द्विषत: च य: ।

जानन्विचरति प्राज्ञो न स याति पराभवम् ।।

एवमेव यदा विद्वान्मन्येतातिबलं रिपुम् ।

संश्रये द्वैतसीं वृत्तिमेव प्रज्ञानलक्षणम् ।। (१२४)

(अर्थ – १) जो सूज्ञ मनुष्य आपले आणि शत्रूचे सामर्थ्य, सैन्य व शौर्य यांचा सारासार विचार करून वागतो, त्याचा पराभव होत नाही.

२) तसेच जो शहाणा, विद्वान माणूस, शत्रू आपल्यापेक्षा बलवान् आहे असे पाहून वेताप्रमाणे नम्र वृत्तीचा अवलंब करतो, त्याचे हे वर्तन शहाणपणाचे लक्षण आहे.)

या गोष्टीवरून माणसाने नेहमीच जशी वेळ असेल त्याप्रमाणेच वागले पाहिजे हा सल्ला भीष्माचार्यांनी दिला आहे. आपली कुवत न जाणता, ताठ्याने, अहंकाराने वागणे योग्य नव्हे हाच या गोष्टीचा मतितार्थ आहे.

५) आळसाचा दुष्परिणाम – आळशी उंटाची कथा – (१२५)

'आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपु: ।'

हे वचन सुप्रसिद्ध आहे. आळसाला, मनुष्याच्या शरीरात राहणारा फार मोठा शत्रू असे म्हटले आहे. एका आळस या शत्रूमुळे मनुष्याची विद्या, यश, संपत्ती, एवढेच नाही तर त्याच्या आयुष्याचाही नाश होतो. म्हणून मनुष्याने सतत उद्योगशील राहिले पाहिजे. ही गोष्ट पटवून देण्यासाठी भीष्माचार्यांनी एका उंटाची गोष्ट सांगितली आहे.

ही सत्ययुगातील गोष्ट आहे. एका उंटाला आपल्या पूर्वजन्माचे स्मरण होते. तो अतिशय उत्तम आचरण करीत असे. त्याने एकदा कठोर तपाचरण केले. या तपश्चर्येच्या शेवटी ब्रह्मदेव त्याच्यावर प्रसन्न झाले. त्यांनी उंटाला वर मागण्यास सांगितले. उंटाने सांगितले,'माझी ही मान शंभर योजने लांब व्हावी असा

१२४) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११४.१३,१४)

१२५) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११३. १ ते १६)

वर आपण मला द्यावा. ज्यामुळे मी चरायला गेलो की मी खूप लांबवरचे गवत खाऊ शकेन.' ब्रह्मदेवाने त्याने मागितलेला वर त्याला दिला. त्याची मान शंभर योजने लांब झाली.

आता उंट लांबवरचे गवत खाऊ शकत होता. परंतु हळूहळू तो आळशी बनला. त्याने चरावयास जाणे सोडून दिले. बसल्याजागीच मान लांब करून तो गवत खाऊ लागला.

एकदा आपली मान शंभर योजने लांब करून तो गवत खात होता. अचानक सोसाट्याचा वारा सुटला. नंतर मुसळधार पाऊस पडू लागला. तेव्हा उंटाने आपली मान व मस्तक एका गुहेत ठेवले. त्याचवेळी पाऊस, वाऱ्याने काकडलेला व भुकेने व्याकूळ झालेला एक कोल्हा, कोल्हीबरोबर गुहेत आला. उंटाची मान व मस्तक पाहून त्या दोघांनी ते कुरतडून मांस खाण्यास सुरुवात केली. ज्यावेळी उंटाला मान कुरतडली जाते आहे अशी जाणीव झाली त्यावेळी आपली मान आकुंचित करून बाहेर काढण्याचा प्रयत्न तो उंट करू लागला. परंतु आता फारच उशीर झाला होता.कोल्हा व कोल्हीने कुरतडून कुरतडून मान व मस्तक दोन्हीचे मांस खाल्ले होते. शेवटी उंटाचा मृत्यू झाला.

केवळ आळशी वृत्तीमुळे उंटाला आपले प्राण गमवावे लागले. म्हणून भीष्माचार्य युधिष्ठिराला सांगतात –

एवं दुर्बुद्धिना प्राप्तम् उष्ट्रेण निधनं तदा ।

आलसस्य क्रमात्पश्य महद्दोषमुपागतम् ।। (१२६)

अर्थ – तेव्हा हे युधिष्ठिरा, पहा, आळसामुळे उंटाला जी दुर्बुद्धि झाली, तो हा मोठाच दोष होय. त्यामुळेच उंटाला मरण पत्करावे लागले.)

६) स्वभावो दुरतिक्रम:– (१२७)

एका निर्जन वनात एक ऋषी रहात होते.अतिशय संयमी, नियमनिष्ठ असे ते ऋषी व्रतांचे पालन करण्यात अतिशय तत्पर होते. ते सदैव अध्ययन करीत, तसेच सदैव सात्विक असा फलमूलांचा आहार घेत. अतिशय सहनशील तसेच उपवासाने अन्त:करण शुद्ध ठेवून सतत परमेश्वराचे चिंतन करत असत. त्या वनातील सर्व व्याघ्रसिंहादि हिंस्त्र प्राणीदेखील त्यांच्या सन्निध अतिशय नम्रपणे येत असत.

त्यांच्यामध्ये एक ग्राम्य असा कुत्रा होता. तो मात्र त्या मुनींना सोडून कधीच राहात नसे. त्याची मुनींवर अतिशय भक्ती होती. तो फळमुळांचा आहार घेत असे. तो अतिशय दुर्बल असल्याने मुनींनाही

१२६) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११३.१६).

१२७) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११७.१ ते ४४)

त्याच्याबद्दल प्रेम वाटत असे.

एकदा एक भुकेलेला, रक्तपिपासु चित्ता आश्रमात आला. त्या कुत्र्याला खाण्याची त्याला इच्छा झाली. कुत्रा अतिशय घाबरला. तो त्या मुनींकडे येऊन म्हणाला, 'मला या चित्त्याची भीती वाटणार नाही असे करा.' तेव्हा मुनींनी तपोबलाने त्याला चित्ता केला. तेव्हा चित्तारूपी तो कुत्रा निर्भयपणे वनात हिंडू लागला.

पुढे एकदा एक भुकेलेला वाघ तेथे आला. तो वाघ चित्त्याच्या रूपातील कुत्र्याचा पाठलाग करू लागला. तेव्हा घाबरलेल्या त्या चित्याला ऋषींनी वाघ बनविले. नंतर एकदा मदोन्मत्त हत्ती वाघाला पाहून आश्रमात आला. त्या हत्तीने वाघासमोर मोठी गर्जना करताच तो वाघ घाबरला.तेव्हा ऋषींनी त्या वाघाला मोठा हत्ती बनविले. अशा तऱ्हेने एकदा सिंहाला पाहून घाबरलेल्या हत्तीरूपातील कुत्र्याला सिंह व नंतर पुन्हा त्या सिंहरूपी कुत्र्याला भयंकर अशा शरभाचे रूप ऋषींनी दिले.

पुढे एकदा रक्तमांसास चटावलेल्या त्या शरभाला फळे, मुळे हे पूर्वीचे अन्न खाण्याची इच्छा अजिबात होईन. त्याच्या भीतीने अरण्यातील सर्व पशु जीवाच्या भीतीने दुसरीकडे पळून गेले त्या शरभरूपातील श्वानाला रक्तप्राशनाची अनिवार इच्छा झाल्याने त्या मुनींनाच ठार मारून इच्छा पुरी करावी असे वाटू लागले. परंतु मुनींनी अंतर्ज्ञानाने सर्व जाणले.

भीष्माचार्य वर्णन करतात,

'ततस्तेन तप:शक्त्या विदितो ज्ञानचक्षुषा ।
विज्ञाय च महाप्राज्ञो मुनि: श्वान तमुक्तवान् ।।
श्वा त्वं द्विपित्वमापन्नो द्वीपी व्याघ्रत्वमागत: ।
व्याघ्रो नागो मदपटुर्नाग: सिंहत्त्वमाप्तवान् ।।
सिंहोऽतिबलसंयुक्तो भूय: शरभतां गत: ।
मया स्नेहपरीतेन न विमृष्ट: कुलान्वय: ।।
यस्मादेवमपापं मां पाप हिंसितुमिच्छसि ।
तस्मात्स्वयोनिमापन्न: श्वैव त्वं भविष्यसि ।।
ततो मुनिजनद्वेषाद्दुष्टात्मा श्वाकृतोऽबुध: ।
ऋषिणा शरभ: शप्त: स्वं रूपं पुनराप्तवान् ।।[१२८]

१२८) BORI प्रमाणित प्रत म.भा. शांतिपर्व (१२.११७.४० ते ४४)

(अर्थ – तेव्हा आपल्या तपाच्या सामर्थ्यामुळे ज्ञानरूपी नेत्रांनी ज्याने सर्व जाणले आहे ते मुनि त्या कुत्र्याला म्हणाले, ‘कुत्रा असणारा तू चित्ता झालास, चित्त्याचा वाघ बनलास. व्याघ्ररूपातून मदोन्मत्त हत्ती झालास. तर हत्तीच रूपाचे सिंहरूप झाले. अत्यंत सामर्थ्यवान असा सिंहरूपी तू पुन्हा शरभ बनलास. तुझ्याबद्दलच्या अतीव प्रेमाने मी ही रूपे तुला दिली. त्या प्राण्यांच्या वंशाशी तुझा काहीही संबंध नाही. ज्याअर्थी हे दुष्टबुद्धी श्वाना, निष्पाप अशा मला ठार मारण्याची तू इच्छा करत आहेस, त्याअर्थी स्वत:ची मूळ योनी प्राप्त होऊन तू पुन्हा कुत्राच होशील. तेव्हा मुनींचा द्वेष केल्यामुळे अज्ञानी अशा त्या कुत्र्याच्या रूपातून दुष्टात्मा झालेल्या शरभाला ऋषींनी शाप दिल्यामुळे त्याला पुन्हा स्वत:चे मूळ श्वानरूप प्राप्त झाले.)

या कथेवरून ही गोष्ट स्पष्ट होते की, एखाद्याचा जन्मामुळे प्राप्त झालेला स्वभाव हा स्थिती पालटली तरी बदलू शकत नाही. म्हणून माणसाच्या स्वभावाची पारख महत्त्वाची असते.

खालील सुभाषिते यादृष्टीने महत्त्वाची आहेत.

१) योहि यस्य स्वभावोऽस्ति स नित्यं दुरतिक्रम:

श्वा यदि क्रियते राजा स किं नाश्नात्युपाहनम् ।।

अथवा

२) या यस्य प्रकृति: स्वभावजनिता केनापि न त्यज्यते । (१२९)

(अर्थ – १) ज्याची जी जन्मजात प्रवृत्ती (स्वभाव) असते ती बदलणे अत्यंत कठीण असते. उदाहरणार्थ, कुत्र्याला जरी राजा केले तरी तो जोडा (चामडे) खाणार नाही का ?

२) जन्मजात ज्याची जी प्रकृती (स्वभाव) असते ती तो केव्हाच सोडू शकत नाही.)

म्हणूनच आपली मूळ प्रवृत्ती, प्रकृती लक्षात घेऊन त्याला अनुसरून प्रत्येकाने वागले पाहिजे. हा या गोष्टीतील संदेश आहे.

प्रजागरपर्व – विदुरनीतीमधील वैयक्तिक जीवनावर संस्कार करणारी काही सुभाषिते –

१) निषेवते प्रशस्तानि निन्दितानि न सेवते ।

अनास्तिक: श्रद्दधान एतत् पण्डितलक्षणम् ।। (१३०)

(अर्थ – ज्यांची स्तुती होते अशी कर्मेजो करतो, जो निदेंस पात्र ठरणारी कर्म करीत नाही. आस्तिक

---

१२९) विंझे ल. गो. – संस्कृत मराठी सुभाषितकोश (प्रकरण ४३ सु. १,२)

१३०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.१६.२३)

व श्रद्धाळू अशा मनुष्याला पंडित मानले जाते.)

२) नाप्राप्यमभिवाञ्छति नष्टं नेच्छन्ति शोचितुम ।

आपत्सु च न मुह्यन्ति नरा: पण्डितबुध्दय: ।।[१३१]

(अर्थ– पंडित बुद्धीचा मनुष्य दुर्लभ वस्तूची इच्छा करत नाही. नाश पावलेल्या वस्तूबद्दल शोक करण्याची इच्छाही करत नाही. तसेच संकटात सापडलाअसता गोंधळूनही जात नाही.)

३) न हृष्यत्यात्मसंम्माने नावमानेन तप्यते ।

गाङ्गो हृद इवाक्षोभ्यो य: स पण्डित उच्यते ।। [१३२]

(अर्थ – जो आदरसत्कार केलाअसता आनंदित होत नाही, अपमान झाला असता क्रोधित होत नाही, गंगेच्या डोहाप्रमाणे जो धीरगंभीर असतो त्यालाच पंडित असे म्हणतात.)

४) अनाहूत: प्रविशति अपृष्टो बहु भाषते ।

अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम: ।। [१३३]

(अर्थ – बोलावणे नसतानाही एखाद्या ठिकाणी प्रवेश करतो, विचारले नसतानाही खूप बडबड करतो, तसेच ज्याच्यावर विश्वास ठेवणे अयोग्य अशा अविश्वसनीय माणसावर विश्वास ठेवतो तो मनुष्य मूर्ख बुद्धीचा व अधम असा असतो.)

५) एको धर्म: परं श्रेय: क्षमैका शान्तिरूत्तमा ।

विद्यैका परमा तृप्ति: अहिंसैका सुखावहा ।। [१३४]

(अर्थ – एकमेव धर्म (कर्तव्यनिष्ठा) हाच कल्याणकारक आहे, क्षमाशील वृत्ति हीच सर्वश्रेष्ठ शांती आहे. विद्या (ज्ञानप्राप्ती) हेच सर्वोच्च असे समाधान आहे. तसेच हिंसा न करणे हेच सुखप्राप्तीचे साधन आहे.)

६) चत्वारि ते तात गृहे वसन्तु

श्रियाभिजुष्टस्य गृहस्थधर्मे ।

वृद्धो ज्ञातिरवसन्न: कुलीन: ।

सखा दरिद्रो भगिनी चानपत्या ।। [१३५]

---

१३१) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.२३)

१३२) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.१६,२३)

१३३) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.२६)

१३४) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.३५)

१३५) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (प्रजागरपर्व ५.३३.५९)

(अर्थ – गृहस्थधर्माचे आचरण करणाऱ्या व धनसंपन्न मनुष्याने या चार प्रकारच्या लोकांना आपल्या घरात आश्रय द्यावा. वृद्ध माणसे, संकटात सापडलेला कुलीन मनुष्य, गरीब, दरिद्री व जिला अपत्य नाही अशी बहीण.)

७) पञ्चाग्नयो मनुष्येण परिचर्या प्रयत्नतः ।

पिता, माता अग्निरात्मा च गुरुश्च भरतर्षभ ।। (१३६)

(अर्थ – हे भरतश्रेष्ठा, माता, पिता, अग्नि, आत्मा आणि गुरु या पाच अग्नींची मनुष्याने प्रयत्नपूर्वक सेवा करावी.)

८) षड् दोषाः पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता ।

निद्रा, तन्द्री, भयं, क्रोध, आलस्यं दीर्घसूत्रता ।। (१३७)

(अर्थ – ऐश्वर्य आणि उत्कर्ष यांची इच्छा करणाऱ्या माणसाने सहा दुर्गुणांचा त्याग करावा. झोप, गुंगी, भीती, संतापी वृत्ती, आळशीपणा व दीर्घसूत्रीपणा हे ते दोष होत.)

९) षडेव तु गुणाः पुंसा न हातव्या कदाचन ।

सत्यं दानमनालस्यम् अनसूया, क्षमा, धृतिः ।। (१३८)

(अर्थ – माणसाने खरेपणा (सत्य), दानी वृत्ती, उद्योगीपणा, (सततोद्योग) मत्सररहित वृत्ती, क्षमाशीलता व धैर्य या सहा गुणांचा कधीही त्याग करू नये.)

१०) न स्वे सुखे वै कुरुते प्रहर्षं

नान्यस्य दुःखे भवति प्रहृष्टः ।

दत्त्वा पश्चात् न कुरुतेऽनुतापं

स कथ्यते सत्पुरुषार्यशीलः ।। (१३९)

(अर्थ – स्वतःला सुख प्राप्त झाले असता जो अनावर आनंद प्रकट करत नाही. तसेच दुसऱ्याला दुःख झाले असता जो हर्ष प्रकट करत नाही. दिलेल्या दानाबद्दल ज्याला पश्चाताप होत नाही तोच आर्यांचे चारित्र्य प्रकट करणारा सत्पुरुष समजला जातो.)

११) मितं भुङ्क्ते संविभज्याश्रितेभ्यो

मितं स्वपित्यमितं कर्म कृत्वा ।

ददात्यमित्रेष्वपि याचितः सन्

आत्मवन्तं न प्रजहत्यनर्थाः ।। (१४०)

---

१३६ ते १४०) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (विदुरनीती ५.३३.६२,६६,६९,९४,९९)

(अर्थ – आश्रितांना पुरेसे दिल्यानंतर शिल्लक असे थोडे अन्न जो खातो, भरपूर काम करून थोडीशीच झोप जो घेतो. याचना केली असता मित्र नसलेल्यांनाही धन देतो. त्या विवेकी मनुष्यास अनर्थ स्पर्शही करत नाहीत.)

१२) भक्षोत्तमप्रतिच्छन्नं मत्स्यो बडिशमायसम्।

अन्नाभिलाषी ग्रसते नानुबन्धमवेक्षते ।।[१४१]

(अर्थ – खाण्याच्या,अन्नाच्या लालसेने मासा उत्तम भक्ष्याने आच्छादित असणारा लोखंडाचा गळ मिळतो, परंतु त्यामुळे होणाऱ्या परिणामाचा विचार मात्र करत नाही. – मतितार्थ – एखादे कृत्य करताना यामुळे होणाऱ्या परिणामाचा विचार आधी करावा.)

१३) यथा मधु समादत्ते रक्षन् पुष्पाणि षट्पदः।

तद्वदर्थान् मनुषेभ्यः आदद्यादविहिंसया ।।[१४२]

(अर्थ – ज्याप्रमाणे एखादा भुंगा फुलांना न दुखविता–त्यांची काळजी घेत मध गोळा करतो, त्याप्रमाणे मनुष्यांना न दुखविता त्यांच्याकहून धन प्राप्त करावे.)

१४) पुष्पं पुष्पं विचिन्वीत मूलच्छेदं न कारयेत्।

मालाकार इव आरामे न यथाङ्गारकारकः ।।[१४३]

(अर्थ – एखादा माळी उद्यानातील एक, एक फूल गोळा करतो, त्याप्रमाणे हळूहळू संग्रह करावा. एखाद्या कोळसा बनविणाऱ्या लोणाऱ्याप्रमाणे मूळावरच घाव घालू नये.)

१५) किं नु मे स्यादिदं कृत्वा किं नु मे स्यादकुर्वतः।

इति कर्माणि संचिन्त्य कुर्याद्वा पुरुषो न वा ।।[१४४]

(अर्थ – हे कर्म केल्यास कोणता परिणाम होईल, हे कृत्य न केल्यास काय परिणाम होईल याचा आधी विचार करूनच मग मनुष्याने ते कृत्य करावे अथवा करु नये.)

१६) सत्येन रक्ष्यते धर्मोविद्या योगेन रक्ष्यते।

मृजया रक्ष्यते रूपं कुलं वृत्तेन रक्ष्यते ।।[१४५]

(अर्थ – सत्यामुळे धर्माचे (कर्तव्यनिष्ठेचे) रक्षण होते,अभ्यासाने विद्या राखली जाते, स्वच्छतेमुळे रूपाचे रक्षण होते, तर सदाचरणाने कुळाचे रक्षण होते.)

---

१४१ ते १४५) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (विदुरनीती ५.३४. १३, १७, १८, १९, ३७)

१७) शीलं प्रधानं पुरुषे तद्यस्येह प्रणश्यति।

न तस्य जीवितेनार्थोन धनेन न बन्धुभि: ।। (१४६)

(अर्थ – मनुष्याचे चारित्र्य हेच जीवनात सर्वात महत्त्वाचे होय. ज्याचे चारित्र्य (शील) नष्ट झाले आहे. त्याचे जीवन, त्याची संपत्ती अथवा बांधव या कशालाच अर्थ नाही.)

१८) अनसूयार्जवं शौचं सन्तोष: प्रियवादिता।

दमस्सत्यमनायासो न भवन्ति दुरात्मनाम् ।। (१४७)

(अर्थ– मत्सरग्रस्त वृत्ती नसणे, पावित्र्य, सरळवृत्ती, समाधान, गोड–मधुर वाणी, इंद्रियदमन, सत्य, शांतवृत्ती या गोष्टी दुष्ट माणसात आढळत नाहीत.)

१९) जरा रूपं हरति हि धैर्यमाशा।

मृत्यु: प्राणान्धर्मचर्यामसूया ।।

क्रोध: श्रियं शीलमनार्यसेवा।

ह्रियं काम: सर्वमेवाभिमान: ।। (१४८)

(अर्थ – वृद्धत्व सौंदर्याचा नाश करते. आशा धैर्य नष्ट करते. मृत्यू प्राण हरण करतो. मत्सर धर्माचरणाचा, नीचपुरुषाची सेवा शील भ्रष्ट करते. कामभावना लज्जेचा नाश करते. तर अहंकारामुळे सर्वस्वाचा नाश होतो.)

२०) इज्याध्ययनदानानि तप: सत्यं क्षमा घृणा।

अलोभ इति मार्गेऽयं धर्मस्याष्टविध: स्मृत: ।। (१४९)

(अर्थ – यज्ञ करणे, अध्ययनात मग्न राहणे, दानी वृत्ती, तपाचरण, सत्यप्रियता, क्षमाशील वृत्ती, दयाळूपणा व निर्लोभी वृत्ती हे धर्माचे अष्टविध मार्ग आहेत.) अशातऱ्हेचे सुमारे १००–१२५ वर श्लोक विदुरनीती मध्ये आलेले आहेत. ज्यामध्ये सदाचरणासाठी आवश्यक असे उत्तमोत्तम विचार मांडले आहेत. ज्यांच्या अध्ययनाने व मनन केल्याने वैयक्तिक नीतीमत्ता दृढ होण्यास मदतच होईल. विस्तारभयास्तव यातील काही निवडक श्लोक वर दिले आहेत.

ज्याप्रमाणे उद्योगपर्वातील विदुरनीतीचा उपयोग मूल्यसंस्कारामध्ये आवश्यक आहे, त्याप्रमाणेच वनपर्वातील यक्षप्रश्न हा भाग आहे. यक्षप्रश्नामध्ये युधिष्ठिराने यक्षाच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे जशी मार्मिक आहेत तशीच मनावर उत्तम संस्कार बिंबवणारी व विचारप्रवृत्त करणारी आहेत.

---

१४६ ते १४९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (५.३४, ४६, ६९, ३५, ४३)

१४९) BORI प्रमाणित प्रत म.भा. उद्योगपर्व (तळटीपा २१२ श्लोक) पृ.क्र. १५५.

वनपर्वात अध्याय २९६, २९७ व २९८ या तीन अध्यायात यक्षप्रश्नाची कथा आली आहे. यापैकी अध्याय २९७ व अध्याय २९८ यात यक्षाने विचारलेले प्रश्न व त्याची युधिष्ठिराने दिलेली उत्तरे हा कथाभाग आला आहे.

यापैकी काही निवडक प्रश्नोत्तरे खाली दिली आहेत.

१) यक्ष उवाच – केन स्विच्छोत्रियो भवति ? केन स्विद्विन्दते महत्।
केनस्विन् द्वितीयवान् भवति ? केन च बुद्धिमान् ।।

(अर्थ – मनुष्य श्रोत्रिय कशामुळे होतो ? त्याला ब्रह्माची प्राप्ती काय केले असता होते ? तो मदत करणारा–साहाय्यवान् कशाने होतो ? आणि काय केले असता तो बुद्धिमान् होतो.)

युधिष्ठिर उवाच – श्रुतेन श्रोत्रियो भवति । तपसा विन्दते महत्।
धृत्या द्वितीयवान् भवति बुद्धिमान् वृद्धसेवया ।।

(अर्थ – श्रुतीचे – वेदांचे अध्ययन केल्याने तो श्रोत्रिय होतो. तपश्चर्येमुळे त्याला ब्रह्मप्राप्ती होते. धैर्यशील वृत्तीने तो मदत करणारा होतो. तर वृद्धांची सेवा केल्यामुळे तो बुद्धिमान होतो.) (१५०)

२) यक्ष उवाच – इन्द्रियार्थाननुभवन् बुद्धिमान् लोकपूजित: ।
सम्मत: सर्वभूतानाम् उच्छ्वसन् को न जीवति ।।

युधिष्ठिर – देवतातिथिभृत्यानां पितॄणामात्मनश्च य: ।
न निर्वपति पञ्चानामुच्छ्वसन् न स जीवति ।।

(अर्थ – यक्ष विचारतो – इंद्रियाचे जे शब्दादि विषय त्यांचा उपभोग घेणारा, बुद्धिमान, लोकांमध्ये मान्यता असणारा, तसेच सर्व प्राणीमात्रांना मान्य असा कोणता मनुष्य जिवंत असूनही मेल्याप्रमाणेच आहे ?

युधिष्ठिराचे उत्तर – देवता, अतिथी, सेवक, पितर आणि आत्मा ह्या पांचांना जो काहीच अर्पण करत नाही– देत नाही,तो मनुष्य जिवंत असूनही मेल्याप्रमाणे आहे.) (१५१)

३) यक्ष उवाच – किंस्विदेकपदं धर्म्यं किंस्विदेकपदं यश: ।
किंस्विदेकपदं स्वर्ग्यं किंस्विदेकपदं सुखम् ।।

युधिष्ठिर – दाक्ष्यमेकपदं धर्म्यं दानमेकपदं यश: ।
सत्यमेकपदं स्वर्ग्यं शीलमेकपदं सुखम् ।।

---

१५०) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आरण्यकपर्व ३.२९७.२८, २९)

१५१) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आरण्यकपर्व ३.२९७.३८, ३९)

(अर्थ – यक्ष विचारतो – धर्माच्या पर्यवसानाचे मुख्य स्थान कोणते ? यश:प्राप्तीचे मुख्य साधन कोणते ? स्वर्गप्राप्तीचे साधन काय ? आणि खरे सुख कशात आहे ?

युधिष्ठिराचे उत्तर – धर्माच्या पर्यवसानाचे मुख्य स्थान दक्षता होय. यश:प्राप्तीचे मुख्य साधन दान हे आहे. स्वर्गप्राप्तीचे मुख्य साधन सत्यनिष्ठ आचरण. तसेच सर्वश्रेष्ठ सुखप्राप्तीचे साधन चारित्र्यसंपन्नता किंवा शील हेच होय.) [१५२]

४) यक्ष उवाच – धन्यानामुत्तमं किंस्वित् धनानां स्यात् किमुत्तमम् ।
लाभानाम् उत्तमं किं स्यात् सुखानां स्यात्किमुत्तमम् ।।

युधिष्ठिर – धन्यानामुत्तमं दाक्ष्यं धनानामुत्तमं श्रुतम् ।
लाभानां श्रेष्ठमारोग्यं सुखानां तुष्टिरुत्तमा ।।

(अर्थ – यक्ष विचारतो – द्रव्यप्राप्तीच्या साधनांमध्ये उत्तम साधन कोणते ? धनांमध्ये उत्तम धन कोणते ? लाभांमध्ये श्रेष्ठ लाभ कोणता ? आणि सुखामध्ये श्रेष्ठ सुख कोणते ?

युधिष्ठिर – दक्षता हे द्रव्यप्राप्तीचे उत्तम साधन होय. विद्या हे धनामध्ये उत्तम धन होय. आरोग्य हा सर्व लाभांमधील श्रेष्ठ असा लाभ होय. तर संतोष–समाधानी वृत्ती हे सर्व सुखांमधील श्रेष्ठ सुख आहे.) [१५३]

५) यक्ष उवाच – किं नु हित्वा प्रियो भवति किं नु हित्वा न शोचति ।
किं नु हित्वा अर्थवान्भवति किं नु हित्वा सुखी भवेत् ।।

युधिष्ठिर – मानं हित्वा प्रियो भवति क्रोधं हित्वा न शोचति ।
कामं हित्वार्थवान्भवति लोभं हित्वा सुखी भवेत् ।।

(अर्थ – यक्ष विचारतो – कशाचा त्याग केल्यामुळे मनुष्य सर्वांना प्रिय होतो ? कोणती गोष्ट सोडून दिल्याने त्याला दु:ख करावे लागत नाही ? कशाचा त्याग केल्याने तो धनवान् (श्रीमंत) होतो ? कोणत्या गोष्टीचा त्याग केल्याने तो सुखी होतो ?

युधिष्ठिर – मानाचा (अभिमान/अहंकाराचा) त्याग केल्याने तो सर्वांना प्रिय होतो. क्रोधाचा त्याग (संताप/राग) केल्याने त्याला दु:ख करावे लागत नाही.काम (उपभोगाच्या इच्छेचा/आशेचा) त्याग केल्याने तो श्रीमंत –धनवान होतो. तसेच लोभाचा त्याग केल्याने तो सुखी होतो.) [१५४]

---

१५२) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आरण्यकपर्व ३.२९७.४८, ४९)

१५३) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आरण्यकपर्व ३.२९७.५२, ५३)

१५४) BORI प्रमाणित प्रत म.भा. वनपर्व (आरण्यकपर्व ३.२९७.५६, ५७)

# उपयोजन

अशाप्रकारे महाभारत हे आपले राष्ट्रीय महाकाव्य वैयक्तिक, सामाजिक तसेच राष्ट्रीय मूल्यांचा संस्कार अतिशय प्रभावीपणे करू शकेल यात संशय नाही.

महाभारतातील अगणित कथा, त्यातील महत्त्वाच्या व्यक्ती, त्यांच्या तत्त्वनिष्ठा, विदुरनीती, यक्षप्रश्न यातून प्रकट झालेले सदाचरणासंबधीचे विचार या सर्वांचेच राष्ट्रीय तसेच वैयक्तिक मूल्यसंस्कारात अनन्यसाधारण स्थान आहे हे निश्चित !

१) आजच्या काळातील उपयुक्तता –

आजच्या काळात शिक्षणक्षेत्रातील सर्वच आयोगांनी शालेय विद्यार्थ्यांवर चिरंतन व राष्ट्रीय मूल्यांचे संस्कार केले जावेत यावर मोठाच भर दिला आहे. मूल्यशिक्षणासाठी शालेय वेळापत्रकात खास वेळ दिला आहे. यादृष्टीने प्रस्तुत प्रबंधाचा शालेय विद्यार्थ्यांवर संस्कार करणाऱ्या दृष्टीने निश्चितच उपयोग होईल अशी खात्री वाटते.

शालेय शिक्षणामध्ये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत तीन स्तर मानले जातात. इयत्ता १ ली ते ४ थी प्राथमिक स्तर, ५ वी ते ७ वी – पूर्व माध्यमिक स्तर. तसेच ८ वी ते १० वी हा माध्यमिक स्तर असे विभाग आहेत. महाभारतातील आरूणी, उपमन्यु कथा, बकासुर कथा, घोषयात्रा प्रसंग, कौशिक ब्राह्मणाची कथा इत्यादि कथांचा समावेश त्या त्या स्तरानुसार भाषाविषयक पाठ्यपुस्तकातून करता येईल. तसेच विदुरनीतीमधील संवेदनशीलतेतील सुभाषिते, संकीर्ण सुभाषिते, यक्षप्रश्नकथा यांचा उपयोगही पाठ्यपुस्तकांमध्ये त्या त्या स्तरानुसार करता येईल. भीष्म, युधिष्ठिर, श्रीकृष्ण यासारख्या आदर्श व्यक्तींचे व्यक्तिचित्रण देऊन त्यांच्या अंगच्या गुणांचे प्रकटीकरण करून त्याद्वारा विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार निश्चित करता येतील.

२) पुढील संशोधनासाठी दिशा–

राष्ट्रीय मूल्यशिक्षणात, तसेच वैयक्तिक व सामाजिक मूल्यशिक्षणात महाभारताचे स्थान कसे महत्त्वाचे आहे, हे आपण पाहिले. महाभारतातील आदिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व, भीष्मपर्व, शान्तीपर्वातील आपद्धर्म या पर्वांची उपयुक्तता कशी आहे हे आपण पाहिले.

यांप्रमाणेच महाभारतातील उरलेली पर्वेयादृष्टीने कशी उपयुक्त आहेत हे पाहता येईल. स्त्रीपर्व, आश्वमेधिक पर्व, अनुशासन पर्व, आश्रमवासिक पर्व, मौसलपर्व, विराटपर्व, शान्तीपर्वातील राजधर्म व मोक्षधर्म हे भाग, यांचा उपयोग मूल्यशिक्षणात कशाप्रकारे उपयुक्त ठरेल यादृष्टीने वरील पर्वांचे संशोधन उपयुक्त ठरेल.

३) महाभारताप्रमाणेच रामायण हे महर्षी वाल्मीकींचे महाकाव्य आसेतुहिमाचल भारतीयांच्या जीवनात अढळस्थानी आहे. यातील प्रसंग, आदर्श व्यक्तिरेखा यांचा अभ्यास मूल्यसंस्कारांच्या दृष्टीने कसा उपयुक्त ठरेल यादृष्टीने पुढील संशोधनासाठी हा प्रबंध उपयुक्त ठरेल.

तसेच अलिकडच्या काळात बापूजी अणे यांचे 'तिलकयशोर्णवम्', श्री.भा.वर्णेकरांचे शिवराज्योदयम्, शारदा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले गं.बा.पळसुले यांचे स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील 'वैनायकम्' तसेच प्र.शं.जोशी यांचे 'भीमायनम्' ही महाकाव्ये प्रसिद्ध आहेत. तेव्हा लोकमान्य टिळक, शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील मूल्यदर्शन घडविणारे प्रसंग व त्याद्वारा मूल्यशिक्षण यादृष्टीनेही संशोधनास वाव आहे असे वाटते.

-✻-✻-✻-✻-✻-

# संदर्भसूची


अ) मूळग्रंथ –

महाभारत प्रमाणित प्रती

प्रकाशक –भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट – पुणे.

१) आदिपर्व – १९३३ Vol. 1

२) सभापर्व – १९४४ Vol. २

३) वनपर्व भाग १ – १९४२ Vol. ३

वनपर्व भाग २ – १९४२ Vol. ४

४) उद्योगपर्व – १९४० Vol. ६

५) भीष्मपर्व – १९४७ Vol. ७

६) शान्तिपर्व – १९६१ Vol. १३

७) शान्तिपर्व – १९५४ Vol. १४

८) अनुशासनपर्व – १९६६ Vol. १७

ब) आधुनिक ग्रंथ –

९) डॉ. सुजाता सिन्हा, डॉ.हेमा वर्मा, डॉ.उर्मिला सिंह – महाभारतकालीन भारतीय संस्कृती, प्रकाशक विश्वभारती पब्लिकेशन्स ८३७८/४८ अंसारी रोड, दरियागंज, नवी दिल्ली २, २००७.

१०) फाटक न. र. – महाभारताचे सुरस मराठी भाषांतर – खण्ड १ आदिपर्व, व सभापर्व प्रकाशक – आवटी विद्याधर शिवराम, सुरेखा प्रकाशन परळ ४०००१२, ३ नोव्हें १९६७.

११) गर्गेस. मा. – शान्तिपर्वातील कथा प्रकाशक– नचिकेत सदाशिव गर्गे, 'ज्ञानेश' १२०५/४, शिवाजीनगर, पुणे ४, नोव्हें १९६३.

१२) त्रिखा डॉ. राजकुमारी – महाभारतकी बोधकथाएँ, ‘अभिषेक प्रकाशन’ ५८२४, न्यू चन्द्रावल, ‘जवाहरनगर, न्यू दिल्ली– ११०००७/२००७.

१३) सातवळेकर श्रीपाद दामोदर – महाभारतकी समालोचना, प्रकाशक – सातवळेकर वसंत श्रीपाद, भारत मुद्रणालय, स्वाध्याय मण्डल, पारडी, जि. बलसाड. पृ. सं. १५८.

१४) हरदास बाळशास्त्री – महाभारतावरील व्याख्याने, प्रकाशक – दाते मुकुंद कृष्ण, ‘काळ’ प्रकाशन १४०४ सदाशिव पेठ, पुणे ३०. पृ. सं. ८७९.

१५) सातवळेकर श्रीपाद दामोदर – ऋग्वेदसंहिता, प्रकाशक – सातवळेकर वसंत श्रीपाद, भारत मुद्रणालय, स्वाध्याय मण्डल, पारडी (जि. बलसाड)

१६) भीमदेव रामानन्द अमरनाथ – वैदिक पदानुक्रमकोश

१७) हरदास बाळशास्त्री – वेदातील राष्ट्रदर्शन, प्रकाशक – शंकर नारायण दाते, २००३, सदाशिव पेठ, पुणे ३०. पृ. सं. ४६१

१८) बापट विष्णुशास्त्री – मनुस्मृती (भाषांतरासह), प्रकाशक – गजेन्द्र विठ्ठल रघुवंशी, २४२/ब, शुक्रवार पेठ, पुणे २.

१९) कंगले आर.पी. – कौटिलीय अर्थशास्त्र, प्रकाशक –श्री. साठे एम्. एस्. मॅनेजर, प्राज्ञप्रेस वाई, जि.सातारा – मुंबई विद्यापीठ १९६०.

२०) कंगले आर. पी – कौटिलीय अर्थशास्त्र, प्रकाशक – टी.व्ही. चिदंबरम् – रजिस्टार मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई १.

२१) हिवरगावकर ब. रा. – कौटिलीय अर्थशास्त्र, – मराठी भाषांतर प्रकाशक – ह.अ.भावे, वरदा बुक्स, ३९७/१, सेनापती बापट रस्ता, पुणे.

२२) भागवत हरि रघुनाथ – सार्थ उपनिषत् संग्रह (भाग १ ते ५)
प्रकाशक– वरदाबुक्स, 'वरदा' पुणे १६, १५
ऑ.१९९४

२३) जोशी गजानन नारायण – भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खण्ड १२, मराठी
तत्त्वज्ञान महाकोश मण्डल,
प्रकाशक–शुभदा सारस्वत प्रकाशन, ६७, पाटील
इस्टेट, पुणे ५. १९९६

२४) सहस्त्रबुद्धे दि.ह. – शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन,
प्रकाशक – नाना डेंगळे, साधना प्रकाशन, ४३०३१
शनिवार पेठ, पुणे ३०. १५ ऑ. १९८४.

२५) टिळक बाळ गंगाधर – भगवद्गीतारहस्य
प्रकाशक – टिळक दि. ज., टिळक शै. श्री. ५६८,
नारायण पेठ, पुणे ३०. १९ वी आवृत्ती, १९९८.
पृ.सं . ७८४

२६) ठोंबरे विद्या वा. – नीतीमूल्ये व शिक्षण,
प्रकाशक – गो. के. जोगळेकर, नूतन प्रकाशन,
२१८१, सदाशिव पेठ, पुणे ३०, ऑक्टो १९९६

२७) जोग रा. श्री. – अभिनव काव्यप्रकाश
प्रकाशक– स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, ३८१ क–
शनिवार पेठ, पुणे ३०.

२८) महाराष्ट्र शासन – भारताचे संविधान संचालक – मुद्रण व लेखनसामग्री
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २६ सप्टें
२००६.

२९) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ – शिक्षक हस्तपुस्तिका (इ. १ ली ते १० वी)

३०) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश
प्रकाशक – भारतीय संस्कृतिकोश मण्डल,
४१३, शनिवार पेठ, पुणे ३०. खण्ड ४ था – १९६७.

३१) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश,
प्रकाशक – भारतीय संस्कृतिकोश मण्डल,
४१३, शनिवार पेठ, पुणे ३०
खण्ड ५ वा – १९६८

३२) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश,
प्रकाशक – भारतीय संस्कृतिकोश मण्डल,
४१३, शनिवार पेठ, पुणे ३०
खण्ड ७ वा – १५ ऑ. १९७२.

३३) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश,
प्रकाशक – भारतीय संस्कृतिकोश मण्डल,
४१३, शनिवार पेठ, पुणे ३०
खण्ड ८ वा – ३१ ऑ. १९७४

३४) जोशी महादेवशास्त्री – भारतीय संस्कृतिकोश,
प्रकाशक – भारतीय संस्कृतिकोश मण्डल,
४१३, शनिवार पेठ, पुणे ३०
खण्ड ९ वा – १९७६

३५) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक – सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मण्डल, ५ वा मजला, सचिवालय, मुंबई ३२.
खण्ड १ ला – १९७६.

३६) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक – सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मण्डल, ५ वा मजला, सचिवालय, मुंबई ३२.
खण्ड २रा – १९७६

३७) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक – सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मण्डल, ५ वा मजला, सचिवालय, मुंबई ३२.
खण्ड ८ वा – १९७९

३८) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक – सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मण्डल,
५ वा मजला, सचिवालय, मुंबई ३२.
खण्ड १२वा – १९८५

३९) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक–'डी ब्लॉक, एन्सा हरमेंट, आझादमैदान
मुंबई–१
खण्ड १४ वा – १९८९

४०) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश,
प्रकाशक – 'डी ब्लॉक, एन्सा हरमेंट, आझादमैदान
मुंबई –१. खण्ड १७ वा, २००७.

४१) विंझे ल. गो. – संस्कृत मराठी सुभाषितकोश,
प्रकाशक – शुभदा सारस्वत प्रकाशन, ६७, पाटील
इस्टेट, पुणे ५ आवृत्ती २ री, १९९१, पृ. सं.५५०.

४२) कै.ओक जनार्दन शंकर – आपटे सरस्वतीबाई गीर्वाण लघुकोश.
प्रकाशक – द्वारकाबाई ओक तथा सरस्वतीबाई आपटे
३ ई, जमदेशपूर, बिहार (आवृत्ती ३री), १९६०.

४३) पेंडसे शंकर केशव – महाभारतातील व्यक्तिदर्शन,
प्रकाशक – भिडे मुकुंद, मॉडर्न प्रकाशन, १९६४.

४४) कर्वेइरावतीबाई – 'युगान्त'
प्रकाशक – सुलोचना राम देशमुख, देशमुख आणि
कंपनी, ४७३, सदाशिव पेठ, पुणे ३०, १९६७.

४५) भागवत दुर्गा – व्यासपर्व,
प्रकाशक – संजय वि. भागवत, मौज प्रकाशन गृह,
खटाववाडी, गिरगाव, मुंबई –४, १९६२.

४६) भावे विनोबा – गीताप्रवचने
प्रकाशक – भाऊ पानसे, मंत्री ग्राम सेवा मंडल,
नालवाडी, गोपुरी, वर्धा. १९५४.

क) इंग्रजी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १) मित्र वेद | – | **Education in Ancient India**<br>प्रकाशक – मान सिंह, आर्य बुक डेपो,<br>करोल बाग, नवी दिल्ली, जाने १९६४. |
| २) गुप्ता एन्. एल्. | – | **Education & Values in Mahabharat,**<br>प्रकाशक – अशोक कुमार मित्तल, कन्सेप्ट, पब्लिशिंग कंपनी, ए १५-१६, कमर्शिअल ब्लॉक, मोहन गार्डन, नवी दिल्ली – ११००५९. |
| ३) वर्मा प्रतीक | – | **Social Philosophy in Mahabharat & Manusmriti**<br>प्रकाशक – बी.के.तनेजा, क्लॉसिकल पब्लिशिंग कंपनी, २८ शॉपिंग सेंटर, करमपुरा, न्यू दिल्ली,११००१५. १९८८, पृ.क्र. ३७६. |
| ४) आळतेकर ए. एस्. | – | **State & Government in ancient India,**<br>प्रकाशक – मोतीलाल बनारसीदास, १९६२. |
| ५) लॉ. एन्. एम्. | – | **Aspects of Ancient Indian Polity**<br>प्रकाशक – ओरिएन्य लाँगमन्स, १९६०. |
| ६) मिरासदार मंगला | – | **Political Ideas in** 'पंचमहाकाव्य'<br>प्रकाशक – इस्टर्न बुक लिंकरर्स – ५८२५, न्यू चन्द्रावल, जवाहरनगर, दिल्ली ११०००७. १९९५, पृ.क्र.३४८. |
| ७) श्री. श्रीप्रकाश | – | **Education in democracy**<br>प्रकाशक – प्रकाश प्रिंटिंग प्रेस, 'मीनाक्षी' प्रकाशन, बेगम ब्रिज, मीरत. १९६७. |
| ८) श्री. श्रीप्रकाश | – | **Religious & Moral Edu.** |
| ९) मुदलियार आयोग | – | **Report of the Secondary Education Commition** 1952-53. |
| १०) कोठारी शिक्षण आयोग | – | **Social, Moral & Spiritial Values**. 1964-66 |